भारत इतिहास संशोधक मंडळ पुरस्कृत ग्रंथमाला क्रमांक २४.

राजधानी रायगड.

लेखक

विष्णु वासुदेव जोशी.



शके १८५१

किंमत १ रुपया

[मंडळाचे सभासदांस बारा आणे]

मुद्रकः—
श्रीपाद रघुनाथ राजगुरु.
राजगुरु आणि कंपनीज प्रेस, ५१३ शनवार, पुणें २.

प्रकाशकः—
श्रीपाद रघुनाथ राजगुरु.
राजगुरु अँड को. ५१३ शनवार, पुणें २.

पुरस्कार

(१) रा. जोशी यांनीं श्रीशिवाजी महाराजांचे त्रिशतसांवत्सरिक-महोत्सवाचे निमित्तानें राजधानी रायगड हें लहानसें पुस्तक लिहून काढून मंडळाकडे पुरस्कारार्थ पाठविलें. रा. जोशी यांच्या विनंतीचा कारभारी मंडळानें विचार करून अखेर तिचा स्वीकार केला.

(२) रा. जोशी यांनीं प्रस्तावनेंत लिहिल्याप्रमाणें त्यांनीं आपलें पुस्तक आकर्षक करण्यासाठीं ऐतिहासिक संकलनाच्या शास्त्रीय मर्यादा कोठें कोठें उल्लंघिल्या आहेत. त्यामुळें बखरींतली हल्लीं निराधार व भ्रामक ठरलेली कांहीं माहिती रा. जोशी यांनीं चिकित्सेच्या अभावीं स्वीकारिली आहे. त्याचप्रमाणें रम्य भावना व मोहक भाषा यांना वश होऊन " मराठ्यांचीं युद्धें " या सारख्या ग्रंथांतील काव्यमय विचार-सरणीहि उतरून घेतली आहे; इतकेंच नव्हे, अनुसरलीहि आहे. असे जरी कांहीं दोष या पुस्तकांत असले तरी साधार अशी बरीच ऐतिहासिक माहिती रायगड किल्ल्याविषयीं रा. जोशी यांनीं जुळवून येथें दाखल केली आहे. ती महत्वाची आहे आणि एवढ्यासाठीं तिचापुर-स्कार मंडळानें केला आहे.

सुपरीक्षित व सुनिर्णीत अशी माहिती किल्ले रायगडबाबत अल्पच उपलब्ध आहे. ही ग्रंथकारास एक मोठीच अडचण भासणारी आहे. त्या-मुळें नवीन माहिती या गडाच्या रहाळांत हिंडून शोधून मिळविल्या शिवाय रायगडचा सुसंगत, साधार, व भ्रान्त कल्पनांपासून अलिप्तसा मनोरम इतिहास रचून प्रसिद्ध करितां येणार नाहीं. रा. जोशी हे उत्साही आहेत आणि आतां त्यांनीं रायगडचा विषय हातीं घेतला आहे त्यापक्षीं ही पुढील कामगिरी पुरी करण्याची जबाबदारी त्यांचेवर आपोआपच येऊन पडते. ती ते पुरी करतील अशी आशा आहे.

आपलीं मतें सांगण्याचा सर्वांसच हक्क आहे. त्याप्रमाणें अर्थात् मतभेदाचे विषय होण्यासारखींहि विधानें या पुस्तकांत आहेत तथापि तो विषय अलाहिदा आहे.

रा० जोशी परस्थळीं राहात असल्यामुळें ग्रंथ स्वतःचे देखरेखीखालीं त्यांस छापवून घेतां आला नाहीं त्यामुळें मुद्रणदोषहि ग्रंथांत पुष्कळच राहिले. तथापि रा० जोशी यांचे पुढें असलेले प्रवासी वाचक यांची विशेष गैरसोय होईल असें भय वाटत नाहीं.

रा. जोशी यांनीं आपलें काम अत्यंत प्रतिकूल स्थितींत विशेष उत्साहानें केलें आहे. त्यामुळें पुढील आवृत्तींत हे दोष जाऊन नवीन माहिती व नवी मांडणी यांनीं ती अलंकृत करून ते सर्वांची –म्हणजे शास्त्रीय इतिहासाचे वाचक व साधारण रसिक वाचक या उभयतांची–संतुष्टि साधतील अशी आशा वाटते.

दोष फार लवकर दिसतात व त्यांचा बोभाटाहि फार होतो; गुणांवर बरेच वेळां नजर पोचावी तितकी पोचत नाहीं. तरी असा प्रकार या ग्रंथासंबंधानें न व्हावा आणि रा० जोशी यांनीं केलेल्या प्रयत्नांस शक्य तितकें प्रोत्साहन यावें याच हेतूनें या ग्रंथास पुरस्कृत–ग्रंथ–मालेंत स्थान दिलें आहे. तीच दृष्टि ठेऊन रा. जोशी यांचे ग्रंथाचा स्वीकार महाराष्ट्र करील तर पुढील काम करण्यास त्यांस उत्साह प्राप्त होईल.

ज्येष्ठ शु॥ ६ }
पुणें १८५२ }

दत्तो वामन पोतदार.
चिटणीस भा. इ. सं. मंडळ, पुणें.



श्री शिवाजी महाराजांच्या समाधीवरील छत्री.

प्रस्तावना.

रायगड किल्ला ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचा आहे. दरवर्षी पुष्कळ प्रवासी रायगड पाहण्यास येतात. "हिंदवी स्वराज्याची पहिली राजधानी" ह्या भावनेनें रायगडची यात्रा करणारेच प्रवासी पुष्कळ. अशा प्रवाशांना उपयोगीं पडावें, म्हणून हें पुस्तक लिहिलें आहे. रायगडच्या वर्णनाचीं छोटीं दोन पुस्तकें ह्यापूर्वी मराठींत प्रसिद्ध झालीं आहेत. प्रस्तुत पुस्तकांत रायगड विषयक संपूर्ण ऐतिहासिक माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला असून, प्रवाशांना उपयुक्त असे मार्ग व स्थळवर्णन हीं संपूर्ण दिलीं आहेत. इतिहास समकालीन अस्सल पत्रांचा उपयोग करून लिहिला पाहिजे हें लक्षांत वागवन, कै० इतिहासाचार्य राजवाडे यांच्या खंडांचा व इतर साहित्याचा भरपूर उपयोग केला आहे. परंतु पत्रावरून उपलब्ध झालेल्या माहितींत मध्यंतरीं जो खंड पडला तो बखरी वगैरेंच्या साह्यानें भरून काढला आहे. सोन्याचे मणी ओवून मध्यंतरीं राहिलेल्या जागा कलाबतूनें भरून काढाव्या तशांतलाच हा प्रकार. रायगडावर येणाऱ्या प्रवाश्यांची दृष्टि इतिहासकाराइतकी चिकित्सक नसून, यात्रेकरुसारखी भाविक असते. म्हणून पुस्तक लिहितांना वर्णनें व माहिती थोडी भावनापूर्ण व क्वचित् सावेश अशी लिहिलीं आहेत. एकंदर पुस्तक मनोरंजक व्हावें म्हणून, कै० प्रो. शि. म. परांजपे यांच्या "मराठ्यांचीं युद्धें" या पुस्तकांतील रायगडविषयक काल्पनिक मोहक वर्णनें व श्री. भालचंद्र यांच्या तीन सुंदर कविता समाविष्ट केल्या आहेत. शुद्ध इतिहास कथनाच्या कसोटीला हा मनोरंजपकणा उतरणार नाहीं हें कबूल केलें पाहिजे व त्याकरतां शेवटीं इ. सं. शंकरराव जोशी यांचा खुलासा जोडला आहे. सारांश, हें पुस्तक मुख्यत्वें करून "रायगड हें राजकीय पुण्यक्षेत्र आहे" अशा भाविकपणें जे यात्रेकरु तेथें जातात व तेथील स्थल-कालाच्या इतिहासाची पृच्छा करतात; त्यांच्या भाविक जिज्ञासेला तृप्त करण्यासाठीं लिहिलें आहे. मला वाटतें रायगडच्या प्रवाश्यांना हें पुस्तक यथायोग्य माहिती पुरवील. रायगडावर गेल्यावर उत्पन्न होणारे "कोठें व काय" हे प्रश्न सोडविण्यास या पुस्तकाचा उपयोग झाल्याविना राहणार नाहीं.

हें पुस्तक रायगडावर यंदां (शके १८५१) होणाऱ्या उत्सवप्रसंगीं प्रसिद्ध व्हावें म्हणून थोडे घाईनें छापिलें. त्यामुळें मुद्रितें कसोशीनें तपासतां आलीं नाहींत. दुसरें असें कीं माझें राहणें दूर खेडेगांवीं असल्यामुळें पुस्तक स्वतःच्या देखरेखीखालीं छापितां आलें नाहीं म्हणून कांहीं दोषस्थळें राहिलीं आहेत.

रायगडचा साधार, संपूर्ण व सत्य असा सर्वांग परिपूर्ण इतिहास लिहावयाचा असला तर रायगडच्या आसमंतात् हिंडून बरेंच संशोधन–कार्य व्हावयास पाहिजे; मीं थोडासा तसा प्रयत्न केला आहे. परंतु अद्याप पुष्कळच अस्सल आधार उपलब्ध व्हावयास पाहिजेत. पुढील आवृत्तीचा योग आल्यास तसा प्रयत्न करून पुस्तकाची उपयुक्तता वाढविण्याचा माझा मानस आहे.

पुस्तक लिहितांना भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या ग्रंथालयाचा पूर्ण उपयोग करून घेण्याची परवानगी मंडळाच्या चालकांनीं दिली; व माझें पुस्तक पुरस्कृत ग्रंथमालेतर्फे पुरस्कृत केलें; याबद्दल मी मंडळाचा व चिटणिसांचा आभारी आहे.

आचार्य भागवत यांच्या समर्थ–ग्रंथ संग्रहालयाचाही मला प्रामुख्यानें उपयोग झाला. या संग्रहानें माझी आधारग्रंथ मिळण्याची अडचण दूर केली.

माझें पुस्तक "राजगुरु आणि कंपनी" यांनीं प्रसिद्ध करण्याचें ठरवुन वेळच्यावेळीं व सुंदर असें छापून प्रसिद्ध केलें याबद्दल मी त्या कंपनीच्या चालकांचा ऋणी आहे.

हा ग्रंथ लिहिण्याचे कामीं मला ज्या कित्येक विद्वान् ग्रंथकारांच्या ग्रंथांचा व लेखांचा उपयोग झाला त्या सर्व ग्रंथकारांचे मी अत्यंत नम्रतापूर्वक आभार मानतों.

माझ्या कित्येक विद्वान् आणि प्रेमळ मित्रांनीं मला सर्वतोपरी साह्य केलें त्यांचा मी सदैव ऋणी आहे.

मु॰ बिरवाडी
मकरसंक्रांत
शके १८५१

आपला नम्र,

विष्णु वासुदेव जोशी.

राजधानी रायगड.

अनुक्रमणिका.

प्रकरण १ लें:--विषयोपक्रम [१] गुलामगिरीचें मोहपटल [२] मानसिक उत्क्रांति. [३] स्वातंत्र्यात्मा सह्याद्री. [४] सह्याद्रीचें स्थान. [५] शिखरें [६] ऐतिहासिककालीं किल्ल्यांचें महत्त्व. [७] तुलना. [८] रायगडचें स्थान. [९] पुढील प्रकरणाचा उपोद्घात.

प्रकरण २ रें:--शिवपूर्वकालीन रायगड. [१] दख्खनची प्रादेशिक स्थीरता. [२] श्री. दिक्षीत यांच्या निबंधांतील उतारा. [३] राजगिरी [४] आणखी उतारे.

प्रकरण ३ रें:--शिवकालीन रायगड. [१] जहागिरदार शिवाजी. [२] शहाजीची कैद. [३] पुत्रवात्सल्य व पितृभक्ति [४] चंद्रराव मोऱ्याला मदत. [५] चंद्ररावाशीं बिघाड. [६] राजगडचा ताबा. [७] राजगड राजधानी. [८] रायगडचा कबजा. [९] शकासंबंधी भिन्न मतें. [१०] निश्चित अनुमान. [११] राजकारणाचें पर्यालोचन. [१२] विजापुरकर व मोंगल यांचें भांडण. [१३] औरंगजेबाचा राग. [१४] विश्वासघाताचा सूड. [१५] राजगडावरील हालचाली. [१६] सुरक्षित राजधानीची आवश्यकता. [१७] रायगडचा सुरक्षितपणा [१८] दुर्गम रायगड. [१९] युद्ध साहित्याला

अडथळा. [२०] राजधानी हीच राष्ट्राची इभ्रत. [२१] आरमाराची उत्पत्ति. [२२] यशाची गुरुकिल्ली [२३] जंजिरा व रायगड [२४] सुवर्णमध्य रायगड. [२५] राज्याभिषेक महोत्सव (२६) उत्सव समयींचे पाहुणे. [२७] राज्याभिषेक महोत्सवाची फलश्रुति. [२८] जिजाईचा मृत्यु. [२९] राजधानीची बांधणी. [३०] महाराजांचा मृत्यु- १६–५५,

प्रकरण ४ थें:—रायगडावरील दुर्घटना [१] राजारामाचें मंचकारोहण. [२] संभाजीची सुटका व रायगडावरील नरमेध. [३] बिरवाडी येथील दरबार. [४] संभाजीच्या रायगडवरील हालचाली. ५०–६१

प्रकरण ५ वें: –रायगडचा वेढा. [१] संभाजीचा वध. [२] येसुबाईचें धीरोदात्त वर्तन. [३] रायगडावरील ऐक्य परिषद [४] वेढ्याची हकिगत [५] पाडाव व लूट [६] पुन्हां रायगड घेण्याचा प्रयत्न. ६२–६८

प्रकरण ६ वें:—पेशवाईतील रायगड. [१] दोन उपमा [२] राजकारणाचा दुवा. [३] सातारा राजधानी [४] जंजिऱ्यावरील स्वारीचा पूर्वेतिहास [५] बाजीरावाची जंजिऱ्यावरील स्वारी. [६] रायगड ताब्यांत आला. [७] शिद्दीशीं तह. [८] किल्लेदाराची बंडखोरी. [९] रायगडास उपद्रव [१०] तोतयाचें बंड व रायगडाचा बंदोबस्त [११] शत्रूपासून बचाव. ६९–८०

प्रकरण ७ वें:- -रायगडच्या स्वातंत्र्याचा शेवट. [१] रायगडची मजबुती. [२] कॅ. प्रॉथर वेढा देतो. [३] दारु कोठाराचा भडका. [४] अखेरचा तह. [५] [कै. शि. म. परांजपे यांच्या मराठ्यांच्या लढाया

या ग्रंथांतील उतारे.] बाराणसी बाईचा बाणेदारपणा [६] कांगोरी व प्रतापगड यांची मदत [७] किल्ल्यांची सभा. ८१–८९

प्रकरण ८ वें:–- **इंग्रजी अमलांतील रायगड** [१] उत्सव व राष्ट्र जागृति. [२] शिवाजी उत्सवाचें विरोधी वर्णन. [३] रायगडची दुर्दशा. [४] सरकारचें लक्ष वेधलें [५] लो० टिळकांचे प्रयत्न. [६] हिरा-बागेंतील सभा व स्मारक फंडाचा इतिहास. [७] पहिल्या महोत्सवाची पूर्व तयारी. [८] पहिला उ-त्सव. [९] पुढचे प्रयत्न. [१०] एक जुना प्रयत्न. [११] दुसरा उत्सव. [१२] तिसरा उत्सव. [१३] चवथा उत्सव [१४] रायगड शिवस्मारक कमेटी. [१५] रायगड व कुलाबा जिल्हाबोर्ड. ९०–११०

प्रकरण ९ वें:– **रायगडावर आण्याचे नवे व जुने मार्ग.** [१] मार्गांचा अनिश्चितपणा. [२] मुख्य केंद्रें [३] मुंबई ते महाड. [४] पुणें ते महाड. [५] कोल्हा-पुर ते महाड. [६] गोवें ते महाड. [७] कल्याण ते महाड. [८] महाडचें वर्णन [९] महाड ते रायगड. [१०] माणगांव ते रायगड. [११] निजामपूर ते रायगड. [१२] विरवाडी ते रायगड [१३] प्रवासांत सूचना [१४] आसपास [१५] छत्री–निजामपूर [१६] शिवतर घळ [१७] ऐति-हासिक माहिती. [१८] पाल्याचीं लेणी. [१९] कांगोरी किल्ला. [२०] दोन जुने मार्ग. १११–१२३

प्रकरण १० वें:– **रायगडचें आजचें दर्शन.** [१] रायगडचा पायथा [२] नाना दरवाजा [३] महा दरवाजा [४] गंगासागर तलाव [५] मनोरे [६] राजसभा

[७] नगारखाना [८] बाजार पेठ [९] जगदीश्वराचें मंदीर [१०] महाराजांची समाधि व छत्री [११] बारा टाकीं [१२] भवानी टोंक [१३] [१४] किरकोळ माहिती. १२४–१३५

प्रकरण ११ वें:–उपसंहार [१] तरुणांच्या आकांक्षा [२] तुलसीदल [३] ग्रंथाचें समालोचन [४] अभिवादन. १३६ –१३९


परिशिष्टः– [१] दिलचंगा [२] अनुचर [३] हिरकणी. १४०–१४५


[२] रायगडावरील इंग्रज कैदी–(शं. ना. जोशी) शिवकाल. १४७. ,,

[३] रायगड शकावली १५० ,,

[४] कांहीं खुलासा. १५३ ,,

[५] शुद्धीपत्र १५६ ,,


रायगडचा घेरा,
पायवाट
गाडीरस्ता
घोसाळगड
घोसाळे
मुरुड
राजापुरी
जंजिरा
दांडा
बिरवली
निजामपूर
भानगड
इंदापूर
लिंगाणा
पुनाडे
निजामपूर
तोरणा
रायगड
पाचाड
राजगड
सोनगड
वाघोली
नातें
चांभारगड
बिरवाडी
महाड
बरंध
बरंधाघाट
आंबोलीघाट
पिंपळवाडी
कांगोरगड
पोलादपूर
प्रतापगड
पारघाट
तयार करणार. य. वि. जोशी. शिक्षक. बिरवाडी.
C.S.P. Poona


भवानी
उध्वस्त भाग
धर्मशाळा
बारा टाकीं
दारूच्या कोठ्या
निजामपूर
टकमक
दारूच्या कोठ्या
पीर
बाजारपेठ
होळीचा माळ
वाडी
राजवाडा
कुशावर्त
तलाव
चोरदरवाजा
कलुशाचा वाडा
तलाव
श्रीगोंदे टोक
हिरकणी
किल्लेरायगड.
तयार करणार: य. वि. जोशी, शिक्षक, विरवाडी.

C.S.P. POONA.

राजधानी रायगड

प्रकरण १ लें.

विषयोपक्रम.

क्षत्रियकुलावतंस छत्रपती शिवाजी महाराजांनीं स्थापन केलेल्या स्वराज्याची पहिली राजधानी रायगडीं स्थापन झाली, म्हणून रायगडास महाराष्ट्राचें किंबहुना अखिल भारताचें राजकीय पुण्यक्षेत्र म्हणण्यास हरकत नाहीं. बाराव्या शतकाचे अखेरीस मुसलमानांचा हिरवा झेंडा दक्षिणेंत फडकल्यापासून सारी दख्खन त्यांच्या राजकीय आघातांनीं हादरून गेली. विजयनगरच्या बलिष्ठ हिंदू साम्राज्याचा मुसलमानांनीं पराभव केल्यापासून तर आसेतु दख्खन त्यांच्या राजकीय व धार्मिक अर्धचंद्राखालीं पिचली गेली. माने, घाटगे, चाळके, शिंदे, सावंत, शेलार इ. इ. पराक्रमी मराठे सरदार मुसलमानांच्या सत्तेचे भक्त बनले. आपल्या स्वातंत्र्याचा विसर त्यांना पडून मुसलमान बादशहांकडून मिळणाऱ्या किताब-जहागिरींतच ते धन्यता मानूं लागले. पारतंत्र्यपंकांत लोळण्याची संवय झालेले हे पिढीजाद राजे त्या पंकांत पिचत पडण्यांतच अहमहमिकेनें भाग घेऊं लागले. बादशाही नोकरीच्या सोनेरी बेड्यांनीं बद्ध झालेले हे पराक्रमी हात आपलें शक्तिसर्वस्व खर्चून मायभूमीला पारतंत्र्यांत जखडून टाकणाऱ्या बादशाही सत्तेचे आधारस्तंभ बनले. पोपटाची अशी गोष्ट सांगतात कीं, तो फासेपारध्यानें लाविलेल्या नळीवर बसतांच स्वतःच्या भारानें नळी फिरून उलटा होतो व

आपण पडूं नये म्हणून नळीला जास्त जास्तच घट्ट धरून ठेवितो. आणि आश्चर्य हें कीं, सुटण्यासाठीं पंख सारखे फडफडवीत असतो. पारतंत्र्यांत सांपडलेल्या मनाची अशीच तिरबागडी पक्कड बसल्यागत स्थिति होते. तें धड त्या पारतंत्र्यांत रहात नाहीं पण पारतंत्र्याचा आधार तर सोडीत नाहीं. उलट जास्तजास्तच बळकट धरीत राहतें. तेराव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंत महाराष्ट्राची हुबेहुब अशीच स्थिति झाली होती. लुकजी जाधवराव, शहाजी–मालोजी निंबाळकर यांसारखे मातब्बर व फौजबंद सरदार कोणत्या तरी बादशहाला कुंकवाचा धनी करून आपण राजकीय घडामोडींत अग्रपूजेचा मान मिळवीत. बादशहत ही मुसलमानांकरितां ईश्वरानें उत्पन्न केलेली आहे. तिचा ताम्रपट मुसलमानांच्या नांवें करून दिला आहे. ही गुलामी मनोवृत्ति तत्कालीन सर्व नाणावलेल्या सरदारांच्या ठायीं दिसून येते.

२. ह्या गुलामी वृत्तीच्या राखेच्या ढिगांतून क्रांतीच्या वावटळीनें असा एखादा स्फुलिंग उत्पन्न होतो कीं, तो सर्व राष्ट्रच्या राष्ट्र नव्या विचाराच्या अग्निज्वालेनें भडकवून टाकितो. तशा प्रकारचा पुरुष सतराव्या शतकाच्या प्रारंभींच महाराष्ट्रांत उदयास आला. क्रांतिकारक पुरुषाचें आयुष्य उपजल्यापासून क्रांतीचे आघात करीत सुटतें. मुसलमान बादशाह सिंहासनावर बसावा आणि आपण समोर हात बांधून “ खाविंद ! आपके बंदे गुलाम ” म्हणून कुर्निसात करावा ही तत्कालीन सरदारांची नित्याची गोष्ट सुद्धां तो क्रांतिकारक करावयास अगदीं अल्पवयांत धजेना. हा क्रांतिकारक “ शिवाजी ” होय, हें वाचकांनीं ओळखिलें असेल. “स्वराज्याची उत्कट इच्छा व परकीय सत्तेचा पुरा वीट ” हेंच शिवाजी व त्याचे जोडीदार यांच्या कर्तबगारीच्या मुळाशीं असलेलें तत्त्व ! याच्या आड येणाऱ्या प्रत्येक गोष्टींत त्यांनीं परंपरा झुगारून क्रांतीच केली. मग दरबारांतून करावयाचा कुर्निसात असो अगर अफझुलखानाचा वध असो. शिवाजीनें केलेली ही क्रांती राष्ट्रास पारतंत्र्याच्या खोल गर्तेतून स्वातंत्र्याच्या देदीप्यमान सिंहासनाकडे नेणारी अशी झाली.

३. नगाधिराज हिमालयाचें विशाल भव्य सौंदर्य पाहून अनेक प्राचीन व अर्वाचीन कवींनीं त्याचें काव्यस्तोत्र गाइलें, हें हिमालयाचें पावित्र्य पाहून

त्याला ' देवतात्मा ' असें म्हटलें तर आमच्या सह्याद्रीला ' स्वातंत्र्यात्मा ' असें म्हटलें पाहिजे. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत असलेलीं २४ मावळें म्हणजे स्वातंत्र्याचें मूर्तिमंत निवासस्थान होय. दक्षिणेंत जरी त्या मुसलमानी पादशहांचा अम्मल सर्वत्र नांदत होता तरी ह्या मावळ खोऱ्यांत राहणाऱ्या मावळ्यांच्या मनावर त्याचा गुलमी मुलामा कधींच चढला नाहीं. मावळचे देशमुख-देशपांडे आपापल्या मुलखांत पूर्ण स्वतंत्र असत. बादशाहाची ' पगडीबदल ' झाली तरी ह्यांच्या स्वातंत्र्यास त्यामुळें बाध येत नसे. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत वावरणारे मावळे दिसण्यांत जरी बावळे असले तरी त्यांच्या ठिकाणीं स्वातंत्र्याभिमान पूर्णपणें वावरत होता. खोऱ्यांतील एकाच जलप्रवाहाचें पाणी पिणारे, एकाच देशमुखाच्या ताब्यांत वावरणारे, मायभूमीची सेवा करून स्वकष्टानें उत्पन्न झालेलें अन्न खाणारे हे लोक, राजकीय आर्थिक व धार्मिक बाबतींत नेहमीं पूर्ण स्वावलंबी असत. पश्चिमसमुद्रावरून येणाऱ्या वाऱ्यानें पडणारा विपुल पर्जन्य, पर्वताच्या उतरणीवर उगवणाऱ्या विपुल वृक्षश्रेणींनीं नटलेला हरिततृणांकुराच्छादित रम्य भूप्रदेश, शुद्धोदकाचे असंख्य निर्झर, व अशा पवित्र व रम्य वातावरणांत वावरणारे सात्त्विक अंतःकरणाचे मावळे लोक, अशी परिस्थिति जेथें असेल तेथें पारतंत्र्याचे पाश कसे टिकून राहाणार ? म्हणूनच उंच डोंगरांच्या गिरिशिखरांवर आणि दऱ्याखोऱ्यांतून स्वातंत्र्य मूर्तिमंत वावरत असतें असें म्हटलें जातें. *

४. सह्याद्रीची रांग पश्चिमसमुद्राच्या (अरबी समुद्र) तटाशीं समांतर आहे. मुख्य पर्वताची ओळ व समुद्रकिनारा यांत सुमारें २५ मैलांची जमिनीची एक पट्टी आहे. या भूप्रदेशास कोंकण असें म्हणतात. सह्याद्रीचे समुद्राकडील अंग जास्त उंच आहे. व पूर्वेकडे तो क्रमाक्रमानें उतरता होत गेला आहे. सह्याद्री व समुद्र यांमधील कोंकणपट्टी जरी सखल आहे, तरी ती सपाट नाहीं. पर्वताचे कित्येक फाटे थेट समुद्रांत सोंडेसारखे घुसले आहेत. सह्या-

---

*मावळ प्रांतांतील देशमुख, देशपांडे फारच स्वतंत्र वृत्तीनें वागत. मलिकंबरची राज्याच्या अंतर्व्यवस्थेसंबंधीं फार प्रसिद्धी आहे. पण त्याच्या वेळींहि हे मावळ प्रांतांतील देशमुख मुख्य सत्तेला जुमानून नसत, याचें कारण या प्रांताची विशिष्ट भूपृष्ठरचना हेंच असावें.

द्रीच्या दक्षिणोत्तर रांगेशीं काटकोन करणारे हे फाटे कित्येक ठिकाणीं मुख्य ओळीशीं सलग आहेत तर कोठें तिच्याशीं विलग आहेत. कित्येक मुख्य रांगेपासून दूर समुद्रतीरीं आहेत, तर कित्येक मुख्य रांगेच्या नजीकच पण विलग आहेत. हिमालयाच्या क्रमाक्रमानें चढत्या अनेक रांगा असून त्या मुख्य रांगेशीं समांतर आहेत. त्यांत दोन समांतर रांगा मुख्य आहेत. सह्याद्रीची रचना अशी नाहीं. त्याची मुख्य एकच एक उंच रांग असून तिच्या पासून पूर्वेस व पश्चिमेस अनेक ' सोंडा ' काटकोन करून निघाल्या आहेत. सह्याद्रीचे जे फाटे पूर्वेस म्हणजे देशावर गेले आहेत त्यांत विलग किंवा सुटे डोंगर क्वचित् आढळून येतात. जे फाटे पश्चिमेस गेले आहेत त्यांत विलग डोंगर बरेच आहेत. सह्याद्रीच्या मुख्य रांगेपासून विलग असलेल्या ह्या डोंगरावर शिवपूर्वकालीं व शिवकालीं कित्येक डोंगरी किल्ले बांधिले गेले. सह्याद्रीच्या ओळीची समुद्रसपाटीपासून सुमारें सरासरीं उंची ४००० फूट आहे. या ओळींत कित्येक शिखरें ह्यापेक्षां उंच आहेत. महाबळेश्वर, माथेरान, सप्तश्रृंग, अंजनेरी, मलयागिरी, कळसूबाई इत्यादि उंच शिखरें म्हणून सांगतां येतील. हीं शिखरें उंच असलीं तरी त्यांवर एकही डोंगरी किल्ला बांधिला गेला नाहीं. याचें कारण असें—शिखरांची उंची समुद्रसपाटीपासून बरीच उंच असली तरी मुख्य पर्वताच्या पठारावरून त्यांची उंची कमीच असते. पर्वताच्या पठारावर उभे राहणाऱ्याला शिखरें फारशीं उंच वाटत नाहींत. मुख्य ओळीच्या पठारावर येण्याची वाट रोखून धरणें जड जातें. पर्वताच्या लांबच लांब रांगेवर शत्रू कोठूनही येऊं शकेल व त्या पर्वतश्रृंगाला वेढा देऊं शकेल. दुसरें सह्याद्रीच्या पठारावर फारशी वस्ती नाहीं. मुख्य वस्ती वर सांगितलेल्या दोन सोंडांमधील दऱ्यांत किंवा मावळांत आहे. या मावळ मुलुखावर जरब बसण्यासाठीं बांधावयाचा किल्ला खोऱ्यापासून दूर व उंच अशा शिखरांवर असण्यापेक्षां त्या दऱ्याखोऱ्यांच्या आसपास असावा हेंच योग्य. हें झालें सह्याद्रीच्या उंच उंच शिखरांवर डोंगरी किल्ले कां नाहींत याचें सामान्य विवेचन. आतां एक दोन विशिष्ट परिस्थितिमुळें उपस्थित झालेल्या कारणाचा विचार करूं.

सह्याद्रीवर आढळणारा काळा कातळ (खडक) हा ज्वालामुखीच्या

उद्रेकामुळें वर आलेल्या लाव्हारसापासून बनला असावा. उंच शिखरांवरील माती शेंकडों वर्षांच्या पर्जन्यानें धुपून धुपून निवळ काळ्या कातळाचे उंच सुळकेच शिल्लक उरले आहेत. ही गोष्ट महाबळेश्वरावरील एखाद्या टोकावर उभें राहिलें असतां अगर रिव्हासिंगवर उभें राहिलें असतां प्रतीत होते. अशा कातळी सुळक्यांवर जिवंत पाणी लागणें अशक्य. किल्ल्यांत राहणाऱ्या लोकांसाठीं पाण्याची योजना प्रथम करावी लागते. शक्य तों पाण्याचा जिवंत झरा असणें ही किल्ल्याच्या सुस्थितीची महत्त्वाची बाब आहे. किल्ल्यावर राहणाऱ्या लोकांच्या अन्नपाण्याची तरतूद भरपूर असणें इष्ट. ऐतिहासिककाळीं जमीन महसूल हल्लींप्रमाणें नक्त रुपये न घेतां ऐनजिनसी-धान्य, गवत, कडबा इत्यादिकांत घेत. रायगड तालुक्यांत असलेल्या कित्येक गांवांतून ऐतिहासिक काळीं धारा भाताच्या रूपानें रायगडावर नेऊन घातल्याचा जमाखर्च अद्याप पहावयास मिळतो. * ऐनजिनसी धारा कुळानें मामलतदाराच्या राहत्या गांवीं नेऊन भरण्याची चाल होती. हे मामलतदार बहुधा एखाद्या डोंगरी किल्ल्यावर राहात. तेथें कुळांना धारा म्हणजे ' धान्य ' नेऊन पोहोंचवावें लागे. म्हणून हे किल्ले पर्वताच्या उंच पठारावरील शिखरांवर न बांधितां लोकवस्तीच्या नजीक बांधण्याची योजना योग्य ठरली.

सह्याद्रीच्या मुख्य रांगेशीं काटकोन करणाऱ्या डोंगराच्या सगल व विलग ओळींत बांधिलेल्या महाराष्ट्रांतील किल्ल्यांचें प्रयोजन काय ? ऐतिहासिक काळीं महाराष्ट्राच्या राजकीय घडामोडींत किल्ल्यांचें महत्त्व फार असल्याचें दिसून येतें. यादवांची राजधानी दौलताबाद ऊर्फ देवगिरी हें नगर. तें देखील एका मजबूत डोंगरी किल्ल्याच्या आश्रयाला आहे. शत्रूंपासून आपला बचाव करण्याचें एकच साधन म्हणजे किल्ला होय! पाण्यांतील किल्ल्यानें किनाऱ्याचें रक्षण व नाकेबंदी होते. डोंगरी किल्ल्यानें चौफेर मुलखाचें रक्षण व नाकेबंदी होते. भुईकोट किल्ला फक्त नगराचें रक्षण करण्यास समर्थ असतो. ऐतिहासिक काळीं या तिन्हीही किल्ल्यांचें महत्त्व राजकारणी पुरुषांस किती वाटत असे याचें प्रत्यंतर रामचंद्रपंत अमात्यकृत आज्ञापत्रांत

* परवांपर्यंत जंजिरासंस्थानांत जमीन महसूल भाताच्या रूपानें घेत.

आढळून येईल.* प्रस्तुत स्थळीं आपणांस महाराष्ट्रांत आढळून येणाऱ्या डोंगरी किल्ल्याच्या स्थलविशेषाचा विचार कर्तव्य आहे. हा विचार करतांना शिवकालीं महाराष्ट्रांत प्रांतोप्रांतीं असलेल्या किल्ल्यांची संख्या जरूर विचारांत घेतली पाहिजे.

प्रांत			गडांची संख्या (जंजिऱ्यांसह)
वाई (सातारा)	...	...	११
कोंकण	...	...	५८
कऱ्हाड	...	...	४
मावळ	...	...	१८
पन्हाळा	...	...	१३
बागलाण	...	...	७
त्रिंबक	...	...	२५
फोंडे बिदनूर	...	...	१२
कर्नाटक	...	...	१८
श्रीरंगपट्टण	...	...	२२
येलूर (वेलोर)	...	...	२५
बनगड	...	...	२२
कोल्हापूर-बाळापूर	...	...	२७

*" गडकोटाचा आश्रय नसतां फौजेच्यानें परमुलखीं टिकाव धरून राहवत नाहीं. फौजेविरहित परमुलखीं प्रवेश होणेंच नाहीं. इतक्याचें कारण तें गडकोट विरहित, जें राज्य त्या राज्याची स्थिति म्हणजे अभ्रपटलन्याय आहे. याकरितां ज्यांस राज्य पाहिजे त्यांनीं गडकोट हेंच राज्य गडकोट म्हणजे राज्याचें मूळ, गडकोट म्हणजे राज्याचा खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचें बळ गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळें, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार. किंबहुना गडकोट म्हणजे आपलें प्राणसंरक्षण असें पूर्ण चित्तांत आणून कोणाचें भरंवशावर न राहतां आहे त्याचें संरक्षण करणें व नूतन बांधण्याचा हव्यास स्वतःच करावा गडकोट संरक्षणाचें कार्य फार नाजूक "

[रामचंद्रपंत अमात्यकृत आज्ञापत्र पृष्ठ ८।२८]

प्रांत		गडांची संख्या
चंदी	... ...	६
एकूणसंख्या	... ...	२६८*

हा किल्ल्यांचा प्रचंड प्रपंच पाहिला म्हणजे तत्कालीन राजकीय सुरक्षिततेचे किल्ले हेच मुख्य ' आधारस्तंभ ' होते, ही गोष्ट प्रत्ययास येईल. सोनोपंत डबीर (युक्त्यभिज्ञ) यांनीं किल्ल्यांचें महत्त्व महाराजांना पटवून देतांना शिवभारतकारांनीं त्यांच्या तोंडी खालील उद्गार घातले आहेत.

॥ अतोऽतिदुर्गमंस्थानमास्थाय जगतोपते ॥
॥ यतस्व जगतीं जेतुं किमजय्यं शिवस्य ते ॥ ५९ ॥
॥ कंठे कालेन कैलासः समेरुः शंबपाणिना ॥
॥ अभ्यंतरमपां पत्युः शिश्रिये दनुजारिणा ॥ ६० ॥
॥ न दुर्गं दुर्गमित्येव दुर्गम मन्यते जनः ॥
॥ तस्य दुर्गमता सैव यत्प्रभुस्तस्य दुर्गमः ॥ ६१ ॥
॥ प्रभुणा दुर्गमः दुर्गं प्रभुर्दुर्गेण दुर्गमः
॥ अदुर्गमत्वादुभयोर्विद्विषभेव दुर्गमः ॥ ६२ ॥

अर्थः--म्हणून महाराज अत्यंत दुर्गमस्थानीं राहून जग जिंकण्याचा यत्न करा; तुम्हां शिवाजी महाराजांना काय कमी आहे ? शंकरानें कैलासाचा, इंद्रानें मेरूचा, आणि विष्णूनें समुद्राचा आश्रय केला आहे.

दुर्गाला केवळ दुर्ग म्हणूनच लोक दुर्गम मानीत नाहींत तर त्याचा स्वामी दुर्गम असणें हीच त्याची दुर्गमता होय.

प्रभूमुळें दुर्ग दुर्गम होतो व दुर्गामुळें प्रभु दुर्गम होतो. दोघांच्याही अभावीं शत्रूच दुर्गम होतो.

सुधारलेल्या जगांत उत्तरोत्तर शस्त्रास्त्रांचा तिखट राक्षसीपणा वाढत चालल्यामुळें जगाच्या युद्धशास्त्रांत आतां या जुन्या गडांचा व भुईकोटांचा मुलाहिजा राहणार नाहीं असें दिसतें. हे गडकोट तोफा–बंदुकांच्या गोळ्यां-

* मल्हाररामरावकृत सप्त प्रकरणात्मक शिवचरित्रांत प्रांतवार किल्ल्याची नांवनिशीवार यादी दिली आहे. ही बखर शाहूकालीन आहे.

पासून फार तर सैन्याचें रक्षण करतील. पण विमानाच्या साह्यानें अंतरिक्षांत उडून होणारा बाँबचा वर्षाव, विषारी धूर, प्राणघातक औषधी यांच्यापासून बिचारे किल्ले कसें रक्षण करणार ? म्हणून आजकाल किल्ल्यांचें महत्त्व राजकर्त्यांना व विजिगिषु राष्ट्रांना फारसें वाटत नाहीं. तरी पण गेल्या महायुद्धांत अँटवर्पसारख्या एका किल्ल्यानें चतुरंगबलान्वित जर्मनीच्या सर्व सामर्थ्यास अनेक दिवस एकट्यानें तोंड दिलें ! जिब्रॉल्टरचा रुक्ष डोंगरी किल्ला ताब्यांत ठेवण्याबद्दल आमच्या ब्रिटिश साम्राज्यसत्तेचा केवढा अट्टाहास ! सारांश अद्याप देखील किल्ल्याचें युध्दशास्त्रदृष्ट्या महत्त्व सर्वस्वीं नष्ट झालें नाहीं.

मग ज्या काळीं बाण, गोफणगुंडे, तरवारी, भाले, तोंड्याच्या बंदुका व लहान लहान तोफा हींच काय तीं युद्धाचीं मुख्य साधनें होतीं, त्या काळीं किल्ल्यांचें महत्त्व किती असेल ? चवथ्या परिच्छेदाच्या शेवटीं सांगितल्या-प्रमाणें सह्याद्रीच्या पश्चिमेस व पूर्वेस पसरलेल्या डोंगरांमधील खोऱ्यांत असणाऱ्या डोंगरी किल्ल्यांचें ऐतिहासिक काळीं फार महत्त्व असे. कोंकण हा प्रांत धान्याच्या दृष्टीनें जरी भिकार असला तरी तो पश्चिम समुद्रालगतचा प्रांत आहे. परदेशचा सर्व व्यापार ह्या कोंकणी बंदरांतून चालू असे. व्यापारी जकातीचें फार मोठें उत्पन्न या प्रांतांतून राज्यकर्त्यांस होत असे. शिवाय मीठ, मासळी वगैरे अत्यंत उपयोगी वस्तूंचा पुरवठा देशावरील लोकांस कोंकणांतूनच होई ! म्हणून इतक्या डोंगराळ नापीक प्रदेशावर ताबा ठेवण्याची क्षत्रिय व नंतरच्या मुसलमान राज्यकर्त्यांची महत्त्वाकांक्षा असे. देशावरून कोंकणांत जाण्यास सह्याद्रीच्या खिंडींमधून ठिकठिकाणीं वाटा आहेत. या वाटा रोखून धरल्या कीं, देश व कोंकण यांमधील ‘ ये जा ’ बंद पडत असे. या वाटा रोखून धरण्यासाठीं उंच जागीं सैन्य असलें पाहिजे. म्हणून अशा घाटांच्या तोंडाशीं दोन्ही बाजूला बहुधा डोंगरी किल्ले आढळून येतात. वरंध्या घाटाचे रक्षणास कांगोरी किल्ला, पार घाटाचे नाकेबंदीस प्रतापगड, अंबवली घाटाचे रोखानें रसाळगड, तिवराघाटाचे पहाऱ्यास प्रतीतगड, कुंभारली घाटानजीक जंगली जयगड इ० इ०

सह्याद्रीच्या पूर्व-पश्चिम उतारावर जीं खोरीं आहेत तींच २४ मावळें

होत. प्रादेशिक दृष्ट्या प्रत्येक मावळ हें नैसर्गिक परिसीमांनीं अलग म्हणजे स्वतंत्र आहे. ऐतिहासिक काळीं प्रत्येक मावळखोर हें जणूं काय एक स्वतंत्र राज्यच होतें. या डोंगरी राज्यांतील राजाला–देशमुखाला आपलें राज्य सुरक्षितपणें चालविण्यासाठीं डोंगरी किल्ल्यावरच आपलें अधिष्ठान ठेवावें लागे. हे डोंगरीकिल्ले सह्याद्रीच्या मुख्य रांगेशीं काटकोन करणाऱ्या डोंगरावर बांधलेले आढळतात. किल्ला ज्या डोंगरावर बांधिलेला असतो तो डोंगर रांगेपासून अलग म्हणजे सुटा असून इतर डोंगरांच्या ओळींपेक्षां उंच असावा लागतो. तो खोऱ्याच्या मध्यवर्ती असला तर उत्तम. तसेंच मुख्य किल्ल्यांच्या घेऱ्यांत टेहळणीसाठीं लहान लहान गढ्यांची सोय करीत असत. त्यावेळीं हल्लींसारखी बातमी जलद पोहोंचविण्यास बिनतारी संदेशवाहक अगर तारायंत्र हीं साधनें नव्हतीं. एका मुख्य किल्ल्याच्या ताब्यांत समाविष्ट असणाऱ्या भूप्रदेशांत वार्ता प्रसारांचीं बावटा उभारणें, कर्णा फुंकणें, आगटी पेटविणें, तोफांचे आवाज काढणें इत्यादि साधनें होतीं. सरहद्दीच्या प्रदेशांत शत्रूचा प्रवेश झाल्यास त्याची बातमी मुख्य किल्लेदाराला देतां यावी अशी योजना प्रदेशाच्या सीमाप्रांतीं करून ठेविलेली अद्याप आढळून येते. महाराष्ट्रांतील किल्ल्यांच्या परस्परवार्ताहारी संबंधाचा यापेक्षां जास्त प्रपंच येथें करणें अप्रस्तुत होईल, म्हणून हें विवेचन येथेंच संपवून पुढील विषयाकडे वळूं.

कांहीं किल्ले खाडीच्या अगर पश्चिमसमुद्रावरील बंदराच्या रक्षणार्थ बांधले गेले आहेत. इ० स० च्या ५व्या शतकांपासून हिंदुस्तानच्या पश्चिमकिनाऱ्यावरून व्यापारी गलबतें निघून तीं अरबस्तान, आफ्रिका, यूरोप, जावा, सुमात्रा इ० परद्वीपांत जात असत. हा व्यापार फारच किफायतशीर असल्यामुळें व्यापारी दृष्ट्या पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांना फारच महत्त्व आलें होतें. या बंदरांचा राजकीय ताबा ज्याच्या हातीं असे त्या राजकर्त्याला द्रव्यलाभही बराच होई. हीं संपन्न व्यापारी शहरें द्रव्यलोभानें शत्रूकडून लुटलीं जाणें फार संभवनीय असे. समुद्रकाठीं अगर खाडीकाठीं असलेल्या शहराच्या संरक्षणास डोंगरी किल्ला अवश्य असला पाहिजे, तसेंच एखाद्या खाडींतून शत्रूचीं गलबतें आंत येऊन

त्यांनीं मुलखास उपद्रव देऊं नये म्हणून खाडीच्या तोंडाशीं व तीरावर किल्ले बांधिले आहेत. चिपळूण बंदराच्या रक्षणास ' गोवळकोट, ' बाणकोटच्या खाडीच्या तोंडाशीं 'बाणकोट', तीरावर 'मदनगड', जंजिऱ्याच्या खाडीच्या तीरावर 'तळगड', 'घोसाळगड' रेवदंड्याच्या खाडीकाठीं 'बिरवाडीचा किल्ला' (ता. रोहें) हीं उदाहरणें वरील विवेचनाचें सत्यत्व लक्षांत आणून देतील. जलयुद्धांत (आरमारी लढाई) जलदुर्गांचा (जंजिरे किल्ले) जसा उपयोग होतो, तसाच ह्या तीरावरील प्रदेशांत असणाऱ्या किल्ल्यांचा उपयोग होतो. म्हणून कोंकण प्रातांत सह्याद्रीच्या मुख्य रांगेच्या सन्निध जसे डोंगरी किल्ले विपुल आढळतात तसेंच समुद्रासन्निध अनेक किल्ले आढळतात. देशांवरील प्रदेशांत आढळणाऱ्या किल्ल्यांच्या संख्येपेक्षां कोंकणांत किल्ल्यांची संख्या तुलनात्मक दृष्टीनें जास्त ठरेल. याचें कारण वरील विवेचनावरून लक्षांत येईल. गड, कोट व जंजिरे यांचा युद्धशास्त्रदृष्ट्या स्वतंत्र विचार करावयाला युध्दशास्त्रविशारद असा संशोधक पाहिजे. वरील विवेचन सामान्यतः पुढील विषयाच्या उपन्यासादाखल केलें आहे.

७ कोंकणांतील किल्ले समुद्रसपाटीपासून जितके उंच आहेत, त्यापेक्षां देशावरील किल्ल्यांची उंची जास्त आढळून येतें. याचेंही कारण पाहिलें पाहिजे. सह्याद्रीच्या पूर्वउतरणीवर जे डोंगरांचे फाटे आहेत त्यावर देशावरील किल्ले बांधिले आहेत. तर कोंकणचे किल्ले समुद्रसपाटीपासून फारशा उंच नसलेल्या पातळीवर उभारिले आहेत. देशावरील किल्ल्यांच्या उंचीला तेथील स्वाभाविक उंच भूप्रदेशाची जोड मिळते. बापाच्या खांद्यावर उभा राहिलेला मुलगा बापापेक्षा उंच ठिकाणची वस्तु काढूं शकतो. तसाच हा प्रकार आहे. सिंहगडाची समुद्रसपाटीपासून उंची ४३१६ फूट आहे. व रायगडची उंची २८५१ फूट आहे. दोन्ही किल्ल्यावर स्वतः जाऊन आलेल्या माणसाला विचारिलें कीं, पायथ्यापासून कोणत्या किल्ल्याचा चढाव जास्त वाटतो ? तर तो "रायगड किल्ल्याचा" असेंच उत्तर देईल. साराश कोकणांतील किल्ले " मूर्ति लहान पण कीर्ती मोठी " या म्हणीचे सार्थक करणारे आहेत. म्हणून निवळ समुद्रसपाटीपासून उंचीचे आंकडे

पाहून तुलना करणारास कोंकणांतील किल्ले टेंगणें—कमी उंच—वाटतील. पण आजिंक्यपणा, बचाव नाकेबंदी इत्यादि गुणांत ते सरस आहेत.

८ येथपर्यंत महाराष्ट्रांताल किल्ल्यांचें सामान्य उद्घाटन केलें. ऐतिहासिककालीं किल्ल्याचें महत्त्व इतकें कां मानिले गेलें हें यावरून वाचकांच्या नजरेस येईल. आतां प्रश्न असा कीं स्वराज्याची पहिली राजधानी शिवाजी महाराजांनीं 'रायगडींच' कां स्थापन केली ? या प्रश्नाचा सांगोपांग विचार पुढें एका प्रकरणांत विस्तरशः करणार असल्यामुळें येथें प्रादेशिक दृष्टयाच विचार करावयाचा आहे.

इंग्रजी अमलांतील राजकीय विभागाप्रमाणें रायगड किल्ला कुलाबा जिल्ह्यांतील महाड तालुक्यांत मोडतो. त्याचें स्थान [उत्तर अक्षांश १८।१४ व पूर्व रेखांश ७३।३० महाडाच्या उत्तरेच्या पूर्वेस सुमारें १० अंशावर व १६ मैल अंतरावर आहे. कुलाबा जिल्ह्याच्या पूर्व हद्दीवर सह्याद्रीची ओळ आहे. महाड तालुक्याच्या पूर्व हद्दीवरही सह्याद्रीची ओळच आहे या ओळीशीं समांतर असा एक डोंगर छत्री निजामपूर पासून तों चांभारगडापर्यंत पसरला आहे. ही रांग व सह्याद्रीची ओळ यांत काळनदीचें प्रचंड खोरें पसरलें आहे. अशा रीतीनें मुख्य रांगेपासून अलग व शिवळ्या घाटांच्या उतारानजीक रायगड किल्ला आहे. रायगड व सह्याद्री ह्यांचेमधील दरीची पायथ्याशीं रुंदी १ मैल व पृष्ठभागामधील अंतर २ मैल आहे. वर जी अलग अशी समांतर रांग सांगितली त्या रांगेची उंची फारशी नाहीं. त्या रांगेच्या पठारावर उत्तरटोंकाशीं पूर्वेकडे चोहोंकडून अलग असा एक बहुश्रृंगी डोंगर आहे. तोच रायगड उर्फ रायरीचा किल्ला. याची समुद्रसपाटी पासून उंची २८५१ फूट आहे. कोणत्याही दिशेनें रायगडावर चढण्याचा प्रयत्न करणारास एक खोरें उतरावें लागतें. पुन्हां चढावें तेव्हां रायगड ज्या डोंगरी रांगेच्या पठारावर आहे, तेथें पोहोंचतां येतें.* तेथून पुन्हां गडाची चढण स्वतंत्र चढावयाची असते. उत्तर पूर्व व दक्षिण या तीन बाजूंनीं काळ-

* या पठाराची उंची समुद्रसपाटीपासून सरासरी ५०० फूट आहे. रायगडच्या पायथ्याशीं असलेल्या पाचाडची समुद्रसपाटीपासून उंची ६०० फूट आहे. येथून फक्त रायगड किल्ला २२५१ फूट चढावा लागतो.

नदीनें (महाड तालुक्यांतील) रायगडास वेढिलें आहे. पश्चिम बाजूला नात्याच्या गांधारी नदीचें खोरें पसरलें आहे. अशा प्रकारें चोंहोंकडून खोऱ्यांनीं परिवेष्टित असा रायगड किल्ला "रायगड पाहाडी किल्ला चांगला आजूबाजूस शत्रूची फौज बसावयास जागा नाहीं, घोडें माणूस जाण्यास महत्संकट वरकड किल्ले पन्हाळे वगैरे बहूत पण खुलासेवार व मैदान मुलखांत यास्तव आजच्या प्रसंगास हीच जागा बरी. येथें लवकर उपद्रव होऊं न शकेल." (म. रियासद भा. १ पृ. ३६२) या अवतरणावरून स्वराज्याची पहिली सुरक्षित राजधानी होण्यास भूपृष्ठ रचनेनें देखील कसा लायक होता हें दिसून येईल.

९ इतक्या विवेचनानंतर विषयोपक्रमाची समाप्ती करून रायगडावरील राजकीय पुण्यपंढरीच्या प्रवाश्यांना निरनिराळ्या मार्गांनीं तिकडेच नेणें इष्ट आहे. वाचकहो पुढील प्रकरणीं आपण रायगडाची ऐतिहासिक माहिती मिळवूं.

प्रकरण २ रें.

शिवपूर्वकालीन रायगड.

रायगड किल्ला मूळ कोणत्या राजानें बांधिला अगर शिवपूर्व कालीं त्याची राजकीय व्यवस्था कशी काय होती याबद्दल प्रस्तुत प्रकरणीं ऊहापोह करावयाचा आहे. प्रथम हें कबूल करावें लागेल कीं, रायगडचा मध्ययुगीन इतिहास संगतवार लिहितां येईल अशी ऐतिहासिक विश्वसनीय साधनें आज उपलब्ध नाहींत. रायरीचा किल्ला मध्ययुगीन राज्यकर्त्यांनीं बांधला असला पाहिजे. पहिल्या प्रकरणांत सह्याद्रीला आम्ही " स्वातंत्र्यात्मा " म्हटलें आहे. त्याचें प्रत्यंतर पृथ्वी वसतिक्षम व्हावी म्हणून मनुष्याला पश्वादिकांशीं प्रथम प्रथम जीं युद्धें खेळावीं लागलीं त्यावरूनही दिसून येईल. ओबड धोबड दगडी आयुधांनीं दक्षिण द्वीपकल्पांत वावरणाऱ्या प्राण्यांबरोबर युद्ध खेळून, त्यांना नामशेष करून, ही भूमि स्वतंत्र केल्याचें प्रत्यंतर गोदावरी व नर्मदा यांच्या मधील डोंगराळ मुलखांत खालीलावक आढळतें. प्राकृतिक बाबतींत दक्षिण हिंदुस्थानची स्थिरता अत्यंत श्रेष्ठ प्रकारची आहे. या प्रदेशांत सृष्टिमाता भूकंपाचे धक्के, ज्वलत्पर्वताचे स्फोट, भूमिप्रपात, इ. इ. बालिश खेळ कधींच खेळत नाहीं. ही प्रादेशिक स्थिरता दक्षिण हिंदुस्थानच्या राजकारणांतही दिसून येते. इतिहासाचें सूक्ष्म अध्ययन करणारास दाक्षिणात्यांची ही निश्चलता प्रतीत होईल.

२. श्री. दीक्षित सुपरिंटेंडंट पुराणवस्तु संशोधन खातें, यांनीं सन १९२६ सालीं रायगडावर जो उत्सव झाला त्यावेळीं वाचण्यासाठीं एक निबंध धाडला होता, त्यांत ते म्हणतात, " ऐतिहासिक युगाविषयीं पाहतां सह्याद्री व घाटमाथा यावर अनेक शतकें अंमल राखून महाराष्ट्राचें स्वातंत्र्य शातवाहननामें प्रसिद्ध असलेल्या राजवंशानें अढळ राखिलें. या शातवाहन अथवा आंध्र राजांनींच प्रथम सह्याद्रीच्या निरनिराळ्या घाटांतून वहातुकीची

उत्तम साये करून देण्याकडे लक्ष पुरविलें असावें. तसेंच काहीं महत्त्वाच्या ठिकाणीं डोंगरपठारावर लेणी कोरून, हौद बांधून व मजबुती करून किल्ले बांधण्याच्या पद्धतीची मुहूर्तमेढ रचिली असावी. सुप्रसिद्ध शिवनेरी किल्यावर पाण्याचीं टाकीं आहेत, तीं या आंध्र राजांच्या वेळचीं असावीं. त्यानंतर चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, ब्राह्मणी राज्य निजामशाही या सर्व अमदानींत किल्यांवर वस्ती होण्याची पूर्वतयारी त्या प्राचीन काळींच झाली असें दिसतें."

३. रायगडचें जुनें नांव रायरी. रायरी हा 'राजगिरी' या संस्कृत नांवाचा अपभ्रंश आहे. शिवपूर्वनांव ज्या अर्थी संस्कृतोत्पन्न आहे, त्या अर्थी तें कोणा हिंदू राजकर्त्यानें दिलें असलें पाहिजे. या किल्ल्यावर एखादा जुना शिलालेख वगैरे नसल्यामुळें त्याची प्राचीन माहिती मिळविण्याचीं साधनें लुप्त झालीं आहेत. तेराव्या शतकाचे अखेरीपर्यंत दक्षिणहिंदुस्थानांत यादवांचें राज्य होतें. दक्षिणेंत मुसलमानांचा प्रवेश झाला. त्यापूर्वी रायगड हा किल्ला एका मराठे पाळेगाराच्या ताब्यांत होता. बाराव्या शतकांत रायरी डोंगराचे भोंवतालील मुलूख एका मराठे पाळेगाराच्या ताब्यांत होता. रायरी हें त्या पाळेगाराचें राहण्याचें मुख्य ठिकाण होतें. चौदाव्या शतकांत हा मराठा पाळेगार विजयानगरच्या राजाचा मांडलिक झाला. शके १३५८ च्या सुमारास दुसरा अल्लाउद्दीनशहा बहामनी यानें त्याला आपल्या अमलाखालीं आणिला. शके १४०० च्या सुमारास हा रायरी मामला निजामशहाकडे आला.तो त्यांचेकडेच निजामशाहीचा नाश होईपर्यंत होता. पुढें हा मामला तहानें विजापुरकरांकडे गेला. तेव्हां एका ब्राह्मण सरदाराच्या ताब्यांत रायरी मामला व किल्ला होता. ह्या ब्राह्मण सरदाराचें नाव उपलब्ध नाहीं. मध्य कोकणांत निजामशहाचे प्रबळ सरदार शिर्के हे नांदत होते. वर ज्या मराठा पाळेगाराच्या ताब्यांत रायरीगड होता असें म्हटलें आहे; तो मराठा पाळेगार शिर्क्यांच्या वंशापैकींच कोणी पूर्वज असावा. हा किल्ला ताब्यांत आल्यावर शिर्क्यांनींच आपली कुलदेवता जी शिरकाई देवी तिची स्थापना केली. विजापुरकरांच्या अमदानींत शिर्क्यांचा किल्यावरील ताबा नष्ट झाल्यामुळें त्यांनीं माजी राज्यापासून असलेला आपला वतनी हक्क मिळविण्यासाठीं खटपट चालविली. शके १५७७ शिर्केराजे रायरी मामल्याच्या

हक्काबद्दल लिहितात. " आपलें कदीम वतन सरदेशमुखीचे मामले रायरी शिरकाण येथील आले. त्यास वडिलांनीं दलपतराव पाताणे *प्रभु मुतालिकीस ठेविला होता. तो कितीका दिवसांनीं बळकाऊन आपण वतनदारच म्हणून बळेंच वतन खाऊं लागला. " [व. नि. पत्रें वाडकृत ७७] शिर्के घराण्याचें एक महजर व दुसरें निवाडा पत्र उपलब्ध आहे. त्यांत पुढील मजकूर आहे. " रायरी मामला महालबरा येथील सरदेशमुखी शिर्के यांची पुरातन निजामशहा पादशहांनीं दिली होती ती बहुत दिवस भोगवटा चालिला त्याजवर आपले वडिलांनीं वतनावर मुतालिक दलपतराव म्हणून पाताणा परभु ठेऊन आपण बादशाही मनसब्र करूं लागले. "

४. रायरीगडाला युरोपीयन लोक पूर्वेकडील जिब्राल्टर या नांवानें ओळखीत. मुसलमान राजकर्ते इसलामगड असें त्यास म्हणत.

" १ किल्ले रायगड हा किल्ला पेशजी डोंगर होता. त्याचे नाव 'जंबुद्वीप' तणस म्हणत. घलकीचा पाहरा व अंधारी येथें निजामशाही पीर दर्गा मदार आहेत तेथे ठाणें काहीक दिवस होते.नंतर कोली घडसी याची वस्ती होती. उपरात शिवाजी महाराज याही किल्ला बांधिला किल्याचे नाव रायेगड ठेविले " [महा० सा. प. वर्ष २ रें अंक २]

" १२ व्या शतकांत लहान लहान मराठे सरदारांच्या कुटुंबांचें हें निवासस्थान होतें. यांनीं १४ व्या शतकांत दुसरा अल्लाउद्दीन शाहावली यानें किल्ल्यांतील लोकांना खंडणी देणें भाग पाडिलें. त्यानंतर १४७९ [इ.स.] हा रायरी किल्ला अहमद नगरच्या निजामशाही सुलतानाच्या ताब्यांत जाऊन सन १६३६ पावेतों तो त्यांच्या हातीं होता. अहमद नगर जिंकल्यावर मोंगल लोकांनीं तो विजापुरच्या आदिलशाही सुल्तानाच्या हवालीं केला. " [ज्ञानकोश भाग १९ पृ. १०१]

१. कविलवाहाळ बु॥ [ता. माणगांव] या गांवीं या पाताणे प्रभु घराण्याची वसती १० वर्षापूर्वी होती. त्यांचा चौसोपी वाडा तेथें आहे. घराण्याचें आडनांव ' दलपतराव सरदेशमुख ' असें लागतें. यावरून वरील दलपतरावाचाच हा वंश असावा असें वाटतें. या घराण्यांतील शेवटचा पुरुष। ' आनंदराव पुतळाजी दलपतराव सरदेशमुख ' हे नुकतेच मयत झाले. हे गृहस्थ चांगलेच सुशिक्षित होते. त्यांच्या जवळील कागदपत्र नष्ट झाले आहेत.

प्रकरण ३ रें.

शिवकालीन रायगड.

॥ तहाँ राजधानी करी जीति सकल तरकॉन ॥
॥ शिव सरजा रुचि दानमें किनो सुजसुजहॉन ॥

शिवराजभूषण काव्य.

करी रायगड रायरिचा तो जिजाइचा तान्हा ॥

कै० गोविंदाग्रज.

रायगड किल्ल्याला सोन्याच्या सात पायऱ्या ॥

लोकगीत [फोक्लोर]

शहाजी राजांनीं विजापुराहून बालशिवाजीस पुण्याकडील जहागिरीच्या बंदोबस्तासाठीं जिजाबाईसह पाठविलें. राजांना ह्या मुसलमान पादशहांच्या विश्वासघातकीपणाचा पुरा अनुभव आला होता. या बादशाही नौकरीचा दुरून डोंगर साजरा असलेला बरा. खुद्द शहाजी राजांना तीनदां बादशाही नौकरीची पालटापालट करावी लागली. निजामशाहींतून दुसऱ्यांदा निवृत्त झाल्यावर राजांना सुमारें तीन वर्षें आपल्या पुणें जहागिरीवर रहावें लागलें. तसेंच पुन्हां कधीं नोकरी सुटून बेलाग राहण्याचा प्रसंग आला तर पुणें जहागिरीचा सवता सुभा मुक्त्यारीनें चालवितां यावा अशी तजवीज करण्याचा शहाजीराजांनीं दूरदर्शीपणाचा डाव मांडिला. बंगळुराहून शिवाजी महाराजांना पुणें प्रांताकडे रवाना केलें. तेव्हां म्हणजे शके १५६३ मध्यें शहाजीनें शिवाजीस जहागिरदार या नात्यानें आपले सर्व अधिकार दिले व मोकासदार या नात्यानें असलेल्या अधिकारांपैकीं कर्यात मावळचा अधिकार

दिला. दादोजी कोंडदेव यांस कारभारी या नात्यानें इकडे पाठविलें होतें. दादोजीच्या कारकीर्दीतच खवळ व पुणें परगण्यांत दंगेधोपे सुरु झाले होते. पुढें दादोजी मरण पावल्यावर कारकुनांनीं नव्या खुर्दखतांचा उजुर (तगादा) लाविला. दादोजीच्या मागें पुणें जहागिरीची वहिवाट विजापूर दरबाराकडून शिवाजीला मिळेलच, अशी खात्री नव्हती. म्हणून शिवाजी महाराजांनीं ‘ खेडें बारें ’ येथें बांधकाम सुरू केलें. पुणें प्रांतीं असलेल्या जहागिरीच्या बंदोबस्तास आसपासचे डोंगरी किल्ले ताब्यांत हवेत. कोंडाणा किल्ला ताब्यांत आल्यास पुणें प्रांताचें संरक्षण ठीक होईल. या कल्पनेनें शिवाजी महाराजांनीं कोंडाणा किल्ला भेदानें घेतला.

२. दादोजीचा मृत्यु, कोंडाण्याचा ताबा, इतर स्वतंत्र उद्योग, मावळ प्रांतीच्या देशमुखांचे तंटे इ. अनेक भानगडी या वेळीं शिवाजी महाराजां-पुढें उभ्या राहिल्या. कृष्णाजी बांदल देशमुख तर मलिकंबरापासून मावळ प्रांतीं जबरदस्तीनें वागे. शहाजी राजांना ह्या मावळच्या देशमुखांची जबर-दस्ती पूर्णपणें माहीत होती; म्हणूनच त्यांनीं “ कान्होजी नाईक जेधे यांस शफत देऊन, शिवबा राजांजवळ जमावानिशी राहण्यास सांगितलें. ” एखादा कर्तव्यदक्ष बाप आपल्या परदेशांत जाणाऱ्या मुलाची जितकी काळजी घेतो तितकी काळजी शहाजी राजांनीं घेतली होती. मावळांत जे देशमुख देश-पांडे वतनदार होते, ते अंतर व्यवस्थेंत जरी पूर्ण स्वतंत्र होते, तरी विजा-पूरच्या बादशाही सत्तेचें दिखाऊ दडपण त्यांचेवर होतेंच. स्वराज्यस्थाप-नेच्या शिवाजी महाराजांच्या प्रयत्नांस कित्येक देशमुखांचाच विरोध होता. ज्यांच्या मनावर बादशाही अमलाचें गुलामी दडपण होतें ते तर उघड अगर प्रच्छन्न स्वराज्याचे वैरी बनले. शिवाजीनें एकही सैनिक खर्चीं न घालतां मोठ्या युक्तीनें सिंहगड ताब्यांत घेऊन तेथें मजबुती चालविली. या शिवाजीच्या धाडसी प्रयत्नाबद्दल कित्येक देशमुखांस व वतनदारांस वैषम्य वाटून त्यांनीं शिवाजीबद्दल विजापूर दरबारीं कागाळी केली. विजापुर दरबार शिवाजीवर रुष्ट झाला. पण ह्या बंडखोरीचा जाब शिवाजीसारख्या भुरट्या धाडशी तरुणास विचारण्यापेक्षां त्याच्या नामजाद बापास विचारणें

बरें ! म्हणून विजापुरच्या मुत्सद्यांनीं मोठ्या कारवाईनें शके १५७० च्या श्रावण वा। १ ला शहाजीस अवचित पकडिलें. कोंडाण्यासारखा महत्त्वाचा किल्ला शिवाजीच्या ताब्यांत असणें, विजापुरच्या महंमदशहाला आवडलें नाहीं. शिवाजीचें म्हणणें असें कीं, पुणें जहागिरीचा योग्य बंदोबस्त व्हावा यासाठीं बादशहाच्या वतीनेंच मीं किल्ला ताब्यांत घेऊन तेथील अव्यवस्था मोडून मजबुती चालविली आहे. परंतु हा युक्तिवाद बादशहास न पटल्यामुळें, शहाजी राजांच्या सुटकेच्या अटींत ' कोंडाणा किल्ला बिनशर्त सोडणें ' हें कलम दाखल झालें. शिवाजी महाराजांच्या मनांत हें महत्त्वाचें नाकेबंद ठिकाण सोडावयाचें नव्हतें. परंतु बापाच्या सुटकेसाठीं कोंडाणा सोडणें भाग पडलें. बादशाही इभ्रत सांभाळली गेल्यामुळें शहाजीची सुटका झाली. अशा प्रकारें आपली इभ्रत राखून घेण्याचें कारण असें कीं, शहाजी राजांस पकडल्यावर शिवाजीस वठणीवर आणण्यासाठीं फत्तेखान नांवाचा सरदार शिवाजीवर चाल करून गेला होता. त्याचा शिवाजीनें पूर्ण पराभव करून त्यास पिटाळून लाविलें. या वेळीं शिवाजीमहाराज पुरंधरावर होते.

३. अशा प्रकारें कोंडाणा किल्ला बादशाही अमलांत असल्यामुळें शिवाजी महाराजांस पुणें प्रांतीं ' स्वतंत्र होण्याचा ' उद्योग करणें जड जाईल; ही जाणीव शहाजी राजानांही झाली होती.

" शके १५७१ विरोधी संवतछर जेष्ठ शुद्ध पुर्णिमा शहाजी राजे कोंडाणा दे (घे ?) ऊन सोडिले, ते समई कान्होजी नाईक जेधे व दादाजी कृष्ण लोहकरे यांस सोडिलें. महाराजांची व त्यांची भेट जाली ते समई माहाराज बोलले कीं तुम्ही अम्हा मुले बंदखानी श्रमी जालेस... ...... तुमचे वतन मावलांत आहे. चिरंजीव राजश्री सिडबा खंडे बारियांत व पुणां अहेत. त्याजवळ तुम्ही जमावानिशी राहावे. तुमची जबरदस्ती त्या प्रांते आहे. अवघे मावलचे देशमूख देखील त्यासी रुजू होऊन त्यांचें आज्ञेत वर्तेत वैसा विचार करून जबरदस्तीनें रहावें. येखादी मोगलाईकडील फौज व इदिलशाहीकडील आली तरी आपण इमान राखा व त्यासी लढाई करावी यैसी शफत इमान पुरस्कर बेल रोटीवर हात ठेऊन

घेतली तैसीच त्याणीहि कान्होजी नाइकास शेपत दिल्ही अणी कान्होजी नाईक यांस व दादाजी कृष्ण यांस वस्त्र देऊन बराबर हुजुऱ्या व पत्रें देऊन राजश्री सिवजीराज यांजकडे पाठविलें. "

जेधे शकावली. पान २–३.

शिवाजीला पुणें प्रांतीं जहागिरीच्या बंदोबस्ताला पाठविण्यांत; सर्जे-राजांचा त्यानें तिकडे कांहीं स्वतंत्र उद्योग करून, बादशाही सत्तेच्या पकडींतून सुटण्याचा प्रयत्न करावा असा हेतु होता; हें वरील उताऱ्या-वरून स्पष्ट ध्यानीं येईल. म्हणूनच शहाजीला स्वराज्य संकल्पक म्हणण्या-कडे आजच्या इतिहासकारांचा कल दिसून येतो. शहाजी राजांची शिवाजी महाराजांच्या स्वराज्य–संस्थापनेच्या कार्यास पूर्ण सहानुभूति व मदत होती. असें म्हटल्यानें शिवाजी महाराजांच्या श्रेष्ठ कर्तबगारीस कमीपणा येतो, असें मानण्याचें कारण नाहीं. निदान इतकें खास कीं, परकीय इतिहास-कार लिहितात, तशी शिवाजी–जिजाबाई हीं शहाजीस अप्रिय खास नव्हती ! इतकें लिहिण्याचें कारण कोंढाण्यासारखें महत्वाचें ठिकाण बापाच्या सुटकेसाठीं हातचें गमावणारा मुलगा पितृ--भक्त व मुलाच्या बंड-खोरीमुळें प्राप्त झालेली बंदिवासाची शिक्षा भोगून सुटल्यावर पुन्हांही मुलाच्या संरक्षणाची तजवीज करणारा बाप पुत्रवत्सल असलाच पाहिजे.

४. शहाजीराजे कैदेंतून सुटल्यावर ४ वर्षें पावेतों विजापुरींच होते. तितक्या मुदतींत पुणें प्रांतीं शिवाजी महाराजांनीं कोणतीच महत्त्वाची उला-ढाल केली नाहीं. कोंकणांतील व मावळांतील अवघड ठिकाणें पाहून कोणतें ठिकाण कसें घेतां येईल, कोणता सरदार कसा वश होईल, याची टेहळणी किंवा विवेचना मात्र चालू होती. याचें प्रत्यंतर पुढील हकिकती-वरून ध्यानांत येईल.

जावळी प्रांतांत चंद्रराव मोरे हा एक फौजबंद व शूर सरदार या वेळीं विजापुरकरांतर्फे अंमल चालवीत होता. बाह्यतः जरी तो विजापुरकरांचा अंकित म्हणवी तरी तो स्वतंत्रपणेंच वागे. जावळी प्रांत वांई सुभ्यांत मोडतो. वांइच्या मुसलमान सुभेदाराशीं चंद्रराव फटकून वागे. शके

१५५८ च्या सुमारास निजामशाही नष्ट झाली. तेव्हां तळ कोंकण प्रांत तहानें विजापुरकरांकडे गेला. चंद्रराव मोरे, आपण विजापुरकरांचे सरदार या जोरावर ह्या प्रांतावरही हक्क सांगू लागला. तेव्हां माजी राज्यांतील (निजामशाहींतील) हक्कदारांनीं विजापूर दरबारकडे तक्रारी केल्या. त्यांत रायरी किल्ल्याचे किल्लेदार शिर्के यांनीं रायरी मामला आपणास मिळावा म्हणून विजापुर दरबारीं खटपट चालविली. चंद्ररावानें शिर्क्यांचा रायरी गड तर बळकाविलाच पण तो मामलाही ताब्यांत घेऊन आपला अंमल चालूं केला. ह्या तक्रारींचा बंदोबस्त करण्यासाठीं अफजलखानास चंद्रराव मोऱ्यावर पाठविण्याचें विजापुर दरबारनें ठरविलें. अफजलखान शके १५७० त चंद्रराव मोऱ्यावर आला. चंद्ररावाचा भाऊ हणमंतराव याचे ताब्यांत जोर खोरें होतें. तें घेण्याची परवानगी खानानें जेध्यांना दिली.

"जोहर खोरे हणमंतराऊ काबीज आहेत हाली कान्होजी जेधे यास दिधले आहे ते खासा येऊन काबीज करतील करु देणे. त्यास मुकासा मऱ्हामती केला आहे. दुमाले करणे" (खंड १५ पृ. ३६५) अफजुलखानानें जावळीहून चंद्ररावाची उठावणी करतांच तो रायरी गडावर (रायगडावर) येऊन राहिला. त्याच वेळीं शिवाजी महाराज वडिलांच्या सुटकेच्या खटपटींत होतें. चंद्ररावाला शिवाजीसारख्या धाडसी तरुणाचें साह्य पाहिजे होते; व शिवाजी महाराजांना चंद्ररावासारख्या फौजबंद बड्या सरदाराची सहानुभूति संपादावयाची होती. म्हणून दोघांनीं परस्पर सहकार्य करून चंद्ररावाला जावळी मिळवून दिली.

गृहिता महिता लोके जयवल्ली मयापुरा ।।
स्थापितश्चंद्रराजश्च तस्यां तदभिलाषुका ।।

शि० भा० १३-४३.

[लोकांमध्यें प्रसिद्ध असलेली जावळी (जयवल्ली) मी पूर्वी घेतलीं; आणि तिचा अभिलाष धरणाऱ्या चंद्ररावाची तेथें स्थापना केली]

५. या हकिकतीवरुन शके १५७०-७१ पर्यंत चंद्रराव मोरे व महाराज यांचा सलोख्याचा संबंध होता असें म्हणण्यास हरकत नाहीं.

थोड्याच दिवसांनीं अनेक कारणें उत्पन्न होऊन महाराज व चंद्रराव मोरे यांचें वांकडें आलें तीं कारणें अशीं:—

शके १५७३ च्या सुमारांस बिरवाडीच्या पाटलाचें व चंद्ररावाचें वांकडें आलें. तेव्हां तो शिवाजीमहाराजांकडे आला व त्याला त्यांनीं आश्रय देऊन शिरासही दिली. (तृ. सं. वृ. पृ. १६७।८.)

मुसे खोऱ्यांतील शिवाजी महाराजांच्या मुलखांतील एक आरोपी पळून जावळीस चंद्ररावाच्या आश्रयास राहिला. (खं. १५ पृ. २७४).

विजापुरकरांकडून शिवाजी महाराजांस कपटानें अचानक धरण्यास आलेल्या बाजी शामराज या शिलेदारास चंद्ररावानें आश्रय व मदत दिली.

रायगड शिवाजी महाराजांनीं चंद्रराव मोऱ्यापासूनच घेतला असल्या-मुळें, प्रस्तुत स्थळीं चंद्रराव मोऱ्याच्या राजकारणासंबंधें सविस्तर वर्णन करणें इष्ट आहे. अफजुलखानाची स्वारी आली, त्यावेळीं शिवाजीची मदत घेणारा चंद्रराव लगेच शिवाजीच्या विरुद्ध कारस्थान करूं लागला. त्याला मूळ कारण बिरवाडीच्या पाटिलकीचें भांडण होय. बिरवाडीच्या पाटिलकी-वर चोरघे देशमुख सरखोत गुंजण मावळचे, चंद्रराव मोरे जावळीकर व कोंडे देशमुख असे तिघे हक्क सांगत होते. चंद्रराव मोरे व सिलीमकर देशमुख हे मामा भाचे. ह्या चंद्ररावाच्या भानगडींत सिलीमकर देशमुख शिवाजी महाराजांच्या बाजूचा होता. महाराजांनीं बिरवाडीची पाटिलकी आपल्या अधिकारांत सिलीमकर देशमुखांस दिली. यामुळें चंद्रराव चिडीस जाऊन, तो महाराजांचें उघड शत्रुत्व करूं लागला.

चंद्ररावाला जावळी प्रांतांत आश्रयास योग्य असा मजबूत डोंगरी किल्ला नव्हता. त्यामुळें तो रायरी किल्ला ताब्यांत ठेवण्याच्या आटोकाट प्रयत्नांत होता. रायरी ऊर्फ रायगड या किल्ल्याच्या घेऱ्यांत बिरवाडी गाव येतो. अर्थात् तेथील पाटिलकी आपल्या मार्फतीनें चालावी असा चंद्र-रावाचा मानस. रायगडच्या पूर्वेस सुमारें १२ मैलांवर असलेल्या शिव-तरच्या डोंगरावर चंद्ररावाचे वाडे असून तें ठिकाण बरेंच मजबूत व दुर्गम असावें, असें आज जे वाड्याचे अवशेष आहेत त्यावरून दिसून

येथें. [या स्थलसंबंधाचें सविस्तर वर्णन पुढें प्रकरण मध्यें आहे.] जावळी, शिवतर डोंगरावरील गढी व रायगड हीं तीन स्थानें जोरावारीनें ताब्यांत ठेवणारा चंद्रराव जवळच्या बिरवाडी गांवची पाटिलकी दुसऱ्या कोणास कशी पचूं देईल ? परंतु बिरवाडच्या पाटलास शिवाजीनें आश्रय किंवा अभय दिल्यामुळें खरें भांडण चंद्रराव व शिवाजी महाराज यांच्या-मध्यें उत्पन्न झालें.

६. कोंडाणा किल्ला ताब्यांतून गेल्यामुळें महाराजास पुणें प्रांतीं सुर-क्षितता वाटत नाहींशी झाली. म्हणून त्यानीं आपले प्रयत्न रोहिडखोरें व वेळवंड खोरें यांत सुरू केले. त्याची ओरड विजापूर दरबारात पोंचून, दादाजी नरस प्रभु देशपाडे कुलकर्णी टा. रोहिडखोरें व वेळवंड खोरें यांस आज्ञापत्र आहे. "शिवाजी राजे फरजंद शाहाजी राजे याणे शाहासी बेमानगी करून तुझे खोरियांत रोहिडेश्वर डोंगराचे आसराण पुंडावे याने मावले वगैरे लोक जमाव केला आणि तेथून जाऊन पेशजीं किल्यावरी ठाणें उठवून आपण किल्यांत शिरला हाली राजगड किला नाव करून बलकावला. तोही वेळखंड खोऱ्यालगत त्यास लोकाचा वगैरे जमाव तूर्त सामील असून फिसाद करून रसिद राजे मजकूर निल्हेस देतोस. व ठाणे सिरवली आमिनासी रुजु राहत नाहींस व जमव वितरजुमा करीत नाहींस व तनखाहि हरदुतपियाचा दिवाणात देत नाहींस मगरुरीचे जबाब ठाणगे व नाइकवाडी यासी देतोस हे जाहिरात आले............

[खं० १५ ले० २६७ शके १५६७ चैत्र शु० १३]
ले० २६७ शके १५६७* चैत्र शुा १३].

७. वरील लिहिण्यावरून लक्षात येईल कीं, पुणें जहागिरीवर जहागिर-दार या नात्यानें जरी महाराज अंमल चालवीत असले, तरी त्यांच्या स्वतंत्र उद्योगाचें केंद्रस्थान सह्याद्रीच्या पश्चिमेकडील डोंगरखोऱ्यांत होतें. शके १५६८ सालीं तोरणा घेतला. व शके १५६९.त तोरणा किल्याचे आग्नेयेस तीन कोसांवर दुरगा नांवाच्या डोंगराच्या शिखरावर राजगड

* वरील पत्राच्या अस्सलपणाबद्दल संशय आहे. परंतु त्यांतील मतलब खरा आहे असें कै. राजवाडे म्हणतात.

बांधिला. किल्ल्यास तीन माच्या करून सुवेळा, संजीवनी व पद्मावती अशीं नांवें दिलीं " राजधानीस राहण्यास योग्य अशी कल्पना करून बांधते झाले [म. रा. सप्त. शि. च. पृ. ३०।३१.]. घाटमाथ्यावर आपलें मुख्य ठाणें असण्यापेक्षां सह्याद्रीच्या पश्चिम उतरणीवरील एखाद्या डोंगरी किल्ल्यावर आपलें ठाणें असावें. अशा विचारानें किंबहुना 'राजगड' राजधानी करण्याचा हेतु धरूनच राजगड बांधण्यांत आला. राजगड, तोरणा हे दोन किल्ले ताब्यांत आल्यावर सहजच महाराजांचें लक्ष नजीकच पश्चिमेस असलेल्या रायरी ऊर्फ रायगड किल्ल्याकडे वेधलें. रायरीवर अंमल चंद्ररावाचा. तेव्हा तो अनुकूल होईल तर किंवा त्याचा पाडाव केला तर रायगड काबीज होणार. सारांश रायगडच्या राजकारणाशीं चंद्ररावाच्या भांडणाचा मुख्य संबंध येतो. चंद्ररावाचें व महाराजांचें शके १५७० पर्यंत सख्य होतें. शके १५७३ पासून तंट्याला सुरवात झाली. परंतु शिवाजी महाराजांस चंद्ररावासारख्या प्रबल सरदाराशीं एकदम शत्रुत्व करतां येईना. कारण शहाजी राजे कैदेतून सुटून विजापुर दरबारींच होते.

८. शके १५७५ मध्यें शहाजी राजे कर्नाटकांत गेल्यावर शिवाजी महाराजांनीं पुणे प्रांतीं आपल्या स्वातंत्र्य स्थापनेच्या धाडसी प्रयत्नास जोरानें सुरवात केली. शके १५७६ त पुरंधर किल्ला ताब्यात घेतला. व सतत चार पांच वर्षे उपद्रव देणाऱ्या व स्वराज्यविरोधी चंद्रराव मोऱ्याच्या पारिपत्यास सुरवात केली.

चंद्रराव मोऱ्याचा भाऊ हणमंतराव हा जोर खोऱ्यात अंमल गाजवीत होता. शके १५७१ मध्यें अफजलखानानें जोर खोरें घेण्याची जेध्याना परवानगी दिली होती. परंतु जेध्याच्या हातून हणमंतरावाचा पुरा मोड झाला नाहीं. म्हणून रघुनाथ बल्लाळ कोरडे यास हणमंतरावावर महाराजांनीं पाठविलें. त्यानें हणमंतरावाचा पराभव करून जोर खोरें घेतलें. तेव्हां हणमंतराव पळून विजापुरीं तक्रार सांगण्यासाठीं गेला.

चंद्ररावाचा मोड करण्यासाठीं शिवाजी महाराजांनीं शके १५७७ पौष शु॥ १४ रोजीं निसणीच्या घाटानें जावळीवर स्वारी केली. " महाबळेश्वरचा निसणीचा घाट दरियाचा उतरून जावळीस वेढा घातला. जावळी

अवघड वाट, जाळ्या कळकीच्या दाट, तेथें महिनाभर झुंज जाहलें. महिन्या एका महिन्यांनीं कृष्णाजी बाजी मेरे जावळी सोडून आपले हासमसुद्धां रायगडास गेले रायगड बलकाऊन राहिले तेथें शिवाजी महाराजे चढाई करून गेले रायगड तीन महिने चंद्रावांहीं भांडविला. मग सला जाहला. " [रा. य. रा. गुप्ते यांचा निबंध]. जावळी प्रांतांत त्यावेळीं किल्ला नव्हता. थोडे दिवस जावळी लढविल्यावर चंद्रराव पळून रायरीस गेला. जावळीहून सह्याद्रीच्या पश्चिम खोऱ्यांनीं शिवतरापर्यंत पायवाट आहे. शिवतरापासून रायगडावर सुमारें ३ तासांत जातां येतें. चंद्रराव पळून रायरी गडांत गेल्याचें महाराजास समजतांच त्यांनीं आपला मोर्चा रायरीकडे वळविला. शके १५७८ दुर्मुखीनाम संवत्सरे चैत्र व॥ ७ स' जावळीहून स्वार होऊन रायरीस आले. [शिवपूर दप्तरांतील यादी] रायरीस वेढा दिला. या वेढ्यांत चंद्ररावाचे भाचे सिलीमकर देशमुख, कान्होजी जेधे देशमुख व बांदल हे महाराजांच्या वतीनें लढत होते. सिलीमकरांनीं महाराज व चंद्रराव मोरे याच्यामध्यें सलोखा करण्यासाठीं उभयपक्षीं मध्यस्ती केली. महाराज व चंद्रराव मोरे याची भेट होऊन रायगड महाराजाच्या ताब्यात द्यावा असें ठरलें. या अटीच्या निश्चितीकरिता चंद्ररावाचे दोन मुलगे बाजिराव व कृष्णराव शिवाजी महाराजांच्या ताब्यांत ओलिस म्हणून दिले. असा प्रकार होऊन रायरीचा किल्ला महाराजांच्या ताब्यात आला. [शके १५७८× चैत्र व॥ ७] प्रस्तुतस्थळीं आपणास मोरे प्रकरणाची यापेक्षां ज्यास्त पुढील माहिती देण्याचें प्रयोजन नाहीं. रायगड महाराजांच्या ताब्यांत कधीं कसा आणि कोणाकडून आला हें वरील इतिहासावरून ध्यानीं येईल.

१. रायगड घेतल्याचा वर दिलेला शक आजच्या नवीन आणि सर्वमान्य संशोधास अनुसरून दिला आहे. परंतु या शकाबाबत कांहीं भिन्न मतें आहेत त्यांचें उद्घाटन करूं.

[अ] कै० राजवाडे यांच्या ऐ० प्रस्तावना पृ. २६९ ते २७१ पर्यंत म. रा. कृत स. प्र. शि. चरित्राची चर्चा केली आहे. या चरित्रांत

× भाद्रपद वा॥ ११ [शके १५७८] गडाचें नांव ठेविलें [शिवापूर द०]

रायगड घेतल्याचा उल्लेख असा आहे.

" रायगडचें राजकारण आलें तेथें जाऊन भेदानें किला घेतला तो पूर्वी हबसी याजकडे होता. शके १५६८ किला बहुत नामी उंच बिकट पाहून फार संतोषी झाले त्याजपाशीं चांगला डोंगर होता तो किल्ला केला नांव लिंगाणा ठेविलें आणि राजगडास आले. " [पृष्ट ३४]

या शकाबद्दल राजवाड्यांनीं पुढीलप्रमाणें लिहिलें आहे.

" बाजी मोहित्याचा सुपें महाल घेतल्यावर कांगोरी* वगैरे किल्ले घेतले......नंतर थोड्याच दिवसांनीं शके १५६८ त कोकणांत उतरून रायगड किल्ला घेतला व कल्याणवर अबाजी सोनदेवाकडून स्वारी करविली.........शके १५७० त राजापुर लुटलें व बाळाजी आवजीस चिटणिसी सांगितली. बाळाजी आवजीस चिटणिसी शके १५७० त मिळाली. हें बरेंच विश्वसनीय आहे. शके १५६८ त रायगड घेतला हेंही तितकेंच विश्वसनीय आहे. " रा. प्र. पृ. २७.

कै० राजवाड्यानीं हा शक जरी बरोबर आहे असें म्हटलें आहे, तरी या विवेचनाच्या शेवटीं त्यांनीं जो शेरा मारला आहे तो विचार करण्यासारखा आहे. ते म्हणतात " साराश अस्सल आधार कांहीं तरी असल्याशिवाय ह्या बखरींतील तपशिलावर विश्वास ठेऊन चालणें उपयोगाचें नाही. " आज जेधे शकावली बरीच मान्य व अस्सल आधारभूत ठरूं पहात आहे. म्हणून तिच्या पुराव्यापुढें ही बखरीची मिति हिणकस ठरते. मल्हार रामराव याच्या बखरीवरून रायगड हबशी याचेपासून घेतला असें दिसते. त्याच बखरींतील चंद्रराव मोरे प्रकरण 'शके १५७७ त केव्हां तरी उत्पन्न होऊन, वरील माहितीशीं बरेंच जुळतें आहे.' यावरून असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं, शके १५६८ मध्यें शिवाजीनें कोंडाणे किल्ला भेदानें घेतला. ही हकिकत व रायगडच्या कबजाची हकिकत यांची गल्लत झाली असावी.

[आ] शामजी आवजीस (बाळाजी आवजीचा भाऊ) कारखान-

---

* कांगोरी किल्ला रायगडचे आग्नेयेस व प्रतापगडचे उत्तरेस आहे कांगोरी व प्रतापगड अंतर ६ मैल आहे.

निशी रायगडची सांगितली शके १५७० त पाठविलें.

म. रा. स. प्र. शि. च. पृ. ३५

राजापुरच्या लुटीच्या सफरीच्या वेळीं चिटणीस बंधूंची प्राप्ती महाराजास झाली. याबद्दल सर्वांचें ऐकमत्य आहे. शिवदिग्विजयकार राजापूर घेतल्याचा शक १५७० हा देतात. पण जेधे श० १५८२ हा दिला आहे. शृंगारपुरच्या सुर्व्यांशीं जेव्हा महाराजांनीं युद्ध केलें त्याच्या पूर्वी थोडे दिवस राजापुर लुटलें. बखरकारास ह्या युद्धाची माहिती दिसत नाही. अर्थात् शिवभारतावरून अनुभविलेली राजापुरच्या लुटीची हकिगत जेधे शकावलीशी बरोबर जुळत असल्यामुळें राजापुरच्या लुटीचा जेधे शकावलीतील शक बरोबर आहे असें समजणे रास्त दिसतें.

[इ] शेडगावकर बखरींत शके १५७५ मध्यें रायगडावर देवीची स्थापना केल्याचा उल्लेख आहे.

हल्लीं रायगडावर भवानी नावाच्या टोकाशीं भवानीचें एक लहानसें मंदिर असून, ते अत्यंत अडचणीच्या जागीं आहे. हेंच कदाचित् शेडगावकर बखरींत उल्लेखिलेलें देवीचें मंदिर असावें. हे भवानीचे मंदिर इतक्या अवघड ठिकाणी आहे, की त्या ठिकाणीं सामान्य प्रवाशाला जाता येणार नाही. देवी प्रतापगडच्या भवानीसारखी अष्ट–भुजा आहे. दुसरी शिरकाई* देवी. ही गंगासागरच्या उत्तरेस व धर्म–शाळेच्या पूर्वेस आहे. मूर्ति प्रतापगडच्या देवीप्रमाणें अष्टभुजा असून साध्या पाषाणाची आहे. येथें बरीच पडापड झाल्यामुळें शिलालेख अगर इतर काहीं प्रमाणावरून

* ही शिरकाई देवी रायगडचे शिवपूर्व किल्लेदार शिर्के यांनीं स्थापलेली असावी. शिरकाई ही शिर्क्यांची कुलस्वामिनी होय. हे शिर्के निजामशाही अमलापासून मध्य कोंकणांत प्रबल असून त्यांच्या ताब्यांतील प्रांतास शिरकाण म्हणतात. प्रकरण २ मध्यें याबद्दल ज्यास्त माहिती आहेच. ह्या शिर्क्यांचे वंशज भोर संस्थानांत अद्याप मोठे मानकरी आहेत. रायगडच्या पायथ्याशीं असलेल्या शेल ऊर्फ बिरवाडी गांवचे ते अद्याप खोत आहेत. तसेंच नांदवी जवळील एका गांवचे ते वतनदार खोत आहेत. शिर्क्यांचा विजापुर दरबारी मोठा बोलबाला होता. त्याच शिर्क्यांच्या ताब्यांत रायगड असतां त्यांनीं आपल्या कुलदेवीची-शिर्काईची स्थापना केली.

निश्चित काल ठरवितां येईल असा कांहींच पुरावा सापडत नाहीं. असो. रायगड ताब्यांत घेतल्यावर तेथें खुद्द महाराजांनीं यशोदायिनी भवानीचें देऊळ बांधून तेथें तिची स्थापना केली असल यांत तिळमात्र शंका नाहीं. मात्र कालनिर्णयाबद्दल शंका आहे.

[ई] ज्ञानकोशकारांनीं रायरी किल्ला शके १५७० (१६४८ सन)त शिवाजीनें हस्तगत करून शके १५८४ (सन १६६२) त तेथें राजधानी केली असें म्हटलें आहे. हे दोन्ही कालोल्लेख आजच्या नव्या माहितीशीं विसंगत दिसतात, हे कोणीही कबूल करील. [रायगड राजधानी कधीं केली हें पुढें साधार देणार आहे. तेव्हा या शंकाचा विचार होईल.]

[उ] शि. च. प्रदीप ग्रंथांत श्री. शं. ना. जोशी (वाई) यांनीं थोडक्यात या सर्व सनांचा परामर्ष घेतला आहे. तोच उतारा देऊन हा भाग संपवूं.

“ रायगड घेतोः—शके १५६८. मल्हार रामराव बखर. याखेरीज दुसऱ्या कोणत्याही बखरींत ह्या प्रसंगाचा शक दिलेला नाहीं. सुरत मारून कारंजें घेतल्यानंतर रायरी घेतली आणि राज्याभिषेकाचे वेळीं रायरीचा रायगड केला, असें सभासद व चित्रगुप्त लिहितात. शिवप्रतापांत रायगड अथवा रायरी घेतल्याचा उल्लेख नाहीं. ९१ कलमींत मोरे प्रकरणापूर्वींच रायगड घेतल्याचें सांगितलें आहे; व तसेंच म. सा. छोट्या बखरींतही आहे. शेडगांवकर बखरींत ह्याचा दोन ठिकाणीं उल्लेख असून पहिल्याचा दुसऱ्याशीं मेळ नाहीं. पृ. ३५ वर म्हटलें आहे कीं मुसल (मुरुम ?) देव डोंगरावर बांधकाम करून अफजल वधानंतर पहिल्यांदा कोंडाणा घेण्यापूर्वीं रायगड बनविला. म्हणजे शके १५८१ च्या नंतर व १५६९ च्या पूर्वीं ! बरें पुढें पृष्ठ ७४ व ८१ वर सभासदी बखरीप्रमाणें सुरत लुटून कारंजें घेतल्यानंतर रायरी घेतली आणि राज्याभिषेकाचे वेळीं ‘ रायरी सोन्याची पायरी ’ हें नांव मोडून रायगड हें नाव ठेविलें, असें लिहिलें आहे. ह्यावरून विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं पृ. १९ वर मुसलदेव म्हणून डोंगर होता त्यास वसविला, राजगड नांव ठेविलें. (शके १५७०-७४) असें आलें आहे. एकंदरींत हें सगळें बिनमेळाचें लिहिणें आहे. शके १५७८

त रायरी घेतली (व तिचाच पुढें रायगड केला) हें जेधे वगैरे श.तील म्हणणें इतर बाबीशीं जुळतें व बरोबरही आहे. "

१०. शके १५७८ त जावळीच्या चंद्रराव मोऱ्याकडून रायरी किल्ला महाराजांनीं हस्तगत केला; असें निश्चित अनुमान करण्यास हरकत नाहीं. त्या किल्ल्याचे माजी राज्यापासूनचे हक्कदार शिर्के. पण त्याचा हक्क दलपतराव नामें मुतालिकानें बळकाविल्याचें मागें आलेंच आहे. महाराजांनीं रायरी घेतल्यावर नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें दलपतरावास मोईन करून देऊन त्याजवळील देशमुखीचा हक्क अनामत केला. अशा प्रकारें मध्य कोंकणांत सुरक्षित अशीं राजगड, *तोरणा व रायगड हीं तीन महत्वाचीं केंद्रस्थानें महाराजांच्या ताब्यांत आलीं.

मावळ प्रांतीं अंमल बसून तेथील देशमुख व देशपांडे दस्त व्हावे. या हेतूनें महाराज व त्यांचें मंत्रिमंडळ एक एक डोंगरी किल्ला सर करण्याच्या मार्गास लागले. कोंडाणा घेऊन पुणें प्रांती पुंडाई चालविली आहे, अशी शिवाजीची कागाळी विजापुर दरबारी पोचतांच, शिवाजी महाराजांवर विजापुरकरांचा सरदार फत्तेखान चालून आला. त्यानें बेलसरें, पुरंदर, शिरवळ हीं ठाणीं घेण्याचा प्रयत्न केला. महाराजांनीं मोठ्या हिमतीनें त्याला हुसकून लाविलें. पुढें शहाजी राजांना कैद झाली. त्यांच्या सुटकेसाठीं, छत्रपती शिवाजी महाराज यांचे ज्येष्ठ बंधू संभाजी राजे यांनीं बंगलूर व शिवाजी महाराजांनीं कोंडाणा देऊन विजापुरकराशीं तह केला. पुढें ४।५ वर्षें शहाजी राजे विजापुरींच असल्यामुळें, कांहीं विशेष हालचाल झाली नाहीं. चंद्ररावाचें प्रकरण उपस्थित होऊन जावळी प्रांत व रायगड किल्ला शके १५७८ त ताब्यांत आला. ही कागाळी प्रतापराव मोऱ्यानें विजापुर दरबारीं स्वतः जाऊन केली; पण त्याच वेळीं तेथें एक नवाच डाव रंगात आला होता.

११. आतां रायगड राधजानी कां केली याचें विवेचन करण्यापूर्वी, ह्या वेळीं शिवाजी महाराजांच्या राजकारणाचें थोडक्यांत पर्यालोचन करूं.

---

* तोरण्यालाच सुलतानगड हें नांव होतें.

१२. विजापुरचा बादशहा महमद आदिलशहा अर्धांग वातानें आसन्नमरण झाल्यामुळें दरबारांत भावी वारसाबद्दल पक्षोपक्ष बोकाळले होते. दक्षिणेंतील मुसलमानी शाह्या बळकाविण्याचे मोंगलांचे प्रयत्न जारी चालू होते. शके १५७५ पासून मोंगल शहाजादा औरंगजेब औरंगाबादेस ठाण मांडून बसला होता. गोवळकोंडेकर, विजापुरकर व मोंगल या तीन हत्तींची झुंज दक्षिणेच्या पठारावर मोठ्या निकरानें चालू होती. या हत्तींच्या टकरींत आपलें चिमुकलें स्वराज्य टिकवून धरणें मोठ्या मुत्सद्देगिरीचें व मिनतवारीचें काम होऊन बसलें होतें. शेवटी शके १५७८ त महमदशहा मरण पावला. तेव्हां वारसाचें निमित्त पुढें करून औरंगजेब विजापुरच्या भानगडींत शिरूं लागला. दोघांची कटकट सुरू झाली. महाराजांच्या पुणें जहागिरीच्या उत्तर–पूर्व बाजूला मोगली मुलूख तर दक्षिण–पश्चिम बाजूला विजापुरकराचा मुलूख. बरें हा जहागिरीचा प्रांत ३० वर्षांपूर्वी तहानें कागदोपत्रीं कां होईना विजापुरकरांकडे सुपूर्त केलेला* अर्थात् मोंगलाची पहिली धाड या प्रांतावर येणार. शिवाजी महाराजांनीं या वेळीं दुटप्पी किंवा दुगल राजकारण करून दोन्ही दरबारशीं पत्रव्यवहार चालविला. औरंगजेबाची इच्छा शिवाजीसारखा कर्तबगार तरुण आपल्या बाजूला असावा अशी होती. म्हणून तो बाह्यतः बादशाही तोऱ्यानें पण अंतस्थ नरमाईची भाषा बोलून महाराजांस आपणाकडे ओढून घेण्याचा प्रयत्न करीत होता. औरंगजेब आतां वाटेल तशीं अभिवचनें देईल व आपलें कार्य झाल्यावर निघून जाईल दिल्लीला. आपण मात्र शेजारच्या विजापुरकरांशीं वाकडे होऊन कायमचा शिवेशेजारीं शत्रू उत्पन्न करून ठेऊं. म्हणून शिवाजी महाराज विजापुरकराच्या पक्षाला मिळाले, व मोंगलांशीं त्यांनीं वैर सुरु केलें. इकडे विजापुरीं मुत्सद्यानीं परभारें दिल्लीस शहाजहान बादशहाशीं

* भीमेच्या उत्तरेचा मुलूख मोंगलांना द्यावा, दक्षिणेचा विजापुरकरांना द्यावा व विजापुरकरांनीं तो जहागिरी म्हणून शहाजीकडे ठेवावा असा जेधे करीन्यांत उल्लेख आहे. तसेंच शहाजीनें आपला मुलुख ठेऊन बाकीचा निजामशाही मुलुख मोंगल व आदिलशाही बादशहा यांस वाटून दिल्याबद्दल शिवभारतकार लिहितात.

तहाचें बोलणें लावून; तिकडून औरंगजेबास युद्ध थांबविण्यास इशारा देव विला. औरंगजेबानें हुकमाप्रमाणें युद्ध थांबविलें. व विजापुरदरबारशीं तह केला. पण तो शिवाजी महाराजांवर माल बेसुमार चिडला. त्यानें पुणें जहागिरी जाळून लुटून बेचिराख करण्याचे सक्तीचे हुकुम सरदारास दिले. बरें विजापुरकरांनीं शिवाजी महाराजांना पक्कें तोंडघशीं पाडिलें, इतकेंच नव्हे, तर तहांत शहाजीच्या जहागिरीचा प्रांत मोंगलास देऊन हलवायाच्या घरावर तुळसीपत्र ठेवण्याचा लटका उदारपणाही केला ! मोंगली सैन्याचा हा जोरदार शह महाराजाच्या स्वराज्याला बसल्यामुळें घाटमाथ्यावरील मुलखाची बरीच खराबी झाली. पण या संकटांतून एका अजब योगायोगानें मुक्तता झाली. तो योगायोग म्हणजे शहाजहानचें दुखणें व औरंगजेबास उत्तरेस जाण्याची लागलेली निकड !

१३. शहाजहान बादशहाच्या आजाराच्या बातम्यावर बातम्या दक्षिणेंत थडकूं लागल्या. औरंगजेबाला उत्तरेंत जाण्याची निकड ! ह्या धादलींत शिवाजीचें पुरते पारिपत्य करण्यास सवड कोठें होती ? इतक्यात महाराजांकडून एक नरमाईचें पत्र आलें तेवढ्यावर खूष होऊन, मनातून जरी सूडाचा अग्नी धडधडत होता तरी शिवाजीचे सर्व अपराध क्षमा करून त्यास कृपेंत घेतल्याचा देखावा औरंजेबाला दाखवावा लागला.

" यद्यपि तुमच्या पेशजीच्या गोष्टी विसरावयाजोग्या नाहींत; तथापि तुम्ही आपल्या कृत्याचा पश्चाताप केला व हा दरबार उपेक्षेचा नाहीं हें जाणिलें. तुमचें लक्ष निभ्रांत इकडे आहे असें समजोन तुमचें पूर्वकृत्य मनास आणीत नाहीं. " असें दरबारी थाटाचें पत्र लिहिलें. व विजापुरकरांस ही शिवाजीची ब्याद तिकडे कर्नाटकांत नेण्यास सुचविलें. इतकी तरतूद करून औरंगजेब उत्तरेंत निघून गेला. या प्रकरणापासून शिवाजी महाराजांसारख्या दूरदर्शी मुत्सद्यानें ' दोन मुसलमानी बादशहाच्या कुह्र दृष्टीसमोर व त्यांच्या जाण्यायेण्याच्या वाटेवर स्वराज्य टिकविणें अशक्य–निदान जिकिरीचें–आहे ' अशी खूणगाठ बांधिली असल्यास नवल काय ?

१४. विजापुरकरांनीं महाराजांचा पुरा विश्वासघात केल्यामुळें,

त्यांच्याशीं उघड बेबनाव पत्करिला. शके १५७९।८० त विजापुर दरबारांत वारसाबद्दल लाथाळी सुरु होती. याचवेळीं औरंगजेब बापा–भावाच्या हाल-अपेष्टा करून दिल्लीचें तक्त बळकाविण्याच्या धादलींत होता. दोन्ही दरबाऱ्यांच्या ह्या दुर्लक्षाचा फायदा घेऊन महाराजानीं आपली सावधगिरीची मजबुती चालविली. दोन्ही बादशहांच्या दृष्टीसमोर असणारी पुणें राजधानी सोडून, सह्याद्रीच्या भिंती आड बांधलेल्या राजगडास राजधानीचें स्वरूप दिलें. प्रबळगड वगैरे किल्ले घेऊन महाराजानीं विजापुरकराचा उत्तर कोंकणांतील अंमल उठविला. जेधे करिन्यात " स्वामीनीं किले राजगड, तोरणा या किलियावर इमारतीचे काम लाविले किले तयार करविले त्यावरी फत्तेखानाची फौज विजापुरीहून पुणें देशांत आली " असा एक उल्लेख आहे. फत्तेखानाची स्वारी शके १५७१ मध्यें झाली. त्या पूर्वी राजगड किल्ला बांधून झाला होता; असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. राजगड हा किल्ला सह्याद्रीच्या पश्चिम उतरणीवर आहे. घाटमाथ्यावरील सैन्यास या किल्ल्यावरही स्वारी करावयाची म्हणजे सह्याद्री ओलांडून यावें लागतें. या वेळीं हा किल्ला देशावरील शत्रूपासून बचाव करण्याच्या दृष्टीनें सोइस्कर वाटल्यामुळें शके १५७९ च्या सुमारास राजगड हे मुख्य ठाणें केलें.

१५. राजगड हें मुख्य ठिकाण केल्यावर, महाराजाच्या महत्त्वाच्या रायकीय हालचाली राजगडावरून झालेल्या आढळतात. त्यातील महत्त्वाच्या उलाढाली सालवार खाली देत आहे.

[अ] शके १५८१.* कान्होजी नाईक जेधे राजगडीं भेटले.

[आ] शके १५८१. पौषमासीं राजगडावर+राजनीतिविशारदांची परिषद भरल्याचा शिवभारतात उल्लेख आहे.

[इ] शके १५८३. सिद्दी जोहारानें पन्हाळ्यास वेढा घातला तेव्हां जिजाबाई राजगडास होती.

---

* माघ बहुल ११ मंदवासर बहुल देणें रदकर्जबरसशेट उबापा बकाल पेठ पावाड कर्जजमा पेठाहाय नजीक रायगड बा। वखैर कारकून पेठ मा। श. १५८१ राजवाडे खंड १८ पृ. ७९

"जननी शिवराजस्य सा राजगिरीवर्तिनी ।
निजानां गिरिदुर्गाणामवनेऽवहिता भवत् ॥५॥

शिवभारत अ. २६

[ई] शास्ताखानाचा पराभव करून शिवाजी महाराज शके १५८२ मध्यें राजगडींच आले.

वरील उल्लेखावरून शके १५७९ ते १५९१ पर्यंत महाराजाच्या कारभाराचें मुख्य ठाणें राजगडींच होतें दिसतें.

१६. जों पर्यंत जाहगिरीचा व मुलुखबंदोबस्तीचा व्याप घाटमाथ्यावर होता; तों पर्यंत राजगडासारखें घाटी मुलखाच्या नजीकचें ठिकाण राजधानीस योग्य होतें. पण मोंगलाशीं जेव्हा महाराजांचें युद्ध सुरू झालें, तेव्हा घाट माथ्यावरला मुलुख जयसिंगाबरोबर झालेल्या शके १५८७ च्या + तहांत मोंगलास देणें भाग पडलें. पुढें आग्र्याहून राजगडास आले. त्या वेळीं घाटमाथ्यावरील मुलखापेक्षा कोंकणांतील प्रदेशच शिवाजी महाराजांच्या

३१ पान + ॥ तमुदंतं शिवनृपो निशम्य शिवपत्तने ।
॥ सर्व नीतिविदांवर्यः सचिवा निदमब्रवीत ॥२९॥
॥ कार्यांतर प्रसक्तत्वात् मयि सांतरमास्थिते ॥
॥ संग्रामदुर्गसहिता गता चक्रावती पुरी ॥३०॥

ही बातमी राजगडावर ऐकून सर्व राजनीतिवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ असा तो शिवाजीराजा सचिवांस असें बोलला. दुसऱ्याकार्यांत गुंतल्यामुळें मी दूर असतां चाकणनगरी संग्रामदुर्गासह हातची गेली.

शिवभारत अ. २८

[उ] * राजगडावर पंचाइती भरवून दिलेल्या निकालांचीं निवाडापत्रें कांहीं सांपडतात.

[ऊ] शके १५८८ पराभव नाम संवत्सरे श्रावण वा। १२ आगरियाहून पेटारियांत बैसोन पळाले. संभाजीसहे वर्तमान मार्गसीर्श शुा। ५ राजगडास आले. १५८९ शहाजहानचा वकील राजगडीं भेटला.

[ऋ] शके १५९१ फाल्गुन शु॥ १५ राजगडीं राजाराम महाराज उपजले.

ताब्यात ज्यास्त होता. या पूर्वीच पेण, दाभोळ, शृंगापूर इ० कोंकणांतील ठाण्यांवर स्वारी करून ती महाराजांच्या ताब्यांत आलीं होतीं. मोरोपंत पेशव्यास उत्तर कोंकण व अबाजी सोनदेव यांस दक्षिण कोकणाच्या बंदोबस्तास पाठविलें. रायगड हा दक्षिण कोंकणात मोडतो. तेव्हां कोंकणप्रात हेंच ' स्वराज्य ' उरल्यावर त्यातील केंद्रस्थान जो रायरीगड तोंच मुख्य ठाणें केलें असल्यास नवल काय?

शके १५९२ भाद्रपदमासीं रायगडाहून निघून जुन्नरास वेढा दिल्याचा उल्लेख आढळतो. याच सालीं केलेलीं सुरतेची दुसरी लूट रायगडीं आणिलीं.

बादशहानें दिल्लीस बोलवून विश्वासघात केल्यामुळें पुरंदरच्या तहाप्रमाणें वागण्याचें बंधन महाराजास राहिलें नाहीं. पुढील तीन चार वर्षांत मोंगलाकडे दिलेले किल्ले परत मिळविण्याचा उद्योग जोरानें चालविला. घाटमाथ्यावरील प्रदेश ताब्यात आला तरी, स्वराज्याचें मुख्य ठाणें तेथें मांडण्यापेक्षां तें कोंकण प्रातीं मांडणें जास्त श्रेयस्कर; ही गोष्ट आता महाराजांस चागलीच पटली. स्वराज्याचा व्याप दिवसेंदिवस जास्त जास्त वाढत चालला असून, विजापुरकरांपेक्षाही प्रबळ असे जे मोंगल बादशहा त्याच्याशीं आतां झगडा करण्याची पाळी आली असल्यामुळें, आपली राजधानी फारच सुरक्षित ठिकाणीं असली पाहिजे. राजगड हें ठिकाण काहींसें सुरक्षित असलें

पान३२* पुरंदरचा तहः--चार लक्ष होनाचा तळ कोंकणपैकीं विजापुरकराचे इलाख्यापैकीं हाली तुह्मांकडे चालत आहे तो बंदोबस्ताकरता इकडील सरकारात आला. किल्याचा तपशील राजे जयसिंगाचे लिहिल्याप्रमाणें.........राजगड, भोरप, घोसाळा, उधेदुर्ग, तोरणा, तळेगड, अलवारी, रायरी, लिंगाणगड, महाडगड पाल, कुंवरी–[शिवाजीकडे राहिलेले किल्ले] राजवाडे खं. ८ पृ. १२।१३
शके १५८७ भाद्रपद ७ ले. १४

ऽ राजवाडे ले. २७३ शके १५७५ ले. २७७ शके १५८९ माघ शु॥ १ निवाडा पत्र. यांत राजगड मु॥ पंचाईत भरवून निकाल दिल्याचा उल्लेख आहे.

तरी, घाटावरील मुलखाच्या नजीक असून त्याचें क्षेत्रफळ राजधानीच्या व्यापास अपुरें झालें. म्हणून राजगडापेक्षां विस्तीर्ण व दुर्लभ असा रायगड किल्ला राजधानी करण्याचें ठरविण्यांत आलें.

मोंगलाशीं झालेल्या युद्धांत देशावरील सपाट व मैदान मुलखाचा कबजा मोंगली सैन्यानें घेतला. परंतु सह्याद्रीच्या प्रचंड तटानें संरक्षिलेला हा डोंगराळ कोंकणी मुलुख तितक्या साहजिकपणें घेणें मोंगलांसही शक्य झालें नाहीं. अखेरीला सर्व शत्रूंपासून बचाऊन एक कोंकण प्रांतच स्वराज्याच्या छत्राखालीं टिकून राहिला. या प्रांतांतील मध्यवर्ती, मजबूत, विस्तीर्ण, दुर्लभ असें ठिकाण जो रायरीकिल्ला तोंच राजधानीला योग्य ठरल्यास नवल काय ?

[१७] रायगड पहाडी किल्ला चांगला शत्रूची फौज बसावयास जागा नाहा. घोडे माणूस जाण्यास महत्संकट वरकड किल्ले पन्हाळे वगैरे बहुत पण खुलासेवार व मैदानांत यास्तव आजच्या प्रसंगाला हीच जागा बरी. येथें लवकर उपद्रव होऊ न शकेल [सभासद बखर]. सुरक्षित राजधानी असावी हीच प्रमुख कल्पना त्या वेळीं महाराजांच्या मनात असावी. राजधानी ही राज्याची इभ्रत ! युद्धमान राष्ट्रं रणांगणावर युद्धाचे डाव खेळत असता बेचिराख मुलुखाचें बाजारबुणगें काबीज करण्यापेक्षां राजधानीला शह देऊन, तेथील राजसिंहासन डळमळीत करण्याचा प्रयत्न करितात. मुसलमानी सत्तेच्या डोळ्यात खुपणारी महाराष्ट्राच्या स्वराज्याची ही राजधानी रायगडासारख्या दूर अंतरावरील अत्यंत डोंगराळ मुलुखात नसती तर बादशाही सत्तेपासुन तिचे रक्षण करणें जिकिरीचें झालें असतें. स्वराज्याचें अधिष्ठान जी राजधानी तीच शत्रूच्या ताब्यांत जाती, तर स्वराज्याचें तारूं कोठें तरी संकटाच्या समुद्रात भटक्या मारीत राहीलें असतें. शेवटचा प्रबळ मोंगल सम्राट औरंगजेब याचे ताकदवान् तक्त पुढील धामधुमीच्या काळात कमकुवत झाल्यानंतर उत्तरेच्या राजकारणात "ज्याच्या हातीं दिल्ली त्याच्या हातीं राज्याची किल्ली" असा प्रकार झाला होता. ५७ सालच्या क्रांतियुद्धांत (बंडात) देशी शिपायांच्या हाती गेलेली दिल्ली ताब्यात घेण्यासाठी इंग्रज सेनापतींनीं इतकी प्रचंड खटपट का केली हें ध्यानांत येईल. फार लाबचें उदाहरण नको. परवांच्या युरोपांतील महायुद्धाची गोष्ट युद्ध

सुरु झाल्यावर जर्मनीचा पहिला डाव काय होता ? बेल्जममधून सैन्य नेऊन फ्रान्सच्या काळजाला–पारिसला–काबीज करून तें राष्ट्र हतप्रभ करून सोडा-वयाचें. तो डाव फसला ती गोष्ट निराळी. स्वराज्यावरील संकटांत स्वराज्याचें भटकलेलें तारुं संकटाच्या तुफान दर्यांत भटकत असतां,त्या वेळच्या कुशल-कर्णधारांनीं स्वराज्याची पंढरी–राजधानी–भीमथडी तट्टावर घालून, जिंजी-पासून सातार्‍यापर्यंत फिरती ठेविली होती. शत्रू राजधानीसाठीं इरेसच पड-ला, तर तिला डोक्यावर घेऊन नाचेन; पण राजधानी सर केल्याची बहा-दुरी त्याला मिरवूं देणार नाही. हा मुत्सद्दी लोकांचा डाव असतो. शिवाजी पुणें जहागिरीचा कारभार पाहूं लागल्यापासून त्यांनी आपलीं मुख्य ठाणीं पुणे, खडेबारें, रायगड व राजगड अशी क्रमानें बदललीं. शेवटीं रायगडा-वर राज्याभिषेक समारंभ करून स्वराज्याची पहिली सन्माननीय राजधानी होण्याचा अपूर्व मान रायगडास दिला.

१८. दोन बादशहांच्या क्रुद्ध दृष्टी समोर राजधानी घाट माथ्यावर न मांडता, कोकणातील पहाडी मुलखात स्थापिली. ही गोष्ट तत्कालिन सुरक्षित-पणास पोषकच झाली. कोंकणांतील मुलूख 'घोडे माणूस जाण्यास महत्संकट' अर्थात् बादशाही बेताचे 'बडे बापके बेटे' खडकाळ व दरिद्रि कोंकणांत येतील कशाला? न जाणों बादशाही सैन्य आले तरी या डोंगराळ मुलखांत हिंडतांना हें डोंगरी उंदीर कुठल्यातरी बिळांत बसून गोफण गुंड्यांनीं त्यास धुडकाऊन लाविंतील. त्याचे ते मिजासीचे फर्मास पोषाख पेहरून होतात न होतात तोंच हे मराठे बहाद्दर त्यास भाल्यानी भोसकून आतील ' रु ' बाहेर काढून पुन्हा अदृश्य होतील. या प्रदेशांचा हा अजिंक्यपणा पुढें चांगलाच प्रत्ययास आला. झुलफिकारखानासारखा नाणावलेला सेनापति कित्येक दिवस वेढा घालून बसला होता. औरंगजेब सर्वस्वासह लागेल ती मदत करीत होता. पण मराठ्यानी दाद दिली नाही. शेवटीं विश्वासघातकी सूर्याजी पिसाळानें किल्ल्यावरील मावळ्याच्या शौर्यास विश्वासघाताचा सुरुंग लाविला. तेव्हा किल्ला हस्तगत झाला. भारताच्या पराक्रमाचा बुरुज तोफा, बंदुका व सुरुंगांनीं उध्वस्त न होतां स्वार्थाच्या फंद फितुरीनेंच तो बहुशः नामोहरम झालेला दिसतो.

१९ राजगड हा किल्ला सह्याद्रीच्या पश्चिमेस अलग आहे. देशावरून येणाऱ्या प्रत्येक शत्रूस सह्याद्री ओलांडून यावेंच लागतें. सह्याद्री ओलांडताना बरेंच अवजड तोफादि युद्धसाहित्य आणणें अशक्य होते. रायगडाजवळ यावें तो निसर्गनिर्मित उभे* कडे ! सुरुंग लावून भगदाडें पाडावीं तरी किल्ल्यात शिरकाव नाही. किल्ल्यावर जाण्यास एकच एक अवघड रस्ता. रस्त्याच्या एका बाजूला खडकाचा स्वाभा विक तट तर दुसऱ्या बाजूला शेकडोंफूट खोलीची उभी दरड एक पाऊल चुकले तर खालीं पाताळात पडून स्वर्गवास. तळवटापासून शेकडों फूट उंच अशा डोंगराच्या पठारावरील एका टोकावर सुळक्यासारखा एक विस्तीर्ण उंच त्रिशिंगी डोंगर, तोच रायगड. पायथ्याशीं यावयालाच ६०० फूट डोंगर चढावा लागतो. माऱ्यासाठी आजूबाजूला टेकड्या म्हणाव्या तर वाळ-डोंगर. वेढा द्यावा तर भोंवतालचा मुलूख डोंगराळ. घोडें उभे राहण्या-इतकी जागा सपाट नाही. किल्ल्यावरून येणाऱ्या एखाद्या धोंड्याने चढाव करणाऱ्या शत्रूचे शेंकडो सैनिक जायबंदी व्हावयाचे. शत्रूचा लवकर उपद्रव न पोचे. अशास्थानीं स्वराज्याचे पहिलें सिंहासन स्थापणे महाराजास का इष्ट वाटलें हे लक्षात येईल.

२०. पुढे पेशव्याचे वेळी मराठी राज्यास शिवेशेजारी प्रबळ शत्रू उरला नाही. मराठी साम्राज्याचा व्यापही वाढला; म्हणून दळणवळणास सोईचे असे पुणें शहर राजधानीचें ठिकाण करण्यात आलें. शत्रू आपल्या-पेक्षा प्रबळ असेल तर आपली राजधानी शीरसलामत बचावण्यासाठी अड-चणीच्या जागी नेण्याची राजनीति जुनीच आहे. जरासंधाच्या त्रासापासून राजधानीला पीडा पोचू नये म्हणून प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णानी आपली राजधानी द्वारका समुद्रात नेऊन बांधिली. इंग्रजांनी आपली मुख्य वखार

*राजा खासा जाऊन पाहता गड बहुतच चखोट चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणें दीड गांव उंच परजन्य काळीं कडियावर गवत उगवत नाहीं आणि धोंडा तासिंव एकच आहे ... ... आणि बोलिलें तख्तास जागा गड हाच करावा. असें करारीं करून तेच गडीं घर वाडे मांडिया सदरा .... थटी महाल चुनेगची बांधिले. [सभासद पृ. ७१]

सुरतेहून मुंबईसारख्या भिकारड्या बेटांत आणिली. ह्याचें मुख्य कारण शत्रूचा होणारा वारंवार उपद्रव टळावा हेंच होय.

सामान्यतः एखाद्या राष्ट्राची राजधानीच शत्रूच्या ताब्यांत गेली की, त्या राष्ट्राच्या इभ्रतीचें नाकच कापल्यासारखें झालें. लष्करी सत्तेचा दणदणीत बादशहा नेपोलियन याने १९ व्या शतकात युरोपच्या नकाशावर मर्जीस वाटेल तशी फिरवाफिरव करितांना चार सम्राटाच्या राजधान्या टांचेखालीं चेंगरल्या होत्या; तेव्हांच त्या कॉर्सिकन शिपायाला पिढीजात बादशहाकडून सार्वभौम म्हणवून घेतां आलें. असो. याप्रमाणें स्वतःच्या राजधानीस सुरक्षित केल्यानंतर कमजोर शत्रूंच्या कंबक्तीचा विचार पुढें येतो. स्वराज्याच्या तोरणापासून तो राज्यारोहणापर्यंत सर्वकाळ स्वकीयांचें संघटन, दक्षिणेकडील व उत्तरेकडील बादशाही शत्रूंशीं भांडण यांत गेल्यामुळें जी कित्येक परकीय लोकांची उटारची पिल्लें देशांत फिरकत होती. त्याच्याकडे तितकेंस लक्ष देतां आलें नाहीं. ज्याच्या हातीं तागडी त्याचेंच तक्त हें, अर्थशास्त्राचें तत्त्व शिवाजीच्या पूर्ण प्रत्ययास आलें असलें पाहिजे. पण तो काळ स्वास्थ्याचा नव्हता. तागडी हळुहळु तक्त निर्माण करिते. तिचें संक्रमण लोकांच्या नजरेंत भडकपणें भरत नाहीं. तरवार एक घाव नी दोन तुकडे करून तक्त ताब्यांत घेते. अशा तडकाफडकी तक्त ताब्यांत घेण्यानें जित लोकांचीं मनें परक्या विरुद्ध भडकून जातात. व ते पुनश्च स्वराज्य प्राप्त्यर्थ साहस कर्म करण्यास प्रवृत्त होतात.

२१. शिवाजीच्या वेळीं पश्चिम किनाऱ्यावर नवीन व्यापारी धामधूम करूं लागले. स्वास्थ्याचा अवधि संपताच पश्चिम किनाऱ्याच्या बंदोबस्ताचा प्रश्न शिवाजीपुढें उभा राहिला. भावी काळ लष्करी व आरमारी अशा जोडसामर्थ्याचा आहे, ही गोष्ट जाणून लष्कराबरोबर आरमाराची करवेल तितकी तयारी करून पश्चिम किनारा ताब्यांत ठेवण्याचे कसोशीचे प्रयत्न सुरू झाले. राजापूर, दाभोळ, चौल, व दुसऱ्या कित्येक बंदरांतून त्या पश्चिम किनाऱ्यावरून बाहेर मोठा व्यापार चाले. त्याची किफायत चांगली असे. सरहद्दीचा बंदोबस्त हें राज्यरक्षणाचें महत्त्वाचें अंग असल्यामुळें कारवारपासून सुरतेपावेतों आपणास कोणी शत्रू नसावा अशी व्यवस्था शिवाजीस

ठेवावयाची होती. ह्या हेतू सिद्धीस नेण्यास सिद्दीचीच कायती प्रमुख अड-चण होती.

२२. सिद्दीचें राज्य लहानसें खरें. परंतु त्याच्या आरमारी सामर्थ्यामुळें व अजिंक्य, जणूंकाय लंका द्वीपच अशा जंजिऱ्या किल्यामुळें तो पश्चिम समुद्रावरील प्रबळ सत्ताधीश बनला होता. शिवाजीमहाराजांस बादशाही बलिष्ट सत्तेजवळ बराच काळ भांडावें लागले. म्हणून ह्या शिवेशेजारील आरमारी शत्रूशीं आपलें शक्तिसर्वस्व एकवटून भांडण्यास लागणारें स्वास्थ्य लाभलें नाहीं. जंजिऱ्याचें शल्य शिवाजीच्या हृदयांत पूर्ण सलत होतें. तें काढून टाकण्याच्या अनेक खटपटी त्यानें केल्या. त्या पूर्ण यशस्वी होण्या-पूर्वीच अवतारसमाप्ति झाली. तरीपण शिवाजीमहाराजांनीं बनविलेल्या आरमारी सैन्याच्या जोरावर संभाजीस शिद्दीचा चांगला खरपूस समाचार घेतां येऊन पित्याची इच्छा अंशतः तरी सिद्धीस नेल्याचें पुण्य संपादितां आलें. संभाजी व जंजिरेकर सिद्दी यांच्यामध्यें झालेल्या कटकटींची हकीकत इतिहासज्ञांस माहीत आहेच. संभाजीची ही धडाडी पाहून त्याचीं दुष्कृत्यें महाराष्ट्र विसरल्यासारखा होऊन पश्चिम किनाऱ्यावरील भावी वैभवाकडे सर्वांचें लक्ष वेधलें होतें. संभाजीच्या ह्या उज्वल पराक्रमाचें वर्णन प्रस्तुत स्थलीं अप्रासंगिक म्हणून देतां येत नाहीं. यूरोप खंडांत १५ व्या व १६ व्या शतकांत समुद्रावरील व्यापारासंबंधीं नवीन चळवळीस सुरवात होऊन व्यापारासाठीं द्विपांतराहून पुष्कळ लोक सुवर्णभूमीकडे धांव घेऊं लागले. ह्या पश्चिम किनाऱ्यावरील व्यापार फार किफायतशीर असल्यामुळें तो हातीं घेण्यासाठीं कित्येक युरोपियन राष्ट्रांनीं खटपट चालविली. विशेषतः पोर्तुगिज फ्रेंच व इंग्रज या राष्ट्रांची फार चढाओढ लागून राहिली होती. स्वतंत्र झालेल्या स्वराष्ट्राची भरभराट होण्याला हा सामुद्रिक व्यापार म्हणजे यशाची गुरु-किल्लीच होय, *आणि तो ताब्यांत राहावा म्हणून शिवाजीनें अटोकाट प्रयत्न* केला.

देशाच्या भरभराटीसाठीं व्यापार, व्यापारासाठीं पश्चिम किनारा ताब्यांत रहावा म्हणून आरमार, आरमाराच्या वर्चस्वासाठीं जंजिऱ्याच्या शिद्दीचा बंदोबस्त, शिद्दीचा मोड होऊन त्याच्यावर कदर रहावी अशी नजीकची

सुरक्षित राजधानी ही कारण, परंपरेची साखळी लक्षात घेतली असतां *रायगड राजधानी का केली या प्रश्नाचें उत्तर समर्पक मिळेल.

२३. आता जंजिरा व रायगड यांचा अन्योन्य संबंध पाहूं. कोंकण-प्रांतीं शिवाजीचा अंमल बसल्यापासून त्या प्राताला जंजिऱ्याच्या शिद्दीकडून उपद्रव पोहोंचत असे. रातबेरात शिद्दीची जहाजें राजपुरीच्या खाडींतून येऊन मुलुखास उपद्रव देत. राजपुरीची खाडी ही दोघांच्या राज्याची सरहद्द होऊन बसली होती. जंजिऱ्याच्या शिद्दीस चांगली जरब बसावी म्हणून जंजिऱ्या किल्ल्याच्या पूर्वेस ३ मैलावर असलेले दंडाराजपुरी हें ठिकाण शिवाजीनें १६८३ मध्यें काबीज केलें. पण शिद्दी फार प्रबल व रगेल असल्यामुळें, इतक्या जवळचे आपलें ठाणें तो सुरक्षित राहूं देईल अशी खात्री महाराजास पटेना, म्हणून त्या ठाण्यापासून ४० मैल पूर्वेस आपली राजधानी वसवून ते ठाणें 'जोरी' केलें. तळगड व घोसाळगड हे कोकणच्या स्वारींत काबीज केलेले किल्ले दंडाराजपुरीच्या खाडीचें द्वार-रक्षकच होत. या दोन किल्ल्यावरून राजपुरीच्या खाडींतील शत्रूच्या हालचालीस टेहेळना येतें इतकेंच नव्हे तर पायबदही घालता येतो. शत्रू तसाच जबरदस्त असला तर तेथून मध्यवर्ती केंद्राला—राजधानीला बातमी देता येते. तळगडाच्याबरोबर पूर्वेस बोरवाडी ह्या गावी भानगड नावाचा एक लहानसा टेहेळ्या किल्ला आहे. तेथें दिवसा खुणेनें अगर रात्रीं प्रकाशानें खुणवार्ता देता येते. तेथून रायगडावर अशीच वार्ता कळविण्याची व्यवस्था आहे. महाराष्ट्रातील किल्ल्यांचे अन्योन्य वार्ताविहारीसंबंध होते. तसे संबध साभिप्राय राखले होते ही गोष्ट इतिहासज्ञास सांगणें नकोच. असाच वार्ताविहारी संबध जंजिऱ्यापासून तो तहत रायगडापर्यंत आहे-जंजिरा किल्ल्याच्या राजकारणाचा रायगड राजधानी करण्यात कशा प्रकारचा संबंध होता, हें ह्यावरून दिसून येईल. जंजिऱ्याचें शल्य महाराजांच्या मनास रात्रंदिवस कसें टोचीत होतें याचें एक उदाहरण देते.

* तळें, घोसाळा व रायरी हीं ठिकाणें काबीज करून त्यानें (शिवाजीनें) रायगड किल्ला अत्यंत मजबूत असा बांधिला. हीं ठिकाणें सिद्दीला दडपून टाकण्यास फार उपयोगाचीं होतीं. (म. रि. पान ३८४)

सन १६७१ (शके १५५२) च्या होळीच्या दिवसात सिद्दीकासम व खैर्यत यांनी दंडाराजपुरी येथील शिवाजीच्या ठाण्यावर हल्ला केला. मराठी शिबंदी सणामुळें बेसावधपणें ख्याली-खुशालीत निमग्न झाली होती. हल्ल्यात मराठ्याच्या दारूच्या कोठारास आग लाविली. त्यावेळी जो धडाक्याचा आवाज झाला तो शिवाजीस ४० मैलावर रायगडी ऐकूं आला. त्याबरोबर राजपुरीस धोका आहे असें म्हणत शिवाजी दचकुन झोपेतून जागा झाला.*

२४. महाराष्ट्राच्या इतिहासाचें भावी भवितव्य कशावर अवलंबून आहे याचा विचार करून सुरक्षितपणा व सावधपणा याचा जणुं सुवर्णमध्य असा जो रायगड त्याच्यावर स्वराज्याची मुहूर्तमेढ रोविणारा कल्पक शिल्पकार धन्य होय! पुढे स्वराज्यावर वज्राघात होऊन हे केंद्र जिंजी, सातारा, पुणें अशा निरनिराळ्या ठिकठिकाणी नेणे प्राप्त झाल्यामुळें मूळच्या शिल्पकाराची धोरणी दृष्टीनें ठरविलेली आखणी मोडली. पश्चिम समुद्राच्या बंदोबस्ताचे कार्य मध्यवर्ती सत्तेकडून दुय्यम दर्जाच्या आरमारी सत्तेकडे सोपविले गेले. पुढे पेशवाईत तर मध्यवर्ती मुख्य सत्ता व आरमारी सरदार यांची सामर्थ्यें परस्परास पूरक न होता विरोधक

* पुढें राज्याभिषेक झाल्यावर जंजिऱ्याच्या राजकारणास पुन्हां सुरवात झाली. भेदानें किंवा अन्यमार्गानें जंजिरा काबीज करण्याची महाराजांची खटपट होती. नेपोलियननें आपल्या आरमारी सरदारांस इंग्लिश खाडीवर ६ तास मोकळीक दे म्हणजे इंग्लंड काबीज करितों असें सांगितलें. तशीच कांहींशी खटपट लाये पाटील यांचे मार्फतीनें करण्याचा महाराजांचा बेत होता, हें खालील हकीगतीवरून दिसून येईल.

" शके १५९८ त मोरोपत पेशव्यानें जंजिऱ्यावर स्वारी केली त्या वेळेस लाये पाटील यांनीं रात्रीं जंजिऱ्यावर शिड्या लावून मराठी शिपायास किल्ल्यांत जाऊं देण्याची तजवीज केली होती, अशा मजकुराचें पत्र अलिबागचे सर पाटील याजकडे पांडडते. महाराज रायगडावर होते ते पिंगळे यास योग्य वेळीं मदत गेली नाहीं म्हणून रागावले."

भा. इ. सं. मं त्रै. वर्ष २ रें पृ. १३२-१३२ ले. २

झाल्यामुळें इंग्रजादि परकीय लोक गोगलगाईच्या पायानें पण हिमालयाच्या स्थाणुत्वानें कसे प्रबल झाले, आंग्रे ह्या आपल्याच आरमारी सरदाराचा पराभव करण्यास नानासाहेबांनीं इंग्रजांची कशी मदत घेतली, पश्चिम किनाऱ्यावरील व्यापारी जकातीचें उत्पन्न लक्षात न घेतल्यामुळें पेशवे द्रव्याच्या कसें अडचणींत सांपडले इ. इ. मुद्यांच्या विवेचनाचें स्थळ हें नव्हे !

छत्रपति शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक महोत्सव.

महाराष्ट्र स्वातंत्र्य लक्ष्मीला यवनांच्या दास्यपंकांतून अविश्रांत आणि अविरत उद्योग करून ज्या महान् थोर देशभक्त स्वातंत्र्यवीरानें सोडविलें त्या छत्रपती शिवाजी महाराजांची धन्य होय ! महाराजांची थोर योग्यता तत्कालीन लोकांस पारतंत्र्याच्या रुढीनें अंध बनल्यामुळें कळेना. शके १५९४ च्या सुमारास महाराज रायगडावर असतां एका भोजनप्रसंगीं पुष्कळ सरदार मंडळी * जुळली होती. स्वाभाविकच शिवाजीमहाराजांना उच्चासन मांडलें होतें. तें कित्येक मराठे सरदारास खपलें नाहीं. आपण पिढीजाद राजे (नांवाचे ?) असता हा पाटलाचा मुलगा आमच्यापेक्षां श्रेष्ठ आसनावर बसतो ! त्या सरदाराची ही क्षुद्र भावना पाहून महाराजास व इतर खास विश्वासांतील मंडळीस यथाविधि राज्याभिषेकाची आवश्यकता विशेषत्वानें जाणवूं लागली.

मागें राज्याभिषेकाचे रहस्य वर्णन केलें आहेच. असो. राज्याभिषेकाची कल्पना पुढें येतांच चिंचवडचे मोरयादेव, श्री. सद्गुरु रामदास, मातोश्री येसूबाई यांनीं या कल्पनेस आनंदानें पुष्टी दिली. महाराजांचे बालपणापासून एकनिष्ठ सेवक मोरोपंत पिंगळे, बाळाजी आवजी चिटणीस यांनीं समारंभाच्या जुळवाजुळवीस सुरवात केली. राज्यभिषेक होण्यापूर्वी मौंजीबंधन व्हावें लागतें. मौंजीबंधन व्हावयास महाराजांचें क्षत्रियत्व सिद्ध झालें पाहिजे.

*रायगडावर मराठे मंडळाच्या एका बैठकीच्या प्रसंगीं शिवाजीराजे उच्चासनावर बसल्याबद्दल मोहिते, माने, घाटगे, शिर्के, निंबाळकर या मराठे घराण्यांस राग आला. (शिवदिग्विजय पान ४०६)

स्वराष्ट्रास अतुल क्षात्रतेजानें स्वतंत्र करणारे महाराज क्षत्रिय होते हें सिद्ध करणें म्हणजे दिवटीच्या प्रकाशात सूर्य पाहाण्यासारखेंच होय ! पण अंधळी रूढी एखादे वेळीं अग्नि देखील धुवून घेण्याचा अट्टाहास करते. गतानुगतिकतेच्या चक्रांत सापडलेली महाराष्ट्रीय जनता महाराजाचें क्षत्रियत्त्व एकदम कबूल करीना. तेव्हा तिच्या डोळ्यात अजंन घालणारा तसाच विद्वान् अधिकारी पुरुष हवा. विश्वेश्वर ऊर्फ गागाभट्ट ह्या अधिकारी थोर विद्वान् पुरुषानें या बाबतींत पुढाकार घेतला. बाळाजीपंत चिटणिसांनीं गागाभट्टास काशीहून ह्या समारंभास रायगडी आणविलें. मनुष्याची योग्यता जन्मावरून न ठरवितां त्याच्या शुद्ध व कर्तबगार चारित्र्यावरून ठरवावी हें मत गागाभट्टास मान्य होतें. शिवाजी महाराजाच्या क्षत्रियत्वास विरोध करणाऱ्या रूढींच्या दासांची तोंडें बंद करून महाराजाच्या क्षत्रियत्वाचा मोठा पुरस्कार केल्यामुळें राज्याभिषेकास राष्ट्रीय व धार्मिक उत्सव यथाविधि पार पडला. गागाभट्टाने केलेली ही सामजिक क्रांती फार महत्त्वाची व उपयुक्त होती. सामाजिक सुधारणेचा हा पाया पुढिलाच्या दोषांमुळें ढासळला त्याचीं फळें आजचा महाराष्ट्र भोगीत आहे.

भोसल्याचें कुळ उदेपूरच्या शिसोदे ह्या रजपूत वंशापैकीं असून त्यास त्रिकर्मांचा अधिकार आहे असें ठरले. नंतर राज्यभिषेकाची समारंभाची जुळवाजुळव सुरु झाली. मागें सांगितल्याप्रमाणें अनेक कारणांनीं रायगड हेंच राजधानीचें ठिकाण ठरलें. रायगड इतका विस्तीर्ण किल्ला दुसरा क्वचित आढळले. राजगड तर रायगडापेक्षां क्षेत्रफळानें बराच लहान.

शके १५९६ आनदनाम संवत्सरे ज्येष्ठ शु॥ १३ *शनिवार हा राज्याभिषेकाचा दिवस ठरला. महाराष्ट्राच्या भाग्याचा तो महन्मंगल दिवस. स्वातंत्र्य लक्ष्मीचा तो महोत्सव मराठ-मोळ्यानीं न पाहिलेला, अदृष्टपूर्व-व न ऐकलेला-अश्रुतपूर्व-स्वराज्याच्या राज्यारोहणाचा प्रसंग शिवछत्राखालीं एकदिलानें लढून मिळविलेल्या स्वराज्याची संस्थापना पाहण्याचें भाग्य ज्या कष्टाळू नेकजात इमानी मराठे वीरांना लाधलें, धन्य त्यांच्या आईची कूस, धन्य ते मावळे व शिवार धन्य तो त्यांचा स्वराज्यसंस्थापक शिव–सम्राट !

* म. रामराव स. म. शि. च. मध्यें गुरुवार देतो.

राज्याभिषेक समारंभाचें सविस्तर वर्णन अस्सल पत्रांवरून मिळणें अशक्य झालें आहे. बखरींतून मात्र हीं वर्णनें विस्तृत खुलासेवार आहेत. ह्या पुस्तकांत राज्याभिषेकाचें सविस्तर वर्णन आम्ही मुद्दाम देणार आहों. कारण आतां येणाऱ्या लोकशाहीच्या काळांत असल्या समारंभांत धार्मिक पावित्र्य व मांगल्य आढळणार नाहीं ! स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय या चतुः-सूत्रीवर आधारलेलें हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या पुरुषाच्या प्रथम राज्यारोहणाचा वृत्तांत तरुणास मंगल, पवित्र व स्फूर्तीदायक वाटेल. म्हणून तो वृत्तांत मुद्दाम देण्याचें ठरविलें आहे. हिंदुस्थानला जरी यापुढें स्वराज्य मिळालें तरी या समारंभाची 'अद्वितीयता' अढळ राहील यांत संशय नाहीं. असो.

ज्येष्ठ शु॥ ४ स महाराजांचा व्रतबंध समारंभ झाला. महाराजांचें क्षत्रियत्व सिद्ध व सर्वमान्य झालें. व्रतबंधसंस्कार झाल्याशिवाय राज्यारोहण होऊं शकत नाहीं म्हणून हा समारंभ आधीं करण्यांत आला. तेव्हापासून १० दिवस निरनिराळे विधी व समारंभ चालू होते. ज्येष्ठ शु॥ ६ स पट्टबंधन विधी करून ऋत्विजवर्णन पुण्याहवाचनपूर्वक यज्ञास आरंभ झाला. विनायकशांति केली. समारंभासाठीं सप्त समुद्र व पुण्य नद्यांचें पाणी आणविलें.

"मुख्य सिंहासन राजधानी करणें, त्यासी पुण्यदेश, पुण्यभूमि पाहून आसमंद्भागीं पुण्यक्षेत्रें व महानदी व स्थानी विपुल उदक कृत्रिम सरिता म्हणजे पाट नहर याची उदकें सर्व धान्यें त्या देशी व्हावें ऐसें स्थान, व शत्रूस दुःसाध्य असावें यावरून रायगड ही जागा सर्व राज्यांत दुःसाध्य व श्रीकृष्णासमीप सर्व लक्षणें उत्तम आहेत पाहून योजिला" [म. ग. १६०]

ज्येष्ठ शु॥ १३ स सकाळीं समारंभास मुख्य सुरुवात झाली. अष्टप्रधान, पत्रलेखक, गणलेखक, ऋत्विज, छंदोगामात्य, कोशरक्षक, महालकरी, अठरा कारखान्यावरील कारखानीस, देशाधिकारी, व नगराधिकारी हे सर्व आपापल्या नेमणुकीप्रमाणें मंगलस्नानें व उत्तम पोषाक करून सिद्ध झाले. महाराज पट्टराणी सईबाईसाहेब व युवराज संभाजीसह विधियुक्त मृत्तिकास्नान, पंचगव्यस्नान गंगादि पुण्य नद्यांच्या उदकाचें स्नान, पंचामृतस्नान व शुद्धोदक स्नान

करून शुभ्रवस्त्रें, अलकार परिधान करून सिद्ध झाले. क्षीर वृक्षाचे (खैराचें) सव्वाहात उचीचें सुवर्णाने मढविलेले सिंहासन* करून त्यावर महाराज बसले. पट्टबधन करून सईबाई सिंहासनावर महाराजाच्या उजव्या बाजूस बसल्या, युवराज सभाजीही बसला. सिंहासनाचे पूर्वेस मुख्य प्रधान मोरोपत पिंगळे घृतपूर्ण सुवर्ण कलश घेऊन उभे राहिले. दक्षिणेस सेनापती हबीरराव मोहिते दुग्धपूर्ण रौप्य कलश घेऊन उभे राहिले. पश्चिमेस रामचद्रपत अमात्य दधिपूर्ण ताम्रकलश घेऊन उभे राहिलें. उत्तरेस छंदोगामात्य प्रधान रघुनाथ पडित मधुपूर्ण सुवर्णकलश घेऊन उभे राहिले. उपदिशाना आग्नेयेस सचीव अण्णाजी दत्तो छत्र घेऊन उभे होते. नैर्ऋत्येस जनार्दनपत हणमते सुमत व्यजन घेऊन उभे होते. सन्मुख सव्यभागी पत्रलेखक बाळाजी आवजी लेखनपात्र घेऊन सिद्ध होते. इशान्य भागी न्यायाधीश बाळाजी पडीत दुसरे चामर घेऊन उभे होते. वामभागी गण लेखक चिमणाजी आवजी लेखनपात्र घेऊन उभे होते. त्याच्या सभोवार सर्व कोशाचे व शालाचे अधिकारी होते. मुहूर्तघटी भरताच ब्राह्मणाच्या वेद मत्रोच्चारावरोबर छत्रपतीवर मगलाक्षताचा वर्षाव आणि आम्रपल्लवानी तीर्थोदकाचे सिचन करण्यात आलें. त्यावेळी मगलवाद्ये दुदुभि याच्या ध्वनीने आकाश दुमदुमून गेले. ह्या अभिषेकानतर मगलस्नान होऊन सुवासिनीनी आरती केली. कास्य पात्रात घृत घेऊन त्यात व आरशात मुखावलोकनाचा विधि झाला. शुभ्र वस्त्रे व अलकार धारण करून सिंहासनावर आरूढ होण्याच्या समारभास सुरुवात झाली. सिंहासनाची रचना अशी होती. क्षीर वृक्षाची वेदि करून ती सुवर्णाने मढविली होती. तळाशी १६ वृषभाची ओळ त्यावर मार्जाराची, त्यावर तरसाची, त्यावर सिंहाची, त्यावर व्याघ्राची तोंडे सुवर्णाची करून बसविली होती. रत्नाचे हिऱ्याचे व जडावाचे काम केले होते. त्यावर मृगचर्म पसरून सुवर्णाची नाणी पसरली. त्यावर मृगचर्म पसरून मग वर गाद्या, लोड, तक्के मखमलीची अंथरली होती. सिंहासनावर छत्र व मेघ डंबरी उभारली होती,

* सिंहासन ३२ मण सोन्याचें होतें. [सभासद]

त्याचा चादवा रत्नखचित सुवर्णाचा असून मोत्याची झालर व घोंस लाविले होते.

मुहूर्त होताच श्रीविष्णूच्या सुवर्ण प्रतिमेची षोडशोपचारें पूजा व प्राणप्रतिष्ठा केली. ती उजव्या हातीं घेऊन सिंहासनाला सव्य घालून उजवा गुडघा प्रथम ठेवून पाय न लाविता पूर्वाभिमुख करून महाराज सिंहासनावर बसले. मंगलवाद्यें, भेरी, तोफांची सरबत्ती, नृत्य, वाद्यजयध्वनी यांनीं आकाश भरून गेलें. रायगडावर तोफांचे आवाज निघताच स्वराज्यांतील सर्व किल्ल्यावर तोफांची सरबत्ती करण्यात आली.

सिंहासनावर बसल्यावर रक्तवर्ण पोषाक, दिव्य अलंकार, व राजभूषणे धारण करण्यात आलीं. नंतर विधिपूर्वक धनुष्यबाण खड्ग याचीं पूजनें होऊन तीं धारण केली. तेव्हा सुवर्णपुष्पांची वृष्टि करण्यांत आली. पुन्हां सोळा सुवासिनींनी मंगल आरती ओवाळली त्यांस वस्त्रें अलंकार दिले. ब्राह्मणांचे आशिर्वाद झाले. ऋत्विज, आचार्य व ब्राह्मणपूजन करून गागाभट्टास १ लक्ष रुपये दक्षिणा दिली. ऋत्विजास ५ हजार रुपये ह्याप्रमाणें इतर ब्राह्मण व याचक यास द्रव्य देऊन तृप्त केलें.

यानंतर अष्टप्रधान व इतर अधिकारी यास वस्त्रें देण्याचा समारंभ झाला. ज्यानें त्यानें आपापलीं पदें वस्त्रांसह स्वीकारून बहुमान पुरःसर महाराजास नजराणा करून मुजरे केले. बाळाजी आवजी चिटणीस यास चिटणीसीचीं वस्त्रें दिलीं. सर्वांचे मुतालिकही नेमून दिले. अष्टप्रधानाच्या गैरहजेरीत राजधानींत राहून त्याचीं कामें मुखत्यारीनें चालविण्याचा त्याचा अधिकार असे. शामजी नाईक पुंडे यास पोतदारीची व बाळाजी रघुनाथ सबनीस यास फौजेच्या बक्षिगिरीचीं वस्त्रें दिलीं. वरकड सुभेदार, महालदार,

* वस्त्रें देणें म्हणजे ज्याच्या त्याच्या पदाचा इतमाम ठरवणें, इतमामाप्रमाणेंच ठरलेला पोषाक अगर ऐश्वर्य त्याच्या अधिकाऱ्यानें मिरवावयाचें. उ० मोरेपंतांच्या वस्त्रांचा तपशील. बादली वस्त्रें ५ सणगे व शिरपेंच, मोत्यांचे तुरे, कंठ्या, चौकडे, झगे, शिकेकटार, ढालतलवार. चौघडे नौबती, जरीपटके, हत्तीघोडे, व सोन्याच्या दांडी चवऱ्या.

कारखानदार फौजेंतील सरदार, मानकरी, यांस त्यांच्या त्याच्या इतमामाप्रमाणें वस्त्रें दिलीं. अशा प्रकारें स्वराज्याचा पहिला दरबार बरखास्त होऊन महाराजाची स्वारी देवदर्शनास निघाली.

सुलक्षणी सोन्याच्या साजानें शृंगारलेल्या व मोत्याची झूल घातलेल्या अश्वावर आरूढ होऊन महाराज महादरवाजासमोरील पटांगणांत आले. तेथें सोन्यामोत्याच्या अलंकारांनीं सजविलेल्या हत्तीच्या अंबारींत बसले. हत्तीचे गंडस्थळावर सेनापती हंबीरराव बसले होते, व मुख्य प्रधान मोरोपंत खवासखान्यात मोरचेल घेऊन होते. राजवाड्यापासून जगदीश्वराचे देवळापर्यंत रस्ता कुंकुमाच्या सड्यांनीं रांगोळ्यांनीं व तोरणांनीं सुशोभित केला होता. मिरवणुकींत सर्वांपुढें जरीपटका व भगवें निशाण दोन हत्तीवर फडकत होतें. त्यामागें प्रधानांच्या जरीपटक्याचे हत्ती व फौजेंतील निशाणें विराजत होतीं. खास हुजुर पागेचे घोडेस्वार, तोफखाने, पादाती, पटेकरी, विटेकरी, साग बर्चीवाले, कोतवाली हत्ती ५० साडणीस्वार १०० बाजेकरी, कर्णेवाले, शिंगेवाले, भाटबंदीजन असे सळामिसळीनें चालले होते. महाराजाच्या खास अंबारीभोंवतीं मावळे सरदार चालले होते. प्रधानाच्या अंबाऱ्या सभोंवतीं अंतरानें चालल्या होत्या. त्यामागें लष्कराच्या निवडक तुकड्या अशी प्रचंड मिरवणूक राजवाड्यापासून निघाली. वाटेंत सुवासिनींनी मंगलारत्या ओवाळल्या व लाह्या, पुष्पें, दुर्वा यांची वृष्टी करीत होत्या. अशा रीतीनें स्वारी जगदीश्वराचे मंदिरांत जाऊन यथाविधि पूजोपचार झाल्यावर परतली. सभाद्वारीं पूर्णकलश लिंबलोण उतरून महाराजानीं ग्रहप्रवेश केला.

गृहात येतांच महाराजानीं कुलदेवता व मातोश्री जिजाबाई यास वंदन केलें.

वाचक हो ! यथाविधि राज्यारोहण समारंभ पार पडून महाराज ज्यावेळीं मातोश्री जिजाबाईस वंदन करण्यास आले. त्यावेळीं त्या ' वीरसू ' माऊलीला काय वाटलें असेल ? आपल्या पुत्राच्या महन्मंगल भाग्याचा अप्रतिम शुभ प्रसंग पाहून तिचें अंतःकरण भरून आलें असेल, गर्हिवरानें कंठ दाटून आला असेल. त्रिलोकात झेंडा फडकविणारा पुत्र आपल्या पोटीं जन्मास

घेऊन गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपति बनला ! ही किती भाग्याची गोष्ट आहे. इंद्रादि देवताचें ऐश्वर्य देखील यापुढें तुच्छ होय ! मातोश्री जिजाबाईच्या आनंदाची परिसीमा झाली. माय–लेकराच्या ह्या रोमहर्षण भेटीस इतिहासात दुसरी तोड सापडणे मुष्कील. असो.

या दिवशी सर्व आप्तेष्टास मोठी मेजवानी झाली. समारंभ सुरु झाल्यापासून म्हणजे ज्येष्ठ शु॥ ४ पासुन ब्राह्मणभोजनें सारखीं चालू होतीं. रायगडाखालीं व रायगडावर अनेक ठिकाणि मडप वगैरे घालून ब्राह्मण भोजनाची उत्तम व्यवस्था ठेविली होती. समारमात कोठेंही न्यून पडूं नये म्हणून निरनिराळ्या खात्यावर निरनिराळे अधिकारी नेमून त्याच्यावर जबाबदारी सोंपाविली होती.

राज्यारोहण प्रसंगी महाराजानी स्वराज्यात महत्त्वाच्या सुधारणा केल्या.

१. महाराजानी सुवर्णतुला करून राजाचिन्हें धारण केलीं. सुवर्णतुलेस १६००० हजार होन लागले (यावरून शिवाजीचे वजन १४० पौंड होते)

२. रामदासस्वामीचा प्रमाद म्हणून भगवाझेडा हे ' सेना चिन्ह ' ठरविले.

३. पूर्वीचा मुसलमानी शक बद करून " राज्याभिषेक शक " सुरु केला. आणि " क्षत्रिय कुलावतास शिव छत्रपती महाराज सिंहासनाधीश्वर " अशी बिरुदावली धारण केली. नवीन शकाचें नाव ' शिवशक ' असे न ठेविता ' राज्याभिषेक शक ' असे ठेवण्यात महाराजाचा व्यक्ति गौरवापेक्षां स्वराज्य गौरवाच्या राष्ट्रीय बुद्धीचा प्रभाव दिसून येतो.

४. रायगड किल्ला राजधानी करण्यात आली. राजधानीस अवश्य लागणाऱ्या तजविजी म्हणजे. वाडे, मंदिरें, सभागृहें, महादरवाजे, पागा, कोठ्या, पेठा, तलाव, भुयारे, मनोरे, रस्ते, वगैरे तयार करण्यांत आले.

५. राज्यकारभाराची व्यवस्था मुसलमानी बादशाही पद्धतीची न करितां महाभारत, स्मृति, कौटिल्यादि प्राचीन राजकारणी पुरुषानी लिहिल्याप्रमाणें प्रधान–मंडळ–पद्धती सुरु केली. वास्तविक पधान मंडळाच्या नेमणुकी व राज–मुद्रा स्वराज्याच्या प्रथमोक्रमापासूनच सुरु केल्याचा इतिहासात आधार

मिळतो. त्या राज्यारोहण प्रसंगी प्रधान मंडळाच्या नेमणुकी वगैरे औप. चारिक रित्या पुन्हा जाहीर करण्यात आल्या, ..

हिंदवी स्वराज्याचें पहिलें प्रधानमंडळ

(मागे हुजुरे चवरी मोर्चेल, पंखे, पानदान घेऊन उभे. मध्यभागीं महाराजाचें सिंहासन.)

उजवी बाजू	डावी बाजू
१ { मुख्य प्रधान (पंत प्रधान) फारशी नाव (पेशवा)	१ (सर नोबद) सेनापति २ (डबीर) सुमंत
२ (मुजुमदार) पंत आमात्य.	३ न्यायाधीश.
३ (सुरनीस) पंतसचिव.	४ पंडितराव.
४ (वाकनीस) मंत्री	

हे मुख्य राजमंडळ झालें.

५ चिटणीस	५ फडणीस.
६ परराज्यातील वकील	६ सेनाधिकारी

कचेरीत मुजुरे करविणे, योग्यते प्रमाणें उभें करणे, परकी परकी आल्यास वर्दी लावणें हीं कामें चोपदारांनी दरबारात पुढें राहून करावीं.

प्रधान मंडळाचीं नावे व वेतन.

१ मुख्य प्रधान—मोरोपंत पिंगळे	१५००० होन
२ सेनापति—हंबीरराव मोहिते	१०००० ,,
३ आमात्य—रामचंद्र निळकंठ बहुतकर	१२००० ,,
४ सचिव—अण्णाजी दत्तो प्रभुणीकर	१९००० ,,
५ सुमंत—जनार्धनपंत नारायण हणमंते	१०००० ,,
६ न्यायाधीश—बाळाजीपंत पंडित	१०००० ,,
७ मंत्री—दत्तोजीपंत त्रिमल	१०००० ,,

* हंबीरराव मोहिते यास सेनापति पावी ऐसे नेमिले होते तेव्हां तो अदिल. सिपाई जोहार करणार नाहीं ऐसे बोलला तें समई राघो मित्र याणें बहुत श्रम समागमें केला दिलीस बरोबर होता. ऐसे पाहून त्यास सेनापति देऊन उभा केला.. सभासद—विरचित शि. ब. दुसरी निबंध. कृ. वा. पुरंदरे.

प्रधानमंडळाचीं नावें वेतन
पंडितराव--रघुनाथ भट्ट उपाध्ये, चदावरकर १०००० होन
पाचाड व गडावर सेटयेपणाचा हक्क गोपाळजी सेटीया* याचा होता. (रा. ख. १८ पान ८० व ८२)

शिवाजी महाराजानी राजकीय अधिकाऱ्याचे पगार नक्त नेमणुकीनें बांधून टाकिले. कोणास वंशपरंपरा एखादें पद अगर जहागिरी--वतन दिलें नाहीं ही महत्त्वाची राज्यकारभारातील सुधारणा महाराजानींच प्रथम केली. + सरंजामी पद्धत नष्ट करण्यानें एक मोठी राजकीय सुधारणा घडून आली.

गोपाळजी सेटियास हरकी होन पा। १५० माथा ठेवले त्याचा वसूल घावयास, हिराजी इदलकर सुभेदार माजी इमारती किल्ले रायगड याचे कर्ज घेतले. (रा. ख. १८ पृ. ८२)

+ सभासद विरचित शिव च. सा. ख. पृ. १०८ या. कृ. बा. पुरंधरे यांच्या लेखावरून. 'ते समई अवघे (अष्टप्रधान) उभे राहून विनंति केली जे महाराज आपण शाश्वत नरेंद्र सिंहासनारूढ जाहले. समस्त देव ब्राह्मण समक्ष तसेंच आम्हास सदाशत्व दिल्हे. परंतु या दत्तास शाश्वत्वाभयें असावें ते समस्त ब्राह्मण मातबर लोकांचे व भटजींचे मुखे चित्त संतुष्ट जाहले निःसंदेह भासतो यैसी विनंति केली ते समयी गागाभट माहाराजास बोलिले ही गोष्ट प्रमाण आहे ब्राह्मण होत्साते क्षत्रीये अंश धरून व्हावे लागते तेव्हां त्यांचे समाधान आमचे समक्ष करावें हे उत्तम आहे. तेव्हां माहाराज बोलिले समाधान कोणते रीतीनें करावें तेव्हां भटजींनीं श्रीशंभु महादेव यावरील बेलभंडार, दवणा व आंबेच हाळद कुंकु व निर्माल्य आणून आपले हातीं घेऊनही राजाचे हाती देऊन समस्त ब्राह्मण व आवघे सरदार जे मंडपी होते त्यांचे समस्त सिंहासनावरून बोलिले जे ही पदे तुम्हांस दिल्ही यांत जो कोणी तुमचा यावत वंश आसल त्यावत खलेले करील त्याचा श्रीशंभु व तुळजाभवानी वंशक्षय करील हे समस्त ब्राह्मण आपण जगद्वंद्य यांचे समक्ष त्रिवाच्या सत्य, सत्य सत्य यैसे बोलून पूर्व युगवत येथा येथा स्थानी उभा राहावयास आज्ञा जाहली. तेव्हां भटजींनींही अतःपर निःसंदेह उभे राहावे यैसे सांगून प्रतिस्तंभींचे मत उच्चारून येथा स्थानी उभे केले आणि आह्निक संपूर्ण केलें.'

उत्सव समयींचे पाहुणे.

२६. भूषण कवि रायगडावर उत्सव प्रसगीं आला असून त्यानें 'शिवराज भूषण' हें काव्य निर्माण केलें. भूषण कवि आपल्या आगमनाबद्दल लिहितो.

॥ देसनि देसनि ते गुनी आवत जाचन ताही ॥
॥ तिनमें आयो एक कवि, भूषण कहियतु जाही ॥२५॥

शिवरायाच्या ह्या स्वतंत्र राज्याचा डका उत्तरेपर्यंत पोंचून तिकडील पादशाही अमलाला कटाळलेले गुणिजन महाराजाच्या आश्रयास येऊ लागले.

गागाभट्ट व त्याचे बरोबर कित्येक विद्वान् शास्त्री पुराणिक गुणिजन रायगडावर ह्या प्रसगी जमले होते. +

वकील.

राज्याभिषेक समयीं शिवाजी महाराजाकडे निरनिराळ्या सत्ताधाऱ्याकडून रायगडावर वकील आले होते.

या समारभास सुरतेच्या प्रेसिडटचा मुलगा हेन्री ऑक्झेडन हा हजर होता. त्याचे बरोबर दोन कपनीचे व्यापारी व दुभाषा नारायण शेणवी असे होते. ही मंडळी एप्रीलच्या अखेरीस मुबईहून जहाजात बसून चौलास उतरली; तेथून रोह्यास दुसरे दिवशी पोचले. रोह्याहून पालखी करून ते निजामपुरास (कोस्ते) गेले. मग पाचाडास पोचले. शिवाजी महाराज राज्याभिषेकाच्या धादलीत असल्यामुळें १०।१५ दिवस त्यांची भेट झाली नाही. महाराजास मोकळीक मिळाल्यावर ह्या वकिलास गडावर बोलावून दुभाषा नारायण शेणवी याचे मार्फत व्यापारी तहाचे बोलणें झालें. इग्रज वकिलानी आणिलेला नजराणा मोरोपत पेशव्यामार्फत महाराजास अर्पण करण्यात आला. त्याचा तपशील, ६ मोती, ३ हिऱ्याच्या आगठया, शिरपेच पिसाचे आकाराचे किंमत ६८० रु., सलकडीं ४५० रु. किंमतीची. मुख्य दरबारला हे इग्लिश वकील हजर असून त्यानी सिंहासनाधिष्ठित शिवछत्र-

+शुद्धिसमारंभः—नेताजी पालकर हा बाटून मुसलमान झाला होता. त्यास शके १५९८ (सन १६७६ जून १७) ला याच रायगडावर शुद्ध करून पुन्हां हिंदु धर्मांत घेतलें.

पतींना लवून मुजरा केला ! तो देखावा पुढें २०० वर्षांनीं उलटा दिसूं लागेल असें भविष्य कोणा भविष्यवाद्याला त्यावेळीं करतां आलें असतें काय ?

गोंवळकोंडेकरानीं (कुत्बशहानें) हत्ती, घोडे, जवाहीर वगैरे नजराणा आपल्या वकिलाबरोबर पाठविला होता.

गोव्याच्या पोर्तुगिजांचें याच वर्षी चौथाईबद्दल महाराजांशीं भांडण चाललें होतें त्या बाबत विचार करणेसाठीं त्याचाहि वकील नजराणा घेऊन आला होता.

राज्याभिषेक महोत्सवाची फलश्रुति

२७. हें पुस्तक जरी मुख्यतः रायगड विषयक आहे; तरी आम्हीं पर्यायानें रायगडशीं निगडित झालेल्या स्वराज्य–स्थापनेच्या कल्पनेचें सूत्र अखंडित राहील असेंच विवेचन ह्या प्रकरणात केलें आहे. राज्याभिषेक महोत्सवाचें विस्तृत वर्णन दिल्यावर ओघानेच त्याची फलश्रुति सांगावीशी वाटणार म्हणून विषयांतर होत असल्यास तो दोष पतकरून थोडक्यात फलश्रुति सांगावयाची आहे.

पनामा कालव्यांतून प्रवास करणारे प्रवासी सांगतात कीं " आम्हाला समुद्रातून डोंगराच्या माथ्यावरील सरोवरात जाताना आम्हीं पाणशिडीनें उंच उंच जात आहोंत असें वाटत नाहीं. मात्र जेव्हा डेकवर यावें व दूरवरचा समुद्र आपल्या कितीतरी खालीं आहे हें पहावें तेव्हा आपण उंच आल्याचें पाहून आश्चर्य वाटतें. उतरताना हीच स्थिती होते. " स्वातंत्र्यातून पारतंत्र्यात जाताना किंवा पारतंत्र्यातून सुटका होऊन स्वतंत्र होताना अशीच स्थिती होते. शिवाजी महाराज आणि त्यांचे मित्र–मंडळ यांनीं सुमारें २५ वर्षे अविश्रांत उद्योग करून महाराष्ट्र स्वतंत्र केला. यवन बादशहाच्या गुलामगिरींतून लोकांची प्रत्यक्ष जरी सुटका झाली तरी मनानें घेतलेली पारतंत्र्याची ' हाय ' गेली नव्हती. मानसशास्त्र सांगतें कीं, रोगी जरी पूर्ण बरा झाला तरी मनानें घेतलेली " आपण रोगी आहों " ही त्याची भावना नष्ट झाल्याशिवाय तो पूर्ण रोगमुक्त होत नाहीं. हेंच तत्त्व राजकीय बाबतींत लागूं पडतें. मुसलमानी अमलाचा तीनशें वर्षांचा बाऊ महाराष्ट्राच्या

मनातून काढून टाकण्यासाठीं व सर्व हिंदुस्थानला झालेली स्वातंत्र्याची स्मृति जागृत करण्यासाठीं एवढा प्रचंड राज्याभिषेक-महोत्सव करणेंच जरूर होतें. ह्या महोत्सवाचा पाया इतका भक्कम, हेतुपूर्ण व विस्तारसूचक कीं या पायावर उभारलेले, ' हिंदवी स्वराज्यानें ' इतिहासांत अनेक चमत्कार करून दाखविले. आम्हीं मराठे स्वतंत्र आहों, आम्ही कोणाचे ताबेदार होणार नाहीं, हें पहा आमचें स्वतंत्र सिंहासन आणि हा पहा आमचा स्वतंत्र राजा. आह्मांला मुसलमानी सुलतानशाही राज्य नको, आमच्याच राजानें आम्हासाठीं चालविलेलें देवाब्राह्मणाचें रक्षण करणारें स्वराज्य पाहिजे. तुमच्या बादशहाचा नूर पौर्णिमेच्या चंद्रासारखा तर आमचा राजाचा नूर " प्रतिपच्चंद्र रेखे " सारखा वर्धिष्णु व विश्ववंदित आहे. ह्या भावना या समारंभानें जनतेच्या मनांत जागृत करावयाच्या होत्या. हिंदी जनतेच्या मनात राष्ट्रधर्माला थारा नव्हता असें कोणी इतिहासज्ञ म्हणत असेल तर म्हणो. पण स्वराज्य संस्थापनेच्या शिवाजीमहाराजांच्या कल्पनेंत राष्ट्र-धर्मच प्रमुख होता. ह्या राष्ट्र-धर्माची संस्थापना रायगडावर ह्या उत्सवानें जाहीर रीतीनें करून ह्या ' नवधर्माचा ' प्रसार महाराष्ट्रभर केला.

राज्यभिषेक महोत्सवानें मराठ्याचा स्वतंत्र राजा स्वतंत्र बाण्यानें स्वराज्य चालवूं शकतो, इतकेंच काय तर तो सिंहासनाधीश्वर होऊन हिंदुपदपादशाहीचा दृढ पाया घालतो, हें मुसलमान पादशहांना व तसेंच त्याच्या हिंदू प्रजेला विदित झालें. शिवाजी हा उपेक्षणीय किंवा दंडनीय कोणी भुरटा लुटारू आहे अशी जी स्वकीय व परकीय लोकाची वेडगळ समजूत होती, तिला यानें मोठाच धक्का दिला. दीडशें वर्षें मराठी राज्य टिकण्याला दुसरीं अनेक कारणें असतील; पण हें उच्च भावना जागृत करणारें कारण सर्वांत श्रेष्ठ होय !

२८. राज्यभिषेक महोत्सव झाल्यावर एक मोठी दुःखदायक पण जगाच्या रहाटीप्रमाणें पाहिलें असता अपरिहार्य गोष्ट घडून आली ती म्हणजे राजमाता*

---

* राजमाता जिजाबाई यांचा मुक्काम रायगडाखालीं पाचाड गांवीं असे. तेथें त्यांचा राजवाडा व विहीर होती. वाड्याचें जोतें व विहीर अद्यापीं आहे.

जिजाबाईसाहेब यांचा मृत्यु ही होय. आपल्या भुवनश्रेष्ठ पुत्राच्या मस्तकावर ' याच देहीं याच डोळा ' छत्रचामरें विराजलेली पाहिल्यावर जणुं आपलें इहलोकींचें इतिकर्तव्य संपलें असें जाणून ज्येष्ठ वा ९ शके १५९६ रोजी रायगडाखालीं पाचाडगांवीं जिजाबाईसाहेब मृत्यु पावल्या. [१८ जून १६७४]

महाराज परम मातृभक्त. मातृवियोगदुःख त्याना असह्य झालें. जिच्या श्रेष्ठ शिक्षणानें, उज्ज्वल उपदेशानें, उद्बोधक आज्ञेने आपण हा प्रचंड उद्योग सिद्धीस नेला; ती परमप्रिय माता सोडून गेली. हे पाहून दुःखानें महाराज विषण्ण बनले ! चार महिने ते कोठेच स्वारी शिकारीस गेले नाहींत; सिंहासनारोहण देखील महाराजांनीं केलें नाहीं. म्हणून अश्वीन शु॥ ५ च्या मुहूर्तावर पुन्हा * सिंहासनारोहण केले. नतर प्रतापगडच्या भवानी मातेचें दर्शन घेऊन सद्गुरु रामदासाचे, जेजुरीच्या खडोबाचे व शिंगणापुरच्या महादेवाचें दर्शन घेतले.

राजधानीची बांधणी.

२९. रायगडचें मूळचें बाधकाम कोणी केलें हें जरी अज्ञात असलें तरी शिवाजी महाराजांनीं रायगड राजधानी करताना त्याची बरीच उस्त वारी केली. वास्तविक मागील राजवटीत हा काही कोणा राजाचा राहण्याचा किल्ला नव्हता. रायरी मामल्याच्या मामलतदाराचें हें ठिकाण. त्याची राजधानी करतांना त्यास अनेक सुधारणा करणें जरूर होतें.

जिजाबाईची छत्री पाचाड गांवीं असून तिचा फोटो केसरी ता. १२।१०।२९ च्या अकांत आला आहे.

जिजाबाईची ५ लाख होनांची खासगी मालमत्ता होती; ती त्यांनीं महा राजांच्या स्वाधीन केली.

* भा. इ सं. मं. त्रै. वर्ष १० शके १८५१ अक १ ला

'श्री शिवराज्याभिषेक कल्पतरू' या ग्रंथात निश्चलपुरीनें तांत्रिक पद्धतीनें ललिता पचमी (आश्विन शु॥ ५) स केलेल्या दुसऱ्या राज्याभिषेकाची माहिती दिली आहे.

'तस्य पर्वतराजस्य बलिदानं न चार्पितं। तत्र स्था शिरका देवी पुजिता नैव वेद्विज'॥

शके १५९२ च्या सुमारास राजगडावरील ठाणें उठवून रायगडावर नेल्याचें मागें आलेंच आहे. राजवाडे खंड ८ ले.१८ मध्यें शिवाजीनें केलेल्या रायगड दुरुस्तीची यादी दिली आहे. तीत तेथें तळीं व इमारती बांधण्याकरिता ५० हजार होन शके १५९४ सालीं खर्च झाल्याचे नोंदलें आहे.

रायगडाचा खर्चाचा तपशील.

३५००० दिवाणांची घरें
२०००० तळी २
१०००० गच्ची
५००० बाले किल्ला
३५०००
१५००० तट
५०००० एकूण राजवाडे खंड ६ पृष्ठ १८

रायगडावर दुरुस्तीचे व इमारती बांधण्याचें काम आबाजी सोनदेव याचेकडे महाराजानी सोपविले होतें. राजधानीच्या सोईसाठी खालीलप्रमाणें इमारती वगैरे बांधण्यात आल्या.

खास महाराजासाठीं राजवाडा, अठरा कारखान्यांची स्थलें, प्रधान, त्याचे सरकारकून याचे वाडे, सिंहासनाची जागा व सभागृह (दरबार हॉल) पुढील महादरवाजा, मनोरे, + पेठ, दारुचा कोठारें, तलाव. जगदीश्वराचें मंदीर *पागा इ. इ. स्थळें बांधविली. या शिवाय विवेकसभा (पंडिताचे वादस्थळ) न्यायसभा प्रगटसभा, (गरिबांची भेट घेण्याचें ठिकाण) प्रबोधसभा (किर्तन, पुराण श्रवण करण्याचें स्थळ), रत्नशाला नीतिसभा, आंतर्गृहें, देवगृहें, महाल, इ. इ., कित्येक बांधण्यात आली. रायगडची चौफेर तटबंदी दुरुस्त करून जागजागीं बुरुज देऊन

+ पेठेची रचना सुंदर व व्यवस्थित आहे सर्व दुकानांची लांबी, रुंदी, उंची सारखी असून घोड्यावर बसून सामान घ्यावें. आज पेठेचें चिरेबंदी जोतें फक्त शिल्लक आहे.

* जगदीश्वराचें मंदीर हिराजी इंदलकरच्या हातून बांधविलें त्याचें वर्णन पुढें येईल.

एकच वाट कायम करण्यांत आली. खाफीखान यानें अशी एक आख्यायिका दिली आहे:— सर्व बंदोबस्त झाल्यावर महाराजांनीं जाहीर केलें कीं जो राजमार्ग ठेविला आहे त्या शिवाय अन्य मार्गानें हातीं निशाण घेऊन गडावर येणारास १०० होन व एक सोन्यांचें कडें बक्षिस मिळेल. एका धेडानें अवघड वाटेनें किल्यावर निशाण रोविलें. त्यास सदरहू बक्षिस मिळालें व ती अवघड वाट बुजवून टाकण्यात आली.

रायगडावरील शिवाजी महाराजांचा मृत्यु

३०. विजापूरच्या आदिलशाहीशीं कटकट उपस्थित झाल्यावर व दुसऱ्या अनेक कारणांनीं महाराज दक्षिण दिग्विजयास शके १५९९ मध्यें गेले. तिकडे अनेक लढाया केल्या. अनेक राजकारस्थानें केली, व्यंकोजीची समजूत काढून त्यास मार्गावर आणिलें.

राज्याभिषेकानंतर लगेच राजमाता वियोगानें महाराज दुःखी झाले. पुढें संभाजी औरंगजेबास मिळाल्याचें दुर्वृत्त ऐकून तर महाराज विलक्षण विषण्ण झाले. अशा स्थितीत कर्नाटकच्या मोहिमेंत फार +दगदग पडली. त्याचा वाईट परिणाम महाराजाच्या प्रकृतीवर होऊन त्यास गुढगी नांवाचा रोग झाला. त्यातच ७ दिवस ताप येऊन शके १६०२ चैत्र शु॥ १५ मेस ता. ३ एप्रिल स. १६८० हिंदवी स्वराज्य सस्थापक शिवाजी महाराज, रायगडावर कैलासवासी झाले ?

हिंददेवीचा स्वातंत्र्य–संपादक कंठमणी एकाएकीं गळून पडला. महाराष्ट्राचा पहिला छत्रपती त्याला सोडून गेला. स्वराज्याचा मुख्य आधार तुटला ! महाराष्ट्राच्या भाग्याकाशातील अत्यंत तेजस्वी तारा तुटला !

महाराजाच्या ह्या आकस्मिक मृत्यूनें रायगडावर सर्वत्र हलकल्लोळ उडाला. आप्तेष्ट, मंत्री व मुत्सद्दी किंकर्तव्य मूढ बनले. आबालवृद्ध शोक-

---

+ दिल्लीहून औरंगजेब खजिना घेऊन येत होता. त्यास लुटण्याकरितां घोड्यावरून अतिवेगानें स्वारी करून शत्रूचा अडथळा येण्याचें आंत रायगडावर दौडत आल्यामुळें अतिश्रमानें छातींत दुखूं लागलें. थुंकोतून रक्त पडूं लागलें व अंगांत मनस्वी ज्वर भरला. (केळुसकर कृत शिवचरित्र)

सागरात बुडाले.* प्रधानमंडळानें किल्ल्याचे दरवाजे बंद करून ही वार्ता बाहेर न पसरण्याची तजवीज केली.

महाराजाच्या शवाची सर्व राजचिन्हांनीं युक्त अशी मिरवणूक काढून जगदीश्वराचे देवालयासमोर चंदनकाष्ठें व बेलकाष्ठें यांची चिता रचून देहास यथाविधी अग्निसंस्कार दिला. सर्व उत्तरक्रिया साबाजी भोसले सिंगणापुरकर यानें राजारामास संनिध बसवून केली ! (वडील पुत्र संभाजी पन्हाळ्यावर कैदेत होते.) महाराजांची तृतीय पत्नि पुतळाबाई हिनें सहगमन केलें.

महाराजांच्या चितेची रक्षा जगदीश्वराचे देवळासमोर पुरून त्यावर चिरेबंदी अष्टकोनी समाधी बांधण्यात आली. त्यावर छत्री वगैरे उभारण्याचा राजमंडलाचा हेतु असणें उघड आहे; कारण त्या अष्टकोनी चौथऱ्याचें बांधकांम इतकें मजबूत आहे कीं, नुकतीच बांधलेली छत्री २५० वर्षे ऊन, पाऊस खाल्लेल्या त्याच चौथऱ्यावर उभारणें इंजिनियरना धोक्याचें वाटलें नाहीं. छत्रपतीच्या इतमामास साजेशी छत्री किंवा मंदीर बांधण्याची योजना पुढील बेबंदशाही राजकारणामुळें तडीस गेली नसण्याचा संभव आहे ! मराठेशाहीच्या भरभराटीच्या काळातही महाराजाच्या समाधीकडे राजकर्त्यांचें लक्ष का गेलें नाहीं हें एक त्रिकालज्ञ काळच जाणें !

महाराष्ट्राच्या पहिल्या छत्रपतीची छत्री स्वराज्य असताना न बांधण्याची चूक परतंत्र महाराष्ट्रानें आता दुरुस्त करून महाराजाच्या समाधीवर छत्री उभारली. हा तरी एक शुभसूचक योगायोग म्हटला पाहिजे !

---

* राजियाचें देहावसान जालें, ते दिवशीं पृथ्वीकंप जाहला. गगनीं धूमकेत उदेला. उल्कापात आकाशाहून जाला. रात्रीं जोड इंद्र धनुष्यें निघालीं. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्रीशंभु महादेवीं तळ्याचें उदक रक्तांबर जालें. (सभासद बखर पृ. १०५)

प्रकरण ४ थें.

रायगडावरील दुर्घटना.

शिवाजी महाराजाच्या आकस्मिक मरणामुळें रायगडावर चमत्कारिक दुर्घटना सुरु झाल्या. अण्णाजी दत्तो व सोयराबाई यांच्या कारस्थानाला मुत्सद्दीमंडळ बळी पडून महाराजाच्या मृत्यूची खबर पन्हाळ्यावर नजर कैदेंत असलेल्या संभाजीपासून गुप्त ठेवण्याचें ठरले व त्यास ज्यास्त बंदोबस्तानें वागवावे अशाबद्दल सक्तीचे हुकूम पन्हाळ्याचा किल्लेदार हिरोजी फर्जंद यास पाठविले. बाळाजीपंत चिटणीस ह्या कारस्थानास प्रथमपासून विरोधी होता. त्याच्या हस्ताक्षराचे हुकूम राज्यात खामाखाय मानले जात; म्हणून मुत्सद्दी मंडळींनीं त्याला हुकूम लिहिण्याची विनंति केली. त्यानी ती गोष्ट नाकारली. तेव्हा त्याच्या मुलाच्या हस्ताक्षरानें हुकूम धाडण्यात आला. असा बंदोबस्त करून वैशाख ब॥ ३ स राजाराम महाराजाकडून रायगडावर मंचकारोहण करविलें.

२. इकडे पत्रे घेऊन गेलेल्या जासुदास पन्हाळ्यावर संभाजीनें गाठून ती पत्रें हस्तगत केलीं. अशा रीतीनें संभाजीस आपल्या विरुद्ध असलेल्या कटाचा सुगावा लागला. आधींच कैदेंत ठेवल्यामुळें चिडलेला संभाजी कटामुळें एकदम खवळला. हिरोजी संभाजीच्या रागापुढें भिऊन चिपळूण-कडे आधींच पळाला होता. संभाजीनें एकदम पन्हाळा काबीज केला. तेथील थोड्याशा फौजेनें त्याला कटवाल्याचा बंदोबस्त करता येत नव्हता. म्हणून त्यानें जनार्दनपंत सुमंताच्या फौजेंत फिसाद करून एकेरात्रीं सुमंतास पकडून पन्हाळ्यांत कैद केलें. संभाजीच्या रोषाचा हा पहिला बळी ! अनायासें ती फौज संभाजीच्या छत्राखालीं आली. संभाजीच्या ह्या तडफेचा मराठी सैन्याच्या मनावर अनकूल परिणाम झाला. हुकमाचा चाकर ‘ अडेल

सिपाई ' हंबीरराव हा यानंतर ससैन्य संभाजीस मिळाला. अशाप्रकारें सैन्याची पुरेशी तयारी झाल्याबर संभाजी रायगडावर चालून आला. रायगडच्या पायथ्यास पाचाड येथें मालसावत नावाच्या मावळयाच्या सरदारास बंदोबस्तास ठेविलें होतें. संभाजीनें कैदेंतून सुटल्यापासून विद्युद्वेगानें ज्या हालचाली केल्या त्यात त्याला जें यश आलें त्याचा परिणाम असा झाला कीं, संभाजी हा शिवाजी महाराजाचा जेष्ठपुत्र असून, राज्याचा खरा वारस आहे; व आपण समजत होतो तसा दुर्गणी नालायख नाहीं, अशी जनतेची समजूत होऊन, लोकमताचा वारा संभाजीला अनुकूलतेनें वाहूं लागला. पाचाड येथें सभाजी आल्यावर त्याला कोणीच प्रतिकार केला नाहीं; उलट सभाजीचें येणें जणूं काय अभिप्रेत आहे अशा भावनेनें गडाच्या दरवाजाची दिंडी सुद्धा कोणी लावून घेतली नाहीं. आषाढ शु॥ २ शके १६०२ मध्यें संभाजी रायगडावर आला. गड पूर्ण ताब्यात येताच विरुद्ध कटवाल्या मंडळींस कैद करण्याचा सपाटा लाविला. कटाच्या आरोपात शिवशाहींतील बहुमोल नररत्ने बळी पडली. अण्णाजी दत्तो, सोयराबाई व तिचे आप्त शिर्के, चिटणीस बाळाजी आवजी, हिरोजी फर्जद हे त्या * नरमेधातील प्रसिद्ध नरबली होत. महाराष्ट्राच्या राजामकट सर्वांनीं देव समजून ज्या चिटणिसाची पूजा करावी त्या चिटणीस घराण्यावर संभाजीची इतकी इतराजी का व्हावी हे ऐतिहासिक गूढ उलगडत नाहीं. शिर्क्यांवर संभाजी इतका खवळला की शिर्का जेथे सापडेल तेथे त्याचा शिरच्छेद करण्याचा सपाटा

* कटवाल्या मडळींचा हा अमानुष सूड संभाजीनें रायगडावर येताच केला, कां पुढें वर्ष दोन वर्षांनीं सोयराबाईच्या मदतीनें संभाजीस पुन्हां विषप्रयोग करून मारल्याचा खरा पुरावा हातीं आल्यावर केला याबद्दल दुमत आहे. संभाजी अमानुष क्रूरकर्माच असता तर त्यानें कटवाल्यांचें जें मूळ अधिष्ठान राजाराम त्यासच जिवत ठेवलें नसतें. यावरून तो राज्यासाठीं भावांचा वध करणाऱ्या औरंगजेब सारखा अभिजात क्रूरकर्मा नव्हता. मुत्सद्दी मंडळींनीं डिवचल्यामुळं तो खवळला, त्याच्या भरांत विवेक न राहाता त्याच्या हातून हें परिणामतः दुष्कर्म वाटण्यासारखें कृत्य झालें हें मात्र खरें. प्रस्तुत ग्रंथात संभाजीवरील आक्षेपांचें किंवा त्याच्या कृत्यांचें विवेचन अप्रस्तुत आहे; म्हणून अन्यमतांचें फक्त दिग्दर्शन केलें आहे.

त्यानें चालविला. (याबरूनच शिरकाण शद्ब प्रचारांत आला असें सरदेसाई म्हणतात. परंतु निजामपूरकडील या भागास या पूर्वीच शिरकाण म्हणत हें मागील एका अस्सल पत्रात नमूद आहे.) राजारामाची आई सोयराबाई हिला राजाना विषप्रयोग केल्याच्या आरोपावरून रायगडीं भिंतीत चिणून मारिलें. राजाराम केवळ ११ वर्षांचें लेकरूं. त्यास फक्त कैद केलें. रायगडावरील हा अमानुष नरमेघ पाहून व त्याच्या भयंकर वार्ता ऐकून शिव–शाहीच्या एक–निष्ट हितचिंतकास परम दुःख झालें. राजगुरु रामदासस्वामी यानी संभाजीस एक पत्र लिहून ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न केला. जुन्या राजवटींतील थोरथोर माणसे संभाजीला ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करू लागलीं.

३. कर्नाटकातील प्रसिद्ध शूर मुत्सद्दी रघुनाथपंत हणमंते हे मुद्दाम संभाजीच्या भेटीकरिता आले. त्यानी बरोबर ४० लक्ष होन कर्नाटक प्रांताच्या वसुलाचा भरणा म्हणून व उत्तम नजराणा आणिला होता. रघुनाथपंत भेटीला येतात असें कळल्यावरून संभाजीने त्याची भेट बिरवाडी नजीकच्या आंबराईत मोठा व शोभिवंत शामियाना उभारून तेथें घेतली. त्या वेळीं तेथें बडा दरबार भरला. राज्यातील शिल्लक असलेलीं थोर माणसें तेथें जमलीं होतीं. रघुनाथपंतानें मोठ्या इतमानानें नजराणा करून मुजरे केलें त्या गंभीरप्रसंगीं 'पुढें कांय'? असा सूचक प्रश्न काढून संभाजीस पुष्कळ उपदेश केला. रात्रौ मोठी मेजवानी केली. नंतर रघुनाथपंत रायगडीं गेला. तेथें पाहतो तों संभाजीच्या वर्तनांत सुधारणा न दिसता तो कलुषा कबजीच्या ज्यास्त ज्यास्त ताब्यात जात चालला. तेव्हा रघुनाथपंत पुन्हा कर्नाटकात निघून गेला.

४. वाचक हो! ज्या रायगडावर स्वराज्यलक्ष्मीची अद्भुत रम्यक्रीडा आपण अवलोकन केलीत त्याच रायगडावर दुहीच्या दुष्ट सैतानाचा नंगानाच पाहाण्याचें नशिबीं आलें आहे. चिटणीसाच्या घराण्यातील तीन पुरुष हत्तीच्या पायीं तुडविले गेले ही दैवदुर्विलासाची परिसीमा नव्हे काय?

रायगडचा बदोबस्त झाल्यावर संभाजीनें १६०२ च्या श्रावण शु॥ ५ स मंचकारोहण केलें. कार्तिक शु॥ ७ स केळशीवर स्वारी केली. तें ठिकाण

काबीज करून शु॥ १३ परत आले. याच वर्षी माघ शु॥ ७ संभाजीनें विधियुक्त सिंहासनारोहण करून यथापूर्व अष्ट प्रधानादि नेमून राज्यकारभार हांकण्यास सुरवात केली. संभाजी गादीवर बसताच एक मोठें वज्रसंकट मराठेशाहीवर कोसळलें. तें म्हणजे औरंगजेबाची दक्षिणेंतील स्वारी हें होय. त्यामुळें राज्यावर बसल्यावर स्वकीयांचा विरोध व औरंगजेबासारख्या प्रबल शत्रूकडून होणारे आघात, या कात्रींत संभाजी सांपडला. पण त्याच्या अंगीं अभिजात शूरत्व व निर्भय धडाडी असल्यामुळें त्यानें रायगडावर स्वस्थ न बसतां महाराष्ट्रभर वायुवेगानें संचार करून सर्व शत्रूंना थोपवून धरलें. संभाजीच्या ह्या रणशूर कर्तबगारीवर फिदा होऊन औरंगजेबाचा पुत्र अकबर हा बापाजवळ भांडून रायगड येथें संभाजीच्या आश्रयास आला. सार्वभौम दिल्लीपतीचा पुत्र ज्याच्या आश्रयास येतो त्याच्या पराक्रमाची थोरवी काय वर्णावी ! रायगडावर शाहाजादा आला तेव्हां संभाजी स्वारीवर होता. परंतु त्याचा इतमाम चांगल्या तऱ्हेनें राखला गेला.

संभाजी गादीवर बसताच त्यानें क्षणाची फुरसुद न घेता जंजिऱ्याच्या सिद्दी, पोर्तुगीज व मोंगल यांच्याबरोबर धडाडीचे युद्धप्रसंग केले. सिद्दी आरमारांत श्रेष्ठ होता; म्हणून आपल्या आरमाराची त्यानें वाढ केली. जंजिरा घेण्याची त्यानें एक अजब युक्ती योजिली. जंजिऱ्या किल्यापासून उत्तरेच्या डोंगरापर्यंतचा सर्व समुद्र भराव टाकून हटवावा आणि मग खुष्कीनें जंजिऱ्यावर हल्ला करावा असा विचार त्यानें केला. नेपोलियनची " डोव्हरच्या सामुद्रधुनीवर मला कोणी ६ तास प्रभुत्व दिलें तर मी इंग्लंडचें नांव उरविणार नाहीं " ही घोषणा व संभाजीची ही अजब कल्पना यांपैकीं श्रेष्ठ कोणती याचा वाचकांनींच विचार करावा. पुढें अनेक कारणामुळें हा बेत संभाजीस सिद्धीस नेता आला नाहीं.

शके १६०६ * च्या सुमारास संभाजीनें १० हजार घोडेस्वार रायगडाहून अशा वेगानें मोगलांच्या मुलखांत धुमाकूळ घालण्यास पाठविलें कीं

* शके १६०६ माघ शु॥ १० हंबीरराव सेनापती यांचें रायगडाहून लिहिलेलें पत्र सांपडतें.

त्यांनीं बऱ्हाणपूर लुटून मोंगलास धूळ चारिली. हीं व अशीच अनेक धाडसी कृत्यें केल्यामुळें संभाजीस जेर करणें बादशहास अशक्य वाटून तो गोवळकोंडे व विजापूर येथील बादशाहींशीं युद्ध करण्यास गेला.

राजवाडे लेखांक २८० शके १६०७ जेष्ठ शु॥ ७ चे एक पत्र येथें उधृत करतों, त्यावरून संभाजीच्या कारकीर्दीत मोगलास नामोहरण करण्याचा कसा कसून प्रयत्न मराठ्यांकडून चालला होता तें दिसून येईल.

" राजमान्य राजश्री कृष्णाजी दादाजी प्रभु देशपांडे सबनीस व जामनीस नि॥ लोक हशम दि॥ हुजरात कौजे कारी वडतुंबी कोरळ चौकी कोरळ खिंड ता॥ रोहिडखोरें गोसावी यासी श्री शंकराजी नारायण आशिर्वाद उपरी मावळ प्रात गनिमानी चाल केली आहे म्हणोन समजले त्यास कोरळ खिंड व ढवळा घाट व माडरदेवन्हा सडा येथील जागा जागा-चौक्या घालून गनीमाची खबर ठेवून कमकसून खास बातमी पावती करणें + + + + " राजगडी " कळवितांच तुमची कुमक रोहिड वगैरे जागाहून होईल तुम्ही सिखली मर्दमुकी चागली केली हे खबर येथें समजली या वेळीं गनिम नामोहरम सर्वांनी करावा तुम्ही जमेदार व सख्याकर माहाराजाचे वेळचे + + + + करोन दाखवतील हा भरवसा आहे; "

पुढें औरंगजेब संभाजीवर तुटून पडला. मराठ्यांचे किल्ल्यामागून किल्ले घेण्याचा त्यानें सपाटा लाविला. परंतु रायगडचा बंदोबस्त उत्तम असल्यामुळें त्या किल्ल्यावर स्वारी झाली नाहीं. संभाजीच्या धडाडीची ओळख मराठ्यास पटून मराठे सैनिक त्याच्या निशाणाखालीं शत्रूंशीं चौफेर लढाईची वेहद्द करूं लागले. परंतु संभाजीच्या पराक्रमाला दुर्व्यसनाची किड लागली; आणि सद्गुणाना खलसंगतीनें ग्रासल्यामुळें त्याच्या कारकीर्दीची अखेर अत्यंत दुःखदायक होऊन, मराठी स्वराज्याच्या राजधानीला दुर्दिन प्राप्त झाले. तो शोकपर्यवसायी इतिहास पुढील प्रकरणीं वाचावयास मिळेल.

प्रकरण ५ वें.

रायगडचा वेढा.

विजापूर व गोंवळकोंडे येथील राज्यें नष्ट करून औरंगजेब पुन्हा मराठयांच्या राज्याकडे वळला. त्यानें निरनिराळे सरदार मोठें सैन्य देऊन मराठी मुलखावर चौफेर रवाना केलें. पैकीं मुकर्रबखान हा कोंकण प्रांतीं पाठविला. संभाजी या वेळीं रत्नागिरी जिल्ह्यांतील संगमेश्वरीं होता. शके १६१० [सन १६८८ डिसेंबर ता। २८ मनूची यानें दिलेली तारीख) मध्यें संभाजीस मुकर्रबखानानें अवचित पकडलें. त्यास हत्तीवर बांधून बादशहाच्या छावणींत तुळापूर येथें पाठवून दिलें. तेथें बादशहानें फाल्गुन व॥ ३० शके १६१० त संभाजीचा अमानुषपणें वध केला !

२. संभाजीच्या वधाची वार्ता रायगडावर आणि सर्व महाराष्ट्रभर पसरली. मोहोळाच्या लक्षावधी माशा खवळून व पिसाळून मध काढणाऱ्यावर तुटून पडाव्या तशीच गत संभाजीच्या वधानें औरंगजेबाची झाली. संभाजीला ठार केला कीं, मराठे विस्कळीत व नामोहरम होऊन आपल्यास शरण येतील ही त्याची कल्पना चुकीची ठरली. संभाजीच्या क्रूर वधाची वार्ता रायगडावर राणी येसूबाई व मराठा-मंत्रि-मंडळ यांस समजतांच त्यांनीं दुःख गिळून मोठया धीरानें बादशहाच्या प्रतिकाराची जंगी तयारी चालविली. या वेळी रायगडावर राणी येसूबाई, युवराज शिवाजी (शाहू) राजाराम व इतर सर्व राजघराण्यातील मंडळी होती. येसूबाईनें पतिनिधनाचें भयंकर दुःख गिळून पुढील संकटपरंपरेला तोंड देण्याचा निश्चय केला. धन्य त्या देवी येसूबाईची कीं जिच्या अलौकिक धीरशालित्वामुळें,

स्वार्थत्यागामुळें व हुशारीमुळें मराठी सैन्याला औरंगजेबास खडे चारण्यास अवकाश मिळाला.

जनार्दनपंत हणमंते, प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत, खंडोबल्लाळ, महादजी नाईक, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे इ. प्रमुख मंडळी रायगडावर जमा झाली. या संकटातुन मराठी राज्य सहीसलामत कसें बचावावयाचें याचा विचार सुरु झाला. येसूबाईनें उदार मनानें माझ्या मुलाचें वय लहान, त्याला गादीवर बसवून राज्य हाकणें धोक्याचें. राजाराम महाराज माझे दीर आहेत; त्यानी गादीवर बसणें उचित. त्यांनीं राज्यकारभार करून मराठी राज्य रक्षावें. सर्व राज–मंडळ एके ठिकाणीं राहिल्यास औरंगजेब आपली शक्ति एकवटून आपणास पाडाव करील. म्हणून राजाराम महाराजानीं आपला कबिला घेऊन विशाळगड पन्हाळयाकडे जावें. मी बालराजाना घेऊन रायगडावर राहतें. रायगड आम्हीं अनेक वर्षें भाडवूं" हा पोक्त, निस्वार्थ व मुत्सद्दी सल्ला सर्वास आवडला. राजाराम महाराजही उदार मनाचा. त्याला राणी व बालराजे याना रायगडावर सोडून जाणे जिवावर आलें. शेवटीं राजारामानें " राज्याचे अधिपति शिवाजीराजे पूर्वीचे तेच हे ऐसें लक्ष ठेऊन आम्ही कारभारी. आमचे आज्ञेंत राहून, पूर्वींहून विशेष पराक्रम करून, औरंगजेबास जिंकून राज्य रक्षावें येविशी सर्वांची शपता प्रमाणें व्हावी."

३. सर्वच उदार थोर मनाचीं माणसें. राज्याचा लोभ हा काय पदार्थ ? शिव–शाहीच्या शिकवणीचीं अमृत बचनेंच त्याच्या तोंडून बाहेर पडावयाचीं. ही रायगडावरील ऐक्य परिषद, ह्या अभिजात ऐक्याच्या परिषदेला साऱ्या मराठयाच्या इतिहासातच काय पण वर्तमान काळांतही तोड सांपडावयाची नाहीं. संभाजीच्या वधाला अत्यंतिक सूड व स्वराज्य संरक्षणाची जरब महत्त्वाकांक्षा या दोन प्रेरणानीं पुढील १८ वर्षांचा इतिहास उज्ज्वल बनला ! ह्या पुढील १८ वर्षांचा इतिहास म्हणजे शिवशाहीच्या शिकवणीचें सार, मराठयांच्या इतिहासांतील सोन्याच्या पत्र्यावर विजेच्या चमकीनें लिहिलेलें पान. महाराष्ट्र धर्माच्या तेजस्वितेचा प्रकाश. मराठयांच्या एकीच्या

सामर्थ्याचा प्रचंड प्रताप. अरे पण हें काय ! आपणांस त्या काळच्या इतिहासाबद्दल लिहावयाचें नाहीं. रायगडच्या वेढ्याचाच विचार करावयाचाच आहे.

वर सांगितलेल्या ऐक्य परिषदेनंतर राजाराम शके १६११ च्या प्रारंभाला रायगडचा उत्तम बंदोबस्त करून, डोंगरीं किल्याच्या आश्रयानें बादशहाशीं झुंजत राहण्यासाठीं निघून गेला. रायगडावर शिबंदी, धान्य सामुग्री दारुगोळा याची भरगच्च तयारी ठेवल्यामुळें रायगडच्या पाडावाची फारशी धास्ती नव्हती. संभाजी जिवंत असतां राजगड किल्ला मोंगलांनीं घेतला होता. अर्थात लवकरच रायगडला शह बसणार या भावनेनें त्या किल्ल्याची खंबिरी करण्यांची अगोदर पासूनच सुरवात असली पाहिजे.

४. शके १६११ चा * पावसाळा संपल्यावर आश्विनाच्या महिन्यांत इतिकदखान (भावी झुलफिकारखान) कोंकणांत रायगडच्या कोंकणच्या स्वारीसाठीं आला. मराठ्याचा हाड वैरी जंजिऱ्याचा सिद्दी, त्यास मदत करण्यास सिद्ध होताच. राणी आणि युवराज रायगडावर आहेत ही बातमी औरंगजेबास लागताच त्यानें मराठ्यांचे कलिजे कापून काढणारा आपला पोलादी पंजा जास्त बळकट होण्यासाठीं झुलफिकारखानास बेहद्द मदत दिली. औरंगजेबानें आपलें कपट विद्येचें इलीम देखील त्यास बरोबर पढवून ठेवलें होतें. झुलफिकारखानानेंही नव्या उमेदीनें किल्यास वेढा दिला. मुंगीचा रिघाव न होय ऐसी बंदिस्ती केली. परंतु याचा काहीं उपयोग झाला नाहीं. किल्ला पडण्याचें एकही चिन्ह दिसेना. वेढा घालून १० महिने होत आले. पुढें पावसाळा आला. पावसाळ्यांत कोंकणप्रांतीं छावणी देणें म्हणजे जिवावरचें संकट. रायगड युद्ध करून, छापे घालून पडेना. बरें मराठ्यांचे सरदार वेढा घालणाऱ्या मोंगल सैन्यावर चोर–हल्ले चढवीत ते निराळेच. रायगडच्या वेढ्यांस ढिलाई यावी म्हणून संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांचे जोराचे प्रयत्न चालू होते. संताजी तुळापुरीं बादश-

* सह्याद्रीच्या पश्चिम उतरणीवरील पावसाळ्याला मोंगली सैन्य भीत असे. कारण तेथें पावसाळ्यांत पक्षांच्या पंखावर देखील शेवाळ धरते, इतका पर्जन्य पडतो.

हाच्या छावणीवर छापा घालून त्याच्या डेऱ्याचे सोन्याचे कळस कापून जो निसटला तो सिंहगडच्या झाडीत येऊन दडला. तेथून घाटानें खालीं उतरून रायगडला वेढा देऊन बसलेल्या झुलफिकारखानावर त्यानें हल्ला चढविला. त्याचे पाच हत्ती काबीज करून मोठ्या त्वरेने पन्हाळ्यावर राजाराम महाराजाकडे गेला. आतून रायगडचा मारा व बाहेरून हे भुरटे हल्ले यांनीं मोगल अगदी टेकीस आले. परतु मराठ्याच्या उज्ज्वल ऐक्याला गालबोट लावण्यासाठीच की काय, सूर्याजी पिसाळ हा सरदार मोंगलास वश झाला. याला वाईच्या देशमुखीचे वतन पाहिजे होते. खानाला हा सुगावा लागताच त्यानें वाइची देशमुखीच काय पण पाहिजे ते देतो अशी लाच दाखवून त्यास * वश करून घेतलें. सूर्याजी पिसाळानें निमकहरामपणा करून किल्याचे दरवाजे मोंगलास उघडून दिले. अशा रीतीनें विश्वासघाताच्या सुरुगाने रायगडचा अभेद्य बंदोबस्त शके × १६०२ त ढासळून किल्ला शत्रूच्या स्वाधीन झाला.

रायगड काबीज होताच झुलफिकारखानाने राणी येसूबाई व बालराजा शिवाजी यास ताब्यात घेतले. स्वराज्य-संस्थापकाच्या सुनेला व धर्मसिंह संभाजीच्या पत्नीला स्वुद्द राजधानींत रायगडावर शत्रूच्या स्वाधीन होण्यात काय क्लेश झाले असतील? पण त्या प्रसगातही तिनें आपला धोरणी मुत्सद्दी-

* अमात्यांच्या आज्ञापत्रांतील उतारा: "परचक्र आले म्हणजे वतनाच्या आशेनें आगोदर सलख करतात. स्वना भेटतात. तिकडील भेद इकडे इकडील भेद तिकडे करून राज्यांत शत्रूचा प्रवेश करितात. मग तेच राज्याचे आपायभुत होऊन दुःसाध्य होऊन जातात."

× चैत्र शुद्ध १५ अवरंगजेब जुलपुकार खानास पाठवून रायेगडास वेढा घातला. चैत्र वद्य १० शुक्रवारी राजाराम पळोन प्रतापगडास गेले १ अस्वीन वद्य ८ गुरुवारी राजाराम पनाळियाहून स्वार होऊन कार्तिक वद्य ११ वैंमुराज आले तेथून चंदीस आले १ कार्तिक मासी रायगडा सला करून मार्गसीर्ष सुद्ध(२) रविवारीं रायगड मोंगलास दिला. (जेधे शकावली पान १९ शके १६११ शुक्ल) (३) नोव्हेंबर १६८१ ला मोगलांचे हवालीं झाला. (केंद्रे केसरी ४ मे, १९२६)

पणा सोडला नाहीं. तिनें खानाकडून कुराणावर हात ठेवून तुमच्या जिवास अपाय करणार नाहीं अशी शपथ घेवविली. मोंगली सैन्यानें रायगड यथास्थितपणें + लुटला. स्वराज्याचें भांडार रितें केलें शिवाजीचें सिंहासन फोडून आपली राक्षसी महत्त्वाकांक्षा तृप्त केली ! त्याना हें काय माहीत होतें कीं सोन्यामोत्यानें मढविलेलें दृश्य सिंहासन आपण फोडलें पण महाराष्ट्रजनतेच्या अंतःकरणात अधिष्टित झालेले स्वराज्याचें अदृश्य दैवी सिंहासन अखंड आहे, आपण एक राजधानीचा रायगड काबीज केला पण प्रत्येक मराठ्याचें अंतःकरण हा प्रति रायगड आहे ! असो.

रायगडचा वेढा अशा रीतीनें पूर्ण होऊन झुलफिकारखान रायगडावरील अलौकिक (?) लूट घेऊन खाविंद चरणाशीं गेला ! रायगडावर संभाजीचे आप्त सोयरे वगैरे पुष्कळ राजघराण्यांतील मंडळी होती. ती सर्व पकडली गेली. सूर्याजीस बादशहानें तूं मुसलमान होशील तर वाईची *देशमुखी देतो ही अट घातली. देशद्रोह करणाऱ्या सैतानाला कसला आला आहे धर्माभिमान. स्वार्थासाठीं लालचावलेल्या त्या कुत्र्यानें शेवटीं मुसलमानी धर्म स्वीकारला !

+ रायगडच्या आसपासचा मुलुख मोगलाच्या हल्यामुळें बेचीराख जाहला साल गुदस्त रायगड कबजा जाला मुलुखांत मोगलाई अमल चालू जाहाली श्रीकृपेनें आपल्या राज्याचा मामला थाटत आहे.

(रा. खं. १६ पा. ४३ मि।। आश्विन शु।। ११ शके १६१२)

* सनदा तयार व्हाव्या तो जुलपिकारखान रायगडाची मसलत सुरु करून लष्करास आले. त्याजपाशीं सूर्याजी पिसाळ बिराजर मोकदमी मौजे वोझर्डे हा गांव पूर्वी मोकदमी चालवीत असतां रायगडाहून बझाईची वरात आली. वसूल घ्यावयास अवसर नाहीं. याजकरितां गांव सोडून पलोन गेला. तो खान मझारनिल्हेजवळी राहिला. तेथें राजगडचे मसलतेमुळें मनसबा करून मावळीयांची सरदारी केली. गडास मोर्चे लाविले व दरामतींत पडोनखानास गड हस्तगत करून दिल्हा.

(वाडकृत सनदा पत्रें पृ. १९६)

रायगडावरील ह्या दुःख पर्यवसायी प्रकरणाचा मराठ्यांचीं दोन नररत्नें शत्रूनें जिंकून शेवट केला ! झालें ! रायगडचें राजधानित्व ह्या वेळेपासून नष्ट झालें. स्वातंत्र्य लक्ष्मीचीं पावलें येसूबाईचा पावलाबरोबर रायगडची पायरी उतरूं लागलीं. शिव–सिंव्हासनाचे झालेले तुकडे या पुढें रायगडावर पुन्हा कधींच जुळले गेले नाहीत ! रायगडचें राजैश्वर्य बालराजाबरोबरच रायगडला सोडून गेले. यापुढे रायगड हा एक सामान्य किल्ला होऊन बसला वा निर्विकार रायगडा ! ह्या विरोधी स्थित्यतराने तुझ्या अंतःकरणात कोणते विचार उद्भवले असतील ?

६. राजाराम जिंजीस गेल्यावर इकडे मराठी मरदारानी रायगड घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यासबधीचे राजारामाच्या वेळचें आज्ञापत्र खालीं दिलें आहे. रामचद्रपत आमात्य विशाळगडी राहून मोगलास त्रास देण्याचा उपक्रम करीत होता. स्वराज्यातील गेलेला प्रत्येक किल्ला मोंगलाच्या पाठोपाठ मराठ्यानी घेण्याचा जणूकाय विडाच उचलिला होता.

" स्वस्नीश्री राज्याभिषेक शक १८ अगिरानाम सवतमरे ज्येष्ट शु॥ ७ गुरुवार क्षत्रीय कुलावतस राजाराम छत्रपती याणी जाऊळकर व दरेकर व मावळे लोक व कासुर्डे व गोळे व समस्त लोकानी पादाती यासी आज्ञा केली ऐसीजे......साप्रत रायगड हस्तगत करून घेणे हे कार्य बहुतच थोर आहे. येविमी रामचद्रपत पडित अमात्य याणी तुम्हास सागितले आहे. त्यावरून तुम्ही गड हस्तगत करून घ्यावयाच्या प्रयत्नात आहा साप्रत स्वामीनी राजगडास आबाजी सोनदेव यासी पाठविला आहे रायगड हस्तगत करून घ्यावयाची आज्ञा त्यास केली आहे हे जाऊन राजकारण जें करावयाचे तसे करतील तरी तुम्ही कुल लोकल अनुकुल होऊन रायगडचा हारी करणे सबत्ती करून ते स्थान हस्तगत करून फत्तेचे वर्तमान स्वामीस लिहिणें म्हणजे स्वामी तुमचे विशेष उर्जिति करतील.

(रा. खं. ८ पृ. ४५ राजारामाचे आज्ञापत्र)

—

प्रकरण ६ वें.

पेशवाईतील रायगड.

अस्तमानी सूर्य-विकासी कमळें मिटल्यावर आंत अडकून पडलेल्या भुंग्यास सूर्योदयापर्यंत बाहेर पडता येत नाहीं. एरव्हीं भुंगा वाटेल त्या कठीण लाकडास आपल्या दातानीं छिद्र पाडतो. पण अत्यंत नाजूक अशा कमलदलास छिद्र पाडून बाहेर येण्यास तो असमर्थ असतो. हा कविसृष्टीतील एक चमत्कार आहे. काही रोगाचे असें आहे कीं त्यांनी एकदा शरिरात ठाणें दिले की ते निर्मूल म्हणून कधीं व्हावयाचेच नाहीत. ही दोन उपमानें जंजिऱ्याच्या सिद्दीचें मराठी राज्यास बोचणारें शल्य व त्याला निर्मूलन करण्याचे मराठी राजाचे प्रयत्न, यांचा इतिहास वाचून कोणालाही सुचतील. दिल्लीच्या तक्तावर कोणास बसवावें व कोणास उतरावे हे डाव ज्यांना खेळता येतात, तेच पेशवे शिवशेजारी जंजिरेकर सिद्दीस नामशेष करण्यास असमर्थ व्हावे ? मराठेशाहीस लागलेला रोग इतक्या बुद्धिवान् धनमंत्र्यास कायमचें उठविता येऊं नये !

पेशवाईतील रायगडचा इतिहास सांगताना जंजिऱ्याच्या राजकारणाचा पुन्हा एकदा वाचकास परिचय करून द्यावा लागणार आहे. राजाराम वारल्यावर औरंगजेबास विशेष हुरूप चढून तो मराठ्याच्या किल्ल्यावर हल्ले करण्यासाठीं जातीनिशी जाऊं लागला. औरंगजेब वाकिनखेड्याकडे गेला. तेव्हा मराठ्यानी मोंगलाच्या ताब्यात गेलेले किल्ले घेण्याचा सपाटा चालविला. परशुराम त्रिंबकनें वसंतगड व सातारा हे किल्ले घेतले. संकराजी नारायणने सिंहगड, रायगड व रोहिडा हे किल्ले काबीज केले. मोठ्या दिमा-

खानें मिळविलेली मराठयाची राजधानी–रायगड–त्याच्या गेल्याचे वृत ऐकून बादशहास परम दुःख झाले. अशा स्थितीत तो शके १६२८ च्या माघात मरण पावला. औरगजेबाच्या मरणानें मराठेशाहीचा एक प्राणघातक शत्रू नष्ट झाला. औरगजेबाच्या मुलात गादीबद्दल तटे पडल्यामुळें मराठी राज्याकडे लक्ष देण्यास त्यास फुरसत मिळाली नाही.

दक्षिणेंतील हें मराठ्याचे मोहोळ कसें तरी स्वस्थ बसावें म्हणून झुल-फिकार खानाच्या सल्यावरून अजीमशहाने शाहूस कैदेतून मुक्त केले. त्या वेळी अजीमशहा व शाहू यात तह झाला, त्यात तुमच्या आजोबानें विजा-पुरकरापासून जो मुलुख जिंकुन घेतला तो व भिमा व गोदावरी या नद्या-मधील काही जहागीरी म्हणन तुम्हास देतो. तुम्ही दक्षिणेत जाऊन आपल्या मुलुखाचा बदोबस्त करावा. " या तहान्वये कोकणप्रातींचे रायगड, राजगड इ. इ. किल्ले मराठ्याच्या ताब्यात असावयास मोगलाची हरकत नव्हती. व हे किल्ले या वेळी मराठ्यान्या ताब्यात होतेही. शके १६२९ मधील [राज. ले. २८८] एक आज्ञापत्र उपलब्ध आहे.

"स्वस्तीश्री राज्याभिषेक शक ३४ सर्वजीत सवत्सर मार्गशिर्ष शु॥ ७ सप्तमी गुरुवार क्षत्रिय कुलावतस श्री राजा शिव छत्रपती याणी राजश्री शामजी हरी देशाधिकारी व कारकुन वर्तमान भावी सुभा प्रात मावल ता। राजगड यासी आज्ञा केली ऐसिजे प्रतापजी सिलीमकर याचे बाप मताजी सिलीमकर हे किल्ले राजगडी नामजाद होते त्यास ताम्राचा वेढा "राज-गडास" पडला. त्याचे लेक प्रतापजी हाली स्वामीची सेवा करावी ऐसी उमेद धरून सेवा करीत आहे. परंतु मुला माणमाचे चाले ऐसा एक गाव ईनाम करून दिला पाहिजे."

पुढे शाहू दक्षिणेत आला. ताराबाईस त्याचें येणे न आवडल्यामुळे तिने शाहुवर फौज पाठविली. राज्यासाठी शाहूलाही स्वकीयाबरोबर युद्ध करावें लागलें. शके १६२९माघ शुद्धात शाहूने सातारा येथें एकदाचा राज्याभिषेक करून घेतला. राजाराम महाराजानी शके १६२० मध्ये सातारा ही मराठी राज्याची दुसरी राजधानी केली.

३. इतउत्तर मराठ्यास घाट माथ्यावर कोणी प्रबळ शत्रू उरला नाहीं. बहामनी राज्याच्या सर्व शाखा औरंगजेबानें नष्ट करून टाकिल्या. औरंगजेबही मेल्यामुळें मोगली शहाजादे दिल्लीच्या तक्तासाठीं आपसात कलह करूं लागले. त्याचें लक्ष दक्षिणेच्या राजकारणाकडे नव्हते. साराच साऱ्या दख्खनचे रान आता मराठ्यास मोकळें झालें. मराठे या वेळी एकोप्यानें वागते तर स्वराज्याचा केवढातरी विस्तार त्याना करितां आला असता. पण ताराबाई शाहूचा नवा कली मराठी राज्यात थैमान घालूं लागला. राजारामाने व त्याच्या सहकारी मुत्सद्यानी घाट माथ्यावरील मुलुखावर आक्रमण करता यावें म्हणून मोक्याची अशी सातारा राजधानी केली. हें ठिकाण कोंकणास फार लांब नाही. रायगड राजधानी वरघाटी मुलखावर ताबा ठेवण्यास गैरसोईची; म्हणून सातारा हे केंद्र–राजधानी–करण्यात आलें. संभाजीनंतर जंजिरेकराकडे मराठी राजकर्त्यांचें पुर्ण दुर्लक्ष झाले. मराठ्याच्या फौजेच्या ढाली आता उत्तरेकडे व दक्षिणेकडे वळल्या. राजाराम जिंजीहून महाराष्ट्रात आल्यावर मराठी सत्तेचे केंद्र विशाळगड, रांगणा, कोल्हापूर, सातारा या भागीं अधिष्ठित झाले. कोंकण प्रांतीच्या 'रायगडावर' राजधानी करण्याची त्या वेळच्या राजकारणात जरूरी भासली नाही. परतु रायगड पासून दंडाराजपुरी पर्यंतचा प्रदेश व कुलाबा किल्ल्यापासून सिंधुदुर्गापर्यंतची कोकणपट्टी ताब्यात ठेवण्याचे पेशवाईतही जोराचे प्रयत्न झाले. तो इतिहास आपण ह्या प्रकरणीं पाहू.

शाहू गादीवर बसला तेव्हा त्याची सत्ता सातारा व त्याच्या सभोवतीचा फारच थोड्या मुलखावर प्रस्थापित झाली होती. शके १६३१ मध्ये शाहूने रांगण्यावर स्वारी करताच ताराबाई मालवणात जाऊन बसली. त्या स्वारीहून परत येताना सेनापती धनाजी जाधव मरण पावला. सेनापतीच्या मरणानें शाहूचा पक्ष अगदीच हतप्रभ झाला. ताराबाई व शाहू याच्या कलागतीमुळे सिद्दी याकुतखान

यास वाव सांपडून त्यानें कोंकणांतील * मराठी राज्यावर चाल केली. दंडा-राजपुरी, तळगड, घोसाळगड, बिरवाडी, रायगड इत्यादि जंजिरा-किल्ल्याच्या लगतची ठाणीं त्यानें काबीज केली. मराठ्याचा आरमारी सरदार कान्होजी आंग्रे याला ही ठिकाणे ताब्यात राखून सिद्दीस दक्षिणेच्या बाजूने पायबंद घालणे शक्य नव्हते. प्रथम प्रथम तो शाहूच्या विरुद्ध ताराबाईच्या पक्षात समाविष्ट झालेला होता. राज्याच्या मालकातच कौरवी-पाडवी असल्यामुळे सरदारातही दुही उत्पन्न झाली. मग सहजच कोणी कौरवाकडचे व कोणी पाडवाकडचे झाले. यापुढे मराठी राज्य दुहीच्या तडाक्यातून सर्वस्वी कधाच मुक्त झालें नाही. शाहूचे नवे कर्तबगार पेशवे बाळाजी विश्वनाथ, यांच्या साह्याने शाहूचे मराठी राज्यावरील प्रभुत्व सर्वमान्य होऊन सर्वत्र स्थिरता आली. तेव्हा पुन्हा हे जजिरेकराचे राजकारण व रायगडचा ताबा याबद्दल हालचाली सुरु झाल्या.

४. या प्रकरणाचा इतिहास फार मोठा आहे. कान्होजी आंग्रे हा सिद्दीशी बरेच दिवस युद्ध करीत होता. कान्होजी आंग्रे शके १६५१ मध्ये मरण पावला. तेव्हा आंग्र्याच्या घराण्यात गृहकलह माजून राहिला. ब्रह्मेंद्र स्वामी कर्नाटकात भिक्षाटनार्थ हिंडत असता सावनूरच्या नबाबाकडून सिद्दीस भेटीदाखल मिळालेला हत्ती जजिऱ्यास नेण्याची कामगिरी स्वामींनीं आपणावर घेतली. या हत्तीच्या पायाने सिद्दी व आंग्रे याच्यात कलह उत्पन्न केला. ब्रह्मेंद्रस्वामीस सिद्दीचा व आंग्र्याचा रुसवा सोसावा लागला. आंग्र्यानें स्वामीची समजूत केली. परंतु सिद्दीबद्दल मात्र स्वामीस फार राग

* शके १६२७ चे सालीं औरंगजेब बादशाहा भागानगरीं औरंगाबादेस येऊन मृत्यु पावले. त्याचे शाहाबाज बादशहाजादे होते. त्यास दिल्हीस राजकारण जलदीच पडल्यामुळें फौजासुद्धां दिल्लीस चालले. ते चमेली नदीपर्यंत गले. इकडे राजाराम यांची स्त्री व त्याचे पुत्र शिवाजी राजे व सर्व कारभारी अष्ट प्रधान हे एकत्र होऊन देशींचें राज्य सोडविलें. कोंकण आंग्रे यांनीं सोडविलें विजयदुर्ग सस्थान केलें व सुवर्णदुर्ग, रत्नागिरी वगैरे किल्ले घेतले. रायगड किल्ला आणीक जंजिरा वगैरे जुजबी ठिकाणें हपसी यांजकडे व कांहीं जुजबी ठिकाणें कर्नाळा, राजकोट वगैरे मोंगलांकडे व रेवदंडा, वसई फिरंगी याजकडे असीं राहिलीं.
(वाडकृत दक्षिणेंतील सरदारांच्या कै० यादी. पृ. ४.)

आला. शेवटीं स्वामी धावडशीस जाऊन, त्यांनीं शाहूस व आपले शिष्य मराठीराज्याचे पेशवे बाजिराव यास भर देऊन सिद्दीच्या सूडाचा बार भरला. त्यातच कान्होजीच्या मृत्यूनंतर सिद्दीनें मराठी मुलखात माडलेल्या पुंडाव्याची भर पडली. शाहूनें × यशवंतराव महादेव पोतनीस या कोंकणप्राताच्या माहितगार सरदारास जंजिरेकरावर मात करण्यास कोंकणांत रवाना केले. [शके १६५५]

याच सुमारास जंजिऱ्याचा पराक्रमी सरदार सिद्दी रसूल मरण पावला. तेव्हा गादीबद्दल तंटे उपस्थित झाले. शेख याकूब नावाचा हबशाचा एक पराक्रमी सरदार असून तो मूळचा कोळी होता. तोच शेखोजी नावानें असून, मोठा +वजनदार होता. त्याला वश करून यशवंत महादेवाने आपले कारस्थान रचिले. त्याला " मराठी आरमाराचे आधिपत्य, हबशी मुलखाची सुभेदारी, पेणेपासून चिपळून पावेतो कोकण प्राताचा सरगोंडपणाचा हक्क व इतर इनाम गावे व किल्ले " देण्याचे कबूल केले. व त्याच्या भावास 'रायगड' किल्ल्याची किल्लेदारी, व फौजेच्या खर्चास एक लक्ष रुपये देण्याचे

× आमचे वडील बाजी मुरार हे कै. शिवाजी महाराज याजपाशीं मावळे लोकांचे जमावाची सरदारी करून होते तेथें सेवा चाकरी बहुत केली. त्याचे पुत्र महादाजी हे कै० संभाजी महाराज याजपाशीं सदरहू जमावाची सरदारी करोन सेवाचाकरी करीत होते. तेव्हा महाराजानी पोतनीसीचा दस्त करून दिल्हा. महादाजी बाजी यांचे पुत्र यशवंतराव महादेव हे आमचे पणजे, कै. शाहू महाराज यांजपाशीं सरदारी व पोतनिसीचें काम करीत असता महाराजांनीं दुसरा खासनिशीचा दरक करून दिल्हा.' [द. सरदारांच्या कै० पृ. १०५ वाडकृत]

प्रतिनिधीनें रायगड घेतला. रायगड तो यशवंत महादेव पोतनीस याचे हवालीं केला. [राजवाडे खंड. २] ह्या पोतनीस घराण्याचे वंशज अद्याप महाड येथें राहतात. महाडच्या विरेश्वराचा देवाळयाचे तेच वतनी हक्कदार आहेत

+ " श्रीयासह चि. रा. रा. दादास अंबाजी त्रिंबक आशिर्वाद उ० आम्हीं ता० ६ मोहरम मु॥ पाचाडमाची किल्ले रायगड सुखरूप असो वि॥ आम्हीं मजल दरमजल येथे आलों. तों राजपुरीहून राजश्री येसाजी गायेकवाड आले. त्याणीं वर्तमान सांगितले कीं तेथील सर्व कामकाजे शेखोजीच्या स्वाधीन... [शके १६५५ अधिक आषाढ शु॥ ७]

ठरविलें. रसूलचा वडील मुलगा अबदुल्ला हाही मराठ्यांस मिळाला. मराठ्यांची मदत आल्यावर इतरभावांची वाट लावूं; अशा समजुतीनें अबदुल्ला जंजिरा किल्ल्यांत राहिला. सिद्दी रहमान हा रसूलचा मुर्दा दफन करण्यासाठीं राजपुरीस आला. तेव्हा त्याला बाहेर ठेवून त्याच्या भावांनी किल्ल्याचे दरवाजे लावून घेतले. म्हणून रहमान हाही मराठ्यांस मिळाला. यशवंत महादेव यानें या दुहीचा फायदा घेण्यासाठीं तावडतोब जंजिऱ्यावर सैन्य रवाना करावें अशीं पत्रें शाहूस लिहिलीं. शाहूनें बाजीरावाला " आधीं पत्र न वाचणें, घोड्यावर बसणें, मग पत्र वाचणें, " असे तातडीचे हुकूम रवाना करून साताऱ्यास बोलाविलें. बाजीराव येताच त्यास सर्व परिस्थिती समजाऊन देऊन तावडतोव कोंकणांत रवाना केलें. ब्रह्मेंद्र स्वामींनीहीं बाजिरावास कोंकणच्या स्वारीसाठीं मुद्दाम पाचारिलें होतें.

५. बाजिराव शके १६५५ च्या वैशाखात फत्तेसिंग भोंसल्यासह कोंकणात उतरला [रा. खड १६ वा. पा. १६]. त्या वेळीं पाचाडचा कोट राजेश्री सचीवपंत याजकडे आला. बाजिराव एकदम तळगड व घोसाळगड घेऊन दंडाराजपुरीवर चालून गेला. त्याच दिवशी जंजिरा किल्ल्यात अबदुल्लाचा खून झाला. राजपुरीस बाजिराव व सिद्दी *रहिमान याचे युद्ध झालें. युद्धात रहिमानचा पराभव झाल्यामुळें त्यानें बाजिरावाशीं ममेटाची इच्छा दर्शविली. मराठी सरदारानीं अंतोणें, नागोठणें, अस्त्रधारा, अवचितगड, बिरवाडी, निजामपूर, ही स्थळे सिद्दी पासून घेतली. परंतु अंजनवेल, गोवळकोट, विजय-

* पुरवणी रा. अंबाजीपंत स्वामी गोसावी विनंति उपरी खानजादा बाहेर आहे त्याचा मतलब जे राजश्री थोर आहेत हा एक अमिराचा लेक आहे आपण आपली स्थापना आपल्या जागेवरी केलियानें दिगंत कीर्ति होईल. तुमचा स्थापित होईन पुढें कितीका कामकाजास येईन आणि आपण येथे काइम जाल्यावरी चहुं महिन्यांनीं रायगड तुम्हास देईन ऐसे बोलतो. जंजिरेयात हबसी सिद्दी संबूळ व सिद्दी अंबर आहे. त्याचा मतलब रायेगड न द्यावा किल्ला आरमार घेतले ते द्यावे तेव्हां खास (स्वारी) जंजिरीयांत घेऊन ऐसे ते म्हणतात......जंजिरियांतील हबसी यासी रायेगडचा मजकूर करावा तरी ते मान्य करून यास आत घेत नाहीत व याची स्थापना करावी याचा अमला केला जालियावर मग हा रायेगड देईन म्हणतो "
[रा ले. १०६]

दुर्ग, जंजिरा, रायगड व उंदेरी हीं मजबूत ठिकाणें सिद्दीच्या ताब्यांत होतीं. बंकाजी नाईक महाडिक यानें बाणकोट व मंडणगड हे किल्ले हबशापासून घेतले. मंडणगडावर ता. २३ मे रोजीं मराठ्यांचा भगवा झेंडा फडकूं लागला. ब्रह्मेंद्र स्वामींच्या टोंचणीमुळें शाहूस जंजिऱ्याच्या कबजासाठीं इरेसच पडावें लागलें. त्यानें श्रीनिवासराव प्रतिनिधी यास ता. २७ मेच्या सुमारास पुष्कळ फौज देऊन कोंकणात रवाना केलें. प्रतिनिधी व बाजिराव याचें वैमनस्य असल्यामुळें, प्रतिनिधी महाडास आले; हें ऐकून बाजिरावास वैषम्य वाटलें. प्रतिनिधीनें अंजणवेलीस जाऊन तिकडे मोहीम करावी म्हणजे सिद्दीस दक्षिणेकडून पायबंद बसेल व रायगड देणेस तो तयार होईल असें बाजिरावाचें मत होतें. त्या अर्थाचें पुढील पत्र पहा.

"प्रतिनिधी रवाना केले ते महाडास येऊन छावणी करणार म्हणून लिहिलें. तरी महाडी छावणीचें प्रयोजन काये. तेथें काही उपयोग नाहीं. आजणवेळीस (अंजनवेल) जाऊन मोर्चे देऊन तिला बंद केलियाने याचे हतपाये बंद होतील हबशी शत्रू काही सामान्य नव्हे.........त्यास प्रतिनिधी अंजणवेलीस जातील तर्ग उत्तम आहे. उंदेरीस सरखेल खटपट करतील ते दोनी स्थळे हातास आलियावर याची हिमत कम होईल व आस्थाही तुटेल. रायेगड यावासा आहे तो न आला तरी तेथेंही दीड हजार दोन हजार पर्यंत माणूस ठेऊन बंद करणें लागेल..."

[पुरंदरे द. पा. ७१ ज्येष्ठ वा।. ९ शके १६५५]

६. यशवंत महादेव पोतनिसानें रायगडचा भेट वगैरे काढून तो किल्ला घेण्याचें सर्व कारस्थान शिजवून टेविले होतें. प्रतिनिधी येतांच त्यानीं [८ जून सन १७३३] रायगड किल्ला घेतला. अशा रीतीनें मराठ्यांच्या ताब्यात रायगड आला. रायगडच्या मोहिमेंत * मावळ खोऱ्यांतील झुंजा-

* राजपुरी व रायगड येथील स्वारीवर गेलेले मावळे सरदार.

१. प्रतापजी बिन संताजी हैबतराऊ सिलिमकर देशमूख.
१. शंकरराऊ बिन संताजी हैबतराऊ देशमूख.
१. पदाजी बिन विठोजी हैबतराऊ देशमूख.
१. सूर्याजी बिन म्हकोजी राऊ सिलिंबकर देशमूख.

रराव, मरळ वगैरे देशमुखानी चागलीच मर्दुमुकी गाजविली. त्यास या कामगिरीबद्दल इनामें मिळालीं. मावळ्यानी रायगड घेण्यास मदत केली त्याबद्दल त्यास अभिनंदनपर पाठविलेलीं पत्रे भा. इ. सं. म. त्रै. पृ. ७ पृ, १५५ (शके १६५५ भाद्रपद शु॥ ६) मध्ये दिली आहेत. केसरी ता. २८-३-१९०५ मध्यें रा. रा. देशपांडे यानी असे लिहिलें आहे " दुसरे दिवशी फौजा घाट उतरून मजल दरमजल मिरवन्यास आले. वैशास व॥ ३० रोजीं खाकरी हस्तगत केली.त्या उपरी राजमाची व राजपुरी हस्तगत झाली. त्या उपरी पुढे रायगड सहवर्तमान कोकणप्रांतीचा देशदुर्ग हस्तगत झाली. ते समयी मावळच्या कुल सरदारांनीं व जमेदारांनी व गडकिल्याचे लोकानी बोली घातली कीं तक्काचा जागा रायगड सुटला या उपरी मावळ प्रांतीची मोंगलाई चाकर लोकास खासगत शेतावर ज्याचे त्यास बांधून द्यावी. ह्याप्रमाणें मनास आणून हे सनद सादर केली असे."

प्रतिनिधींनी रायगड घेतला तेव्हा रा. शामराव रुद्र बेंदर याच्या ताब्यात दिला. पुढें पुन्हा हबशी याने रायगडास कार्तिकात वेढा दिला. त्यावेळीं बेंदर यानी किल्ला नऊ महिने झुजविला. हबसी याचे मोर्चे स्वतः खाली येऊन मारले. या त्याच्या मर्दगिरीबद्दल खुडलपूर गाव इनाम दिलें. प्रतिनिधींनी शामराव रुद्र बेंदर यास दिलेली सनद [भा. इ. स. त्रै. पु. ७. पृ. ५७] मध्यें आहे.

७. साराश तक्काची जागा रायगड मराठ्याच्या ताब्यात आल्यावर सर्वांस बरें वाटलें. तेव्हापासून रायगड किल्ला पेशवाईचे अखेरीस पर्यंत मराठ्याच्याच ताब्यात होता. ही स्वारी बाजिराव व प्रतिनिधी याच्या दुहीमुळे व्हावी तितकी यशस्वी झाली नाही. " कोकणातून सिद्दीचें समूळ उच्चाटन करावें असा शाहूचा व ब्रह्मेंद्रस्वामीचा हेतु होता." पण तो साधला नाहीं अखेर बाजिराव

---

१. पुनाजी बिन दत्ताजी नाईक देशमूख.

१. रावजी राऊ बिन त्रिंबकराऊ सिलिमकर देशमूख.

राजवाडे खंड १७, ल, ३९ पृ. ४९ शके. १६५६

व सिद्दी यांच्यांत अलिबाग नजीक नवदरें येथें +तह झाला. "सीद्दी अब्दुल रहमान यास जंजिऱ्यांत तक्तावर बसवून किल्ले घेतले. त्या पैकीं रायगड व महाड हुजुर महाराजांनीं ठेऊन वरकड किल्ल्यांचा बंदोबस्त बाजिराव साहेब यानीं केला. साडेपांच महाल हबशांस देऊन वरकड सरकारांत घेतलें." [पे. ब. खं. ४]

८. शके १६९४ च्या सुमारास रायगडचा किल्लेदार पेशव्यांशीं जोरावारीनें वागूं लागला. त्यानें सिद्दीच्या मदतीनें पेशव्याविरुद्ध बंड उभारलें. त्यावेळीं त्याचा बंदोबस्त करण्याकडे माधवरावांच्या दुखण्यामुळें मुत्सद्यांचें लक्ष गेलें नाहीं. पुढें माधवरावाच्या मृत्यूनंतर नारायणराव पेशवा होतांच रायगडावर स्वारी करण्यांत आली. शके १६९५ मध्यें रायगडच्या फितुरी किल्लेदाराचा मोड होऊन तो शरण आला. त्यावेळीं 'आपण साताऱ्याच्या छत्रपती रामराजाच्या वतीनें पेशव्याशीं लढत आहों. पेशवे छत्रपतीला कैदेंत ठेवल्यामारखे वागवतात'' असें त्यानें आपल्या पुंडाव्याचें कारण सांगितलें. परंतु रामराजाचें आज्ञापत्रच त्या किल्लेदारास दाखविले तेव्हा त्याचें बोलणे फोल ठरून किल्ला पेशव्यांच्या ताब्यांत आला. व ४०००० रुपये दंड घेण्यात आला.

९ पुढें नारायणराव पेशव्याचा वध होऊन पुण्यात नवीन भानगडी सुरु झाल्या. रायगडावर पेशव्याचा पूर्ण बंदोबस्त होता तरी सिद्दीचा उपद्रव कमी झाला नव्हता. "ता। रायगड येथें शामळ जंजिरेकर यानें जमाव करून येऊन मुलकांत दंग केला आहे. त्याचे बंदोबस्ताविशी

१ रघुनाथ सदाशिव तो। रायगड यास सनद की रायगडकरी व महाडकरी लोक नामजादीस आम्हाकडून गेले आहेत त्यापैकीं १०० तुम्ही तो मजकुरी आणून शामलांचा बंदोबस्त करणे. बंदोबस्त जाहालियावर सदरहू

+ प्रांत किल्ले यांचा तपशील [रा. खं. १, पृ. ७७] मामले, तळे घोसाळे, गोरेगाव, तो। बिरवाडी, निजामपूर तो गांवेल, चाणगांव बिमे महाल पेशव्यांनीं घ्यावे. रायगड, तळगड, घोसाळगड, अवचित गड, बिरवाडी असे किल्ले पेशव्यांनीं घ्यावे.

१०० असामी जेथील तेथें माघारे पाठविणे......पुढें हा तंटा शामला-कडील वकील बोलावून आणून त्याचे हरद्र मनास आणून पक्का तह होत असल्यास तो मजकूरचे चार पाच हजार रुपये पर्यंत अमल न करितां उचल्या हाते द्यावे. याद्याचे करार करून दरम्यान मातबर माणूस घेऊन तह करणें फिरोन रयतेस उपद्रव लागो न देणे. [सवाई माधव० रोजनिशी पृ० ३१० । ११]

प्रस्तुत प्रकरणाच्या आरंभीं केलेल्या विधानाप्रमाणें पेशव्यास ही सिद्दीच्या उपद्रवाची व्याधी वारंवार कशी त्रास देत होती, ते वरील उताऱ्यावरून दिसून येईल. बारभाई व रघुनाथराव पेशवे याचे मध्यें कटकट उपस्थित झालेली पाहून सिद्दी शामळानें रायगड लगतच्या पेशवाई मुलखास उपद्रव देणेची सुरवात केली. पेशवाई मुत्सद्यास ह्यावेळीं सिद्दीची खोड मोडण्याइतका अवधी नसल्यामुळे त्यानी किल्लेदार रघुनाथ सदाशिव यास 'उचल्या हातें चार पाच हजार रुपये देऊन' सिद्दीस गप्प बसवा असें लिहिलें.

रघुनाथ सदाशिव (रायगडचा किल्लेदार) याच्या पश्चात् त्याचा पुत्र * सदाशिव रघुनाथ याजकडे तो रायगडचा कारभार आला. सिद्दीच्या घराण्यातील काही राजकीय कैदी यावेळी रायगडावर होते. त्याना पुण्यास चौकशी करिता पाठविण्याचा हुकूम या किल्लेदारास आला. "ल्वामिया शामल जजिरेकर याचे भाऊ छोटेमिया व सिद्दी युसूफ व त्याचे बरोबरची माणसे असामी ७ तो. रायगड येथे अटकेत ठेविले होते. त्यास हुजुर पाठविणे बद्दल हुकुम सदाशिव रघुनाथ यास जाला होता. त्याप्रमाणे ९ कैदी पोचल्याचे कळविण्यात आले " अशा अर्थाचा मजकूर [सवाई माध० पे० रो० पृ० ३१७] मध्ये आहे.

तोतयाचें बंड व रायगडचा बंदोबस्त.

१० पानपतच्या लढाईत नाहींसा झालेला भाऊसाो पेशवा तो मी असें

---

* सदाशिव रघुनाथ तर्फ रायगड यास कीं ता मजकुर येथील बेगमीस तर्फ गोरेगांव पैकीं नऊ गांव व तर्फ निजामपूर पैकीं तीन गांव दिलें आहेत. [सवाई माधरा० रोज० पृ. ३१४]

लटकेच सागून, त्यानें कोंकणात बंड उभारलें. तोतया रत्नागिरीच्या किल्ल्यां-तून मोकळा होतांच कोंकणात त्याला भराभर अनुयायी मिळाले. रत्नागिरी जिल्ह्यातून तोतया कुलाबा जिल्ह्यांत आला. मराठी राज्यावरील संकटाचीं संधी साधून आपला अंमल वाढविण्यास टपून बसलेल्या जंजिरेकर सिद्दी शामळानें तळगड, घोसाळगड व रायगड काबीज करण्यास मदत देण्याचें कबूल केलें. तोतयाच्या लोकानीं *तळगडास वेढा दिऊन सिद्दीच्या साह्यानें तो घेतला. तेथून तोतयाची फौज रायगड घेण्यास निघाली. वंरध्या घाटानें देशावर जाण्याचा त्याचा मानस होता. रायगडचा बंदोबस्त चागला असल्यामुळें तो घेता आला नाही. वरंध्या घाटाचाही बंदोबस्त झाल्यामुळें तोतयाची फौज गोरघाटाने पुण्याकडे चालून गेली.

" राजश्री रामचंद्र शिवदेव स्वामी गोसावी यास.........तरी बरंधा घाटाखालीं तोतयाकडील हजार दीड हजार माणूस आले आहे. घाटावरी ×××× नी माणसें पाठविली जे आम्ही रायरेश्वराच्या डोंगरावरी येऊन राहणार तरि तुम्हीं वाट सोडून देणें इकडील चौकीदारानीं त्यास सागितले जे आमच्या धरायाची आज्ञा जाहल्यावरी जी आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करुं म्हणून करार करून आले. त्यास काय सागावे पुढे दीड हजार आले. मागोन हजार दोन हजार माणूस येतच आहे. तिकडून घाटाचा बंदोबस्त करावा तरी किल्ल्याचा बंदोबस्तास लोक गुंतले तेव्हा पुढें विचार करावा.

[भा० इ० सं. मं. पु. ४ पृ. ११५ शके १६९८ अश्वीन शु॥ ८]

११. पेशवाईच्या अखेरच्या कालात रायगड देशावरील शत्रूपासून रक्षण करण्यास कसा उपयोगी पडला हें पुढील विवेचनावरून दिसून येईल. नाना फडणीस हे शेवटच्या बाजिरावाच्या संशयी वागणुकीमुळें पुणें सोडून निघाले. ते महाड येथे येऊन राहिले. त्यानीं रायगडचा बंदो-

---

* या वेढ्याच्या हकीगतीचा एक ऐतिहासिक कागद मु॥ तळें ता० माणगांव येथें प्रस्तुत लेखकाच्या मदतीनें सांपडला व तो. भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध झाला आहे. खरवलीच्या माणकरानीं ह्या सिद्दीचा व तोतयाचा वेढा उठवून तळगड पुन्हां पेशवाई अमलाखालीं आणिला.

वस्त करून तेथेंच राहण्याचें ठरविलें [राजवाडे खं. ७]. हेतू हा कीं धरणें वगैरे आलें तर तात्काळ रायगडचा आश्रय घेतां यावा. परंतु नानांवर हा प्रसंग आला नाहीं.


पुढें जेव्हां होळकरानीं पुण्यावर हल्ला करून पेशव्यांचें अधिष्ठानच उठविलें तेव्हां सिंहगडाहून महाडास + व तेथून रायगडास पळून आला होता. तेथें कैदेंत असलेल्या माधवराव रास्त्यांस बंधमुक्त करून, आपल्या बचावासाठीं सैन्य गोळा करण्यास त्यास सांगितलें. इतक्यात बाजिरावाचा पाठलाग करण्यासाठीं ५ हजार फौज घऊन यशवंतराव होळकर रायगडचे रोखानें येत आहे असें बाजिरावास कळलें. तेव्हां शके १७२४ च्या कार्तिकांत बाजिराव रायगडावरून वसई येथें इंग्रजाच्या आश्रयास गेला. इकडे होळकरानें रायगड काबीज केला. पुढें बाजिराव व होळकर याच्यामध्यें इंग्रजांच्या मध्यस्तीनें तह होऊन रायगड पेशव्याच्या ताब्यात आला. घाटावरील शत्रू पाठीस लागला म्हणजे सुरक्षितपणें राहण्यास रायगड उपयोगी पडत असे. शेवटच्या बाजिरावावर जेव्हा आपली पुणें राजधानी सोडण्याचा प्रसंग आला तेव्हा त्यालासुद्धा रायगड हीच जागा सुरक्षित वाटली.

" श्रीमंत क्षत्रिय कुलावतंस महाराज राजश्री छत्रपतीचे शेवेशीं विनंति सेवक बाजिराव रघुनाथ प्रधान कृतानेक विज्ञापना ता. छ. २२ मोहरम सुरुसन इहिये अशर मयालेन व अलफ यशवंतराव होळकर यांचे बोलणें कीं पूर्वी जसे बखेडे झाले. कारण सातारा जागा नाजूक बाकी नव्हे बलकुबलीस रहावयाचे उपयोगी नाहीं सबब पूर्वी शिवाजी महाराज यानीं रायगड सारख्या जागा बसवून दवलती केल्या. प्रसंगाचे दिवसात सातारियास खासा स्वारी राहणें हें माझे विचारास येत नाहीं. रायगड जागा चागली मजबूत कोणी म्हणे कीं फौजा पाठवून वस्त्रे आणू किंवा बखेडा करूं तरी होणार नाहींत. या करितां स्वामीची मर्जी मुकारकेंत आल्यास यशवंतराव होळकर दक्षिणेंत येऊन कोठें लढाईचा प्रसंग न करितां......... " [मिती आश्विन शु॥ १२ शके १७३२ चें बाजिरावाचें स्वदस्तुरचें पत्र]

+फारसी मराठी पत्रव्यवहार. पत्रांक १२३. शके १७२४ पौष व॥ १० वेलस्लींचें पत्र. पेशव महाडाकडे गेल्याचा उल्लेख आहे.

हिंदवी स्वराज्याचें पहिलें स्वतंत्र सिंहासन ज्या रायगडावर स्थापिलें, त्या रायगडचा स्वराज्यकालीन इतिहास आतांपर्यंत लिहिला आहे. शके १७२४ मध्यें वसईचा तह झाल्यापासून मराठी राज्याच्या पारतंत्र्यास प्रारंभ झाला. क्रमाक्रमानें सर्व मराठी साम्राज्य इंग्रजांच्या ताब्यांत गेलें. त्यांतच आमचा रायगडही अखेरची धडपड करून इंग्रजांस मिळाला. तो इतिहास पुढील प्रकरणीं देण्यांत आला आहे.





रायगडवरील शिवाचें मंदीर.

प्रकरण ७ वें.

रायगडच्या स्वातंत्र्याचा शेवट.

वसईच्या तहानें बाजीराव पुराच इंग्रजांच्या ताब्यांत गेला. तेव्हांपासून बाजिराव व इंग्रज यांच्या अनेक कटकटी झाल्या. गंगाधरशास्त्र्याच्या खुनाचें प्रकरण निस्तरतांना बाजीरावास पुरेसें झालें. शेवटीं पुणें येथें इंग्रज व पेशवे यांत तह झाला (शके १७३८.) " गायकवाडाकडून पेशव्यानें यापुढें बाकी मागूं नये, व राहिलेल्या बाकीबद्दल वर्षास साडेचार लक्ष रुपये गायकवाडाकडून घेऊन पेशव्यानें स्वस्थ बसावें. इंग्रजांस पलटणीच्या खर्चीकरितां मागें २६ लक्षांचा मुलूख दिला होता. तो आतां ३४ लक्षांचा दिला." या तहाची हमी म्हणून बाजिरावानें इंग्रजांस रायगड, सिंहगड, पुरंदर हे तीन किल्ले द्यावे असें ठरलें. रायगड देणें बाजिरावाच्या जिवावर आलें होतें. परंतु बऱ्याच वाटाघाटी नंतर दिला. शके १८३७ च्या पावसाळ्यांत बाजिराव पंढरपुराहून माहुलीस गेला. व त्यानें इंग्रजाबरोबर युद्धाची तयारी चालविली व याचवेळीं रायगडही* ताब्यांत घेतला. आपली पत्नी +वाराणसीबाई

---

* इंग्रज व पेशवे यांचें भांडण सुरूं झालें तेव्हां बाजीरावाचे हुकुमानें रायगड, सिंहगड, पुरंदर, व त्रिंबकगड येथें लढाईचा बंदोबस्त सुरूं झाला. (रा. ख. ४ पृ. १२२ शके १७३८।३९)


+ " त्यास श्रीमंताची स्वारी तर्फ मजकुरी सन सलाममया तैनात (शके १७२४) दाखल झाली. यावर यशवंतराव होळकर याचा दंगा जाहाला. ते समई श्रीमंत येशवदाबाईसाहेब किल्ले रायगडास होती. या करितां राजश्री

हिला बरोबर बरीच मालमत्ता|| देऊन रायगडीं पाठविलें.


×बाळोजी कुंजीर याणी श्रीमंताची आज्ञा महाडचे मुक्कामी घेऊन जमीनदार तर्फ मजकूर यास ताकीद केली. कीं तर्फ मजकूरचे रयतेस दिल दिलासा देऊन रयते नीं पळूं नये किले मजकुरी रसद भरणा दाणा वगैरे कारकारसाई पोहोचऊन द्यावी म्हणजे घर देणें असे ते पाल दिल्हे जाईल. त्या प्रमाणें रयेत सरकार कामास आली...... ” म. सा. पत्रिका अं. २ वर्ष २ रें, पृ. ३८

|| श्रीमंतानीं किल्ले इंग्रजी सरकारांतून माघारा दिल्यावर जवाहीर व पैका वगैरे चीजवस्त सिंहगड व रायगड वगैरे किल्यांत रवाना केली व वाड्यांतील देव व थोरली श्री वाराणशीबाई रायगडास पाठविली. राजवाडे (खं. ४ पृ. १३९.)

× बाळोजी कुंजीर या वेळीं रायगड मामल्यावर होता. त्याचें एक पत्र विरवाडी येथें श्री. वि. अं. पटवर्धन यांचेकडे सांपडलें आहे. त्याचा शिक्का व आरंभीचा मजकूर असा आहे.



शके १७२१ चैत्र शु|| ३ (सन १७९९ एप्रील ८) “ कौलनामा अजस्वारी राजश्री बालोजी कुंबीर सुभेदार तालुके रायगड वा|| ” शिवाय आणखी कांहीं कागद सांपडले आहेत त्यावरून पुढीलप्रमाणें रायगडचे किल्लेदार होते असें दिसतें.



हा शिक्का

[शके १७३४ “ राजश्री पराशराम केशव सुभेदार तो|| रायगड ” सेवक रामचंद्र भिकाजी सुभेदार तो|| रायगड शके १७३८

२. इंग्रज व बाजिराव याच्यांत अनेक झटापटी होऊन अखेर बाजिरावाचा पूर्ण पराभव झाला. शके १७४० मध्यें मालकमला बाजिरावानें पेशवाईची सोडचिठी लिहून दिली. ह्या त्याग–पत्रावरून इंग्रज सर्व मराठी राज्याचे मालक बनले. ले. कर्नल प्रॉथर हा घाट माथ्यावरील सह्याद्रीच्या ओळी लगतचे किल्ले घेण्याच्या मोहिमेवर निघाला त्यानें इसापूर, लोहगड, कोअरी, हे किल्ले घेतले. नंतर कुलाबा जिल्ह्यांतील ठिकाणें काबीज करण्याची मोहीम सुरू केली. रायगडच्या घेऱ्यांतील तळें, घोसाळें व मानगड हे किल्ले बिनविरोध इंग्रजांच्या ताब्यांत आले. प्रॉथरनें २३ एप्रीलपर्यंत आपलें ठाणें इंदापूर (ता० माणगांव) येथें ठेविलें होतें. तळगड १० शिपायांची तुकडी पाठवून घेतला. मानगडावर इंदापूराहून निजामपूर मार्गें एक तुकडी पाठवून तो घेतल्याचें जाहीर केलें. २३ एप्रील रोजीं त्यानें इंदापूर सोडलें. व तो महाडास आला. ८९ व्या तुकडीचा अधिकारी मेजर हॉल याचे हाताखालीं २०० गोरे व २०० काळे शिपाई देऊन त्यास रायगडावर पाठविलें. इंग्रजी सैन्य ता. २४ एप्रील रोजीं पहाटेंस पाचाड येथें आले. रायगडावरील ३०० लोकांच्या एका तुकडीनें यास पाचाड येथेंच आडवून धरलें. या चकमकींत इंग्रजांचे ३ शिपाई जखमी झाले व मराठ्यांचे २० ठार झाले. तेव्हां मराठी सैन्यानें पाचाड सोडलें व तें किल्यावर निघून गेलें. इंग्रजानीं पाचाडची नाकेबंदी करून मुख्य छावणी पाण्याच्या आश्रयानें मागें ३ मैलांवर नेण्यांत आली. ता. २५ रोजीं निरनिराळ्या इंग्रजी टोळ्यांनीं किल्ल्याच्या पायथ्याच्या सर्व भागांची पाहाणी करून, तोफांचे मोर्चे बांधण्यांत आले. इंग्रजी सैन्य रायगडला वेढा देऊन बसलें. मराठी सैन्यानें किल्ला भांडविण्याचा कसोशीचा प्रयत्न केला. कोंकणांतील कांहीं किल्ले अल्पायासानें हातीं आल्यामुळें, कॅ. प्रॉथरला रायगडचा विरोध बराच जाणवला. त्यानें मुंबईस सैन्याची मदत मागितली. थोड्या दिवसांनीं पावसाळा सुरू होणार असल्यानें बरसाती पूर्वी रायगडचा वेढा पूर्ण करणें भाग होतें. मुंबई सरकारनें ६७ व्या पायदळी पलटणींतील सहा तुकड्या रायगड येथील सैन्याचे कुमकेस रवाना केल्या. दक्षिण कोंकणांत मोहिमेवर असलेल्या ८९ व्या पलटणीपैकीं एक तुकडी मालवणाहून रायगडावर आली.

इंग्रजी तोफांनीं शेजारच्या टेकड्यांवरून किल्ल्यावर मारगिरी चालविली. तटास सुरुंग लावण्यांत आले. किल्ल्यावरून इंग्रजी सैन्यावर तोफांचा भडिमार चालला होता. त्यापासून बचाव व्हावा म्हणून खंदकाचा आश्रय इंग्रजी सैन्यानें केला. रायगड नजीकच्या कांगोरी व प्रतापगड किल्ल्यावरून मराठ्यांच्या कांहीं टोळ्या रायगडास वेढा देणाऱ्या इंग्रजी सैन्यावर चालून आल्या. ले० क्रॉसबी हा महाडास तळ देऊन होता. त्यानें हे मराठी हल्ले परतविले. कांगोरी किल्ल्यावरून आलेल्या मराठ्यांचा व ले. क्रॉसबी याचा मोठा सामना काळनदीचे कांठीं झाला.

३. रायगड बरसात सुरु होण्यापूर्वी ताब्यांत येत नाहीं, असें पाहून कॅ. प्राथरनें बाजिरावाची पत्नी वाराणशीबाई हिला निरोप पाठवून किल्ला खालीं करून देण्यास सांगितले. तिनें किल्ला देण्याचें साफ नाकारलें. ता. ६ मे रोजीं दक्षिणेस असलेल्या गुयरीच्या डोंगरावर मारगिरी करणाऱ्या आठ इंची तोफेचा गोळा रायगडावरील दारूच्या* कोठींत पडला. ती सायंकाळचीं ४ वाजण्याची वेळ होती. दारूकोठारांत मोठा भडका उडाला. भूकंप व्हावा तसा सारा रायगड किल्ला हदरला. उघडच आहे ! स्वराज्याच्या पहिल्या राजधानीचा मान मिळालेला रायगड पारतंत्र्य-नरकांत पडतांना दगडा-मातीचा

---

* गुयरीच्या डोंगराचा पोटल्याचा डोंगर म्हणून एक फांटा आहे. त्यावरून ही तोफ सोडण्यांत आली. तिचे **गोळे** दारु कोठाराच्या आसपास पडत पण नेमके तेथें पडत नव्हते! तेव्हां रायनाक महारानें फितूर होऊन तोफेच्या गाड्याखालीं दोन शिवराई ढबू घालण्याची युक्ती सांगितली. लागलीच गोळा दारु कोठारांत पडून भडका उडाला. इंग्रजांनीं ह्या फितुरी रायनाकाला कडेलोटाची शिक्षा दिली. व त्याच्या देशद्रोहाचें योग्य फळ त्याला मिळालें. अशी एक दंतकथा आहे.

रायनाक महाराबद्दल महाडच्या कारखाननिसांच्या घराण्याकडून अशी माहिती मिळते कीं,:– तो (रायनाक) इंग्रजांना फितूर झाला नाहीं, उलट किल्ला लढविण्यासाठीं अखेरपर्यंत लढत मेला. म्हणून त्याचा एक चांदीचा टांक करून तो पूजण्यास ठेविला आहे.

असला तरी शहारून जावा यांत नवल काय? इतके दिवस जवानमर्दीनें लढ-लेला रायगड, ह्या दारू-कोठारांच्या स्फोटामुळें प्राणहीन-शवासारखा-बनला. माणसांचें अन्न संपतें तर गडावरील झाडपाला खाऊन शिपायांनीं आपलीं पोटें भरलीं असतीं. पण तोफा, बंदुकांचें अन्न-दारू-खलास झाल्यामुळें तोफेच्या तोंडीं काय द्यायचे ! रायगडावरील माती ! त्या मातींतही आतां शिव–कालीन स्पोटपणा राहिला नव्हता. असो, त्याच दिवशीं सायंकाळीं वाराणसी-बाईसाहेबांच्या हुकमावरून किल्ला खालीं करून देण्याचें किल्लेदारानें कबूल केले. त्यादिवशींच्या सूर्यानें महाराष्ट्राच्या ह्या राजकीय पुण्यभूमीवरील सोनेरी किरण अखेरचेच आवरून पश्चिम समुद्रांत एकदांची उडी घेतली.

४. दुसऱ्या दिवशीं पाचाडजवळ वाडी येथें आठ वाजतां तहाची वाटा-घाट सुरु झाली. इंग्रज सेनापतीनें अशक्य अटी घातल्या. सर्व किल्ला द्रव्य-सामानासह इंग्रजांस द्यावा. इ. इ. त्या अटी पाळून किल्ला ताब्यांत देण्याचें मराठ्यांनीं नाकबूल केलें. ह्या तहाला पांच तासांची मुदत दिली होती. मराठ्यानीं अद्याप बाणेदारपणा सोडला नव्हता. त्यांना कोठून तरी मदत येऊन किल्ल्याचा वेढा उठेल ही आशा होती. इंग्रजांनीं पुन्हां तोफांचा भडि-मार चालविला. तो दुसरे दिवशीं म्हणजे ८ तारखेस दुपारीं १० वाजेपर्यंत चालू होता. १० वाजतां मुख्य किल्लेदार शेख अबदुल हा स्वतः तहाची वाटाघाट करण्यास पायथ्याशीं आला. ही वाटाघाट ९ तारखेस दुपारीं ३ वाजेपर्यंत चालली होती. तहाच्या देखाव्यावर इंग्रजास झुलवीत ठेवण्याची ही किल्लेदाराची युक्ती होती. तो कोठून तरी दारूगोळ्याची व सैन्याची मदत येईल ह्या आशेवर होता. शेवटीं निरुपाय झाल्यावर तह ठरला. तो असा. १०० अरब ८० मराठे सैनिक यांनीं आपलीं शस्त्रें, कुटुंबांतील मंडळी व मालमत्ता घेऊन खालीं उतरावें. किल्लेदारानें आपल्या पांच अनुयायांसह पुण्यास रहावें. बाजीरावाचे बायकोबरोबर किल्लेदाराच्या मंडळींपैकी कोणी नसावा. किल्लेदारानें देखील आपल्या खाजगी मालमत्तेखेरीज कोणतीही चीजवस्त नेऊं नये. ह्या अटी पाळण्याची हमी म्हणून खुद्द किल्लेदारानें इंग्रजी छावणींत रहावें. १० मे

रोजीं दुपारीं* क. प्रॉथर वर गेला. तो वर जात असता सैन्य मराठी खालीं उतरत होतें. इंग्रजाच्या १०० सैनिकांनीं किल्ल्याच्या दरवाजा आपल्या ताब्यात घेतला. क. प्रॉथर वर गेला, तों त्याला सर्व किल्ला बेचिराख झालेला आढळला. कित्येक इमारती अद्याप पेटत होत्या. मात्र धान्याचा संग्रह व काहीं इमारती शाबूत होत्या. इंग्रजाच्या माऱ्यानें किल्ल्याची अगदीं धुळधाण उडविली. क. प्राथर किल्यावर वाराणसीबाईचे भेटीस गेला. ती बाई निराशा, दुःख, उद्विग्नता यानीं खिन्न झाली होती. तिच्याआजूबाजूला अमीनें सर्व हलकल्लोळ माडला होता. नंतर तिला तिच्या खाजगी मालमत्तेसह पुण्यास जाण्याची परवानगी देण्यात आली. तिच्याबरोबर १०० शिपायांची एक तुकडी बदोबस्तासाठीं देण्यात आली. ह्या बाईच्या पावलांबरोबर रायगडला व अखिल महाराष्ट्राला स्वातन्त्र्यलक्ष्मी सोडून गेली. इंग्रजानी आपला बावटा—युनियन जॅक—रायगडावर फडकविला! किल्ल्यात पाच लक्ष रोकड नाण्याच्या रूपानें इग्रजाच्या हातीं आली. सपला रायगडचा इतिहास!

वाचकहो, स्वराज्यात्मा निघून गेल्यावर आता रायगडच्या इतिहासाचा समारोप कोणत्या शब्दानी करू! स्वातन्त्र्यचैतन्य नष्ट झालेल्या रायगडच्या दगडाधोंड्याच्या शवाकडे पाहून दुःखानें अपार अश्रू आल्यानें सारा समारोप धुपून निघाला!

'.. " पण सुदैवाने वाराणशीबाई तशा नव्हत्या. त्यानी या मायावीपणाच्या पासपोर्टाच्या निरोपाला झिडकारून टाकले आणि त्या किल्लेदाराला म्हणाल्या, " मी असल्या या फसवेगिरीच्या मोहाला कधीही बळी पडणार नाही. मी तुमच्या सरक्षणाखाली इतके दिवस एथें येऊन राहिलें;

* क. प्रॉथरनें ता. १२ मे १८१८ रोजीं काढलेल्या जाहिरनाम्यांत त्यानें रायगडावर निशाण रोवणारे जॅप व डॅशवुडज् तोफांचे मोर्चे बांधणारे ले. रेमन यांचें अभिनंदन केलें आहे.

मेजर बॉंड यानें केलेले हल्ले तोफांची अचूक मारगिरी होण्यासाठीं रायगड भोंवतालच्या डोंगरावर करण्यांत आलेली मोर्चेबंदी, व सुरुंग लावण्यांत दाखविलेलें कौशल्य ह्यांचा कौतुकानें उल्लेख केला आहे.

आणि आता मी तुम्हांला संकटात टाकून आपल्या देशाच्या शत्रूच्या संरक्षणाखालीं जाईन, असें तुम्हाला वाटतें? तुम्ही माझ्या संरक्षणाखालीं आपल्या जीवावर उदार झाला आहां अशा वेळीं माझ्या जीवाच्या संरक्षणासाठीं तुमचे जीव धोक्यांत घालून मी कशी जाईन? मनुष्यप्राण्याला इतकें कृतघ्न कसें होतां येईल? किल्लेदार, शेखअबदुल! मी आपल्या जीवाच्या बचावासाठीं येथून एक पाऊलभर देखील हालणार नाहीं! तिकडच्या जीवावर दररोज लढाईचीं हजारों संकटें कोसळत असतांना मी आपल्या या यःकश्चित् जीवाच्या बचावासाठीं त्यांच्या शत्रूच्या संरक्षणाखाली कशी जाईन? किल्लेदार, येथील माझ्या सहवासानें माझ्या पोटच्या मुलाच्याप्रमाणें या तुमच्या सगळ्या शिपायावर माझें मातृप्रेम जडलेलें आहे. या माझ्या मुलाबाळाना टाकून मी कोठें जाऊं? किल्लेदार, तें काहीं नाहीं! आपण सगळेजण या किल्ल्याच्या तटावर उभे राहून शत्रूला मारूं किंवा मरूं! हा त्या शिवाजीमहाराजाचा किल्ला आहे! या पवित्र किल्ल्याला आपल्या कमकुवतपणानें आपण कोणत्याही प्रकारचा कलंक लावता कामा नये!"

६. "या सर्व किल्ल्याचा मिळून तो एक संघ होता त्या संघाच्या सभा नेहमीं भरत असत! व त्या सभातून महाराष्ट्रातील सर्व किल्ले हजर असत. या किल्ल्यांच्या संघाची सभा भरण्याची वेळ मध्यरात्रीची असे आणि त्याचीं जागा आकाशमंडळातील विस्तीर्ण मैदान ही असे! चंद्र आणि तारे याच्याकडे त्या संघाच्या सभेतील रोषणाईचें काम देण्यात येत असे! आणि सभेतील सभासदाना उष्णतेपासून त्रास होऊं नये म्हणून प्रत्यक्ष वायु हा तेथें पंखे ओढण्याचें काम करीत असे. अशा व्यवस्थेमध्यें या महाराष्ट्रातील किल्ल्याच्या संघाची सभा भरली असता त्या सभेमध्यें काय भाषणें होत असत! रायगडचा किल्ला हा त्या किल्ल्याच्या संघाचा कायमचा अध्यक्ष होता! तो अध्यक्ष स्थानापन्न झाल्यानंतर तेथें जीं भाषणें होत, तीं फक्त एक वीररसाचींच असत! प्रत्येक किल्यानंतर तेथें आपण सहन केलेल्या तोफेच्या गोळ्याच्या जखमा आपल्या श्रोतृवृंदापुढें दाखवीत असे; आणि कोणत्याही उत्कृष्ट मानवी वक्त्यापेक्षा तो त्या योगानें

आपल्या श्रोत्यांच्या मनावर जास्त परिणाम उत्पन्न करीत असे! कोणताही किल्ला बोलावयाला उठला, तरी त्याच्या सगळ्या बोलण्यातील सार एकच असें; आणि तें हें कीं, आपल्याला कितीही संकटें सोसावीं लागलीं, तरी सगळीं मुकाट्यानें सहन करून आपण अखेरपर्यंत आपल्या देशाच्या स्वातंत्र्या-करितां लढत उभें राहिलें पाहिजे! आता हा लढण्याचा कार्यक्रम अयशस्वी झालेला आहे; तेव्हा आतां आपण सगळेजण शत्रूला शरण जाण्याचा कार्यक्रम स्वीकारूं या. अशा प्रकारचा अभद्रपणाचा एकही शब्द तेथें कोणाच्या तोंडून कधीं निघत नव्हता. लढण्याला किंवा शत्रूशीं तोंड दे-ण्याला थकला असा एकही किल्ला त्या संघामध्यें नव्हता. ते किल्ले म्हणत असत कीं, मनुष्यानें आमचे दरवाजे उघडून शत्रूला आंत घेतलें, तर तेथें आमचा नाइलाज आहे. पण आम्ही आपण होऊन आपले दरवाजे कोणत्याही परशत्रूच्या प्रवेशाकरिता प्राण गेला तरी उघडणार नाही व आम्ही कधी कोणाला शरण जाणार नाहीं. त्या सर्व किल्ल्यांनीं आपलें सर्व प्राचीन इतिहास प्रत्यक्ष पाहिलेले होते, व परकीय लोकांनीं लिहिलेल्या खोटया इतिहासाकडे ते कधी ढुंकूनही पहात नसत. अशी स्थिति असल्यामुळें त्या सर्व किल्ल्यांच्या संघानें बाजीरावसाहेबांच्या वेळीं असा निश्चय ठरविला होता कीं, आपले धनी बाजीरावसाहेब यानीं इंग्लिशांच्यापाशीं हल्लीं लढाई करण्याला सुरवात केली आहे, अशा वेळी आपण सर्वांनीं इमानेंइतबारें त्यांच्या बाजूनें लढलें पाहिजे आणि शेवटपर्यंत टिकाव धरून राहिलें पाहिजे!"

७ " पण या वेळीं रायगडच्या किल्ल्यावर हल्ला करणाऱ्या इंग्लिश लोकाना पाठीमागून शह देण्याकरता कोणीच पुढें सरसावले नाहींत, असें नाहीं. पूर्वी वायरलेस टेलिग्राफीचीं साधनें जरी अस्तित्वांत आलेलीं नव्हतीं, तरी एका किल्ल्यावरची बातमी आसपासच्या किल्ल्यावर कळविण्याचे कांहीं मार्ग त्या वेळच्या लोकानींही योजिलेले होते. आणि तोफाच्या आवाजांनीं, किंवा मोठाले जाळ पेटवून, किंवा इतर कांहीं खुणांनी ते लोक आपल्या बातम्या दुसऱ्यांना कळविण्याचा कार्यभाग साधून घेत असत. अशा कांहीं उपायांनीं अगर जासुदाच्या निरोपांनीं रायगडापासून कांहीं थोड्या अंतरा-

वर राहाणारे रायगडाचे दोन धाकटे भाऊ—कागोरीचा किल्ला व प्रताप-गडचा किल्ला—याना आपल्या वडील भावावर गुदरलेल्या प्रसंगाची बातमी कळली; व ही बातमी कळतांक्षणींच त्या दोन्ही किल्ल्यावरचे मिळून काहीं लोक खालीं उतरले; व रायगडावरचा किल्लेदार इंग्लिशाच्या सैन्यावर गोळे फेकीत असता, आपण पाठीमागून जाऊन त्या शत्रूच्या सैन्याला दोहों-कडच्या मारामध्यें गाठावें, असा त्याचा विचार होता. आणि त्या उद्दे-शाने प्रतापगडच्या आणि कागोरीच्या किल्ल्याच्या पायथ्याशीं सावित्री नदीच्या काठी पोलादपूर म्हणून जें एक गाव आहे, तेथे ह लोक जमा झाले. परतु हे लोक पाठीमागून आपल्या सैन्यावर छापा घालण्याकरिता येत आहेत, असे कळल्याबरोबर लेफ्टनट क्रॉसबी हा त्या लोकावर चालून गेला. विजयश्रीच्या या लहरी पक्षपातामुळें मराठे शिपायांच्या त्या वेळच्या त्या प्रयत्नाला यश आल नाही.

मराठ्यांची युद्धे.

प्रकरण ८ वें.

इंग्रजी अमलांतील रायगड.

गाढ झोपेंतून एकाएकीं जागे व्हावें. आपण आपल्या घरीं असलों तरी आपण कोठें आहों, आपले पाय कोणत्या दिशेला आहेत, बाहेर पडण्याचा दरवाजा कोठें आहे, याचें कांहीं एक भान रहात नाहीं. इंग्रजी अमलाच्या सुरवातीस हिंदुस्थान असेंच कांहींसें भांबाऊन गेलें. मागील सर्व स्मृती नष्ट झाल्या. इंग्रजी अमलाच्या मोहमयीनें हिंदुस्तान दिङ्मूढ बनलें ! स्वातंत्र्याची स्मृती नष्ट झाली; स्वाभिमान गारठला, पराक्रम पारखा झाला, विचाराची उज्ज्वलता लोपली इतकेंच नव्हे तर पूर्वचांच्या उज्वल इतिहासाकडे व पूर्व संस्कृतीकडे पाहण्याची दृष्टीच दूषित बनली. ह्या मोहांधतेचें पटल इतर प्रांताप्रमाणें महाराष्ट्रावरही पसरलें. महाराष्ट्र आपली शेंकडों वर्षांची उज्ज्वल ऐतिहासिक परंपरा विसरून हिवाळ्यातील वाढ खुंटलेल्या झाडाप्रमाणें स्तिमित झाला. ह्या अव्वल इंग्रजींत हिंदुस्तानची राष्ट्रीय-भावना अगदींच मलिन झाली. ह्या मालिन्याची राख ऐतिहासिक स्थलांवरही उडाल्यावांचून राहिली नाहीं. पण एकोणिसाव्या शतकाचे अखेरीस ह्या राखेंतूनच गणपति उत्सव, शिवाजी उत्सव इ. इ. अग्नि-स्फुलिंग बाहेर पडून त्यांच्या द्वारें साऱ्या महाराष्ट्रभर एका सामर्थ्यवान् विचारांची रसरसीत दीप्ति पसरली गेली. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर व लो. टिळक या दोन विभूतींनीं महाराष्ट्रात राष्ट्रीय चैतन्य आणण्याचे अनेक प्रयत्न केले. पैकीं लो. टिळकांनीं गणपत्युत्सव व शिवाजी उत्सव सुरू करून धर्म व इतिहास यांच्या भूमिकेवरून राजकारणाचे पाट महाराष्ट्रास दिले. प्रस्तुत प्रकरणात लो. टिळकांनीं रायगड फंड, शिवाजी उत्सव इ. इ. महत्त्वाच्या चळवळी कशा केल्या व त्या बीजाचा आज केवढा वृक्ष झाला आहे हें पहावयाचें आहे.

२ शिवाजी उत्सव संबधी चिरोल साहेब आपल्या पुस्तकात लिहितातः— "मराठे मंडळीस आपल्या बाजूला आणण्याचें काम टिळकास अद्यापी करावयाचें होतें. म्हणून ज्या शिवाजीनें मुसलमान लोकाचा पराभव करून महाराष्ट्रात हिंदुपद-पादशाहीची स्थापना केली त्याचा जन्म एका मराठा सरदाराच्या कुलात झाला असल्याकारणानें त्याच्या पराक्रमाचे पोवाडे गाऊन शिपाई बाण्याचे जे मराठे लोक त्याच्या मनात इंग्रजी राज्याविषयीं असलेले प्रेम नाहीसें करून त्याना आपल्या बाजूला वळवून आणण्याच्या उद्योगास टिळक लागला. काही लोकांचा असा तर्क आहे कीं, एका इंग्रज गृहस्थानें वर्णिलेल्या रायगडावरील शिवाजीच्या समाधीच्या शोचनीय स्थितीच्या हकीकतीवरून टिळकाच्या मनात प्रथमतःकल्पना आली कीं, शिवाजी उत्सव सुरू करून त्याचा फायदा राजकीय चळवळीस करून घ्यावा...... कसेंही असो, टिळक ने शिवाजीला पुढें आणून मोठी "राष्ट्रीय" धामधूम सुरू केली. व सन १८९५ साली महाराष्ट्रात सर्व मुख्य ठिकाणी शिवाजीच्या जन्मदिवसानिमित्त उत्सव करण्यात आले."

विरोधी भावनेने का होईना, पण चिरोलने राष्ट्रीय भावना जागृतीचें श्रेय टिळकाच्या व शिवाजी उत्सवाच्या गळ्यात घातलें !

३ ह्या प्रकरणाच्या सुरवातीस सांगितल्याप्रमाणे अव्वल इंग्रजींत महाराष्ट्र अगदी स्तिमीत झाला होता. एवढा स्वातंत्र्य—संस्थापक शिवाजी पण परकीय इतिहासकाराच्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहिल्यामुळे तों चोर, दरवडेखोर व खुनी वाटू लागला. त्याचें नाव घेणें, त्याचा जयजयकार करणें भीतिप्रदायक वाटू लागलें. शाळेत मुलाना देखील परकीयांनीं विकृत केलेला शिवाजीचा इतिहास शिकवावा लागे. खुद्द शिवाजीमहाराजीसंबधानें इतकी अनास्था ! तर त्याच्या राजधानीची व समाधीची किती अनास्था असेल बरें ? सन १८१८ सालानतर रायगड किल्ला व समाधी ही सरकारच्या जगल खात्याच्या ताब्यात. जगल खात्याचे धारे—कायदे काय विचारावे ? एक झाडाची फांदी तोडावयास अगर एक फूट खोल खड्डा खणावयास परवानगी नाहीं. सन १८१८ च्या रायगडच्या वेढ्यात इंग्रजी तोफांनीं रायगडावरील सर्व इमारती जाळून, मोडून, तोडून टाकल्या होत्या. फक्त काहीं भिंताडें व

एक दोन इमारती उभ्या होत्या. त्यांही ऊन, पाऊस, वारा यांच्या माऱ्यानें भूमीला शरण आल्या. जिकडे तिकडे उजाडपणा, उदासपणा व रखरखीतपणा पसरला. कित्येक तळीं,हौद तळांत फुटल्यामुळें जलशून्य—अतिशोकानें पाणी आटलेल्या डोळ्यांसारखीं—दिसूं लागली. नयनमनोहर गंगासागर चिखलानें ओहळून व तळाशीं फुटून मढ्याच्या खांचा झालेल्या डोळ्यासारखा दिसूं लागला. राजवाडा व इतर इमारती पारतंत्र्यानें चूर्ण झालेल्या राष्ट्राप्रमाणें सहस्रशः भग्न होऊन पटल्या. साराश त्यावेळीं रायगडचें दर्शन घेणाऱ्या प्रवाशाला आपण ओसाड निर्मानुष प्रदेश पहात आहों असें वाटलें असतें. मुसलमानी अमलांत पददलित झालेल्या महाराष्ट्राला स्वातंत्र्याचा सौभाग्यतिलक लावणारा श्रीशिछत्रपती जेथें सिंहासनाधीश्वर झाला तें महाराष्ट्राच्या अभिमानाचें आश्रयस्थान राजधानी रायगड हें होय ! ह्या पुण्यभूमीचें दर्शन घेण्यासाठीं भाविक लोक कधींमधीं रायगडावर जात असत. त्यांना तेथें काय दिसत असे ? खडकाळ व उजाड मुलख. रात्रभर निवाऱ्याची एखादी जागाही किल्ल्यावर नाहीं. शिवछत्रपतीचें स्मारक पहावें तों एक भग्न होऊं लागलेला लहानसा दगडी चौथरा. आत्मीयभावाचा अभिमान नसलेला इतिहासभक्त परदेशी प्रवासी जर हिंदुस्थानांतील ऐतिहासिक स्थळें पहात पहात रायगडावर आला असता तर तो जवळच्या वाटाड्याला म्हणता " तूं वाट नाहींना चुकलास रायगड किल्ल्याची ? ज्या जगद्वंद्य पुण्य पुरुषानें आटोकाट प्रयत्न करून हिंदवी स्वराज्याची पहिली राजधानी ज्या गडावर स्थापली तेथें इतकी ओसाडी ? मी उत्तरेंत पहिलें तो प्रियानें प्रियेसाटीं बांधलेलें प्रेमाचें थडगें (ताजमहाल) जगाला ललामभूत झालें आहे ! निराकार परमेश्वराच्या प्रार्थनेसाटीं उत्तरेच्या बादशहांनीं बांधलेल्या साकार मंदिराचें सौंदर्य जगप्रसिद्ध ठरलें आहे . तसें येथें कांहींच दिसत नाहीं "! हें त्या प्रवाशाचे काल्पनिक उद्गार अगदीं सत्य आहेत. पण आत्मीय बुद्धीनें रायगडाकडे पाहणारास तेथील प्रत्येक धोंड्या दगडावरून शेंकडों ताजमहाल ओवाळून टाकावेसे वाटतील. गगनस्पर्शी विजयस्तंभापेक्षां तेथील पडकी भिंताडें जास्त उत्तमोत्तम वाटतील. हा भावनेचा फरक मान्य केला तरी रायगडच्या उपेक्षेचें चित्र कमी भडक ठरत

नाहीं. रायगडची एतत्कालीन उपेक्षा जशी जनतेनें केली तशी सरकारनें केली. पुढे रायगड स्मारक व शिवाजी उत्सव ह्या परस्पर अनुयोगी चळवळींचा बनाव कसा बनत गेला हें आता पहावयाचे आहे.

" सन १८८५ साली रायगड येथील शिवाजी महाराजाच्या समाधीच्या उपेक्षेचा उल्लेख वर्तमानपत्रद्वारें जनतेपुढे आला. कुलाबा जिल्ह्यांतील एका जंगल अधिकाऱ्यामुळें हा उल्लेख जाहीर झाला. रायगड किल्ला सरकारी जगलखात्यात मोडतो. या वेळीं कर्झन साहेबानें काढलेला ऐतिहासिक वस्तुसंरक्षणाचा कायदा झालेला नव्हता. तरी सर्व किल्ला जगलची हद्द म्हणून सरकारच्या ताब्यात गेला. अर्थात् समाधीही त्यात आलीच. पेशवाईनतर रायगडावर दोनचार धनगराच्या पावसाळी वाड्यापेक्षा ज्यास्त वस्ती नव्हतीच. नुसतें निगडीचे जगल माजलेलें ! तथापि हें जगल तुडवीत कित्येक एतद्देशीय लोक तर येतच पण कित्येक वरिष्ठ युरोपेअन अमलदारही येत. सर रिचर्ड टेपल हे मुबईचे गव्हर्नर असता किल्ला पहावयास आले. ह्या प्रसगाचें सुरस वर्णन पुढें २० वर्षांनी " माझ्या टिपण वहीतील सुटीं पाने " ह्या शिर्षकाखालीं ए. टी. सी. या महीने टाइम्समध्ये प्रसिद्ध झाले आहे. टेंपल साहेब गव्हर्नर असता सुप्रसिद्ध क्रॉफर्ड साहेब रेव्हेन्यु कमिशनर होते. रायगडावर टेंपल साहेबाबरोबर क्रॉफर्ड साहेब, डॉ. वाटर्स व कॅ. रिट हे गेले होते. क्रॉफर्ड लिहितात " रायगडावर गेल्यावर टेंपल साहेब समाधीवर चढले तेव्हा त्याना इतकी स्फूर्ती झाली कीं, आपल्या कल्पनाशक्तीची भरारी दोनशे वर्षे मागें नेऊन शिवाजीच्या दरबारचे काव्यमय वर्णन त्यांनी केले. नतर शिवाजीच्या मरणोत्तर रायगडावर झालेल्या अनन्वित प्रकाराचे वर्णन करून टेंपल साहेब म्हणाले ' वरील दोन देखाव्याची चित्रे जगातील इकडे येणाऱ्या चित्रकारानी अवश्य काढावी. मात्र " गस्ताव डोरे " या चित्रकाराशिवाय इतर कोणास ही चित्रें काढणें साधेल असें मला वाटत नाही. ह्या प्रसगी खुद्द टेंपल साहेबानीं रायगडावरील देखाव्याचीं अनेक चित्रें पेन्सिलीनें काढून घेतलीं. जाताना रायगडच्या व समाधीच्या दुरुस्तीकडे पूर्णपणें लक्ष ठेवण्याविषयीं बजावून व तुमच्या जिल्ह्यात असणाऱ्या ह्या इतिहास प्रसिद्ध स्थळाची

दुरुस्ती ठेवण्याकडे तुम्ही कां लक्ष पुरविलें नाहीं अशा अर्थाचें कुलाबाच्या कलेक्टरास एक कडक पत्र लिहिलें!

४. पुढें टेंपल साहेबांच्या हुकुमाचा आधार घेऊन कु. जि. जंगल अधिकाऱ्यानें मुंबई सरकारकडे समाधीच्या दुरुस्तीसाठीं कांहीं रकम मागितली; हें जाहीर झाल्यामुळें पुन्हा रायगडाबद्दल चर्चा सुरु झाली. डग्लस साहेबांनीं मुंबई इलाख्यासंबंधानें एक पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यांत समाधीच्या दुःस्थितीचा उल्लेख होता. तसेंच गोविंद बाबाजी जोशी वसईकर, ग्रंथकार यांनीं स्वतः रायगडची स्थिती पाहून रायगडविषयक एक पुस्तक लिहिलें. डग्लस साहेबांनीं आपल्या पुस्तकात शिवाजीची समाधी आजवर अशा दुःस्थितींत राहू दिल्याबद्दल महाराष्ट्रीयांना दोष दिला. जोशी यांच्या मनाला ही गोष्ट लागली. डग्लस साहेबानीं कोल्हापूर व सातारा येथील छत्रपतींच्या वंशजास व पेशव्यांच्या संस्थानिक सरदारासही दोष दिला.

जोशी यांनी के. जनार्दन नावाच्या एका शिल्पज्ञ इंजिनियरास रायगडावर धाडून समाधीवर छत्री बांधण्यास लागणाऱ्या खर्चाचें अंदाजपत्रक तयार करविलें. या छत्री बांधण्यास लागणाऱ्या खर्चाचा अंदाजी आकडा ४५०४६ रु. होता. रायगडावरून परत येताच जोशी यानीं मुंबईच्या 'नेटिव्ह ओपीनियन' वगैरे पत्रातून याच साली लेख लिहिले. इतक्यात "लॉर्ड रे यांनीं समाधीच्या जीर्णोद्धाराचें काम सरकारातून व्हावें अशी शिफारस केली आहे" अशी बातमी प्रसिद्ध झाली. शिवाय दरसाल पाच रुपयांची समाधीच्या किरकोळ दुरुस्तीला मंजुरी मिळाली! पण पुढें सार्वजनिक प्रयत्न थाबल्यासारखा झाला. काही किरकोळ वर्गण्यांचीं पोंच वर्तमानपत्रांतून क्वचित् आढळून येतें. या चळवळीला चांगले स्वरूप येण्यास आणखी दहा वर्षांचा काळ जावा लागला!

५. सन १८९५ च्या एप्रिल महिन्याच्या अखेरीस लोकमान्य टिळकांनीं शिवस्मारकाबद्दल लेख लिहिण्यास सुरुवात केली. लोकमान्य लिहितात "मराठ्यांचे हितशत्रु लॉर्ड हॅरिस साहेब हे देखील शिवाजीच्या पराक्रमाचे वर्णन करीत असतात. त्यांचे वंशज व सरदार हें स्मारकाची काहीच खटपट करीत नाही. त्या अर्थी त्यांचे जिणे व्यर्थ होय" डग्लस

साहेबांनीं समाधीच्या दुस्थितीचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें होतें. “समाधीचा अंतर्भाग झाडाझुडपानीं व्यात केला आहे. धर्मशाळेच्या फरसबंदींतून मोठाले वृक्ष उगवले आहेत. देवालयाची धाण झाली असून त्यांतील मूर्ति जमिनीवर फेकून दिली आहे.” सिंक्लेअर साहेबाच्या शिफारशीवरून मुंबईसरकारनें सालीना ५ रुपये मजूर केले. ते, इग्रज परकीय हें लक्षांत घेता पुष्कळच होत. पण संस्थानिकानी व सामान्य लोकानीं ढिलाई सोडून जागोजाग सभा भरवून फंड जमा करण्याची तजवीज करून जगास आपली कृतज्ञता दाखविली पाहिजे”

पण या पूर्वीच स्मारकासाठी वर्गणी जमविण्यास सुरवात झाली होती. महाड रायगड जवळच असल्यामुळें तेथील लोकानीं पुढील सालापासून खुद्द रायगडावर जाऊन शिवाजी उत्सव साजरा करण्याचा बेत प्रसिद्ध केला. याच वेळीं लो. टिळकांनी स्मारकासंबंधीं कमेटी नेमल्याचें केसरींत जाहीर केले. तारीख १४ मे च्या अंकात एका प्रवाशानें रायगडावर काय काय सोई केल्या पाहिजेत याची माहिती दिली. दुसऱ्या एका गृहस्थाने श्री. बाबासाहेब इचलकरंजीकर याचे जवळ गोष्ट काढताच त्यानीं सालिना १०० रुपये उत्पन्नाची व्यवस्था समाधीकरतां करून देण्याचे कबूल केले. असे जाहीर केले.

६. तारीख ३० मे रोजी सायंकाळीं हिराबागेच्या मैदानात स्मारकाप्रीत्यर्थ टोलेजंग सभा भरली. सभेस सरदार, जहागिरदारही हजर होते. ती सभा म्हणजे दरबारच वाटला. सरकारी दरबारात न होणारी गोष्ट म्हणजे सरदार लोकाचीं सभेत भाषणें झाली. उच्चस्थानीं चाफळचे स्वामी बसले होते. प्रारंभी सेनापति दाभाडे यानी लो. टिळकांच्या व आपल्या सहीने निघालेली निमंत्रणपत्रिका वाचून दाखविली. श्री पंतप्रतिनिधी यास अध्यक्ष नेमलें. या सभेस न्या. रानडे याचेकडून संमतिदर्शक तार आली होती तींत न्यायमूर्ती रानड्यानी कायमचा फड उभारण्याची कल्पना सुचविली होती. ती बापूसाहेब कुरुंदवाडकर यानीं १८८५ ची व हल्लीची ही चळवळ एकच आहे असें सागून सर्वांना मदत करण्यासंबंधींचा पहिला ठराव मांडला त्याला डॉ. विश्राम, बॅ. गाडगीळ, स. पोतनीस, जोगळेकर यानीं

अनुमोदन दिले. पोतनीस यांनीं महत्त्वाची माहिती सांगितली कीं, "मराठेशाहींत समाधीच्या उत्सवासाठीं दरसाल मोठी रक्कम पडत असे, हें आमच्याकडील ऐतिहासिक कागदपत्रावरून सिद्ध होतें." ठराव दुसरा बाळासाहेब कुरुंदवाडकर यानीं पुढें माडला. तो कमिटी नेमण्यासंबंधींचा होता. कमिटींत ५०–५५ गृहस्थाचीं नांवें चाफळकर स्वामीपासून सामान्य व्यापाऱ्यांपर्यंत घातलीं होतीं. खजिनदार बाळासाहेब नातू व सेनापति दाभाडे, बाळासाहेब इचलकरंजीकर व लो. टिळक असें कार्यकारीमंडळ नेमण्यांत आले. या सभेंतील विशेष महत्त्वाची गोष्ट अब्दुल रझाक बिझली, वाईकर या सभेंतील गृहस्थांनीं कमिटीच्या ठरावास संमति दिली. नंतर लो. टिळकानीं आपल्या भाषणात सांगितले कीं "कोल्हापुरच्या महाराजांनीं मनावर घेतल्यास ते एकटेच समाधीची दुरुस्ती करू शकतील पण सर्व दर्ज्यांच्या व सर्व जातीच्या लोकांकडून पै पैशापासून वर्गणी गोळा होऊन त्या द्रव्यानें शिवरायाच्या समाधीचा जीर्णोद्धार व्हावा अशी सर्वांची इच्छा आहे." शेवटीं कोल्हापुरच्या छत्रपती महाराजाकडे या बाबतीत शिष्टमंडळ पाठविण्याचें ठरलें. इतक्यात त्याचेकडून सभेस सहानुभूतीचा संदेश आला. या सभेनंतर महाराष्ट्रात रायगडावरील शिवस्मारकाबद्दल बरीच चळवळ सुरू झाली. समाधीवर छत्री बाधून उत्सव सुरु करण्यास चाळीस हजारावर रुपये लागतील आणि पुतळा उभारावयाचा असला तर १००००० रुपये लागतील म्हणून कमिटीनें ज्या मानानें वर्गणी जमेल त्या मानानें काम करावे असें ठरविलें. कोल्हापुरचे रीजंट आबासाहेब घाटगे यानीं मुद्दाम रायगडावर मनुष्य पाठवून छत्रीस लागणाऱ्या खर्चाचा अंदाज केला. सुमारें २५००० रुपये खर्च लागेल असा अंदाज झाला. सयाजीराव महाराजाकडून १००० रुपये रोख वर्गणी आली.

७. शिवाजी स्मारकाची चळवळ लो. टिळकानीं हातीं घेताच टाइम्स वगैरे सरकारच्या कच्छपीं लागणाऱ्या पत्रानी त्याविरुद्ध कोल्हेकुई माजविली. कित्येक देशद्रोही स्वजनानी सुद्धा या चळवळीवर "ब्राह्मणी कावा" म्हणून आग पाखडण्यास सुरवात केली. या टीकेला प्रत्युत्तरेंही मिळालीं. मुंबईस सभा भरून कमिटी नेमण्यात आली. श्री. शंकराचार्य यानीं १० रुपये

समाधीला वर्षासन नेमून दिलें. फर्ग्युसन कॉलेजमध्यें याच विषयाच्या विचारासाठीं प्रो. भानूंचे अध्यक्षतेखालीं सभा भरली. कोल्हापूरच्या छत्रपतीकडे ता. २६ आगष्ट रोजीं हिराबागेंत ठरल्याप्रमाणें डेप्युटेशन गेलें. लो. टिळक डेप्युटेशनचे चिटणीस होते. कोल्हापुरास डेप्युटेशनचा सत्कार चांगलाच झाला. "आपल्या इतर पूर्वजांच्या छत्र्याप्रमाणेंच रायगडावरील छत्रीचीही आपण व्यवस्था करूं व अंदाज ठरेल त्याप्रमाणें वार्षिक देणगीची रक्कम मागाहून जाहीर करूं." असें छत्रपतीनीं कळविलें. पुढें पुण्याच्या राष्ट्रीय सभेच्या ऐन धांदलींत रे मार्केटच्या विस्तीर्ण मैदानात राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष श्री. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी याच्या अध्यक्षतेखालीं लो. टिळकांनी शिवस्मारकासंबंधी जाहीर सभा भरली. मैदान गर्दीनें फुलून गेले होतें. शिवाजी महाराजांची तसबीर एका रेशमी दोरीनें झाडाला लटकावून दिलेली होती. अशाप्रसंगीं सुरेंद्रबाबू व पंडित मालवीय अशा वक्त्याचीं किती स्फूर्तिदायक भाषणें झालीं असतील? लो. टिळकाचे स्नेही, महाडकर ज्योतिषी व बाबाजी काशिनाथ पटवर्धन यानीं चालू सालीं (सन १८९६) रायगडावर वैशाख शु॥ २ स आपण मोठा उत्सव करणार आहों असें प्रसिद्ध करून सर्व लोकांकडून उत्सवास मदत मागितली. या उत्सवाचे मूळाशीं लो. टिळकांचे प्रयत्नच प्रमुख होते, व उत्सवाचा कार्यभारही त्यांनींच आपल्या अंगावर घेतला हाच रायगडावरील पहिला उत्सव होय. हा उत्सव स्मारकफंड कमिटीचे मार्फत साजरा करण्यात येणार नव्हता; तर महाडकर मंडळी वेगळाच फंड जमवून मोठ्या प्रमाणावर उत्सव करणार होती. ता ३ मार्चच्या केसरींत उत्सवाचे नियम प्रसिद्ध करण्यात आले. (१) सर्वांस प्रसादाचें भोजन दिलें जाईल. (२) उत्सवास लागणारें सर्व सामान देशीच वापरलें जाईल. (३) कथा, नाटकें, गोंधळ, पोवाडे यांत चागलें शिववर्णन असेल तर त्यांना या नव्या संस्थेचे मानकरी समजून मानाचे नारळ देण्यांत येतील. याच वेळेला शिवस्मारकाची रक्कम १६००० रुपये जमल्याचें प्रसिद्ध झालें.

रायगडावरील त्या आधुनिक महोत्सवाची तारीख २५ एप्रील ठरली.

उत्सवाला 'प्रथमग्रासे मक्षिकापात' झाला. रायगड हा सरकारी जंगलाच्या हद्दींत असल्यामुळें जंगलखात्याची परवानगी मागितली व ती मिळाली. पण रेव्हिन्यू खात्याकडून उत्सवाला अडथळा आला. लँब साहेब कुलाब्याचे कलेक्टर होते, त्यांनीं या उत्सवाला जत्रांचा कायदा लागतो असें ठरवून अर्ज मुदतींत नाहीं या सबबीवर परवानगी नाकारली. उत्सवासाठीं लोक तर जमूं लागले व परवानगीचें खेकटें आयत्यावेळीं पुढें आलें. तेव्हां लो. टिळक महाबळेश्वरास खुद्द गव्हर्नर साहेबापर्यंत गाऱ्हाणें घेऊन गेले. लो. टिळक हे कायदे कौन्सिलचे सभासद; तेव्हां असल्या साध्या गोष्टींत टिळकांना नाखूश करणें सरकारच्या जिवावर आलें. एकदांची परवानगी आली ! परवानगीसाठीं किती त्रास सोसावा लागला हें टिळकांना माहित झाल्यामुळें उत्सवांत शक्य तितका नेमस्तपणा राखावा अशी विनंति टिळकांनीं लोकांना केली. लोकमान्य महाबळेश्वरीं परवानगी मिळवून महाडावरून रायगडास गेले. गेल्या १००–१५० वर्षांत नसेल इतकी गर्दी रायगडावर जमली. रायगडचा तो उंच चढाव, खडकाळ रस्ता व महाडापासून बारा मैल अंतर अशा स्थितींत एवढा मोठा उत्सव रायगडावर साजरा करणें किती श्रमाचें झालें असेल ?

रायगडावरील पहिला उत्सव.

८. तारीख १४ पासून गडावर माणसें जमूं लागलीं. बाराही मावळांतले मावळे प्रतिनिधी आले होते. किल्ल्यावरील नगारखान्याचा चौक, राजदरबारचा दिवाणखाना, दारुखान्याचें कोठार, जगदीश्वराचें व शिरकाईचें देवालय वगैरे सर्व ठिकाणें माणसांनीं गजबजुन गेलीं. देवळें, टांकीं व डबकीं स्वच्छ करण्यात आलीं. गंगासागर बराचसा स्वच्छ करण्यांत येऊन मुख्य भागातले काटे काढून टाकण्यात आले. सभेच्या जागीं तट्टयांचा मांडव घालून तोरण उभारण्यांत आलें होतें. सिंहासनाच्या जागेवर शिवाजी व रामदास यांच्या तसबिरी गाद्या घालून त्यावर मांडल्या. सकाळीं कै. विनायकशास्त्री अभ्यंकर यांचें कीर्तन झालें. नंतर मेळ्यांचीं पदें झालीं. दुपारी गंगासागरावर सर्वांना प्रसादाचें भोजन मिळालें. सायंकाळीं पांच वाजतां समारंभ भरावयास सुरुवात झाली. मेळ्यांचीं पदें

झाल्यावर ना. बा. कानिटकर, कै. प्रो. शि. म. परांजपे व दापोलीचे गोगटे यांचीं ऐतिहासिक विवेचनपर भाषणें झालीं. शेवटीं लो. टिळकांचें समारोपादाखल भाषण होऊन "आपण आपल्या स्वराज्य-संस्थापकाचें स्मारक करण्यांत राजनिष्ठेचा मागमूसही नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. नंतर पोवाडे म्हणण्यात येऊन मध्यरात्रीं वाजत गाजत जगदीश्वराचे देवळापासून छबिना काढण्यांत आला.

ह्या प्रसंगा रायगडच्या इतिहासाची बरीच उजळणी झाली. महाराष्ट्रीयांच्या रायगडाचें गतवैभव उभे राहून मनःचक्षूंसमोर आपण कोण होतों याचा वस्तुदर्शनानें धडा मिळाला. दुसरे दिवशीं समाराधनेनंतर तान्हाजी मालुसरे, येसाजी कंक वगैरे ऐतिहासिक वीरांच्या वंशजाना व कार्यकर्त्यांना मानाचे नारळ देण्यांत आले. स्वयंसेवकानाही नारळ देऊन गौरविण्यांत आलें. स्वराज्य नष्ट झाल्यापासून आजच रायगडावर प्रथम हा राजशाही थाटाचा समारंभ झाला.

ह्या उत्सवास कित्येक सुधारकांनी व अँग्लो इंडियन पत्रकारानीं नावें ठेविली. शिवाजी महाराजांचा झालेला गौरव त्या दिवाभीतास पाहवला नाहीं. स्मारकाच्या वर्गणीचेंही काम रोडावलें. पुढच्याच वर्षी लो. टिळकांवर राजद्रोहाचा खटला झाला. राजद्रोही ठरलेले लेख मुख्यतः शिवाजी उत्सवाबद्दलचे होते. अर्थात् लोकांच्या मनाला त्यातल्या त्यांत संस्थानिकांच्या मनाला तर हें शिव-स्मारक फारच वाकडें वाटूं लागलें. जमलेले पैसे मात्र बँकेंत कमेटीच्या मार्फत ठेविले होते.

९. स्मारकाच्या प्रयत्नांचा पुढील इतिहास. कै. ना. दाजी आबाजी खरे याना उत्सवमंडळाचे अध्यक्ष करून लो. टिळकानी सरकार दरबारीं खटपट १९०६ सालीच सुरू केली होती. व तिला थोडेंबहुत यशहि आलें होतें. तें असें की, ना. खरे यांनीं महाड येथून सन १९०६ चे एप्रिल महिन्यात सरकारकडे रीतसर अर्ज करून स्मारकासंबंधीं आपली योजना सरकारास कळविली. आणि पुढील सालीं सरकारी ठराव नं. ४४५४ ता. २ मे १९०७ रोजीं निघून सरकारनें या स्मारकाच्या कार्यास सर्वसामान्यपणें सहानुभूति व विशेषें-करून ५००० रुपयांची मदत देण्याचा विचार ठरवून जाहीर केला.

परंतु पुढील सालीं लो. टिळक याजवर खटला व शिक्षा होऊन त्यांची रवानगी मंडाले येथें झाली. फिरून १९११ सालीं जेव्हा नामदार खरे यांनीं सरकारकडे चौकशी केली. तेव्हां त्यांना असें सांगण्यात आलें कीं, कबूल केलेली मदत देण्यास सरकार अजूनही तयार आहे. परंतु नकाशे, अंदाजपत्रक व स्मारकाचें प्रत्यक्ष काम सरकारमार्फतच झालें पाहिजे. ही नवीन अडचण लक्षांत घेऊन नामदार खरे यांनी या पुढील कार्य लो. टिळक बंधमुक्त होऊन परत येईपर्यंत तहकूब ठेवलें. परंतु वर दर्शविल्याप्रमाणें टिळक आल्यावरही प्रथम त्याचीं इतर व्यवधानें आड आली. टिळकासंबंधीं सरकारची दृष्टी त्याच्या बंधमुक्ततेनतरही कलुषितच राहिलेली होती. आणि पुढें तर डेक्कन बँक बुडाल्यामुळें स्मारकाला लागणारा स्मारकमंडळाचा सर्व पैसाहि घोटाळ्यात पडला. पुढे लो. टिळक हे विलायतेस गेले व परत आल्यानंतर थोडे दिवसात मृत्यु पावले. तात्पर्य या सर्व कारणामुळें स्मारकाची योजना पूर्ण होऊन अमलात येण्यास विलंब झाला. ता. १ मे सन १९०६ च्या केसरीमध्यें त्या सालच्या उत्सवासंबंधानें लिहिताना लो. टिळक यानी असे उद्गार काढले होते कीं "शिवाजी महाराजाच्या जीर्णोद्धाराचें राष्ट्रीय कार्य पुरें होऊन रायगडावरील चवथा महोत्सव दुरुस्त केलेल्या जगदीश्वराच्या विस्तीर्ण देवालयात शिवरायाच्या छत्रीसमोर साजरा होण्याची वेळ लौकरच येवो."

"परंतु जगदीश्वराच्या देवळाच्या दुरुस्तीचें काम अद्यापि व्हावयाचें आहे. आज जरी त्याची कांहीं योजना लोकापुढें नाही, तरी कार्यानें कार्य वाढतें. या रीतीनें समार्धाच्या जीर्णोद्धाराच्या कार्यानंतर हें दुसरें कार्यही हाती घेण्यास स्मारक-मंडळास सहजच उत्तेजन येईल आणि देवळाच्या जीर्णोद्धाराचें कार्य हें आपल्या देशातील लोकाच्या धर्मबुद्धीला विशेष रीतीनें पटणारें असल्यामुळें पुढें मागें कोणी एकादा धनिक स्मारकमंडळाच्या प्रोत्साहनाने किंवा स्वतंत्रस्फूर्तीनें पुढें येऊन हें कार्य का करणार नाहीं? देवळाचे जीर्णोद्धाराशिवाय इतरही काहीं गोष्टी प्रवाशाच्या सोईकरता म्हणून गडावर व्हावयास पाहिजेत. त्यातील मुख्य म्हटलें म्हणजे धर्मशाळा किंवा विश्रातिगृह हें होय. सुदैवानें कुलाबा जिल्हाबोर्डाला या कामीं स्वतंत्रपणें

स्वतःस्फूर्ती होऊन तिनें आरंभिलेल्या धर्मशाळेचें झालेलें निम्मे शिम्मे काम आपणांस पहावयास सांपडलेंच आहे. आणि या कार्यास लागणारें द्रव्य-सहाय्य वर्गणीनें गोळा करण्याची खटपट सुरू असल्यानें तेंही कार्य लौकरच पुरें होईल अशी आशा वाटत आहे. धर्मशाळेशिवाय तलावाच्या दुरुस्तीची व्यवस्था तसेंच पाचाड येथील मैदानांत प्रवाशांच्या मुक्कामाची व्यवस्था व रायगडचे पायथ्यापर्यंत येणाऱ्या सार्वजनिक मार्गाची सुव्यवस्था वगैरे लोकोपयोगी कामेंही व्हावयाचीं आहेत. पण तींही सरकार, स्मारक मंडळ, जिल्हा लोकलबोर्ड व सर्वसामान्य जनता यांच्या परस्पर साहाय्यानें पुढें मागें लौकरच पुरीं होतील आणि रायगड व श्री शिवाजीमहाराजांची समाधी यांचें दर्शन घेणाऱ्या शिवभक्ताचा प्रवास व वसति सुलभ, व सुखाची होईल अशी चांगली व्यवस्था दिवसेंदिवस अधिकाधिक होईल अशी आशा वाटत आहे. "

एक जुना प्रयत्न.

१०. केसरी मंगळवार ता. २० माहे एप्रील सन १९२६ इसवी मधील रा. ब. पु. बा. जोशी यांचा समाधीवरील छत्रीबद्दलच्या जुन्या प्रयत्नांचा इतिहास. " समाधीच्या जीर्णोद्धारासंबंधीं पहिली सूचना व विनंति ४० वर्षांपूर्वी "समाधी शतकावली" या काव्याच्या रूपानें प्रस्तुत लेखकानें महाराष्ट्र जनतेपुढें आणली होती. मुंबई गॅझेटीयरकरिता ठाणें व कुलाबा जिल्ह्यातल्या ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळाच्या वर्णनासाठीं संशोधन कार्य करीत असता शिवसमाधीची शोचनीय स्थिती आमच्या निदर्शनास आली, व त्यासंबंधानें 'टाईम्स ऑफ इंडिया'मध्यें एक पत्र लिहून जीर्णोद्धाराची आवश्यकता आम्हीं जनतेपुढें माडली. त्यावेळीं त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें इ.स. १८८५ सालीं वरील 'समाधी शतकावली' ह्या नांवाचें मराठींत काव्य लिहून त्याच्या द्वारें रायगडावरील समाधीच्या जीर्णोद्धाराची व शिवस्मारकाची आवश्यकता महाराष्ट्र जनतेच्या निदर्शनास फिरून एकदां आणली. या काव्यांत न्या. रानडे, कुंटे, तेलंग इत्यादि लोकाग्रणींस, महाराष्ट्रांतील संस्थानिकांस, कोल्हापूरचे रीजंट आबासाहेब घाटगे यांस व विशेषतः केसरीकारांस हें कार्य हातीं घ्यावें म्हणून सविनय प्रार्थना केली होती. तेलंग यांनीं सहानु-

भूतिपर पत्र पाठवून आपली सहानुभुति दर्शविली. रा. सा. रानडे यांनीं सप्रेम पत्र लिहून आम्हांस पुण्यास येऊन भेटण्याची सूचना केली. त्याप्रमाणें प्रस्तुत लेखक पुण्यास गेले होते. रा. सा. रानडे यांचे घरीं नीळकंठराव कीर्तने व इतरही पुण्यांतील एक दोन पुढारी यांचा या कार्याकरितां हिराबागेंत एक जंगी सभा भरवावी असा विचार ठरला. त्यानंतर थोड्या अवधीनें हिराबागेंत एक जंगी सभा भरून आमचें 'समाधी शतकावली' हें काव्य सभेपुढें वाचण्यात आलें व फंड गोळा करण्याकरिता कमिटीची योजनाही झाली. सरकारची परवानगी न मिळाल्यानें या सभेस प्रस्तुत लेखकास हजर राहता आलें नाहीं. मध्यंतरीं म्हणजे रावसाहेबाची पहिली भेट घेऊन मुंबईस आपल्यावर समाधीच्या कार्यासाठीं अनेक दिशेनें आम्ही प्रयत्न चालविले होते. याच सुमाराम कोल्हापूरचे रीजंट आबासाहेब घाटगे हे मुंबईचे गव्हर्नर फर्ग्युसन याच्याबरोबर विलायतेस जाण्याकरिता आले होते. त्यावेळीं त्यांची भेट घेऊन समाधीची शोचनीय स्थिती त्यांच्या निदर्शनास आणून समाधीच्या जीर्णोद्धाराचें काम हातीं घ्यावें म्हणन त्याना विनंति केली. विलायतेहून आल्यानंतर तें काम आनंदानें हातीं घेण्याचें त्यानीं आम्हास आश्वासन दिलें आणि आबासाहेब सूज्ञ व उदार असल्यामुळें शिवाजी स्मारकाचे कार्यास त्यानी मनःपूर्वक सहाय्य केलें असतें असें आम्हास वाटतें. परंतु मध्यंतरीं एक गोष्ट घडली त्यामुळें त्यानें मन साशक झालें असावे असें वाटतें. ती गोष्ट ही. प्रस्तुत लेखक सर जॉर्ज फॉरेस्ट यानीं मुंबई सरकारतर्फे प्रसिद्ध केलेल्या Selections from State Papers Maratha Series Vol. 1st या पुस्तकात शिवाजीच्या रायगडावरील बखरीचें भाषातर अग्रभागीं दिलें आहे. त्यात खालील प्रमाणें थोडासा मजकूर आढळतो. " When Shiwaji went to take half his share of chandi chandawar in the year of Shalivahan 1595 [A. D. 1673] the Goddes Bhawani came into his body and remained there five hours, during which time she gave him a view of future events, viz. that his dominion would fall into the hands of the people with red faces; that Smbhaji would be taken prisoner

by the Moghals; that Rajaram would succeed him on the masnad; that Shivaji would in the course of time, come into the world again under a new form and extend his dominion to Delhi, for 27 Generations."
(जेव्हां शिवाजी शके १५९५ (इ. स. १६७३) मध्यें चंदी चंदावरला आपला अर्धा हिस्सा मागण्यास गेला होता तेव्हा त्याच्या अंगांत तेथें भवानी देवी संचरली. ती ५ तास पर्यंत त्याच्या अंगात होती. तिनें त्या अवधीत त्याला पुढील भविष्य कथन केलें. ते हे कीं, त्याचे राज्य ताम्र लोकांच्या हातात जाईल; संभाजीला मोंगल कैद करतील; राजाराम संभाजीची गादी जिंकील; आणि शिवाजी या जगात पुन्हा अवतीर्ण होऊन तो आपलें राज्य दिल्लीपर्यंत वाढवील व तें २७ पिढ्या होईतों टिकेल.)

रायगड संबधीच्या भाषातराच्या प्रुफाची एक प्रत सर जॉर्ज फॉरेस्ट यांनी गव्हर्नर फर्ग्युसन यास व प्रस्तुत लेखकाने दुसरी प्रत आबासाहेब घाटगे यास अवलोकनार्थ दिली होती. भाषातराच्या प्रुफाच्या पृष्ठभागावर असलेला वरील मजकूर गव्हर्नर साहेबास राजकीय अस्वस्थता उत्पन्न करणारा आहे असें वाटून त्यानीं एडनहून त्यावेळचे ॲक्टिंग गव्हर्नर सर मॅक्स्वेल मेलविल यास त्याच्या ग्राह्याग्राह्यतेविषयी तार केली ! ज्याअर्थी ही बखर आमच्या आग्रहास व विनंतीस मान देऊन काही फेरफार न करिता सर जॉर्ज फॉरेस्ट यांनी मुंबई सरकारतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या Selections from State Papers, Maratha Series Vol. 1st. ह्या पुस्तकाच्या अग्रभागी घातली होती त्याअर्थी त्यांतील विषयाच्या पात्रापात्रतेसंबंधीं जबाबदारी आमच्यावर होती व याच करिता आम्हास व सर जॉर्ज फॉरेस्ट यास जाब विचारला असता स्पष्टीकरण करणें जरूर होतें. परंतु समाधानाची गोष्ट ही कीं, सर मॅक्स्वेल मेलविल व पील यांच्या अवलोकनात हा विषय पूर्वीच आला होता. यामुळें आमचें स्पष्टीकरण जाण्यापूर्वीच सर मेलविल यानीं त्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेऊन त्यांतील सर जे. फर्ग्युसन याना आक्षेपार्ह वाटलेलें विधान अस्वस्थता उत्पन्न करणारें नसून ऐतिहासिक सत्य आहे म्हणून तें छापण्यास परवानगी दिली. आबासाहेब व गव्हर्नर फर्ग्युसन साहेब इंग्लंडला जाताना एकाच बोटींत

असल्यामुळें शिवाजीच्या भविष्यासंबंधीं त्याचेमध्यें चर्चा झाली असावी; व गव्हर्नरास तें अराजकतेचें व अस्वस्थता उत्पन्न करणारें आहे असें वाटल्यामुळें आबासाहेबाचेंही मन जीर्णोद्धारासंबंधी साशंक झालें असावें. ही गोष्ट पुढें आमच्या प्रत्ययासही आली. आबासाहेब विलायतेहून परत आल्यानंतर शिवाजीच्या जीर्णोद्धाराचें काम हातीं घेण्यास त्याना मी पुन्हां विनंति केली पण त्याचा काहीच परिणाम झाला नाहीं.

फर्ग्युसन याच्या मागून लॉर्ड रे हे मुंबईचे गव्हर्नर झाले. त्यासही पत्र लिहून समाधीचें कार्य हाती घ्यावे म्हणून विनंति केली व याचा विचार होईल असा त्याच्याकडून जबाबही आला. पुढे काही काळ लोटल्यावर कुलाब्याचे कलेक्टर मि. सिंक्लेअर यानीं आम्हास कळविलें की, रायगडावरील समाधीची स्थिति सरकारनें (पी. डब्ल्यू. डी.) खात्याच्या नजरेस आणली आहे व त्याच्याकडून योग्य ती व्यवस्था होईल. रायगड व त्याच्या आसमंतातील जागाही राखून ठेवलेल्या जंगलाच्या हद्दींत असल्यामुळें बहुजनसमाजास तेथे सार्वजनिक उत्सवास परवानगी देणें इष्ट होणार नाहीं.

आपलें वास्तव्य पुण्यास असल्यामुळे ग. रा. रानडे याच्या कमेटीनें काय केलें हें आपणास अवगत असेलच. लो. टिळक यानीं १८९९ या वर्षी म्हणजे पाहिली सभा झाल्यानंतर दहा वर्षांनी हे कार्य आपल्या हातीं घेतले व तें आज त्याच्या आपल्या व इतर मित्राच्या परिश्रमानें पूर्णतेस येत आहे हं पाहून आम्हास अतिशयच आनंद होत आहे. ह्या कार्यासाठीं केसरीकारानीं व महाराष्ट्रातील ज्या देशाभिमानी सद्गृहस्थानी मनोभावानें सहाय्य केलें त्याची महाराष्ट्र जनता ऋणी राहील.

रायगडावरील दुसरा उत्सव

११. लो. टिळक तुरुंगातून सुटून आल्यावर पुन्हा रायगड येथें शिव-जन्मोत्सव करण्याचे ठरलें. त्याप्रमाणें २३ एप्रिल सोमवार चैत्र वद्य ९ शके १८२२ ही तिथी शिवाजीफंड कमिटीकडून ठरविण्यात आली. वास्तविक ही तिथी जन्मदिनाची पण नव्हे व राज्याभिषेक दिनाची पण नव्हे. परंतु उत्सवास सोईस्कर म्हणून धरिली होती. रायगडच्या आसपास

महाड, बोरवाडी, बिरवाडी येथील स्वयंसेवक गोळा करण्यात आले, निमंत्रणें वगैरे पाठविलीं. पांढरपेशे ५००।६०० व मावळे वगैरे मिळून मोठा जमाव रायगडावर जमला होता. सोमवारीं सकाळपासून कार्यक्रमास सुरवात झाली. कै. विनायकशास्त्री अभ्यंकर यांचें कीर्तन, मेळ्यांचे कार्यक्रम, आरती वगैरे होऊन प्रसादाच्या पंक्तीस सुरवात झाली. प्रसादाचा बेत साधा, सार भात हाच होता. पण तोही मंडळींना फार गोड वाटला. पुणेंकर पाहुणे मंडळीही स्वयंसेवकांसमवेत गंगासागराचे पाणी भरणें, पंक्ति वाढणें वगैरे कामात भाग घेत होती. रात्रीं फिरून कार्यक्रमास आरंभ झाला. राजवाड्यापासून महादेवाचे देवळापर्यंत पालखीचा छबिना, नळे चंद्रज्योति, वाजंत्री, भजनी मेळे यांच्यासह निघाला. जगदीश्वराचे देवालयाला प्रदक्षिणा घालून पालखी राजवाड्यात आली. तेथें गोंधळ्याचे पोवाडे झाल्यावर लो. टिळकांनीं स्मारकाच्या रकमेचा जमाखर्च सांगितला, व समाधीच्या दुरुस्तीप्रीत्यर्थ काय तजवीज केली आहे हेंही सांगून लवकरच त्या कामास सुरुवात होईल असें आश्वासन दिलें. नंतर आरती प्रसाद होऊन पहाटे दोन अडीच वाजता उत्सव समाप्त झाला. लो. टिळकांनीं आपल्या भाषणात उत्सवाच्या हेतुसंबंधानें जरी फारशी चर्चा केली नव्हती तरी "इतके खटले वगैरे झाले असता हा उत्सव इतक्या थाटानें होत आहे. यावरुन लोकाची भावना अद्याप जागृत आहे. व सरकारनेंही उत्सवास प्रतिबंध केला नाही, यावरून सरकारचेंही मन साफ असावे" असें सांगितलें. सदर प्रसंगी बंदोबस्तासाठीं पोलीस वगैरे पाठविण्यात आले होते.

या उत्सवाचे पूर्वीच थोडे दिवस शिवजन्मतिथीसंबंधाचा वाद निघून त्यांनीं अनेक पुराव्यांनीं शके १५४९ वैशाख शु॥ १ गुरुवार उत्तररात्र अश्विनी नक्षत्र हा काल ठरविला !

रायगडावरील तिसरा महोत्सव

१२. सन १९०६ च्या एप्रील महिन्यांत हा उत्सव करण्यात आला. एकंदर समाज मागील १९०० सालापेक्षां कमी होता. तरी सरकारी बंदोबस्त भरपूर होता. या उत्सवाचें अध्यक्षस्थान कै. दाजी आबाजी खरे यांस दिलें होतें. कै. दाजीसाहेब यांच्या पत्नीही गडावर उत्सव प्रसंगीं

आल्या होत्या. कै. लोकमान्यांबरोबर कै. शि. म. परांजपे, श्री. दत्तोपंत लिमये, श्री. भाऊसाहेब चौकर इ. इ. मंडळी गडावर गेली होती. यावेळीं सरकारची दृष्टी थोडी निवळली आहे असे वाटत होतें. म्हणून कायदे कौन्सिलचे सभासद दाजी साहेब खरे यांस अध्यक्ष करून त्यांचेमार्फत सरकारांत खटपट करून स्मारकास वर्गणी व इतर मदत मिळविण्याचा लोकमान्याचा विचार होता. लॉर्ड कर्झन यांनीं पुराणवस्तु संरक्षणाचा कायदा केला होता. त्याअन्वये समाधीच्या दुरुस्तीची सरकार आपण होऊन कांहीं तजवीज करील अशी आशा वाटत होती. उत्सवाचा कार्यक्रम मागील दोन उत्सवांप्रमाणेंच ठरविला होता. स्मारकफंडाचा हिशेब लो. टिळकांनी वाचून दाखवून पैनपैचा मेळ दाखविला.

याच वेळीं शिवनेरीवर शिवजन्मस्थानीं सरकारनें एक त्यांच्या नावाची पाटी लाविली. सारांश सरकारची दृष्टी बदलली आहे त्याचा फायदा घेऊन एकदाचें स्मारक उभारण्याची पर्वणी साधावी असा लो. टिळकाचा बेत होता. कै. दाजीसाहेब याच्या अर्जावरून लॉर्ड लॅमिंगटन हे स्वतः रायगडावर आले. वाटेंत त्यांस पावसानें फारच त्रास दिला. सर्व गड तशा पावसात त्यांनीं स्वतः हिंडून पाहिला. नंतर त्यानीं समाधीच्या दुरुस्तीला ५००० रु. आणि इतर सामानसुमान देण्याचा सरकारी ठराव काढला.

अशाप्रकारें तिसऱ्या उत्सवप्रसंगी रायगडावरील शिवसमाधीवरील स्मारकाला सरकारची प्रत्यक्ष मदत मिळण्याचा संकल्प झाला.

रायगड येथील चौथा महोत्सव.

(केसरी तारीख ६ माहे एप्रील १९२६ करून)

१३. शिवाजी स्मारक मंडळानें पूर्वी संकेत ठरवून प्रसिद्ध केल्याप्रमाणें चौथा महोत्सव शनिवार ता. ३ माहे एप्रिल १९२६ रोजीं रायगड येथें पार पडला. महाड येथें स्मारक–मंडळानें तात्पुरतें स्वागतमंडळ बनविलें होतें. उत्सवाकरिता लोक शुक्रवार पासून येऊं लागले. स्मा. मं. चि. श्री. न. चिं. केळकर कांहीं प्रतिनिधीसह शुक्रवारी सकाळीं गडावर आले. तत्पूर्वी भोजनगृहाची व सभेची मांडव घालून व्यवस्था ठेवण्यांत आली होती.

उत्सवाचे नियोजित अध्यक्ष श्रीमत राजे लक्ष्मणराव भोंसले व डॉ. मुंजे शनिवारीं सकाळीं गडावर आले. छत्री पुरी झाली नसल्यामुळें छत्रीचा समारभ कांहींच नव्हता. श्री. राजे लक्ष्मणराव यानीं दोनप्रहरीं समाधीची यथाविधी वेदोक्त विधीने पूजा केली. व लघुरुद्राचें उदक सोडून समाधीला उंची वस्त्राचा अहेर केला. शनिवार सकाळी महाड येथील शिल्पकार फडके यानी बनविलेल्या शिवाजी महाराजाचा अर्धपुतळा सिंहासन शिळेवर बसविला. व त्यावर आवासचे शिल्पकार करमरकर यानी केलेला ब्रॉन्झचा प्रतिमाफलक माडण्यात आला. मूर्तिला हार घातल्यावर वे. फडकेशास्त्री याचें पुराण व प्रार्थनापद्यें झाला. ह. भ. प. मुरुडकरबुवा याचें कीर्तन झालें. बरोबर ११॥ वाजता प्रसादाच्या समाराधनेस आरभ झाला. पंक्तीवर पंक्ती उठत होत्या. जातगोत मनात न आणिता सवानी प्रसादाचें अन्न पवित्र मानून आनदाने खाल्लें. दुपारी ४॥ वाजता कुलाबा जिल्हा लो. बो. मार्फत बाधल्या जाणाऱ्या धर्मशाळेचा पायाचा दगड राजे लक्ष्मणराव भोसले यानी बसविला. बोर्डाचे अध्यक्ष श्री. सितारामपत टिळक यांनी प्रास्ताविक भाषण केलें, "अशा राजधानीच्या जागी य:कश्चित दहावीस हजाराची छत्री किंवा दहावीस हजाराची धर्मशाळा बाधताना बाधणाराच्या मनात स्वत:विषयी महत्त्वाची बुद्धि न येता उलट स्वत:च्या क्षुद्रपणाची भावनाच अधिक प्रगट होते. तथापि पूर्ववैभवस्मरणाला जर पुराणवस्तुदर्शनाचें सहाय्य घेणें इष्ट तर ही क्षुद्रपणाची भावना मनात दडपून टाकून समाधि रक्षणाकरिता छत्री व तिच्या दर्शनाला येणाऱ्या लोकाकरता निवाऱ्याची धर्मशाळा अशा अनुषगिक गोष्टीही इष्टच म्हणून त्यांचा उपक्रम होत आहे तो योग्य होय." नतर राजेसाहेबानीं रुप्याच्या सुदर करणीने चुना घातल्यावर कोनशीला बसविण्यात आली. धर्मशाळेला १५१ रुपयाची देणगी दिली. श्री. केळकर यानी आभार मानताना कुलाब्याचे कलेक्टर व मुबईचे गव्हर्नर यानीं धर्मशाळेला देणगी दिल्याचें सांगितलें.

सायकाळीं सिंहासनापासून शिवाजी महाराजाच्या दोन्ही प्रतिमा पालखीत घालून छत्रीकडे जाण्यास छबिना निघाला. मिरवणुकीपुढें दाडपट्टा वगैरे मर्दानी खेळ सुरु होते. छबिन्याचा थाट व जमाव पाहून प्रेक्षकास

ऐतिहासिक कालाची आठवण झाली. पालखी छत्रीला भेटून आल्यावर पुन्हा सभास्थानीं आणली. व राजेसाहेबांच्या अध्यक्षतेखालीं सभेस सुरुवात झाली. प्रास्ताविक भाषणांत राजे लक्ष्मणराव यांनीं शिवाजीचें शौर्य, मुत्स-द्देगिरी, धर्मरक्षण व देशरक्षण यांची पराकाष्ठा, स्वराज्यस्थापनेची कळकळ इत्यादि गोष्टींचें मार्मिक, गंभीर व कळकळीचें विवेचन केलें. स्मा. मं. चि. श्री. केळकर यांनी १ एप्रील १९२६ पर्यंतचा शि. स्मा. फं. हिशोब सांगितला. श्री. रामभाऊ सोमण यानीं स्मा. कमेटीनें या स्मारकाचें काम तडीस नेल्या-बद्दल आभार मानण्याचा व नवें कार्यकारी मंडळ नेमण्याचा ठराव माडला. या ठरावाला ना. बेळवी श्री. काणे, डॉ. वेलकर, प्रो. पोतदार, श्री. आपटे, डॉ. सावरकर, डां. मुंजे व श्री. रानडे यानीं दुजोरा दिला.

रायगड शिवाजी स्मारक कमिटी.

१४. अध्यक्षः—श्री. मो. गो. देशमुख.

उपाध्यक्षः—श्री. शि. म. पराजपे, श्री. र. पा. करंदीकर, श्री. मु. रा. जयकर, श्री. ना. केशवराव, श्री. द. व्यं. बेळवी, खजिनदार व चिटणीसः—श्री. न. चिं. केळकर. दु. चिटणीसः—श्री. ना. रा. गुंजाळ.

सभासद—बृहन्महाराष्ट्रातील चौतीस पुढारी (केसरी ता. १३।४।२६ पहा) येणेप्रमाणें कमिटी नेमण्याचा ठराव पास झाल्यावर श्री. केळकर यांनीं सर्वांचे आभार मानले. शेवटी अध्यक्ष श्री. राजे लक्ष्मणराव भोंसले याचा सन्मान करण्याकरिता हार घालण्यात आला. व या प्रसंगाची खूण म्हणून मुद्दाम केलेली प्रस्तुत उत्सवाला यथोचित अशी रुप्याची तलवार व मानाचा पहिला नारळ ही देण्यांत आली. ती स्वीकारताना अध्यक्ष गहिंवरले व म्हणाले ' या काळात उत्सवमंडळाने दिलेली ही देणगी स्वीकारणाराची लाज एक श्री. शिवाजीमहाराज राखू शकतील ' हे हृदयस्पर्शी उद्गार, ती गंभीर वेळ आणि शिवरायाच्या स्मरणानें सद्गदित झालेला श्रोतृसमूह हें दृश्य विशेष नव्हे काय ? श्री. केळकर व श्री. गुंजाळ या चिटणीसद्वयाना राजानी उंची वस्त्राचा आहेर केला. अशा रीतीनें सभा आटोपल्यावर पोवाडे म्हण-ण्यात आले. व रात्रीं बारा वाजतां शिवाजी महाराजाच्या जयघोषात उत्सव पार पडला.

रायगड व कुलाबा जिल्हा बोर्ड.

१५. रायगड किल्ला हा कुलाबा जि. बोर्डाचे हद्दींत येतो. लो. बोर्ड ही संस्था हल्लीं बहुतांशीं लोक प्रतिनिधींच्या ताब्यांत आल्यासारखी आहे. महाराष्ट्रांतील जनता ज्या अर्थीं रायगडावरील समाधीच्या दुरुस्तीसाठीं व स्मारकासाठीं हजारों रुपये जमविते, त्याअर्थी रायगडाचे यात्रेकरूंना उतरण्यासाठीं धर्मशाळा व जाण्यासाठीं चांगला सडकेचा रस्ता करून देण्याची नैतिक जबाबदारी कुलाबा लो. बोर्डवर पडते. ह्या जबाबदारीची जाणीव बोर्डाला झाली असून त्यांनी त्या दिशेनें काय प्रयत्न केला त्या संबंधीचा कु. लो. बोर्डाच्या सन १९२६ ते २८ सालच्या अहवालातील उतारा सादर करितों.

गडावर चालून गेल्यावर विसांव्याकरिता सोय असावी म्हणून महाड ता. लो. बोर्डानें तारीख २५।५।१९२२ रोजीं ह्या किल्यात धर्मशाळा बांधण्याचा ठराव केला. परंतु हें विशेष खर्चाचें काम ता. बोर्डाकडून होण्यासारखें नसल्यामुळें त्या वेळचे जिल्हा बोर्डाचे अध्यक्ष कै. रा. ब. गजानन महादेव कामत यांनी तें हातीं घेऊन धर्मशाळेकरिता गडावर १० गुंठे जागा सरकारकडून मिळविली [सरकार ठराव रेव्हेन्यु डिपार्टमेंट नं. २१४८।२४ ता. २०।१।२५] ह्या बोर्डाची आर्थिक परिस्थिती अनुकूल नसल्यामुळें रा. ब. कामत याच्यामागून झालेले अध्यक्ष मे. सिताराम विश्वनाथ टिळक यांनीं रायगड–धर्मशाळा फंड सुरू करून त्यास नेक नामदार गव्हर्नर साहेब सर लेस्ली विल्सन याची व दुसरे थोर गृहस्थांची सहानुभूति मिळविली. व फंड गोळा करण्याकरिता एक प्रचारक नेमण्यात आला. त्यानें कुलाबा, ठाणें, पुणें, सातारा, रत्नागिरी, पूर्व व पश्चिम खानदेश या जिल्ह्यांत तसेंच बडोदें, कोल्हापूर, सांगली, मिरज, कुरंदवाड, जमखिंडी, मुधोळ, भोर, फलटण, औंध, गगनबावडा, अक्कलकोट, हैद्राबाद, धार, देवास वगैरे संस्थानांतून प्रवास करून वर्गणी गोळा करण्याचा प्रयत्न चालविला आहे. तसेंच दुसऱ्या जिल्हा बोर्डाकडून व इतर सार्वजनिक संस्थाकडून मदत होत आहे.

येणेंप्रमाणें रायगड किल्यांत धर्मशाळा बांधण्यात आली. व धर्मशाळेची कोनशिला क्षत्रियकुलावतंस श्रीमंत धर्मवीर, धर्मविभूषण राजे लक्ष्मणराव

साहेब भोंसले, नागपूरकर यांचेकडून तारीख ३ एप्रील सन १९२६ रोजीं बसविण्यांत आली. त्यावेळीं श्रीमंत राजेसाहेब यांनीं स्वतः गडावर येऊन व फंडास मदत करून या कार्यास उत्तेजन दिलें.

या धर्मशाळेस ९३२३ रुपये खर्च आला. त्यापैकीं ह्या फंडांतून ७००० रुपये घेतले असून बाकीचे बोर्डानें दिले. या फंडांत तारीख ३१।३।२८ पर्यंत १३२४८ रुपये जमले. व त्यातील धर्मशाळेकरिता ७००० रुपये व धर्मशाळेजवळ औटहाऊस करिंता व धर्मशाळेच्या व्हरांड्यांस कटडा व लाद्या बसविण्याकरिता लागणारे २९१४ रुपये फंडांतून घेतां फंडात बाकी ३३३४ रुपये राहात आहेत. आता धर्मशाळेचें काम संपलें आहे. परंतु रायगडावर जाणाऱ्या लोकांचे सोईसाठीं बोर्डास पुष्कळ कामें हातीं घेण्या-सारखीं आहेत, व जमजमा फंड जमत जाईल, त्या त्या मानानें कामें हातीं घेण्याचा बोर्डाचा विचार आहे. करिता या फंडाचें नाव बदलून त्यास रायगड फंड असें नाव देण्यांत आलें आहे.

हा फंड लोकलफंडास लागू असणाऱ्या नियमाप्रमाणें बोर्डानें आपले ताब्यात ठेवला असून त्याचा विनियोग कसा करावयाचा या बाबत सूचना करण्याकरिता एक कमेटी नेमण्यात आली आहे. ह्या कमेटीच्या द्वारें रायगड फंडाचा योग्य तो विनियोग होऊन लोकाच्या उदार देणग्यांचें फळ लौकरच दिसून येईल असा पूर्ण भरंवसा वाटत आहे.

कुलाबा जिल्हा बोर्डाकडून श्री. पु. स आठवले, राहाणार पाली, यास प्रचारक नेमण्यांत आलें होतें. ते गेली ५।६ वर्षे पुणें, मुंबई, बेळगांव, इंदूर, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, मिरज इ. इ. ठिकाणीं वर्गणी जमविण्यास हिंडत होते. त्यांनीं रायगडच्या फोटोंचा एक संग्रह तयार केला असून कांहीं ठिकाणी ते रायगडबद्दल सदीप व्याख्यानें देत. त्यांनीं अत्यंत कसोशीनें काम करून रायगड फंडास बरीच वर्गणी मिळवून दिली. वर्गणीची पोंच केसरींतून वारंवार प्रसिद्ध होत असे.

प्रकरण ९ वें.

रायगडावर जाण्याचे नवे व जुने मार्ग

सुमारे ३५ वर्षापूर्वी महाडचे प्रसिद्ध नागरिक कै. प्रो. गो. गो. टिपणीस यांनी रायगडवर्णनपर एक लहानसे पुस्तक लिहिले आहे. त्यात मुंबईहून रायगडावर जाण्याचा एक मार्ग दिला आहे. पुस्तक लिहिले त्या वेळेस तोच मार्ग सुमार्ग होता. पण हल्ली तो मार्ग मागे पडून अगर गैरसोईचा ठरून आधुनिक सुखसाधनांनी सुसज्ज, जलद वेगाचा, मोटार प्रवासाचा मार्ग प्रचलित आहे. आणखी दहा वर्षांनी कोंकण प्रांती रेल्वे झाल्यास रेल्वेचा मार्ग त्यापेक्षाही सोईस्कर निघेल, आणि कोणी सांगावे, आणखी ५० वर्षांनी विमानाची वाहतूक झाल्यास दिल्लीहून सकाळी निघालेला प्रवासी दुपारी रायगडी पोचू शकेल. ज्या शिवशाहीचा रूमशामपर्यंत दरारा बसविण्याची महत्त्वाकांक्षा १८ व्या शतकातील मुत्सद्याच्या मनात वावरत होती. ते रूमशामही मग रायगडास दूर नाही. सांगण्याचा मुद्दा—भौतिक शोधांनी जुन्याला पुरे म्हणायला लावून नव्याचा धडाका जगभर प्रतिदिनीं गाजविला आहे. तेव्हा आज आम्ही दिलेले मार्ग मागे पडले तर नवल काय? आज प्रचलित असलेले मार्ग दिल्याशिवाय या पुस्तकाची पूर्णता होणार नाही हे जाणून रायगडावर जाण्याचे आजचे मार्ग देतो.

२. मार्ग सांगताना आम्ही मुंबई, पुणें, कोल्हापूर व गोवें ही चार केंद्रें कल्पून तेथून महाडपर्यंतचे मार्ग प्रथम सांगून, मग महाड ते रायगड हा मार्ग देऊ. महाड, गोरेगाव, बिरवाडी व निजामपूर या चार ठिकाणाहून रायगडावर जाण्याचे मार्गही देण्यात आले आहेत.

३. प्रथम मुंबई ते महाडः—मुंबईहून सकाळीं ७ वाजतां धरमतर लाईनच्या बोटीनें १० वाजता धरमतरला यावें. भाडें सेकंड क्लास १५आणे व थर्ड १० आणे. धरमतरीस महाडच्या पुष्कळ मोटारी येतात. महाडपर्यंत २ ते २॥ रु. भाडें पडतें. महाडास दुपारीं २ ते ३ च्या सुमारास त्या मोटारी येतात. धरमतर ते महाड अंतर ५६ मैल आहे.

दुसरा मार्गः—मुंबईहून सकाळच्या लोकलनें ठाण्यास यावे. ठाण्यास महाडच्या अगर पेणच्या मोटारी मिळतात. पेणची मोटार धरमतर नाक्यावर बदलून महाडच्या मोटारींत बसावें.

तिसरा मार्गः—मुंबईस सकाळीं कोंकण लाईनच्या बोटींत हरेश्वरचें तिकिट काढून बसावें. बोट ४ वाजता हरेश्वरास येते. रात्रभर तेथें मुक्काम करून सकाळीं दासगाव खाडींतील मोटार लाचमधून दासगावी यावे. तेथें महाडच्या मोटारी मिळतात. हा तिसरा मार्ग हल्लीं बहुतेक रद्द झाल्यासारखा आहे. त्यातल्या त्यात जयंती व तुकाराम बोट बुडाल्या पासून तर ह्या मार्गाने येणारे प्रवासी फार विरळा. पहिल्या दोन मार्गांनीं खर्च कमी लागून शिवाय प्रवास ५ तासात होतो. म्हणून पहिले दोन मार्गेच हल्लीं जोराची रहदारी आहे.

४. पुणे ते महाड—पुण्याहून दोन मार्गांनीं महाडास येता येतें. पुण्याहून सकाळीं ७ वाजता निघणारी मोटार लोणावळा खंडाळा या मार्गानें १० वाजता धरमतरीवर येते. तेथून मुंबईची बोट आल्यावर निघून सुमारें २ते४ च्या दरम्यान महाडला येते.

दुसरा मार्गः—पुण्याहून सकाळीं ७ वाजता निघणारी मोटार भाटघरचें धरण, भोर, या रस्त्याने वरध्या घाटातून दुपारीं १ ते २ च्या दरम्यान महाडास येते.

पहिला मार्ग जास्त लांब असल्यामुळे, मोटारीत बसण्याचा कंटाळा येतो. दुसरा मार्ग त्या मानाने नजीक, नयनमनोहर व शिवशाहींतील घडामोडींची पदोपदीं स्मृति देणारा पण घाटात थोडा धोक्याचा आहे.

५. कोल्हापूर ते महाडः—कोल्हापुराहून मोटारीनें कऱ्हाड, कऱ्हाडाहून

कुंभार्ली घाटानें चिपळूण, चिपळुणाहून खेड, खेडपासून कशेडी कवटीच्या घाटानें पोलादपूर व महाड हा सर्व मोटारीचा प्रवास झाला.

दुसरा मार्गः—कोल्हापुराहून रेल्वेनें मिरज, मिरजेहून पुणें, पुणें ते महाड मार्ग मागें दिला आहे.

तिसरा मार्गः—[सायकलनें अगर मोटारने जाता येईल.] कोल्हापुराहून सातारा, साताऱ्याहून मालकमपेठ—महाबळेश्वर—तेथून पारघाटातून पोलादपूर व महाड.

६. गोवें ते महाडः—गोव्याहून आगबोटीने मुंबईस यावें. मुंबई ते महाड मार्ग मागें दिला आहे.

दुसरा मार्गः—गोव्याहून रत्नागिरीस आगबोटीनें यावें. रत्नागिरीपासून महाडपर्यंत मोटार सर्व्हिस आहे.

मागे दिलेल्या चार केंद्रापासून महाडास येण्याचे आजचे सोईस्कर मार्ग दिले आहेत.

७. कल्याण ते महाडः—नाशिक, खानदेश या भागातून येणाऱ्या प्रवाशांनीं रेल्वेनें कल्याणास यावें. तेथून रेल्वेनें कर्जतला अगर ठाण्याला जावें. कर्जतहून व ठाण्याहून धरमतरीस येणाऱ्या मोटारी सकाळी ७ वाजतां निघतात. त्या मोटारींनें महाडास येता येतें.

आता महाडाहून रायगडावर जाण्याचे मार्ग देण्यापूर्वी महाडासंबंधीं चार शब्द लिहिणें जरूर आहे.

८. महाड हें तालुक्याचें ठिकाण असून, ऐतिहासिक कालापासून आजपर्यंत मोठें व्यापारी शहर आहे. कुलाबा जिल्ह्याच्या दक्षिणार्धात याच्याइतकें मोठें संपन्न शहर दुसरे नाहीं. बाणकोट बंदरापासून महाडपर्यंत मोठमोठी जहाजें खाडींतून येऊं शकतात. महाड हें बंदर असून घाटीगाड्याची उतार पेठ आहे. मुंबई व कलिकोट येथील गलबतें महाड बंदरात येऊं शकतात. तसेंच पारघाटाने, वरध्याघाटानें घाटीगाड्या महाडच्या तळावर बिनबरसातीच्या दिवसात येऊं शकतात. मोसमांत महाड बंदरांत १०।१५ गलबतें व तळावर २००।३०० गाड्या व्यापारा-

च्या निमित्तानें आलेल्या असतात. महाडची मुख्य बाजार पेठ १॥ मैल लांबीची असून रचनेच्या दृष्टीनें फार नमुनेदार आहे. भात दळण्याच्या येथें ७ गिरण्या असून तांदूळ करण्याचें फार मोठें काम येथें होतें.

महाड बंदरांतून तांदूळ, नागली, वरी, भात, हिरडे, सागवान, लांकडी कोळसा, कडवे इ. इ. माल मुंबई व कालिकोट बंदरीं जातो.

कापड, साखर, चहा, स्टेशनरी, माल, राकेल, लोखंडी सामान, इ. इ. माल मुंबईहून महाडास येतो.

पुणें, भोर, वांई, कऱ्हाड, सातारा, फलटण येथून गहू, हरभरा, तुरी मुईमुग, हळद, तंबाखू, जोंधळा, बाजरी, तेल, मिरची, बटाटे, कांदे, लसूण इ. इ. माल महाडच्या तळावर विक्रीस येतो. महाडची एकंदर वार्षिक व्यापारी उलाढाल एक कोट रुपयाची आहे.

महाड म्युनिसिपालिटी संपन्न असून शहराची व्यवस्था ठीक आहे. महाड येथें पाहाण्यासारखीं ठिकाणें—वीरेश्वराचें मंदीर, मैकावतीचें जुनें मंदीर, बंदरावरील—महायुद्धात मरण पावलेल्या शिपायाच्या स्मारकाप्रीत्यर्थ उभारलेला—दगडी स्तंभ हीं स्थळे विशेष आहेत.

९. महाड ते रायगडः—महाडाहून रायगडचा पायथा सुमारे १२ मैल लांब आहे. महाडाहून सायंकाळीं ७ वाजता बैलगाडीनें निघावें नें नातें या गावावरून कोंझरास व तेथून पाचाडास जावें. ५-६ वर्षांपूर्वी नात्या-पर्यंत फक्त चांगला रस्ता होता. पण अलिकडे कुलाबा डि. लो. बोर्डानें पाचाडपर्यंत सडक बांधली आहे. म्हणून तेथपर्यंत बैलगाड्या जाऊं शक-तात. लवकरच मोटारीनें पाचाडपर्यंत जाता येण्यासारखा रस्ता होईल. हल्लींही मोटार जाऊं शकते.

पाचाड येथें पूर्वी मोठी पेठ होती. गडावरील सर्व सामानाचा पुरवठा पाचाडहून होत असे. महाराजाची आई जिजाबाई याचा वाडा व त्याच्या नांवाची विहीर तेथें आहे. ती विहीर अद्यापपर्यंत पडकी होती. परंतु १९२६ सालीं इंदूरच्या महाराजांनीं ५००० रुपये तिच्या जिर्णोद्धाराकरतां दिल्या-मुळें हल्लीं तिचें बांधकाम पुरे झालें आहे. मातुश्री जिजाबाईच्या वाड्याच्या पडक्या भिंती येथें अद्याप दिसतात. वाडी गावच्या देशमुखाच्या घराण्यात

एक महत्त्वाची ऐतिहासिक वस्तु आहे. ती म्हणजे शिवाजी महाराज आपले गुरु रामदास यांच्या ज्या पादुकाची पूजा करीत त्या पादुका त्यांचे घरीं आहेत.

१०. माणगाव ते रायगड:—माणगाव हा गाव धरमतर—महाड रस्त्यावर असून महाडच्या उत्तरेस १७ मैलावर आहे. हें तालुक्याचें ठिकाण आहे. माणगाव येथून सकाळीं ६ वाजतां बैलगाडीने अगर पायाने निघून पळसगावाहून घरोशी येथे जावे. घरोशी या गावी पाण्याचे दुर्भिक्ष आहे. तेथें दुपारचें जेवण करावे. तेथून ऊन कमी झाल्यावर सुमारे ३ वाजता निघावें. निघताना बरोबर पाण्याचा तांब्या भरून घ्यावा. कारण रस्ता चढणीचा असून वाटेंत कोठेंही पाणी नाही. पहिला चढाव चढल्यावर दोन रस्ते लागतात. एक आडवा, डोंगर पठारावरून व दुसरा पठारावरून खालीं खोऱ्यात व तेथून पुन्हा डोंगराच्या चढावाने वर जाऊन रायगडच्या पायथ्याशी पाचाडच्या वाडीवर पहिला रस्ता जास्त लांब पण बिनचढणीचा. दुसरा लांब कमी पण चढउताराचा. दोन्ही रस्त्यांनी मनुष्य रायगडच्या पायथ्याशी असणाऱ्या पाचाड गावी जातो. पाचाडाहून रायगडचा चढाव सुरू होतो. पाचाडापासून २ फर्लांगावर एक खिंड आहे. त्या खिंडींतून पलीकडे जाऊन मग किल्याच्या उत्तरेकडून वर चढण्याचा रस्ता आहे. हल्ली रायगडावर जाण्यास खिंडीच्या उजव्या बाजूला किल्याच्या पश्चिमेस असलेल्या 'खुबलढा' बुरुजावरून रस्ता नेला आहे. या रस्त्यानें अंतर थोडेसे कमी होते. हाच रस्ता हल्ली दुरुस्त राखला आहे.

११. निजामपूर ते रायगड:—कोस्ते—निजामपूराहून बोरवाडीस जावें. बोरवाडी गावाच्या पूर्वेस मानगड नावाचा किल्ला इतिहासप्रसिद्ध असून रायगडच्या घेऱ्यातील तो टेहळ्या किल्ला आहे. तेथून समोर तळगड दिसतो. मानगड किल्ल्यात वझाई नावाची प्रसिद्ध देवी आहे. नवरात्रात देवीचा उत्साह होतो त्या देवीस सरकारातून नक्त नेमणूक आहे. बोरवाडीहून चनाट व तेथून जोर या गावी जावें जोराहून पुनाड, म्हसेमाळ, या गावावरून सोनारवाडीस जावें. सोनारवाडी ही रायगडच्या उत्तर पायथ्याशीं आहे.

तो रस्ता पाचाडाहून जाणाऱ्या रस्त्याला नाना दरवाज्याच्या अलीकडे मिळतो. निजामपुराहून रायगड सुमारें १४ मैल लांब आहे.

१२. बिरवाडी ते रायगडः–१ बिरवाडीहून बैलगाडीनें अमशेत, दहिवड, वाळण, मागरुण, वारंगी या गांवांवरून छत्री–निजामपूर, तेथून पाचाडच्या वाडीपर्यंत जावें. हा रस्ता लो. बोर्डाचा असून असावा तितका व्यवस्थित नाहीं, व चढउताराचा आहे. २ बिरवाडीहून मांगरुण, वाघोलीपर्यंत गाडीरस्ता आहे. तेथपर्यंत जावें. व पुढें धनगर वाडींत जावें. तेथून गडग्यांत जावें (पाचाड गावची वाडी).

बिरवाडीहून रायगडास जातांना वाळणजवळ गुयरी म्हणून एक इतिहासप्रसिद्ध डोंगर आहे. हा डोंगर रायगडच्या दक्षिणेस आहे. त्या डोंगरावरून पाण्याचा एक मोठा झोत (धबधबा) पावसाळयात पडतो. हल्लीं धनगर लोकांचे वाडे त्या डोंगराच्या पश्चिमेस आहेत. रायगडावर जाण्याकरितां गुयरीच्या उत्तर बाजूस दगडांनीं बांधलेली एक कमान व कांहीं ठिकाणीं दगडी पायऱ्या आहेत. त्या पायऱ्यांनीं वाघोलींत उतरतां येतें. ह्या गुयरी डोंगराचा उत्तरेच्या बाजूला जो फांटा जातो त्याला पोटल्याचा डोंगर म्हणतात. व तेथून शके १७४० (सन १८१८) मध्यें ज्या काळकाईवरून रायगडवर तोफा डागण्यात आल्या तें ठिकाण हेंच होय. या पोटल्याच्या डोंगरावरील काळकाई ह्या टोंकावर तोफांचे गाडे ठेवून रायगडावर मारागिरी इंग्रजांनीं चालविली होती, परंतु तोफेचा गोळा दारूकोठींत पडेना. तेव्हां रायनाक महार फितूर होऊन त्यानें सांगितलें कीं तोफांच्या गाड्यांच्या चाकाखाली दोन दोन शिवगाई ढबू घाला म्हणजे गोळा नेमका दारूखान्यांत पडेल. त्याप्रमाणें करितांच गोळा दारूच्या कोठींत पडून भडका झाला. ह्या कामगिरीबद्दल त्या महाराला गुयरी डोंगरावरून कडेलोटाचें बक्षीस इंग्रजांनीं दिलें अशी दंतकथा आहे.

१३ रायगडावर येणाऱ्या प्रवाशांस सूचनाः---

१ रायगड पाहण्यास येणारांनीं नाताळच्या सुटीपासून (डिसेंबर अखेर) ते मेच्या सुटी अखेर पर्यंतच्या मुदतींत केव्हांही यावें. दिपवाळीच्या सुटींत येऊं नये. कारण ते दिवस कापणीच्या हंगामाचे असल्यामुळें मजूर मिळत

नाहीं. रस्त्यावर गवत फार वाढलेलें असतें. त्यामुळें चालण्यास फार त्रास पडतो.

२ माणगांव व महाड या तालुक्यातील लोकांखेरीज इतर ठिकाणच्या व विशेषत: परजिल्ह्याच्या लोकांनीं रायगडावर जाण्यासाठीं महाडासच यावें. तेथें सर्व प्रकारची सोय उत्तम होऊं शकते. बिरवाडी, माणगांव, निजामपूर (कोस्ते) ह्या ठिकाणी ओळख असेल किंवा तेथील कोणी मित्र बरोबर येण्यासारखा असेल तरच तेथें जावें.

३ पाचाड येथें श्रीपत भागोजी शेडगा या नावाचा मराठा इसम आहे. त्याचें लहानसें दुकान असून प्रवाशाला लागणारा माल त्याचेकडे मिळतो. या इसमाचा वाटाड्या म्हणूनही उपयोग होतो. प्रवाशानीं या शेडग्याला बरोबर घेऊन गडावर जावें. म्हणजे कसलीही अडचण पडणार नाहीं.

रायगडच्या आसपास

१४. रायगडच्या आसपास जे डोंगरी किल्ले व इतर ऐतिहासिक व विशेष दृश्यें आहेत त्यांचें वर्णन देतों.

बिरवाडीचे १ उत्तरेस ९।१० मैलावर दापोर्ला खेड्याचे खालचे बाजूस एका दरीत १०० यार्ड लांब व ३० यार्ड रुंद असा डोह आहे. त्याला वाळणकोंडी असें म्हणतात. हा काळनदीतील एक डोह आहे. याच्या दोन्ही बाजूच्या दगडी (कातळ) दरा* (कांठ) खूप उंच असून खालीं खोल व भयाण वाटतें. या कोंडींत मोठमोठे मासे असून ते विविध रंगाचे आहेत. तांदूळ, चणे, कुरमुरे, वगैरे पदार्थ टाकिले असता माशांचे एकापेक्षा एक मोठे असे थवेच्या थवे वर येतात. या ठिकाणची एक दंतकथा आहे ती अशी:—ह्या कोंडींवर आसरा म्हणून कोणी देवता आहेत. ज्या कोणास लग्नकारणासाठीं किंवा मैन्याच्या तळासाठीं जें सामान लागेल तें त्यानें येथें येऊन आदले दिवशीं प्रार्थनापूर्वक मागितलें असता मिळत असे. कार्य होताच पुन्हा तें कुंडांत बुडवावें लागत

*ह्या दरा इतक्या ताशीव व गुळगुळीत आहेत कीं कोणी आंत पडल्यास त्याला वरून दोर सोडल्याशिवाय वर निघतां यावयाचें नाहीं.

असे. पण कोणी एकानें तेथून आणलेलीं माडीं नशीच दडपलीं तेव्हां-पासून वस्तु निधेनाश झाल्या.

१५. छत्री निजामपूरः—कोंडीपासून सुमारें तीन मैलावर पन्हे (एक गाव) येथें एका माळावर पुष्कळशा झाडाची गर्द छाया असून त्या खालीं पन्हेकर नावाचें जुने देवालय आहे. अशा आंबराया ह्या भागांत पुष्कळ ठिकाणीं आहेत. राजाच्या भोयाना ३।३ कोसावर विसावा घेता यावा म्हणून मुद्दाम लाविल्या असाव्या. बिरवाडीची बाग, अकल्याची बाग, पुणेंकराच्या परिचयाची शिवापूरची बाग ह्या आज अस्तित्वात असून आज देखील प्रवाशाना शीतल छाया देत आहेत.

या पन्हे गावच्या बागेपासून ४ मैलावर छत्री निजामपूर हें गाव आहे. ह्या गांवाला छत्री निजामपूर नांव पडण्याचें कारण असें सागतात की, शिवाजी महाराज रायगडच्या तटाची पाहणी करीत टकमक टोकावर आले होते. एका नोकराने महाराजावर छत्री धरली होती. इतक्यात मोसाट्याचा वारा आल्यामुळें तो नोकर छत्रीसह उडाला तो एकदम खाली जाऊं लागला. त्यानें छत्रीचा दाडा घट्ट हातात धरल्यामुळे तो सुरक्षितपणें खालच्या निजामपूर गावी उतरला. तेव्हापासून त्याला छत्री निजामपूर म्हणून संबोधण्यात येऊ लागलें.

१६. शिवतर घळः—वरंध्याहून पारमाची गाव ३ मैल तेथून पूर्वेस ३ मैल कसबे शिवतर गाव लागते. शिवतराच्या आग्नेयेस २ फर्लांगावर डोंगराच्या पायथ्याशींच दरडींत ही शिवतर घळ लागते. हल्लीं ह्या घळींत डोंगरांतील कपारी व माती पडून बरीच अव्यवस्था+ झाली आहे. मनुष्याला आत उभ्याने जाता येत नाही, वाकून जावे लागतें. ही घळ लेण्याप्रमाणें खडकात खोदली असून आत अनेक खोल्या आहेत. एकंदर घळीची लांबी १२५ फूट व रुंदी ७५ फूट आहे. हल्लीं त्या खोल्या नादुरुस्त व

+१९३० च्या जानेवारी महिन्यांत हीं शिवतर घळ उकरून साफ करण्यांत आली. तेव्हां २५०।३०० माणसें बसण्याजोगी जागा झाली आहे. पूर्वीची घाण वगैरे नाहींशी होऊन आतां या पुण्य क्षेत्रास बरीच स्वच्छता आली आहे. ज्यानें हें कार्य केलें त्याची रामदासभक्ति वाखाणण्याजोगी आहे.

अंधःकारमय आहेत. घळईत शेजारी पाण्याचा लहानसा झोत पडतो. घळईच्या शेजारीं 'खुस्याचा विरा' नावाचा ओढा आहे. घळईच्या डोंगरमाथ्यावर तीन पाण्याचीं टाकी असून उन्हाळ्यातही त्यात पाणी असते. सर्वांत मोठ्या टाक्याची खोली १५ फूट असून तें कातळात कोंडीसारखें झालें आहे. पावसाळ्यात पाण्याचा झोत घळईच्या शेजारीं पडत असतो. हल्लीं जितकी घळ आहे त्यापेक्षा पूर्वी बरीच मोठी असावी. कारण घळईच्या पुढे डोंगराचे सुमारें ५०×५० हात आकाराचे ४।५ दगड पडले आहेत. ते त्या घळईचेच पुढचे भाग असले पाहिजेत. हल्लींच्या घळईचे तीन भाग दिसतात. प्रत्येक भागाची लांबी सुमारें ४० फूट व रुंदी १५ फूट असावी. आत सर्वत्र वाघळाच्या लेंड्यांची घाण पसरली आहे. शेजारील सृष्टिसौंदर्य मात्र फारच बहारीचें आहे. वरून पडणारा पाण्याचा झोत हजारी कारंजासारखा तुषारमय पडतो. त्याशीत व तुषारमय झोताखालीं उभें राहून त्या समर्थतीर्थाचें अवगाहन करताना मनात अत्यंत पवित्र भावना उत्पन्न होते. घळईपासून वाघजई नावाचे ठिकाण दिसतें. वरंध्या घाटाचा माथाही दिसतो. घळईच्या डोंगराच्या माथ्यावर चंद्रराव मोऱ्याच्या वाड्याचे जुने चौथरे आहेत. घळईच्या ईशान्येस चेराव नावाच्या गांवाशेजारीं हें ठिकाण आहे. वाडे २ असून भोवतीं दगडी कुसू आहे. जोतें घडीव चिऱ्याचें असून पूर्वाभिमुख आहेत. प्रत्येक जोत्याची लांबी ६५ फूट व रुंदी ३० फूट आहे. जवळ पाण्याचें सुंदर टाकें आहे. चंद्रराव मोऱ्याच्या वाड्यापासून कसबे येथील शंकराच्या देवळापर्यंत भुयार होतें असें म्हणतात. हल्लीं देवळासमोर एक चौथरा आहे. तो भुयारचें तोंड म्हणून दाखवितात. चंद्रराव मोऱ्याच्या जावळीपासून या ठिकाणापर्यंत डोंगराच्या पठारानें एक पायवाट आहे. चंद्रगवाचा अमल या प्रांती असतांना हे वाडे बांधले असावेत. वाड्याची रचना पाहता ते वाले किल्ल्यासारखे भासतात. हा डोंगर उंच व चढावास अवघड आहे.

१७. शिवतर घळीची ऐतिहासिक माहिती.

श्रीसमर्थ रामदास स्वामींनीं ज्या सुंदरमठांत बसून ग्रंथराज दासबोध रचिला तें हें ठिकाण !

सुंदर मूर्ति सुंदर गुण । सुंदर कीर्ति सुंदर लक्षण
सुंदर मठीं देव आपण । वास केला ॥
गिरिकंदरीं सुंदरवन । सुंदर वाहाती जीवन
त्यामधें सुंदर भुवन । रघुनाथाचें ॥

समर्थ स्फुट प्रकरण.

समर्थें सुंदरमठी गणपती केला । दोनी पुरुष सिंदूरवर्ण अर्चिला
सकळ प्रांतासी मोहछह दाविला । भाद्रपद मास पर्यंत ॥

स. प्र. स. ८ वा.

बावीं पोखरणी झरे । टाकीं विशाळ सुंदरें
कडेकपाटें दुर्कुटें । पाहो जाता भयचि वाटे ॥

असल्या ह्या कडेकपाटात समर्थांनीं एकांतवास पत्करून दासबोधासारखा ग्रंथ रचिला.

समर्थ रामदासस्वामी शिवतरी असता त्याच्या भेटीसाठी शिवाजी महाराज आले. परंतु वाटेतील नद्याना महापूर आल्यामुळें त्यास शिवतरी जाता आलें नाहीं म्हणून ते बिरवाडीस राहिले. रात्रौ दर्शनोत्सुक शिवाजी महाराजांच्या पलंगाशीं समर्थ येऊन त्यांनीं त्याना दर्शन व आशिर्वाद दिला अशी एक दंतकथा आहे !

दत्ताजी त्रिमल यानें दिवाकर गोसाव्यास लिहिलेलें पत्रः—

" राजश्री छत्रपती यजमान कर्नाटकांतून स्वारी करून श्री रामदास स्वामींच्या दर्शनास सज्जनगडासी आले. ते समई श्रीस प्रार्थनायुक्त विनंति केली कीं, श्रीनी पूर्वी बिरवाडीचे मुक्कामीं श्री शिवथर प्राती असता मधें महानदी महापूर आणि अकस्मात+ रात्रीं पलंगापासी येऊन चमत्काररूपें दर्शन दिल्हें कितीके चित्तीं होतें तेचि आशिर्वाद दिल्हे. दुसरे दिवशीं सिवथर प्रांतीं सुदरमठी भेटी जाली. "

+समर्थ प्रताप:- शिवराज शिवतरीं चमत्कार देखिले । करतळ स्फोटक स्मरणें तात्काळ शमले । स्वप्नीं समर्थ.प्रसाद देऊनि गेले । महानदी उतरूनिया ॥ स. ३. ६५

शिवाजी महाराजाना राज्याभिषेक झाल्यावर देखील रामदास शिवथर घळींत होते. याबद्दल ऐतिहासिक आधार आहेत.

शके १५९८ भाद्रपद वा ८ (ले. १३)
शिवथर तर्फे रामनगरपेठ बसवावयाची आज्ञा केली.

शके १५९८ (ले. १५।१६) रामदास गोसावी शिवतरीं राहती असें शिवछत्रपती म्हणतात.

शके १५९९ भाद्रपद वा २ ले. १७।१८ या दोन लेखांत समर्थ शिवतरीं असता शिवछत्रपती त्याचे भेटीस गेले होते.

शके १५९८ श्री समर्थांनीं छत्रपतींना शिवतरास १८ शस्त्रें समर्पिलीं व समर्थांच्या इच्छेनें राजे यास कित्येक आशिर्वचनें प्राप्त झालीं.

१८. पाल्याचीं लेणीं:— हीं लेणीं गाधारी नदीच्या पश्चिम बाजूच्या टेकडीवर पालेगावच्या नजीक आहेत. या लेण्याचें तीन मजले आहेत. तिन्ही मजले मिळून ४७ खोल्या आहेत. पाण्याचीं ७ टाकीं असून प्रत्येकात पाणी आहे. मुख्य सभामंडपाच्या लेण्यांत मोठा स्तूप आहे. त्याच्यावर एकंदर ६ मूर्ती आहेत. त्या छिन्नभिन्न झाल्यामुळें नीटशा ओळखतां येत नाहींत. इतर खोल्यात स्तूप असून त्यावर पाली भाषेंत कांहीं लेख कोरले आहेत. सभामंडपाचा दिवाणखाना सुमारें ५०० मनुष्यें बसूं शकतील इतका मोठा असून त्याचें कोरींव काम उत्तम प्रकारचें आहे.

कांगोरी किल्ला.

१९. हा किल्ला रायगडच्या घेऱ्यात येतो. शिवाजी महाराजानी तळें, घोसाळगड हे किल्ले घेतले त्याच सुमारास म्हणजे शके १५७८ नंतर हा किल्ला घेतला असावा. या किल्यावरून रायगड, प्रतापगड, राजगड, तोरणा, हे किल्ले स्पष्ट दिसतात. शके १७४० सालीं रायगडला इंग्लिशांनीं वेढा दिला त्यावेळी कर्नल प्रॉथरच्या सैन्यावर छापे घालण्यासाठी या किल्यावरून सैन्याची तुकडी रवाना झाली होती. तिची व ले. क्रॉसबी याच्या सैन्याची पोलादपुराजवळ गाठ पडून क्रॉसबीच्या सैन्यानें या तुकडीचा पराभव केला. पुढें रायगड पडल्यावर हा किल्ला पुढील उन्हाळ्यांत इंग्र-

जाचे ताब्यात गेला. या किल्याचा शिवाजी महाराजाना पार घाटानें संरक्षणाचे कामीं फार उपयोग होत असे. हा किल्ला चढण्यास फारच बिकट आहे. पायथ्यापासून सुमारें २ मैलावर दिंडीदरवाजा आहे. हा दरवाजा हल्लीं पार कोसळून गेला आहे. दरवाजातून आंत गेल्यावर पूर्वेकडे सुमारें ७०।७५ कदमावर काल–भैरवाचे देवालय आहे. देवळाच्या भिंती पार पडल्या आहेत. या देवळाच्या पाठीमागे शंकराच्या दोन पिंडी आहेत, व काल-भैरवाच्या भंगलेल्या ४।५ मूर्ति आहेत. देवालयाला १५ पायऱ्या आहेत. तेराव्या पायरीवर डाव्या हाताला एक दीप-माळ आहे. देवळासमोर दोन टाकीं आहेत. ती कोरडी आहेत. पुढे १०० कदमावर पूर्वेकडील बुरुज आहे. यावरून प्रतापगड महाबळेश्वर व ब्रम्हारण्याचा डोंगर हीं स्पष्ट दिसतात. या बुरूजावरून एक पलीकडे पठार दिसतें. या ठिकाणीं शंकराचें स्वयंभू देवस्थान आहे. या पठारास ‘ महादेवाचा मुरा ’ असे म्हणतात. काल-भैरवाच्या देवळाच्या पश्चिमेकडे बालेकिल्ला आहे. त्यावर ७।८ घरटे व दोठ पडक्या इमारती आहेत. बालेकिल्यात ७।८ जिवंत पाण्याचीं टाकीं आहेत.

कांगोरी किल्ल्यावर पेशवाईच्या अखेरच्या कालात खालील किल्लेदार होते, असें बिरवाडी येथील रा. रा. वि. त्र्यं. पटवर्धन याचेकडील जुन्या कागदपत्रावरून दिसतें. त्याचेकडे कौलनामे, येजित खतें, निवाडापत्रे सापडलीं आहेत.

शके १७१० मार्गशीर्ष वा १३ चे येजित खतात कांगोरीचा उल्लेख किल्ले मंगळगड असा केला आहे.

शके १७३५ कौलनामा यात मंगळगडचा किल्लेदार रूपराम चौधरी हा होता असें लिहिलेलें आढळते.

शके १७२९ कौलनामा यांत “ राजश्री बाळकृष्ण येशवत सुभेदार तो मंगळगड ” असा उल्लेख आहे.

पुण्याहून रायगडास येण्याचे जुने मार्ग

२०. पुणें, खडकवासले, खामगाव, पाल्याचा घाट, येल्याची पेठ,

बोचेघोळी, रायगड तेथून महाड, मानगड, तळगड, घोसाळगड, गोबेलें (तर्फ गोरेगाव) श्रीवर्धन बाणकोट. [राजवाडे प्रस्तावना]

रायगडाहून पुण्यास

रायगडावरून दहिवड (वाकी) तेथून मढ्या घाटानें अन्नछत्र ६ मैल आहे. त्या गावचें नावच अन्नछत्र. येथे जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशास जेवण मिळतें. हें अन्नछत्र पतसचीव (भोर) याच्या देणगींतून चालतें. प्रस्तुतचा मार्ग पेशवाईत कोंकणची भिक्षुक मडळी पुण्यास दक्षिणेसाठीं जात त्यावेळीं फार प्रसिद्ध होता. ह्या भिक्षुकास वाटेत जेवण मिळावें म्हणून ही सोय मुद्दाम केली होती. अन्नछत्राहून १३ मैलावर वेल्याची पेठ येथें जवळच प्रचडगड किल्ला आहे. पुढे पाब्याघाट चढून गेल्यावर खानापूर लागतें. खानापुराहून डोणजे, खडकवासले व मग पुणें. बिरवाडी येथे प्रस्तुत लेखक ज्या गोखले याच्या घरात राहतो त्या घरी दक्षिणेच्या ब्राम्हणाना जेवण मिळत असें.

रायगडाहून पुणें— रायगडाहून शिवतर गावी तेथून गोप्याघाटानें निरा नदी ओलाडून तिच्या काठानें शिवापूर व तेथून पुणें.



प्रकरण १० वें.

रायगडचें आजचें दर्शन

मागील एका प्रकरणात आम्ही रायगडच्या पायथ्याशी म्हणजे पाचाडपर्यंत येण्याचे मार्ग दिले आहेत. पाचाड पासून पुढे जाण्याचा मार्ग व रायगडावरील स्थलवर्णन प्रस्तुत प्रकरणात देण्याचा विचार आहे.

प्रथम हे सागितले पाहिजे की, सन १९२५ सालापासून रायगड रस्ता दुरुस्त करण्याकडे कुलाबा जिल्हा बोर्डाचे लक्ष गेल्यापासून रस्त्याची बरीच दुरुस्ती झाली आहे; व महाड तालुका बोर्डाचे सभासद, नाते येथील श्रीमान गृहस्थ श्री. शकरभाई घर्या याच्या प्रयत्नाने व माहितीने रस्ता पुष्कळ ठिकाणी नवीन व सोइस्कर असा करण्यात आला आहे. १० वर्षामागे रस्त्याचे जे स्वरूप होते ते आता बरेच बदलले असून रस्ता पुष्कळ चागला झाला आहे. ह्यापेक्षाही जास्त चागला रस्ता करण्याची बोर्डाची इच्छा आहे. पण ही गोष्ट जनतेच्या व सरकारच्या मदतीवर अवलबून आहे. असो.

पाचाडहून निघाले की, प्रथम जिजाबाईची विहीर लागते. ही विहीर पायऱ्याची असून हिचे १० महिने पाणी टिकते. ही नुकतीच दुरुस्त केली आहे. विहिरीपासून पुढे थोड्या अतरावर शिवाजीमहाराजाचा बाग लागतो. हल्ली येथे मुरट जगल वाढले आहे. पुढे दगडी पायऱ्याचा रस्ता आहे. या रस्त्याने खिंडीपर्यंत गेल्यावर उजवे बाजूस किल्ल्याचे वायव्य बाजूस "खुबलढा" बुरूज आहे. हा बुरूज मुख्य डोगरापासून अलग आहे. तेथे एक खिंड आहे. खिंडीचे उत्तरेस मोठी दरी आहे. पूर्वीचा रस्ता ही खिंड ओलाडून पलीकडून दरीतून गेला आहे. परतु हल्ली खुबलढा बुरूजावरून रस्ता नेला आहे. हा थेट महादरवाजापर्यंत हिरकणी

बुरूज ज्या टोंकावर बांधिला आहे त्याच्या पायथ्याला वळसा घालून जातो. आणि जेथे हा पायथा चढण्यास सुरवात होते त्या ठिकाणीच उजव्या अंगच्या दरींतून वाघोलींकडून एक रस्ता येऊन मिळतो. वाडीकडून येणाऱ्या रस्त्यानें गड चढूं लागल्यास प्रथम नाना दरवाजा लागतो.

२. नाना दरवाजा: —कोणी म्हणतात नाना फडणीसानी हा दरवाजा दुरुस्त केला म्हणून याला नाना दरवाजा असें म्हणतात. पण हा निव्वळ तर्क आहे. नाना हे लहाना याचे अपभ्रष्ट रूप असावे. एक मोठा दरवाजा व हा "लहान दरवाजा" लहाना–लाना–नाना अशीं रूपें बदललीं असलीं पाहिजेत. हा दरवाजा अगदी मोडकळीस आला आहे. सोळा सतरा पायऱ्या चढून दोन्ही कमानींतून जावें लागते. कमानींची उंची १५ फूट व दरवाजाची रुंदी १० फूट आहे. दरवाजा गोमुखीच्या आकाराचा असून दोन्ही बाजूस २० फूट उंचीचे दोन बुरूज आहेत. बुरुजावर बसण्याजोगे कट्टे असून मारगिरी करण्यासाठी माऱ्याचे झरोके राखून ठेविले आहेत. पाहारेकऱ्याना बसण्यासाठी खडकात कट्टे किंवा ओसऱ्या खोदल्या आहेत. या दरवाजापासून ३/४ मैल रस्ता बहुतेक सपाटीचा आहे. पुढें दोन मोडलेल्या इमारतींचे अवशेष आहेत. एकीची लांबी रुंदी ३९×२५॥ आहे. व दुसरीची ७५×२० आहे. ही धान्याची कोठारें (अंबरखाने) असावीं. नाना दरवाजापासून हे ठिकाण ३०० फूट उंच आहे. येथेंच मदनशहाचें थडगें आहे, व 'मसजिद तोफखाना' आहे. ले. रेमनने १८१८ सालीं रायगडावरील या तोफखान्याचा "मसजिद" तोफखाना असा उल्लेख केला आहे. येथुन ४०० यार्डावर खडकात कोरलेल्या तीन खोल्या दिसतात त्यांची लांबी रुंदी अनुक्रमे २०×८; १८×८; ३३×८ अशी आहे. पैकी तिसरीस दोन आंगचेच दगडी खांब आहेत. या घोड्याच्या पागा असाव्या. खोल्यांची उंची सुमारें ८ ते १० फूट आहे. थोड्या अंतरावर खडकात खोदलेल्या पायऱ्या लागतात. येथे रस्ता फारच बिकट आहे. परंतु आता येथें लोखंडी कठडा घालून चांगला बंदोबस्त केला आहे. येथून वर बघितलें तर महादरवाजा अगदी आपल्या डोक्यावर दिसतो. येथून ४०० फूट उंचीवर तो असून चढाव अगदी खडा आहे. हिरकणी

टोकाचें वायव्येस जें वाकण आहे त्या वाकणात महादरवाजा येतो.

३. महादरवाजाः--दरवाज्यात जाण्यास ३२ बांधीव चांगल्या पायऱ्या आहेत. दरवाजापुढील तटाचें बांधकाम खूप मजबूत असून गोमुखीच्या आकाराचें आहे. असें असण्याचें कारण शत्रूनें महादरवाजावर हल्ला केल्यास त्याच्या तोफाचे गोळे दरवाजास न लागतां समोरच्या बुरुजावर आदळावे दरवाजा लगतच्या तटाची उंची ७५ व ६५ फूट आहे. दरवाज्यापुढील मार्गाची रुंदी प्रथम ८ फूट, गोमुखीच्या वाकणात १६ फूट व दरवाज्यापाशी ८ फूट अशी आहे. दरवाज्यापुढील भव्य बुरुजांना माऱ्याचे झरोके असून तटाच्या आड शिबंदीला लपून बसण्यास कट्टे केले आहेत. दरवाजाची एक फळी उभी आहे व दुसरी फळी मोडून पडली आहे. दरवाजाची अर्गला किंवा अडसर एका मोठ्या वहाला येवढा जाड आहे. दरवाजा औदुंबराच्या लाकडाचा असून त्याला लोखंडी लंगरी खिळे ठोकलेले आहेत. दरवाज्याच्या आतल्या बाजूस दोन्ही बाजूला पहारेकऱ्यासाठी देवड्या आहेत. हीच किल्ल्यावर जाण्याची मुख्य वाट. दुसरी एक चोरवाट दक्षिण बाजूस आहे. पण ती बंद पडली आहे. महादरवाज्यापासून हिरकणी टोक ४०० फूट उंचीवर आहे. व बालेकिल्ला ६०० फूट उंच राहातो. दरवाजातून आंत गेल्यावर पश्चिमेस हिरकणी टोक व वायव्येस टकमक टोंक आहे.

मोठ्या दरवाजाने आत जाऊन सुमारें पाऊण मैल चढाव गेल्यानंतर डाव्या बाजूला एका थडग्यासमोर एक लोखंडी खांब पुरलेला आहे तो 'मलखांब' असावा असें म्हणतात. पण ते खरे दिसत नाहीं, त्याला वर कडी आहे. त्यावरून तो झेंडा वगैरे उभारण्याच्या काठीचा आधारस्तंभ असावा असें वाटतें. उजव्या बाजूला एक तलाव लागतो. त्याची लांबी रुंदी १२×७५ आहे. या तलावापासून ३०० फूटावर दक्षिणेस प्रख्यात गंगासागर तलाव लागतो.

४. गंगासागर तलावः--हा तलाव सुमारें ३७५ फूट लांब व ३०० फूट रुंद असून खडक खोदून तयार केला आहे. उत्तरेस व पश्चिमेस चिरेबंदी बांधकाम केलें आहे. सुमारें ७।८ वर्षांपूर्वी गंगासागराचे पश्चिमेच्या बाजूचें

बांधकाम तळाशीं फुटल्यामुळें चैत्र वैशाखात पाणी संपून जाई. परंतु अलीकडे त्याची दुरुस्ती केल्यामुळें नेहमी पाणी भरपूर असते. बालेकिल्यांतील राजघराण्याला व इतर लोकाना पाण्याचा मुख्य पुरवठा याच तळ्यापासून होई. गंगासागराचे पाणी स्वच्छ व चवदार असल्यामुळें त्या पाण्याचा प्रवाशानी पिण्याकडे व स्वयंपाकाकडे बिनदिक्कत उपयोग करावा. गंगासागरावर उभे राहिलें असता विशेष शोभा दिसते. दक्षिण बाजूला बाले किल्याचा उंच प्रचंड तट त्याच्या लगत तळयाच्या त्याच कडेवर दोन मनोरे. समोर पूर्वेस उंच दरड. त्या पलीकडे ईशान्येस देवळाचा घरटा थोड्या अतरावर आहे. त्यात अष्टभूजा देवीची मूर्ति आहे तीच शिरकाई देवी होय. हें ठिकाण हल्लीच्या धर्मशाळेच्या पूर्वेस येते. पश्चिमेस खोल दरी व उत्तरेस निवडुंगाचे रान. गंगासागराच्या उत्तरेस लोकलबोर्डाची धर्मशाळा आहे. धर्मशाळेचा रखवालदार एक पगारी नोकर आहे. प्रवाशाने त्याचेपासून किल्ली घेऊन धर्मशाळेंत उतरावे. धर्मशाळेंत प्रवाशाची सर्व सोय होईल अशी व्यवस्था केली आहे. आणखी काही उणीवा आहेत पण द्रव्याभावी त्या दूर करिता येत नाहींत असें बोर्डाचें म्हणणें आहे. जनतेने या कार्यास जास्त मदत केल्यास प्रवाशाची सर्वप्रकारे उत्तम सोय होईल.

५ **मनोरे**:—गंगासागरापासून जवळच ४० फूट उंचीचे दोन मनोरे आज दिसते असे आहेत. तिसरा एक मनोरा राजवाड्याशेजारी पश्चिम अंगास असावा असें त्याच्या अवशिष्ट भागावरून वाटतें. हे दोन मनोरे पूर्वी पाच पाच मजली होते असें सागतात. हल्ली फक्त दोनच मजले आहेत. मनोऱ्यास बारा पैलू किंवा बाजवा आहेत. प्रत्येक बाजूस एक एक निमुळती खिडकी असून तिच्यावर नकामकाम केलें आहे. मनोऱ्याच्या गर्भाचा व्यास तळात १४ फूट आहे. धर्मशाळा नव्हती तेव्हा प्रवासी येथेंच जेवण करीत. रायगड ही राजधानी असता मनोऱ्याचें स्वरूप काय असेल बरें! स्वराज्य मस्थापनेच्या प्रयत्नानें श्रांत झालेले शिवाजीमहाराज जेव्हा विश्रांतीसाठी येथें बसत तेव्हा गंगासागरावरून आलेल्या थंड वायुलहरींनीं त्याचे सर्व श्रम हरण होत असतील! आज हे मनोरे पाकोळ्यांचें आश्रयस्थान बनलें आहेत.

बालेकिल्लाः—मनोऱ्यांच्या पश्चिमेस ३२ पायऱ्यांचा एक प्रशस्त दगडी जिना आहे. त्याच्या बाजूचे धक्के अद्याप पुष्कळ चांगल्या स्थितींत आहेत. या पायऱ्यांनीं वर चढलें कीं, बालेकिल्ल्यांत प्रवेश होतो. बालेकिल्ल्याची पूर्वपश्चिम लांबी ९०० फूट, व दक्षिणोत्तर रुंदी ४५० फूट आहे. बालेकिल्ल्यांत शिरतांना जो दगडी कमानींचा दरवाजा लागतो त्याला 'पालखी दरवाजा' म्हणतात. बालेकिल्ल्यांत पश्चिमेस अनेक मोडक्या इमारतींचे अवशेष आहेत. पालखी दरवाजापासून उत्तर दक्षिण जो रस्ता जातो. त्याच्या पश्चिमेस सात मोडक्या इमारतींचीं भिंताडें उभीं आहेत. भिंती विटांच्या असून त्या सलग आहेत. हे राण्यांचे महाल असावे असें वाटतें. रस्त्याच्या पूर्वेस अनेक मोडक्या इमारती व जमिनींत बांधलेलीं कोठारें असून रस्त्याच्या दक्षिण टोंकाशीं एक दरवाजा व पायऱ्या आहेत. त्या उतरून पुढें गेलें कीं थोडी सपाटी आहे. हीच राण्यांची हवा खाण्याची जागा होय. पालखी दरवाजापासून एक रस्ता पूर्वेकडे जातो. त्या रस्त्यानें गेलें म्हणजे राजसभा किंवा दरबारची जागा लागते.

६ **राजसभाः**—हिंदवी स्वराज्याचें सिंहासन ज्या स्थानीं विधिपूर्वक झालें तेंच हें महान् पवित्र पुण्यस्थान! मागें प्रकरण ३ मध्यें राज्याभिषेक महोत्सवाचें जें वर्णन केलें आहे तो सर्व विधि याच ठिकाणीं घडून आला. येथेंच सुवर्णपुष्पांचा वर्षाव शिवप्रभूंवर झाला! आणि आतां.... ... ... ! सारांश—

सा रम्या नगरी महान् स नृपतिः सामन्तचक्रंच तत्।
पार्श्वे तस्यच सा विदग्ध परिषत् ताश्चंद्रबिंबाननः।
उन्मत्तः सच राजपुत्रनिवहस्ते बंदिवानस्ताः कथः।
सर्वे यस्य वशादगात् स्मृतिपथं कालाय तस्मै नमः॥

हें कविवचन सार्थ मानून कालाच्या कठोर करणिस नमस्कार करावा झालें! राजसभेच्या भोंवतालच्या भिंती मात्र शिल्लक आहेत. या जागेची लांबी १२० फूट व ५० फूट आहे. पटांगणाच्या पश्चिमेस उंच चौथरा आहे ती जागा अद्याप पवित्र पादत्राणें घालून येथून कोणीं जात नाहीं.

सिंहासनाचे दोन्ही बाजूस असलेल्या इमारतींत पेशव्यांचे काळीं



गंगासागर तलाव व मनोरे.

असें लिहिलें आहे तींच हीं कोठारें. या काळकाई टोकालाच पोटल्याचा डोंगर असें म्हणतात.

१२. भवानीटोंकः– जगदीश्वराचें देवळाच्या थेट पूर्वेस पुष्कळ ओसाड जागा आहे. किल्यावरील शिबंदी या भागांत राहत होती. राज्याभिषेकाचें वेळीं आलेल्या इंग्रज वकीलास इकडेच उतरण्यास जागा दिली होती. या पुढील टोंक तेंच भवानी कडा होय. याच टोकावर अगदीं अवघड जागीं भवानींचें देऊळ आहे. वाट इतकी अवघड आहे कीं, सामान्य प्रवासी तेथें जाऊं शकत नाहीं. देवीचा भोपी मुद्धा दर मंगळवारीं पूजा करण्यास जातो. कडयाच्या अगदीं टोकावरून उभी उतरंडीची वाट आहे. शिवाजी महाराजांनीं आपल्या वरदायिनी कुलदेवतेचें बांधिलेलें देऊळ तें हेंच होय.

१३. टकमकटोंकः–कडेलोटाची शिक्षा केलेले अपराधी या टोकावरून लोटून देत. ही शिक्षा होतांना लोक टकमक बघत राहत यावरून या टोका-हें नांव पडलें असावें, हा कडा अगदीं लंब रेषेंत तुटला आहे. बाजार पेठेंतून थेट उत्तरेकडे गेलें असता या टोकावर प्रवासी पोहोंचूं शकतो.

हिरकणीटोंकः–राजवाडयाचे पश्चिमेस ३ टप्पे उतरून गेल्यावर हें टोंक लागतें. दुसरा टप्पा उतरण्यास त्रासाचा असल्यामुळें कातळ खोदून २७ पायऱ्या केल्या आहेत. या ठिकाणीं राण्यांचें हवा खाण्याचें ठिकाण म्हणून जें सांगितलें आहे, तेथून थेट पश्चिमेस जाणाऱ्या रस्त्यानें येणें सोपे. तिसऱ्या टप्प्यावर म्हणजे हिरकणी टोंकाच्या कडेवर उभें राहिलें असता खालीं खूपलढा बुरूज दिसतो. हिरकणी हें नाव पडण्याचें कारण असें सांगतात कीं, खाल-च्या वाडीवरील एक गवळण कोजागिरी पौर्णिमेस दूध घेऊन गडावर आली होती. तिला किल्ल्याचे दरवाजे रात्रीं बंद झाल्यामुळें खालीं येतां येईना. तिचें तान्हें मूल घरीं होतें. त्याला पाजण्याची तिला अत्यंत उत्कंठा लागली. पण किल्याचा दरवाजा उघडणें अशक्य म्हणून तिनें या टोकाव-रून खालीं उडी घातली. आश्चर्य हें कीं इतक्या उचीवरून उडी टाकून ती सुखरूप खालीं उतरली. तिचें नांव हिरकणी होतें. हिरकणीचें हें अजब कृत्य महाराजांच्या कानावर गेल्यावर त्यांनीं या ठिकाणीं बुरुज बांधून त्याला ' हिरकणी बुरुज हें नांव दिलें.

१४. किल्ल्यावर तोफा बऱ्याच आहेत. चौदा पंधरा सहज दिसतात. धर्मशाळेजवळील एकीवर ४।१।१९१६ असें खोदलें आहे. हिच्या कान्यात खिळा मारला आहे. बाकीच्या तोफावर अक्षरें वगैरे कांहीं नाहींत. त्याच्या कान्यात खिळे मारलेले नाहींत.

अंधारकोठड्याः—राजवाड्याचे दक्षिणेस, व राण्यांच्या महालाच्या पूर्वेस तीन कोठड्या आहेत. पैकीं दोहोंची खोली सुमारें २५।३० हात आहे. तिसरी ओहरल्यामुळें दहा बारा हात खोल आहे.

प्रकरण ११ वें

उपसंहार

छत्रपती शिवाजी महाराजाच्या नव्या व बहुमान्य जन्मतिथीप्रमाणें येत्या फाल्गुन व॥ ३ शके १८५१ ला त्रिशत सांवत्सरिक महोत्सव महाराष्ट्रभर मोठ्या प्रमाणावर साजरा होणार आहे. त्यावेळीं महोत्सव रूपी भावनोत्कट पण तात्कालिक गुणसंकीर्तनाबरोबरच वाङ्मयस्वरूपीं विचारप्रवर्तक व चिरकालिक व्हावें, असे अनेक शिवभक्तांनीं ठरविलें. शिवजन्माला ३०० वर्षें पूर्ण झालीं; तरी देखील संपूर्ण साधार व सत्य शिवचरित्र निर्माणकरण्याइतका आत्मविश्वास इतिहासज्ञांस आला नाहीं, असें म्हटले असता फारसें चुकणार नाहीं. परंतु महाराष्ट्राच्या इतिहाससंशोधनाच्या कार्याची झपाट्यानें प्रगति होत असुन शिव–चरित्राच्या साधनसामग्रीची भरपूर जुळवाजुळव झाली आहे. त्याचें दृश्य फल म्हणजेच त्रिशत सांवत्सरिक उत्सवप्रसंगीं प्रसिद्ध होणारा हा ग्रंथ होय. भावी शिवचारित्र ग्रंथाचा हा पाया होय! या सत्य व साधार पायावर उभारलेलें शिवचरित्र तरुणाच्या मनांत नव्या आकांक्षा उत्पन्न करील! महाराष्ट्रीयांचीं मनें आजच शिवभक्तीनें भरून गेलीं आहेत. "शिवाजी आमुचा राणा। भवानी आमुची माता" ही नव्या कविशाहिराची ललकारणी साऱ्या मराठ्याच्या हृदयांत घुमून राहिली आहे. शिवाजीच्या नांवानें मोहित झालेले आजचे मराठे देखील सारे भेदभाव विसरून एकमुखानें त्या "शिवनामाचा" जयजयकार करीत आहेत.

२. अशा वेळीं महाराष्ट्रापुढें शिवाजी महाराजासंबंधी जितक्या गोष्टी मांडल्या जातील तितक्या पाहिजेच्च आहेत. प्रस्तुत ग्रंथ याच दृष्टीनें लिहिला आहे. हें वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. त्रिशतसावत्सरिक महोत्सव प्रसंगीं व्हावयाच्या वाङ्मयपूजेंतील हें एक लहानसें तुलसीपत्र आहे ! हें तुलसीदल अत्यंत भक्तिभावानें " रायगडावरील शिव–समाधीला " गरिबाचें पूजासर्वस्व म्हणून अर्पण असो ! त्या प्रसंगी शिव–चरणावर समर्पण केल्या जाणाऱ्या कमालखानी व गेंदबाज हारतुऱ्याच्या मानानें हें तुलसीपत्र म्हणजे कोण्या झाडाचा पाला ! पण भक्तिभावाला भुकेलेला शिव–प्रभु ही माझी सेवा गोड करून घेवो व वाचकवृंदाच्या मनात ह्या ग्रथाबद्दल असेंच प्रेम उत्पन्न करो अशी त्यांच्याच चरणीं विनंति करून उपसंहाराच्या उपसंहाराकडे वळतो !

३ प्रस्तुत पुस्तकाचे दोन भाग पडतात. हे वाचकाना दिसून आलेंच असेल. एक ऐतिहासिक व दुसरा स्थलवर्णनात्मक ! पहिल्या प्रकरणात महाराष्ट्रातील किल्ल्यासंबंधानें भौगोलिक दृष्ट्या विचार केला असून, मराठी राज्याचें किल्ले हेच प्राण कसे हे थोडक्यात दाखविलें आहे. प्रस्तुत ग्रंथारंभी हा विषय घेण्याचें कारण वर्ण्य विषय जो " राजधानी रायगड " तो एक किल्ला असून इतर सर्व ठिकाणापेक्षां राजधानी करण्यास शिवाजी महाराजास तोच जास्त योग्य वाटला; तेव्हां तत्काळीं किल्ल्याचें वैशिष्ट्य तरी काय होतें हें वाचकाच्या लक्षात यावें हें होय. कै. दे. भ. शि. म. पराजपे यानीं देखील " मराठ्याच्या लढाया " या पुस्तकात ' मराठी किल्ले ' या नावाचा लेख लिहून मराठेशाहीच्या अंतकाळीं देखील हे किल्ले कसे उपयोगी पडले हें दाखविलें आहे.

रायगडचे आजचें दर्शन हें प्रकरण वाचकास पाचाडपासून जणू काय हातांशीं धरून रायगडावरील आजचे प्रत्येक दृश्य दाखवील. वाचक हें पुस्तक घेऊन रायगडावर कोणच्याही मदतीशिवाय तो संपूर्ण गड पाहूं शकेल. आजपर्यंत पुष्कळ प्रवाशाना वाटाड्ये न मिळाल्यामुळें रायगडावर गेल्यावर कोठें काय आहे, व कशाला काय म्हणतात, हें समजण्याची

मोठी पंचाईत पडे; ती अडचण सर्वस्वी दूर करण्याचा प्रयत्न आहे किंवा नाहीं हें वाचकांनीं स्वानुभवानेंच ठरवावें.

बृहन्महाराष्ट्रांतील कोणत्याही ठिकाणापासून रायगडावर येण्याचे सविस्तर मार्ग दिले आहेत. त्यामुळें कोणाही प्रवाशाला रायगडचा मार्ग शोधण्याची खटपट उरली नाहीं. रायगडच्या आसपास कांहीं ऐतिहासिक महत्त्वाचीं स्थळें आहेत. ज्या कोणा हौशी प्रवाशाला निवांतपणा असेल त्याला रायगडाभोंवतीं असलेल्या मनोहर दृश्याचा आस्वाद घेण्यास या पुस्तकाचा उपयोग होईल.

शिव—कालापासून रायगडचा जितका इतिहास आज उपलब्ध आहे, तितका सर्व देण्याचा प्रयत्न केला आहे. * वास्तविक रायगडच्या आसपास असलेल्या खेड्यात हिंडून रायगडविषयक कांहीं नवीन संशोधन करून हा इतिहास लिहिला असता तर पाहिजे होता. पण दोन दृष्टींनीं हे शक्य जाहले नाहीं.

एक पुस्तक लिहिण्याचा संकल्प आचरणांत आल्यापासून अवधि थोडा राहिला. स्वतःच्या पोटाचा व्यवसाय व पुस्तकाच्या लिखाणाचा व्यवसाय यापुढे संशोधनास स्वास्थ्यच मिळेना. दुसरें, दोन तीनदां संशोधनाचा प्रयत्न केला. त्यात असें आढळलें कीं लोकांचा विश्वास बसून कागदपत्र हातीं येण्याला कै. राजवाड्यासारखा सर्वसंगपरित्यागी संशोधकच हवा; किंवा एखाद्या संस्थेचा तरी पाठिंबा हवा. अर्थात् ह्या दोन्ही गोष्टी नसल्यामुळें संशोधन शक्य झालें नाहीं. सुदैवानें पुस्तकाची द्वितीयावृत्ती काढण्याचा सुयोग आला, तर ही उणीव भरून काढण्याच्या तजविजींत आहे.

शिवपूर्वकालीन रायगडचा इतिहास फारसा उपलब्ध नाहीं हें स्पष्ट दाखविण्याकरतांच जणूं काय " शिवपूर्वकालिन इतिहास " हें प्रकरण

---

* शिवराज्यारोहण प्रसंगाचे शब्दचित्र मुद्दाम सविस्तर दिलें आहे. बारीक सारीक समारंभाचीं वर्तमानपत्रीं भडक वर्णनें वाचणाऱ्या वाचकांस स्वराज्यकालीन अत्यंत महत्त्वाच्या मोठ्यांत मोठ्या महोत्सवाचें सत्य वर्णन गोड वाटेल यांत नवल काय ?

दिलें आहे अशी टीका कोणा टीकाकारानें केल्यास ती मान्य केल्यावांचून गत्यंतर नाहीं. कारण शिवपूर्वकालीन रायगडची माहिती मला कोठेंच आढळली नाहीं. कोणा वाचकास आढळल्यास त्यानें मला कळवावी, मी तिचा आभार स्वीकार करीन. असो. या प्रमाणें प्रस्तुत ग्रंथाच्या विषयाचा थोडक्यांत आढावा आहे.

४. शेवटीं ज्या प्रभुकृपेनें ही वेडीवांकडी सेवा करण्याचें सामर्थ्य दिलें, ज्या रायगडाच्या नित्य दर्शनानें माझी स्फूर्ति सतत टिकविली व ज्या रायगडच्या राजराजेश्वराची अल्पशी वाङ्मयपूजा करण्याचें भाग्य लाभलें, त्या प्रभूला, रायगडाला व राजराजेश्वर शिव-नृपाला अभिवादन करून हें पुस्तक संपवितों.

समाप्त.

परिशिष्ट.

दिलचंगा.

१. [रायगडावरील गंगासागर तलावाविषयींची आख्यायिका.]

श्री० भालचंद्र कवि [महाड] यांनीं केलेली; त्यांच्याच परवानगीनें प्रसिद्ध करीत आहों.

शिवराया अभिषेक कराया । विष्णूपद रावाते याया ॥
सर्व सिद्धता महाराष्ट्र करी । गंगेच्या कावडी झडकरी ॥
आणाया काढिले निवडुनी । श्रेष्ठ ब्राह्मण! तोंच येऊनी ॥
जरी एक आरडला नंगा । दिल्चंगा–कठवठमें गंगा ॥ १ ॥
टकमक बघती सर्व त्याकडे । म्हणती वदतो माचें कोडें ॥
गंगेच्या कावडी झडकरी । आणाया पाहिजेत द्विजकरिं ॥
म्हणशी बाबा तूं काय परी? । गंगा येती रे काय घरीं? ॥
जटी परी आरडला नंगा । दिल्चंगा कठवठमें गंगा ॥ २ ॥
आरडुनी हें दंड करींचा । रोवी भूमीं रुद्रचि साचा ॥
भासे! भार जटेचा विखरे । नेत्रीं दावाग्नीच त्या स्फुरे ॥
टकमक बघती भयाभीत तें । वदती शब्द न कुणी एक ते ॥
जटी परी आरडला नंगा । दिल्चंगा–कठवठमें गंगा ॥ ३ ॥
आरडतां हें दंड करींचा । काढी भूमीं! गंगा वेगें ॥
उडी घेतसे त्याच्या संगें । धो–धो वाहे प्रवाह साचा ॥
टकमक बघती सर्व तदातें । वदती गंगा कैशी येथें? ॥
जटी परी आरडला नंगा । दिल्चंगा कठवठमें गंगा! ॥ ४ ॥
आरडुनी हें क्षणांत झाला । दृष्टीला पारखा! विराला ॥
वातावरणीं कीं तेजीं तों । टकमक बघती–वदती ' हा, तों ॥
सांबचि! शिवरायास्तव आणी । पाताळांतुनि गंगापाणी ॥
वाणी सांग करी तो नंगा । दिल्चंगा कठवठमें गंगा ॥ ५ ॥

सहस्रकर लागुनी झडकरी । ' गंगासागर ' निर्माण करी ॥
शिवराया अभिषेक होतसे । विष्णूपद रायास येतसे ॥
शिवराया दिलचंगा ! गंगा । कठवठमें कांये ना सांगा ? ॥
कारण वाणी साच अभंगा । दिलचंगा कठवठमें गंगा ॥ ६ ॥
हीन दीन जी जनता-गाई । तिच्या रक्षणीं निजबल वही ॥
स्वार्थाचा होम जयें केला । भीतीला लावी भ्यायाला ॥
ऐसा शिवराया दिलचंगा । कठवठमें का ये ना गंगा ? ॥
कारण वाणी सच्चिद्रंगा । दिलचंगा कठवठमें गंगा ॥ ७ ॥

अनुचर.

२. [श्री शिवाजी महाराजाबरोबर त्याचा आवडता कुत्रा चितेंत उडी घेऊन मेला. ह्या आख्यायिकेवर श्री. भालचंद्र कवि [महाड] यांनीं केलेलें काव्य, त्यांच्या परवानगीनें देत आहे.]

शिवराजे निजधामा गेले । भग्न हृदय जन अवघे झाले ।
राष्ट्र अश्रुनीं साचें न्हालें । परी एकला अश्रु न ढाळित ।
बावरूनी बघतो । कुत्रा त्यांचा तो ॥ १ ॥
धाय मोकलित रथारूढ तें । पुण्य श्लोकाचें शव करितां ॥
हंबरडा फोडी ती जनता । परी एकला दुःख न करितां ॥
रथीं उडी घेतो । कुत्रा त्यांचा तो ॥ २ ॥
विशालाकृती, भिसाळ ढवळा । श्वानकेसरि नरकेसरिचा ॥
ऐसा जो जगताला गमला । साचा अनुचर छत्रपतीचा ॥
सवे रथीं चढतो । कुत्रा त्यांचा तो ॥ ३ ॥
स्वारी शेवटली हाले ती । भगवा झेंडा हत्ती पुढती ।
सहस्र हय गज त्या मागूती । 'धडड' सलामी भांडी देतीं ।
परी उगी बघतो । कुत्रा एकचि तो ॥ ४ ॥
स्वारी शेवटली येतां ती । श्री जगदीश्वर देवा पुढतीं ॥

धाय मोकलित रथा खालतीं । शिवरायाचें शव तें घेती ।
उडी खालिं घेतो । कुत्रा त्यांचा तो ॥ ५ ॥
शय्या शेवटली ती होतां । चंदन काष्ठाची ती वरती ॥
हंबरडा फोडित जनता ती । शव ठेउनि त्या अग्नी देतां ॥
आत उडी घेतो । कुत्रा त्याचा तो ॥ ६ ॥
शिवराजे निजधामा गेले । राष्ट्र अश्रुंनीं साचें न्हालें ॥
भग्न हृदय जन अवघे झाले । परी एकटा एकनिष्ठ तो ॥
त्यांच्या सह जातो । कुत्रा त्याचा तो ॥ ७ ॥
त्यांच्यासह जाउनिया होई । समाधिस्थ त्यांच्या जवळी ही ॥
त्यांच्यासह पूज्यपदा घेई । एकनिष्ठता गुणेंचि ऐसा ॥
श्रेष्ठपदीं वसतो । कुत्रा केवळ तो ॥ ८ ॥

हिरकणी.

३ [रायगडावरील 'हिरकणी' टोंकाविषयींची आख्यायिका. श्री. भालचंद्र कवि [महाड] यांनी केलेली व बडोद्याच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रसिकवर्य तात्यासाहेब केळकर यांनी नावाजलेली कविता येथें देत आहे.]

आश्विनमासीं पौर्णिमादिशीं या कोजागरिशी ।
द्वाही ऐसी शिवरायाची फिरली मुलखाशी ।
खंडोगणती दूध पातलें रायगडावरती ।
लाखोगणती गवळी गवळिणी घेऊनियां जमती ।
त्यात चमकती पहा 'हिरकणी, हिरकणीच साची ।
नाजुक साजुक केवळ पुतळी पिवळी सोन्याची ।
पोरवयाची परि आवरती ती संसाराची ।
प्यारी येसाजीची–भारी तालेवाराची ।
" बची ती नवलास गर्डीची पाहियली नाहीं ।
पाहुनि येत्यें, तान्हुकलें तें उठलें जंव नाहीं " ।

लाड कोड पुरविता धनी तो " जा ये बघ गमती ।
दूध घालवुनि फिर माघारी गवळ्या सांगाती " ।
धाई येई उभी गडावर पांचाडोहुनि ती ।
दोन विसानी दोन दुधाच्या चरव्या सागाती ।
गडीं दुधाचे समुद्र पडले त्यांतचि दोन विसा ।
दोन दुधाच्या चरव्या पडतां पडला दिवस कसा ? ।
रात्र पातली नगारखाना—नौबत झडली ती ।
ऐकत गुंगत गवळ्यासंगत रमली त्यांतचि ती ।
रात्र पातली पुनवेचा तो चांद उडी घेई ।
दूध चांदणें पडे, त्यांतची बुडे तिचें मन ही ।
रात्र पातली ! सनइ चौघडे सुटले गडभर ते ।
ऐकत नादावत त्यातचि हो वेडें पाडस तें ।
रात्र पातली बत्ति पेटली नवलाखावरती ।
पाहत पाहत चमकत चाले चांदणि त्यांतचि ती ।
बत्ती ती पाजळे मनोऱ्या वरति महालाच्या ।
जळीं तळीं भडकलीच दिसली गंगासागरिच्या ।
बत्ती ती जगदीश—देऊळीं दीपस्तंभाची ।
जिव्हा जी मोजिता होत हो मूकस्तंभाची ।
बत्ती वरती ! बत्ती खालति ! बत्ती चौफेरी ।
बत्ती ती नवलाख पेटली ह्या परि गडाभरी ।
नटली नगरी शिवरायाची इंद्रपुरीच जशी ।
बघतां गुंगे गवळ्यासंगे हिरकणि ती न कशी ।
तोफ उडे तों धडड गडींची पहिल्या प्रहराची ।
साडेसात घडी रात्रीची—दिंडी बंदीची ।
धडंड ऐकतां दचके चमके हिरकणि नागिणिशी ।
जीव उडे तो ! ऊर धडाडे ! आतां गत कैशी ? ।
उडे गडांतुनि धावत, दिंडीकडेस यायाला ।
घडे पाहतां नको तेंच ! तों धीर तिचा तुटला ।

दिंडी ती मृत्युची उघडणें सोपें हो साच ।
ब्रह्माचा लेखही लिहविणें पुनरपि तैसाच ।
परी गडावरि शिवरायाच्या दिंडी उघडविता ।
इह लोकीं ना उद्या तयातें भुवनत्रय मिळता ।
पाहुनि दिंडी काळ कठोरा बंद अशी हाय ।
तान्हुकल्याची पान्ह्याविण गति आता हो काय ? ।
तान्हुकल्यारे ! करीत वेगें धरणीवर पडली ।
तान्हुकल्यारे करीत तीची शुद्ध बुद्ध गेली ।
दोन विसार्नी दोन धावते गवळी पाठिवरी ।
दिंडीशीं येऊनी पाहती घनीण धरणिवरी ।
पाणी ! पाणी ! करीत कोणी पाणी तें आणी ।
डोईवर शिंपडता होई सावध तोंच क्षणीं ।
तान्हुकल्यारे ! करीत सुटली तीरा सारी ती ।
तान्हुकल्यारे ! करीत ये पश्चिमटोका वरती ।
काळखाइसें काळकाइचे खोरें त्या खालीं ।
वरी उभी ती काटावरती हिरकणी हो झाली ।
किर्र दरींतुनि रात किड्याची घू घू घुबडाची ।
साद येत त्या ‘ तान्हुकल्यारे ! ’ पडसादचि सार्चा ।
‘ तान्हुकल्यारे ! ’ करीत फुटला पान्हा तिजलार्गी ।
पान्हा दे बळ तान्हाजीचे त्या अबले अंगीं ।
‘ तान्हुकल्यारे येत्ये आता ! ताड माड पाहीं ।
पहाड सारी दूर तुला तरि आता गत नाहीं ।
अबेनें घडविला साच हा तासुनिया हातीं ।
तरी तुला ती माझ्यापासुनि दूर न हो करती ।
तान्हुकल्यारे ! ’ करीत टेकी हात कड्या वरती ।
दूध चादणें भरे हरी ती तींताचि उतरे ती ।
दोन विसानी दोन पातले गवळी तों तेथ ।
‘ अबां ! ’ करुनि बसती मटकन मर्द तिशीं बघत ।

दूध चांदणें भरे दरी ती; तींताचि झळके ती।
बघतां बघता धनीण हिरकणी दर्यांतिल मोती।
इकडे पाचाडीं येसाजी होई साच पिसा।
हिरकणी येना म्हणुनी जैसा जळावीण मासा।
तोफ उडे तों धडड गडींची पहिल्या प्रहराची।
जीव उडे तों येसाजीचा; झोंपहि तान्ह्याची।
शंभ्यानें साधिला कायरे दावा! मुलखाचा।
दुस्मान उभा! कुलाशिलाचा आया बहिणींचा।
ठेवी डोळा तिच्यावरी तो फार दिवस पाही।
लेक पोळ हा सुटला, करितो राजा तरि कायी?
बघ गे आतां बये तान्हुलें! घेउनि मी येतों।
तीशी दिंडी फोडुन! बघतों काय बाप करितो।
सडा उडाला आवळुनी जरि फेटा डोईशी।
फडा ठाकली मेढ उपटली ती हिसक्यासरशी।
टाकी ती खाद्यावर हा की भीमसेन दुसरा।
गदा टाकुनी स्कंधीं धावे शत्रूसंहारा।
चोरटाग त्या आंब्यापाशीं एकदमी येई।
तोंच झळकली तळी पहाडा हिरकणि ती पाही।
धनी देखता अंगावरती उडी तया घेई।
मेढ टाकुनी हातीं तीशीं झेली तो घाई।
खाद्यावरती टाकी, ठोका धूम घरा येई।
'तान्हुकल्यारे' करता हातीं तान्हुकलें देई।
दुज्या दिशीं ती वार्ता सरशी जाता रायाशीं।
पाचारी तो झणी हिरकणीशी–येसाजीशी।
प्रभू प्रजेचा सिंधू साक्षात् तो वात्सल्याचा।
चोळी पातळ गांव देऊनी गौरव करि साचा।

परिशिष्ट (ब)

कुलाबा जिल्हा बोर्डानें रायगडासंबंधी केलेली तजवीज.

महाड तालुका बोर्डाचा ठराव नं २५/१२/३३ चा खालीं लिहिल्याप्रमाणें–

“ मे. केशव अंताजी हर्डीकर यानीं, रायगडावर तलावाची व रस्त्याची बोर्डाकडून जरूर ती दुरुस्ती झाली आहे, परंतु तेथें धर्मशाळा असणें फार जरूर आहे, करितां सदर धर्मशाळेकरिता एस्टिमेट तयार करून डि. बोर्डाकडे पाठवांवें. ”

रायगडावरील धर्मशाळेचा खर्च सुमारें ९३००रुपये आहे.

रायगड फंड प्रचारक श्री. आठवले यांनी आजपर्यंत सुमारें ३२००० रुपये वर्गणी जमविली आहे.

रायगडावर धर्मशाळेकरिता १० गुंठे जागा देणेबद्दलचा सरकारी ठराव पुढील प्रमाणें आहे.

G. R. R. D. 2148124.
20-1-29

The grant to the District Local Board kolaba of land, measuring 10 gunthas free of revenue & occupancy price for the construction of a Dharmashala in the Rayagad fort, Taluka Mahad, is sanctioned subject to the conditions prescribed in No. 36 of the Land revenue rules and the following additional canditions that the building shall be errected according to the instructions given and on the site pointed out by the superintendent Archaelogical survey Westeru Circle.

[2] Government have no objection to allowing the Board to use loose stones and bricks lying about the fort for the construction of the building in accordance of the directions of the superintendent of Archaelogical survey Western Circle.

परिशिष्ट २ रें

रायगडावरील इंग्रज कैदी—शिवकाल

(शं. ना. जोशी)

श्रीशिवाजीराजाच्या सैन्याचा इंग्रज वखारवाल्यांशी प्रथम व प्रत्यक्ष संबंध असा श. १५८१ (इ. स. १६६० मार्च) मध्ये आला. दोन महिन्यापूर्वी म्ह. मार्गशीर्ष वद्यात (७ मी, ता. १०-११-१६५९) अफजलखानाचा वध झाल्यानंतर शिवाजीचे सैन्य अदिलशाही मुलखात उत्तर, दक्षिण व पूर्व ह्या तिन्ही दिशाकडील प्रांत हस्तगत करण्याकरता चाल करून गेले. कोकणातहि शिवसैन्याचा एक भाग दोरोजी नामक सेनापतीच्या आधिपत्याखाली गेला होता. अफजलवधानंतर खानाचें सामान घेऊन तीन गलबतें राजापुरास या वेळी नांगरून उभीं होतीं. अर्थात् हीं गलबतें ताब्यात घेण्यासाठीं दोरोजीने प्रयत्न चालविला. परंतु, राजापूरचा अदिलशाही सुभेदार जो अब्दुल करीम त्याच्या देण्याघेण्याच्या भानगडीमुळे इंग्रज व्यापारीहि हीच गलबतें आपल्या आधीन असण्याबद्दल खटपट करीत होते. अशा प्रकारे शिवाजीचे सैन्य व इंग्रज सौदागर ह्याचा एव्हा संबंध आला. ह्या बाबतींत इंग्रज व्यापाऱ्यांशीं दोरोजीचा खटका उडून दोरोजीनें राजापूर वखारीवरील इंग्रज व्यापारी जो गिफर्ड ह्यास व त्याबरोबर एक दलाल यास पकडून नेले (ता. २०-१-१६६०). विजापुरकरातर्फे ह्यावेळी राजापूर हे रुस्तुमजमाकडे होतें, आणि रुस्तुमाचा इंग्रजाप्रमाणें शिवाजीशींहि सलोखा होता; यामुळें गिफर्डच्या कैदेविषयीं रुस्तुमजमाकडे तक्रार येताच रुस्तुमाचा हा संबंध लक्षात आणून व गिफर्डने सुटका झाल्यावर शिवाजीस दंडाराजपूर घेण्यास सहाय्य करण्याचें पुनः कबूल केल्यामुळें गिफर्डची सुटका झाली. पण इंग्रजाच्या अतिलोभामुळें ह्या गिफर्डला इतर

इंग्रजासमवेत पुनः शिवाजीच्या कैदेंत पडावें लागलें; आणि ते इंग्रज कैदी रायगडावर ठेविले होते. तो प्रसंग असाः—

अफजलप्रसंगानंतर १५ दिवसांनीं शिवाजीराजानीं पन्हाळा किल्ला घेतला. पुढें श. १५८२ 'चैत्र शुद्ध प्रतिपदेस राजश्री शिवाजीराजे फिरोन' पनालि (या) स आले. मग सिदी जोहार येऊन पनालियास वेढा घातिला. सिद्दीला राजापूरच्या वखारवाल्या इंग्रजाकडून तोफेचे गोळे वगैरे सामान पुरविलें जात होतें. इंग्रज व शिवाजी यांचा स्नेही असलेल्या रुस्तुमजमानें ह्या इंग्रजी व्यापाऱ्यांना, तुम्ही ह्या वेळीं युद्धसामग्री पुरविण्यांत सामील होऊं नका, असें सांगितलें असतां, व विशेषतः तसा कंपनीचाहि स्पष्ट इशारा असता राजापूरच्या वखारवाल्यांनीं ते न ऐकता सामग्री पुरविली. रुस्तुमजमानें इतकेंहि सांगितलें कीं, तुमचा माल खपविणें एवढाच हेतु असला तर तो माल मजकडे द्या. पण ह्या सांगण्याकडेहि दुर्लक्ष करून इंग्रजानी शिवाजीच्या शत्रुपक्षाला गोळे पुरविले. पुढें पन्हाळाप्रकरण आटोपून शिवाजीनें जेव्हा *राजापूर घेतलें (श. १५८२ माघ) तेव्हा शिवाजीनें इंग्रजाच्या ह्या आगळिकीचें चांगलें उट्टें काढिलें. म्हणजे त्याची वखार लुटली, तेथील जमीन खणून संपत्ती नेली व फिलिफ गिफर्ड, हेन्री रेव्हिंगटन्, रँडाल्फ टेलर इत्यादि ७,८ इंग्रजाना कैद केलें.प्रथम ह्या कैद्याना वासोटा किल्यावर (ले.§८४८) कांहीं दिवस ठेविलें; तेथून त्याना सोनगड–कुलाबा (ले. ८५२) येथें नेलें; आणि तेथून रायगडावर ठेविलें; ते तेथे सुटेपर्यंत होते (ले. ८७४,९०७).

रायगडावर जाण्याच्या पूर्वी सोनगडावरून ह्या कैद्याच्या सुटकेविषयीं बरेच प्रयत्न झाले. 'आमची सुटका न होईल तर औरंगजेबाचें सैन्य सुरतेहून दख्खनमध्यें आणण्यास आम्ही मदत करूं' अशी धमकावणीहि कैद्याच्या मार्फत दिली गेली. नंतर एक हजार होन खंडणी देण्याचेंहि कबूल करण्यात आलें. पण सुटका होण्याचें चिन्ह दिसेना. रायगडावर गेल्यावर त्या कैदी मंडळींनीं प्रे. ॲन्ड्रूयूजला आपल्या सुटकेविषयीं खटपट करण्याबद्दल दोन

*चिटणीस व शिवदिग्विजय बखरींमध्यें राजापूर घेतल्याचा शक १५७० दिला आहे. ता बरोबर नाहीं. §हे लेख शिवकालीन-पत्र-सार संग्रह ह्या ग्रंथांतील आहेत

तीन पत्रें मोठ्या उत्सुकतेनें पण जरा रागानेंच लिहिलीं. कारण त्याचे उत्तरीं प्रे. लिहितात कीं, "आपल्याला कैद कां प्राप्त झाली हें तुम्ही चांगलें जाणता. कंपनीच्या मालाचें रक्षण केलें म्हणून ही कैद प्राप्त झाली नसून पन्हाळ्याच्या वेढ्यात जाऊन इंग्रजांचा बावटा फडकावून गोळे उडविल्याबद्दलचें हें प्रायश्चित आहे. शिवाजी नसता आणि दुसरा कोणी असता तरी ज्याला म्हणून असल्या अत्याचाराबद्दल सूड उगविण्याचें सामर्थ्य आहे तो तसाच वागला असता. व्यापाऱ्यांनीं दारुगोळ्यासारखा माल विकावयाचा नसतो किंवा शत्रुसैन्यावर उडवावयाचा नसतो. परदेशांत असे उपद्व्याप केल्यास मग त्याचें फळ भोगावे लागतें. तुमच्या कैदेचें हेंच खरें कारण आहे. रेव्हिंगटन्‌ला स्वतःला शिवाजीची, दारुगोळा न विकण्याबद्दलची आज्ञा माहीत होतीच." ह्यावरून ह्या कैदी मंडळींनी आपल्याबरोबर आपल्या वखारीवरहि जी आपत्ती ओढविली ती केवळ त्यांच्याच गुणानीं होय असें स्पष्ट होतें. ह्या कैद्यांचे तुरुंगातच वर्ष सवावर्षावर दिवस गेल्यानंतर सुरतेच्या इंग्रजांनीं ठरविलें कीं, शिवाजीचीं कांहीं गलबतें मक्केहून येणार आहेत तीं पकडूं आणि दख्खनी सापडेल त्यासहि मोकळें सोडणार नाहा. ह्या मार्गानें काय होतें तें पाहूं (ले. ८८८). पण ह्या मार्गापेक्षा राजापूरचा शिवाजीचा अंमलदार रावजी पंडित याचेंहि मन वळविण्याचा प्रयत्न करावा; विशेषतः शिवाजीचीं जी गलबतें मोठ्या किमतीचा माल भरून मक्केकडे जाणारीं आहेत तींच हल्ला करून धरावीं असें ठरविलें. शेवटीं इतक्या निकरावर ही गोष्ट येण्याच्या पूर्वीच ह्या रायगडावरील कैद्यांची सुटका झाली (इ. १६६३ जाने. १७). जवळ जवळ दोन वर्षे हे इंग्रज कैदेंत होते. पुढेंहि रायगड हा राजकीय कैदी ठेवण्याची जागा म्हणून उपयोगात आणिलेला दिसतोच. असो. अशा प्रकारें श. १५८२ अखेर ते १५८४ माघ व. ४ पर्यंत (इ. १६६१ ते १६६३ जाने. १७) हे राजापूर वखारीमधील इंग्रज कैदेंत होते आणि त्यापैकीं शेवटचें वर्ष हे कैदी रायगडावर होते.

परिशिष्ट ३ रें

रायगड-शकावली

(शं. ना. जोशी.)

११ वें शतक- रायगडावर यादव सत्ता. मराठे पाळेगारांचा ताबा.

१२ ,, यादव सत्ता.

१३ ,, विजयानगरकर माडलीक. पाळेगार (शिर्के ?)

१३५८ ,, हा अल्लाउद्दीन बहामनीच्या अधिपत्याखाली येतो.

१४०० सुभा रायरी निजामशाहीकडे येतो. येथील देशमुख शिर्के. त्यांचे ◇मुतालीक दलपतराव, पाताणे प्रभु

१५५८ ,, आदिलशाहीकडे येतो, चंद्रराव मोरे याचा ताबा.

१५७८ चैत्र व. ७ (६।४।१६५६) शिवाजी राजे रायरीस येतात.

,, वैशाख (एप्रील १६५६) रायरी गडावर शिवाजी राजाचा अंमल.

१५८३ फाल्गुन (इ. १६६२) } राजापुरचे वखारवाले रोव्हिंग्टन,
१५८४ माघ व. ८ (१९।१।१६६३) } गिफर्ड इत्यादि इंग्रज शिवाजीच्या अटकेंत.

१५९२ (इ० १६७०) शिवाजीची मुक्कामाची जागा.

१५९४ (इ० १६७२) रायगड दुरुस्ती.

१५९६ ज्येष्ठ शु. ४ (२९।५।१६७४) शिवाजीची मुंज.

,, ,, शु. ६ (३०।५।१६७४) शिवाजीचा सोयराबाईशी वैदिक मंत्राने विवाह.

,, ,, शु. १३ (६।६।१६७४) राज्याभिषेक समारंभ.

,, ,, वद्य ९ (१७।६।१६७४) माता जिजाबाईचा, पायथा पाचाड, येथे स्वर्गवास.

,, आश्विन शु. ५ (२४।९।१६७४) शिवाजीचें पुनः सिंहासनारोहण
१६०१ फाल्गुन व. २ (७।३।१६८०) राजारामाची मुंज
,, ,, वद्य १० (१५।३।१६८०) राजारामाचें प्रतापराव गुजराच्या कन्येशीं लग्न.
१६०२ चैत्र शु. १५ (३।४।१६८०) शनिवारीं दुपारीं शिवाजीचें स्वर्गारोहण.
,, वैशाख शु. ३ (२१।४।१६८०) राजारामाचें मंचकारोहण.
,, आषाढ शु. २ (१८।६।१६८०) संभाजी राजाचें पन्हाळ्याहून △ आगमन.
,, ,, शु. ११ (२७।६।१६८०) पुतळाबाई—शिवाजीपत्नी सती जाते.
,, श्रावण शु. ५ (२०।७।१६८०) संभाजी मंचकारोहण
,, आश्विन वद्य (१६८० आक्टो.) मोरोपंत पिंगळे प्रधान मृत्यु.
,, माघ शु. ७ (१६।१।१६८१) संभाजी सिंहासनाधिष्ठित होतो.
१६०५ पौष शु. १५ (२३।१२।१६८३) रायगडीं संभाजी मुक्काम.
१६१० कार्तिक (१६८८ आक्टो. नवं.) संभाजी रायगडाहून कविकलुशाच्या मदतीकरतां जातो.
१६११ चैत्र शु. १५ (२५।३।१६८९) झुल्पुकारखानाचा रायगडास वेढा.
,, चैत्र व १० (५।४।१६८९) राजाराम रायगडाहून पळून प्रतापगडास जातो.
,, मार्ग. शु. २ (३।११।१६८९) रायगड मोंगलास दिधला.
१६१४ ज्येष्ठ शु. ७ (१२।५।१६९२) रायगड हस्तगत करण्याबद्दल छ. राजारामाकडून उत्तेजन व मदत
शंकराजी नारायण रायगड घेतात
रायगड शिद्दी याकुतखानाकडे जातो.
१६५५ अ. आषाढ शु. ८ (८।६।१७३३) रायगड पंतप्रतिनिधी घेतात.

१६५५ कार्तीक (१७३३ आक्टो. नवं.) हबशियाचा रायगडास वेढा.
१६९४ (इ. १७७२) रायगडावरील किल्लेदाराचा दंगा
१६९५ (१७७३) ,, ,, ,, बंदोबस्त
१६९८ (इ. १७७६) सदाशिवराव भाऊंच्या तोतयाची रायगडकडे चाल.
१७०० जेष्ठ शु. १५ (१०।६।१७७८) शिद्दीकडील लोकाचा पुन्हा दंगा.
'' श्रावण शु. ३ (२६।७।१७७८) ,, ,, बंदोबस्त.
१७१२ जेष्ठ व. ३ (३१।५।१७९०) रायगडवर शिद्दी याजकडील कैदी.
१७२४ कार्तिक (१८०२ नवं.) दुसऱ्या बाजीरावाचे रायगडहून वसई-कडे प्रयाण.
१७३१ पौष व. १३ (२।२।१८१०) रायगड–माचीं येथें बाजीरावाचा मुक्काम.
१७३८ (इ. १८१६) रायगड इंग्रज कपनीच्या ताब्यात जातो व पर-तहि लगेच घेतला जातो.
१७४० चैत्र व. ५ (२५।४।१८१८) इंग्रज कपनीचा रायगडास वेढा व लढाई.
,, वैशाख शु. १ (६।५।१८१८) पर्यंत बाजीरावपत्नी किल्ला लढवितात. शेवटीं पराभव.
,, वैशाख शु. ५ (१०।५।१८१८) तह होऊन रायगड इंग्रजाकडे गेला.

इ. स. १८९५ रायगडी शिवोत्सव–लोकमान्य पुरस्कृत.
१८९६ ,, ,, फार मोठा
१९०० ,, ,, दुसरा उत्सव.
१९०६ ,, ,, तिसरा ,,
१९२६ ,, ,, चौथा ,,

परिशिष्ट क्र. ४

कांहीं खुलासा

(शं. ना. जोशी)

खालील मजकुरांत दुरुस्तीसह खुलासाहि असल्यामुळें स्वतंत्र परिशिष्टच करून तें जोडिलें आहे

पृ. ७ वर टीपेंत चिटणीस बखरीविषयीं, ती शाहुकालीन आहे, असें मोघम लिहिलें आहे. बखरींत प्रारंभीं 'शाहू नृप छत्रपती' असेंच आहे. परंतु राज्याभिषेक श. १३७ ज्येष्ठ बहुल ६ असा तेथें कालाचा निर्देश केला असल्यामुळें शाहू ह्या नांवाचा योग्य खुलासा करतां येतो. रा. श. १३७ श. १७३२ ज्येष्ठ व. ६ (ता. २२।६।१८१०) हा ह्या बखरीचा शक येतो. धाकटे शाहू राजे तर श १७३० वैशाख शु.९(ता.४–५–१८०८) स निवर्तले. अर्थात ते शाहू छ. एऽह्रा असणें शक्य नाहीं. ह्या वेळीं छ.प्रतापसिंह महाराज हे गादीवर होते. बखरींतील टिपा प्रकरणामध्यें इ. स. १८११ हें साल पडलें आहे त्याऐवजीं वर कंसांत दिलें तें वर्ष येतें. शाहू हें नाव बखरींत आलें आहे, त्याजविषयीं, बखर लिहिण्यास आज्ञा (धाकटा) शाहू छ. नीं केली असावी व म्हणून त्याचा नामनिर्देश आला असेल, असें कै. रा. ब. साने यानी सुचविलें आहे.

पृ. १६—शिवकालीन रायगड ह्या ३ ऱ्या प्रकरणांत प्रारंभींच 'शहाजी राजांनी विजापुराहून बाल शिवाजीस पुण्याकडे पाठविलें' असें लिहिलें गेलें, परंतु ह्याचीच दुरुस्ती, पुढें २० ध्या ओळींत 'बंगळुराहून शिवाजी महाराजांना पुणे प्रांताकडे रवाना केलें' असें लिहिण्यांत आल्यानें झाली आहे. शिवाजी महाराजांच्या पाहिल्या बारा वर्षापर्यंतच्या आयुष्यातील त्यांच्या मुक्कामाविषयीं अद्याप निश्चित अशी माहिती नाहीं. सध्या इतकें म्हणता येतें कीं, श. १५५१–१५५८ पर्यंत माता जिजाबाई व शिवाजी राजे याचें रहाणें शिवनेरी व माहुलीस होतें; आणि शहाजी राजांना बंगळूर

बक्षीस म्हणून मिळाल्यानंतर तेथें कांहीं दिवस शिवाजी रहात असे. तेथून म्हणजे बंगळूराहून शिवाजी पुण्यास जहागिरीची व्यवस्था पहाण्यास आला.

ह्याच परिच्छेदात 'निजामशाहींतून दुसऱ्यांदा निवृत्त झाल्यावर (शहाजी) राजाना सुमारें तीन वर्षे आपल्या पुणें जहागिरीवर रहावें लागलें' असें एक वाक्य आलें आहे. परंतु याविषयीं खुलासा असा:-हीं वर्षे म्ह. १५५८ ते ६१ च्या प्रारंभापर्यंत, शहाजी कर्नाटकातील संस्थानिकाच्या बंडाळीचा बंदोबस्त करण्याकरितां तिकडेच मोहिमेवर होता.

पृ. १७ वर दादोजी कोंडदेवाच्या मागें जहागिरीची वहिवाट विजापूर दरबाराकडून शिवाजीस मिळण्याबद्दल संशय दर्शविला आहे; तो बरोबर वाटत नाहीं. जहागिरीऐवजीं, दादोजीप्रमाणें कोंढाण्यावरील अधिकार व सुभेदारी त्या हक्काबद्दल हें विधान मानल्यास चालेल

पृ. २०—'अफजलखानानें जावळीहून चंद्ररावाची उठावणी करताच तो रायरीगडावर येऊन राहिला. त्याचवेळीं शिवाजी महाराज वांडेलांच्या मुटकेच्या खटपटींत होते' असें आलें आहे. अफजलखानानें जावळीवर स्वारी काढली होती हें खरें; पण त्यांत चद्रराव जावळीहून रायगडास गेला नाहीं. खानाच्या ह्या स्वारीचा काल श. १५७१ तील व चंद्रराव रायगडावर जातो श. १५७७–७८ मध्यें. रायगडावर चंद्रराव जाण्यास चंद्ररावावर शिवाजीची स्वारी हें कारण आहे; अफज०ची नव्हे. शिवाय, ह्यातील दोन्ही कालांचा शहाजीच्या मुटकेशीं जो संबंध 'त्याच वेळी' ह्या शब्दाने दाखविला आहे तो अर्थातच जमत नाहीं. कारण, शहाजीची सुटका श. १५७१ च्या ज्येष्ठी पौर्णिमेसच (पूर्णपणें नाहीं तरी) झाली आहे. पूर्ण सुटका पुढें चार वर्षांनी झाली असें मानिलें तरीहि तो काल जमत नाहीं. तेव्हा हें लिहिणें येथेंच दर्शविल्याप्रमाणें दुरुस्त मानावें व तसें मानण्याची सोय ग्रंथातही पृ. २३–२४ वरील मजकुरानें काहीशी झाली आहे.

पृ. २१—चंद्रराव व शिवाजी याचेमधील भांडणास ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या त्यांत, गुंजणमावळच्या देशमुखीवर चंद्रराव मोरे आपला हक्क सांगू लागले, ही एक गोष्ट आहे. असें असतां, ह्या देशमुखी-ऐवजी बिरवाडीची पाटिलकी असें १६–२२ मध्यें लिहिलें गेलें. बिरवाडी-

बद्दलचा उल्लेख ह्याच पृष्ठावर ओळ ८–६ मध्यें आला आहे, व तो बरोबर आहे.

पृ. २२––कोंढाणा किल्ला ताब्यातून गेल्यामुळें महाराजांनीं आपले प्रयत्न गेहिडखोरें व वेळवंडखोरे यात सुरू केले असे म्हटलें आहे. येथें विरोध असा येतो कीं, श. १५७१ मध्ये कोंढाणा किल्ला शिवाजीच्या हातातून गेला व वेळवंडखोऱ्यातील हालचाल आहे ती श. १५६७ मधील! तेव्हा ही हालचाल अशी जमेस धरण्याचे कारण नाही.

पृ. ५६–– शिवाजी महाराजाची तृतीय पत्नी हिचा मृत्यु श. १६०२ च्या आषाढात सहगमनविधीनें झाला, असा उल्लेख आढळतो.

पृ. ५८––संभाजीराजानी शिवाजीच्या मृत्यूनंतर पन्हाळ्याहून येऊन प्रसिद्ध मुत्सद्याचे व आप्तइष्टाचे अमानुषपणे खून केले असें जें बखरींतून आले आहे ते खोटे आहे. कारण संभाजी रायगडाहून आषाढ लागताच आला, व मोरोपंत पेशवे याचा मृत्यु श. १६०२ च्या आश्विनात (स. १६८० सप्टें. आक्टो.) झाला व लगेच त्याचे पुत्र निळोपंत यास सोडून पेशवाई दिली. सोयराबाई ही श. १६०३ आश्वीन व ११ (२७। १०।१६८१) स वारली. तसेच आण्णाजी दत्तो, बाळप्रभु, हिरोजी फर्जंद यास परळीखाली कैद करून मारविले; तेहि श. १६०३ च्या भाद्रपद महिन्यात (१६८१ आग. सप्टें.). तेव्हा ह्याच पृष्ठावरील टीपेंतील मजकूर ग्राह्य धरणें इष्ट आहे.

शुद्धि पत्र.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२	१३	राष्ट्र	राष्ट्र
७	२७	शाहुकालीन आहे	शके १७३२ मध्यें लिहिली आहे
९	२	मावळखोर	मावळ खोरें
११	३	महाराष्ट्रातील	महाराष्ट्रातील
१४	१	साये	सोय
१९	२५	विजीपुरकराचा	विजापुरकराचा
२२	१	प्रकरण मध्यें	प्रकरण ९ मध्ये
२३	२५	हणमतराव	प्रतापराव
२४	११	चैत्र व० ७	वैशाख
२६	२६	ऊर्फ	तर्फे
२७	११	आहै	आहे
३१	२१	१५८१	१५८२
३२	४	१५८२	१५८५
३२	(उ) (ऊ) (ऋ) ही कलमें (ई) च्या पुढें		
३२	११	+	*पान ३३ वरील टीप
३२	२२	*	+पान ३३ वरील टीप
३६	१	राजगड	रायगड
३६	११	वाळ	बाळ
३८	१५	दोऊन	होऊन
३८	१९	द्विपांत राहून	द्वीपातराहून

४०	२६	पादडते	सांपडतें
४१	२०	येसूबाई	जिजाबाई
४२	१२	राज्याभिषेकास	राज्याभिषेकासारखा
४२	१६	वेशापैकीं	वंशापैकीं
४३	२८	सईबाई	सोयराबाई
४४	४	,,	,,
४४	११	इशान्य	ईशान्य
४६	२१	ग्रहप्रवेश	गृहप्रवेश
४७	६	पासुन	पासून
४७	१७	कुलावताम	कुलावतंस
४८	२१	१२०००	१००००
४८	२४	सत्तोजीपंत	दत्तोजीपंत
५२	९	आमचा	आमच्या
५३	५	१८ जुन	१७ जून
५४	१२	खंड ६	खंड ८
५७	१३	वा॥	शुद्ध
५८	२५	अभिजात	अमानुष
[illegible]	२२	अभिजात	अलौकिक
६३	२४	वधाला	वधाचा
६५	१२	१६०२	१६१२
६७	४	सिंव्हासनाचे	सिंहासनाचे
६८	१३	धनमंत्र्यास	धूर्त मंत्र्यास
७०	१२	पुर्ण	पूर्ण
७४	८	वैमम्य	वैषम्य
७४	२०	भेट	भेद

७९	८	घऊन	घेऊन
८५	६	स्पोटपणा	स्फोटकपणा
९७	१०	क्षरली	भरावेली
९९	४	राजनिष्ठेचा	अराजानिष्ठेचा
१०७	६	फडके	वडके
११८	१८	वरंध्याहून	वरंधेहून
११९	२६	स्यार्मीनीं	स्वामींनीं
१२२	१४	दोठ	दोन
१२२	१७	न्य	अं
१२८	२७	पवित्र पादत्राणे	पवित्र समजून पादत्राणे
१३६	१२	होणारा हा ग्रथ होय.	होणारे शि. च. मडळाचे ग्रथ होत.

